लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२- २०१३ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२) व
कृषी व पदुम (दुग्धव्यवसाय) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१.५), यावरील

अडतिसावा अहवाल

सत्यमेव जयते

(हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक २८ मार्च २०१८ रोजी सादर करण्यात आला)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई/नागपूर.
फेब्रुवारी/मार्च २०१८

लोकलेखा समिती

(२०१७-२०१८)

(तेरावी महाराष्ट्र विधानसभा)

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२- २०१३ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील
अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२) व
कृषी व पदुम (दुग्धव्यवसाय) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ३.१.५), यावरील

अडतिसावा अहवाल

एचबी ३३६१—१

लोकलेखा समिती

२०१७-२०१८

समिती प्रमुख

(१) श्री. गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

सदस्य

(२) श्री. शिवाजीराव नाईक, वि.स.स.

(३) श्री. नानाजी शामकुळे, वि.स.स.

(४) श्री. संजय सावकारे, वि.स.स.

(५) श्री. सुधाकर देशमुख, वि.स.स.

(६) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.

(७) श्री. अतुल भातखळकर, वि.स.स.

(८) श्री. योगेश सागर, वि.स.स.

(९) डॉ. सुनिल देशमुख, वि.स.स.

(१०) श्री. प्रशांत ठाकूर, वि.स.स.

(११) श्री. संजय केळकर, वि.स.स.

(१२) श्री. सुरेश ऊर्फ बाळुभाऊ धानोरकर, वि.स.स.

(१३) श्री. अजय चौधरी, वि.स.स.

(१४) श्री. शंभुराज देसाई, वि.स.स.

(१५) श्री. सत्यजीत पाटील-सरुडकर, वि.स.स.

(१६) श्री. अब्दुल सत्तार अब्दुल नबी, वि.स.स.

(१७) प्रा. विरेंद्र जगताप, वि.स.स.

(१८) श्री. दिलीप वळसे-पाटील, वि.स.स.

(१९) श्री. जयंत पाटील, वि.स.स.

(२०) श्री. राजेश टोपे, वि.स.स.

(२१) श्री. विजय ऊर्फ भाई गिरकर, वि.प.स.

(२२) श्री. रविंद्र फाटक, वि.प.स.

*(२३) श्री. हेमंत टकले, वि.प.स.

(२३अ) श्री. विक्रम काळे, वि.प.स.

(२४) श्री. अमरसिंह पंडित, वि.प.स.

(२५) श्री. अशोक ऊर्फ भाई जगताप, वि.प.स.

निमंत्रित

(२६) श्री. जयंत पाटील, वि.प.स.

सदरहू समिती दिनांक २४ ऑगस्ट, २०१७ रोजी विधानसभा व दिनांक ६ सप्टेंबर २०१७ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :

(१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.

(२) श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM).

(३) श्रीमती मेघना तळेकर, उप सचिव.

(४) श्री. अ. चां. कोल्हे, उप सचिव तथा नि.अ.

(५) श्री. सो. न. सानप, अवर सचिव.

(६) श्रीमती सुषमा पाठक, कक्ष अधिकारी.

(७) श्री. रविंद्र मेस्त्री, कक्ष अधिकारी.

*** श्री. हेमंत टकले, वि.प.स. यांनी आपल्या समिती सदस्य पदाचा राजीनामा दिल्याने रिक्त झालेल्या जागेवर श्री. विक्रम काळे, वि.प.स. यांची मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक १९ डिसेंबर २०१७ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन **भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या सन २०१२- २०१३ च्या आर्थिक क्षेत्र अहवालामधील अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. २.२) व कृषी व पदुम (दुग्धव्यवसाय) विभागाशी संबंधित (परिच्छेद क्र. ५.३),** यावर विचार करून लोकलेखा समितीचा अडतिसावा अहवाल सादर करीत आहे.

समितीने दिनांक ८, ९, २४ व ३१ जानेवारी, २०१८ रोजी प्रधान सचिव, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग तसेच सचिव, कृषी व पदुम (दुग्धव्यवसाय) विभाग व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष विधानभवन, मुंबई येथे घेण्यात आली.

प्रधान महालेखाकार, लेखापरीक्षा-एक महाराष्ट्र, मुंबई तसेच महालेखाकार, लेखापरीक्षा-दोन महाराष्ट्र, नागपूर हे समितीच्या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होते. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागारे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांचे देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासित माहिती व परिपत्रके परिशिष्ट " अ " मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट " ब " मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २० व २६ मार्च, २०१८ रोजीच्या बैठकीत प्रारुप अहवाल विचारात घेतला व त्यातील शिफारशीवर सुधारणा सुचवून प्रारुप अहवालाला मान्यता दिली.

विधान भवन,
मुंबई/नागपूर,
दिनांक २६ मार्च २०१८.

गोपालदास अग्रवाल,
समिती प्रमुख,
लोकलेखा समिती.

अनुक्रमणिका

अ.क्र.	विभाग व तपशील	पृष्ठ क्रमांक
(१)	(२)	(३)
	प्रस्तावना	(पाच)
(१)	**अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग**	१
	(परिच्छेद क्र. २.२)	
(२)	**कृषी व पदुम (दुग्धव्यवसाय) विभाग**	९७
	(परिच्छेद क्र. ३.१.५)	

अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. २.२ " महाराष्ट्रात निर्धारीत सार्वजनिक वितरण प्रणालीची अंमलबजावणी " यासंदर्भात महालेखापरीक्षकांनी खालील अभिप्राय दिले आहेत.

१.१ परिच्छेद क्र.२.२.८.१-लाभार्थ्यांचे अयोग्य परिक्षण-

महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार (नोव्हेंबर, १९९९/ऑगस्ट २००१), रु. १५,००० पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या ज्या कुटुंबांना १९९७-९८ BPL कुटुंबांविषयीच्या एकात्मिक ग्रामविकास योजनेच्या (IRDP) यादीत समाविष्ट केले होते, ती कुटुंबे TPDS अंतर्गत ग्रामीण क्षेत्रात BPL शिधापत्रिका मिळण्यास पात्र होती, परंतु त्याकरिता त्यांच्याकडे दुचाकी किंवा चार चाकी वाहनाची मालकी नसणे, गॅस जोडणी प्राप्त नसणे इत्यादी इतर अटींची पूर्तता होणे गरजेचे होते. शहरी क्षेत्रात, ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. १५,००० पेक्षा कमी होते आणि ज्यांचे स्वत:चे दुचाकी किंवा चार चाकी वाहन आणि गॅस जोडणी नव्हती ती कुटुंबे BPL शिधापत्रिका मिळण्यास पात्र होती. मे, २००५ मध्ये स्वत:च्या मालकीची दुचाकी आणि गॅस जोडणी नसणे हा निकष विभागाकडून काढून टाकण्यात आला होता. लेखापरिक्षेला खालील बाबी आढळून आल्या :

- PDS (नियंत्रण) आदेश, २००१ नुसार विभागाने BPL आणि AAY कुटुंबांच्या यादीचे दरवर्षी अपात्र कुटुंबे वगळण्यासाठी आणि पात्र कुटुंबांना सम्मिलीत करण्यासाठी पुनर्विलोकन करायला हवे होते. वर्ष २००९ आणि २०११ या दोन वर्षांमधील ज्या विशेष मोहिमांद्वारे १.५० लक्ष आणि १.२५ लक्ष BPL शिधापत्रिका रद्द केल्या गेल्या, त्या मोहिमांचा अपवाद वगळता वर्ष २००८-१३ या कालावधीत विभागाने कोणत्याही वर्षात BPL आणि AAY कुटुंबांच्या यादीचे पुनर्विलोकन केले नव्हते.

- ग्रामविकास विभागाकडून (RDD) वर्ष २००२ मध्ये लाभार्थींचे सर्वेक्षण करण्यात आले होते आणि नोव्हेंबर, २००६ मध्ये BPL कुटुंबांची एक सुधारित यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. सुधारित यादीप्रमाणे, ग्रामीण क्षेत्रात BPL कुटुंबांची संख्या ४५.०२ लक्ष होती. विभागाने जानेवारी, २०१० मध्ये ग्रामीण विभागातील BPL लाभार्थ्यांच्या केलेल्या तुलनेत असे आढळून आले की, वर्ष २००६ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार २६.६९ लक्ष नवीन कुटुंबे BPL साठी पात्र ठरली होती, तर याआधी १९९७ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात सम्मिलित केलेली २६.८४ लक्ष कुटुंबे आता अपात्र असल्याचे आढळून आले होते. तथापि, यादीचे पुनर्विलोकन आणि सुधार न केल्यामुळे रु. २,१०२.७१ कोटी किंमतीच्या ४२.२३ लक्ष मे.टन अन्नधान्याचे अपात्र लाभार्थ्यांना वर्ष २००८-१३ दरम्यान वाटप झाले होते तर २६.६९ लक्ष BPL कुटुंबे सवलतीच्या दराने अन्नधान्य मिळण्याच्या लाभापासून वंचित राहिली होती.

- शहरी क्षेत्रात २००५ मध्ये नगरविकास विभागाकडून (RDD) लाभार्थ्यांचे सर्वेक्षण केले होते आणि BPL कुटुंबांची संख्या १५.२० लक्ष निश्चित केली होती (मे, २०१३).

- RDD आणि UDD कडून राज्यात मागील सर्वेक्षणात निश्चित केलेल्या BPL कुटुंबांची संख्या ५९.६७ लक्ष होती. मात्र, मे, २०१३ पर्यंत TPDS अंतर्गत BPL शिधापत्रिकाधारकांची संख्या ६७.८२ लक्ष होती. अशाप्रकारे विभागाने RDD आणि UDD च्या सर्वेक्षणवर आधारित BPL शिधापत्रिकांचे पुनर्विलोकन न केल्यामुळे राज्यात ८.१५ लक्ष जास्तीचे BPL शिधापत्रिकाधारक होते.

शासनाने असे नमूद केले (नोव्हेंबर, २०१३) की RDD ने केलेल्या सर्वेक्षणाच्या आधारावर २० लक्ष अपील दाखल केले गेले होते व मे, २०१३ पर्यंत अपील निर्णित असतांना यादीत १.४७ लक्ष कुटुंबे वगळण्यात आली होती तर ०.९२ लक्ष कुटुंबांची भर पडली, अशा रितीने एकंदर BPL कुटुंबे ४४.४७ लक्ष झाली होती. अशा रितीने मे, २०१३ पर्यंत RDD आणि UDD कडून निर्धारित केलेल्या BPL कुटुंबांची एकूण संख्या ५९.६७ लक्ष (४४.४७ लक्ष + १५.२० लक्ष) होती. शासनाने पुढे असेही नमूद केले की, अपिल निर्णित करण्याआधीची BPL सर्वेक्षणाची माहिती जर विचारात घेतली असती तर BPL लाभार्थ्यांची व्याप्ती कमी झाली असती, परिणामत: योजनेअंतर्गत अन्नधान्यावर मोठ्या प्रमाणावर सूट मिळण्याच्या लाभास मुकावे लागले असते.

हे उत्तर स्वीकारणीय नाही कारण, पात्र लाभार्थ्यांनाच सवलतीच्या दराने अन्नधान्याचे वितरण व्हावे हेच शासनाचे उद्दीष्ट होते. तसेच, अपिल निर्णित झाल्यानंतरही, राज्यात ५९.६७ लक्ष BPL कुटुंबे होती तर मे, २०१३ पर्यंत ६७.८२ लक्ष BPL शिधापत्रिकाधारक होते.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ दिनांक ५ जुलै, २०१३ पासून राज्यात लागू करण्यात आला. सदर योजनेत ७५% ग्रामीण तर ५०% शहरी लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण योजनेचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांना ३५ किलो/माह धान्य मिळेल, तर उर्वरित लाभार्थ्यांना ५ किलो/माह धान्य मिळेल.

पूर्वी लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण योजनेत ८.७७ दशलक्ष लाभार्थी होते. तर आता राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत दि.१ फेब्रुवारी, २०१४ रोजी ७ दशलक्ष लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे.

राज्य शासनाने त्यांच्या दि.१७.०८.२०१३ च्या शासन निर्णयान्वये सर्व रास्तभाव दुकानांची नियमित तपासणी करावी तसेच सदर तपासणी करतानाच ५% शिधापत्रिका (Random) तपासणी करण्याबाबत सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविले आहे.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमाची अंमलबजावणी राज्यात दि.१ फेब्रुवारी, २०१४ पासून सुरू झाली. सदर योजनेत दोन शिधापत्रिकांचा म्हणजेच अंत्योदय अन्नयोजना व प्राधान्य कुटूंब गटाचा समावेश होतो. दि.१ फेब्रुवारी, २०१४ पूर्वी अस्तित्त्वात असलेले अंत्योदय अन्न योजना व दारिद्रयरेषेखालील शिधापत्रिकाधारकांचा समावेश पूर्णत: सदर अधिनियमांतर्गत करण्यात आलेला आहे. तर याशिवाय जे अंत्योदय अन्न योजना लाभार्थी आधी नमूद केल्याप्रमाणे उत्पन्नाचा निकष पूर्ण करतील त्यांनाही सदर योजनेचा लाभ दिला जाईल.

मंत्रिमंडळाच्या उप समितीने केलेल्या शिफारशीनुसार शासनाने त्यांच्या दि.१७.१२.२०१३ च्या शासन निर्णयान्वये शहरी भागात रु. ५९,०००/- तर ग्रामीण भागात रु. ४४,०००/- वार्षिक उत्पन्न मर्यादा असणा-या व्यक्तीस सदर योजनेचा लाभ मिळण्यास पात्र ठरविण्यात येईल, असे कळविले आहे. केंद्र शासनाने राज्यासाठी राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियमांतर्गत अंत्योदय अन्न योजनेसाठी २५.०५ लक्ष एवढा इष्टांक निर्धारित केला होता. तथापि, डिसेंबर, २०१४ पर्यंत राज्यात २४.६४ लक्ष एवढे लाभार्थी निश्चित करण्यासाठी इष्टांकांची विविध जिल्हयात पुन:श्च विभागणी करण्याबाबत शासन पत्र क्र. साविव्य २०१५/सीआर-३/नापु-२८, दि. ३० मार्च, २०१५ अन्वये कळविण्यात आले आहे.

दारिद्रयरेषेखालील कुटुंबांच्या यादीचे अद्ययावतीकरण ही निरंतर प्रक्रीया असल्याने, सदर यादीचे वेळोवेळी अद्ययावतीकरण करणे, अपात्र व्यक्तींची नावे यादीतून वगळणे इ. कार्यवाही करण्याबाबत शासन निर्णय दि.२२.२.२०१०, दि.२५.३.२०१०, दि.२७.८.२०१० अन्वये आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत धान्य वितरणाचा लाभ देण्यासाठी सर्व अंत्योदय लाभार्थ्यांना पात्र लाभार्थी म्हणून गणण्यात आले आहे.

अन्नसुरक्षा - २०१३ अंतर्गत सर्व बीपीएल लाभार्थ्यांना प्राथम्य कुटुंब गटात समाविष्ट करण्यात येऊन त्यांना लाभ देण्यात आला तर उर्वरीत लाभार्थी हे अंत्योदय गटातून निवडण्यात आले.

दि.१३.१०.२०१६ च्या शासन निर्णयान्वये सर्व जिल्ह्यासाठी नवीन लाभार्थी निवडण्यासाठी १५० लाख इतका इष्टांक देण्यात आला आहे. सदर यादीत दि. ३०.९.२०१३ पूर्वीचे नवीन लाभार्थ्यांचाही यात समावेश करण्यात येईल.

सामाजिक, आर्थिक व जातनिहाय सर्वेक्षण-२०११ संदर्भातील सर्वेक्षणचे कामकाज पूर्ण झाले असून त्यानूसार अंतिम याद्या दि.२१.०३.२०१६ अखेर प्रसिद्ध झाल्या आहेत.

१.२ परिच्छेद क्र.२.२.८.२-शिधापत्रिकांचे पुनर्विलोकन-

PDS (नियंत्रण) आदेश २००१ नुसार शिधापत्रिका पूर्वी निलंबित अथवा रद्द केली नसेल तर ती जारी केलेल्या तारखेपासून पाच वर्षांपर्यंत वैध असते. तसेच आधीच्या माहितीची नव्याने पडताळणी करून आणि महाराष्ट्र शासनाने विहित केलेल्या इतर चाचण्या पूर्ण करून पुन्हा किंवा नवीन शिधापत्रिका जारी करता येते किंवा तिचे नुतनीकरण करता येते. लेखापरिक्षेत खालील गोष्टी आढळून आल्या:

- चाचणी तपासणी केलेल्या चार कार्यालयांमध्ये (DSOS. बीड, नंदुरबार, जळगाव आणि ठाणे शिधावाटप क्षेत्र) स्वघोषाणापत्र आणि प्रतिज्ञापत्राच्या आधारावर आवेदकांना शिधापत्रके जारी करण्यात आली होती. विभागाने आवेदनपत्रात दिलेला चारचाकी वाहने, जमिनीच्या मालकीचा तपशील इत्यादीची खात्री करून अपात्र शिधापत्रके रद्द करण्यासाठी इतर शासकीय विभागांबरोबर जसे महसूल विभाग आणि प्रादेशिक परिवहन विभाग यांच्याशी समन्वय साधला नव्हता.

- काही प्रकरणांमध्ये आवेदनाच्या प्रपत्रांमध्ये सादर केलेल्या अपूर्ण माहितीच्या आधारावर शिधापत्रिका देण्यात आल्या होत्या, उत्पन्न घोषित करण्यात आले नव्हते आणि जिल्हा शिधावाटप क्षेत्रांच्या शिधावाटप प्राधिका-यांकडून अधिप्रमाणन करण्यात आले नव्हते.

- चाचणी तपासणी केलेल्या चार कार्यालयांत (अमरावती, बीड, जळगाव आणि नंदूरबार) को-या शिधापत्रिकांचा लेखा ठेवण्यात आला नव्हता आणि वर्ष २००८-१३ दरम्यान शिधापत्रिकांच्या साठ्याची प्रत्यक्ष पडताळणी केली नव्हती. शिधापत्रिका अयोग्य पद्धतीने ठेवल्यामुळे शिधापत्रिकांचा अवैध वापर होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती.

शासनाने असे नमूद केले (नोव्हेंबर, २०१३) की, शिधापत्रिका वाटप करतांना घेण्याची दक्षता, को-या शिधापत्रिकांची काळजी घेण्यासाठी अवलंब करायच्या पद्धतीबाबत तपशिलवार निर्देश जून, २०१३ मध्ये जारी केले आहेत.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

नवीन शिधापत्रिका देणे व अपात्र शिधापत्रिका शोधण्यासाठी राज्य शासनाने खालील ४ शासन मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत.

(अ) शासन निर्णय, दि.२९.०६.२०१३ :- नवीन शिधापत्रिका देण्यासाठीचा अर्ज स्वीकारतानाच्या अटी व शर्ती, अर्जाची छाननी याबाबतची कार्यपद्धती.

(आ) शासन निर्णय, दि.१५.०७.२०१३ :- अपात्र शिधापत्रिकांबाबतची चौकशी वरिष्ठ स्तरावर करण्याबाबत व सदर चौकशी विभागीय आयुक्तांमार्फत.

(इ) शासन निर्णय, दि.१७.०८.२०१३ :- विविध पातळीवर कार्यरत दक्षता समिती सदस्यांचे प्रत्यक्ष सहभाग. अपात्र शिधापत्रिकांचे रद्द करणे.

(ई) शासन निर्णय, दि.२६.०८.२०१३ :- शिधापत्रिका वितरणातील अनियमितता करणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्याविरूद्ध कारवाई करण्याबाबत.

राज्य शासनाने त्यांच्या दि.२१.०७.२०१७ च्या पत्रान्वये अपात्र शिधापत्रिका रद्द करणे व नवीन वितरीत केलेल्या शिधापत्रिकांची तपासणी (Cross Verification) करण्याच्या सूचना सर्व विभागीय आयुक्तांना निर्गमित केल्या आहेत.

उपरोक्त नमून सूचना व उपाय योजनांव्यतिरिक्त राज्य शासनाने सर्व शिधापत्रिकांचे संगणकीकरण करून सर्व शिधापत्रिका आधार कार्डसोबत जोडण्याचे पाऊल उचलले असून त्यासोबतच संपूर्ण सार्वजनिक वितरण योजनेसाठी Biometric प्रणालीचा वापर करण्याची कार्यवाही सुरू केली आहे.

अपात्र शिधापत्रिकांचा शोध घेऊन त्या रद्द करण्यासाठी वरील उपाययोजना केलेल्या आहेत.

पात्र लाभार्थ्यांना बारकोडेड शिधापत्रिका देऊन त्याआधारे त्यांना देण्यात येणारे धान्य हे त्यांच्या आधार कार्डाच्या बायोमेट्रिक ओळखपत्राच्या साहायाने पडताळून घेण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला आहे. आधार कार्डातील लाभार्थ्यांची ओळख बायोमेट्रिक असल्याने यामुळे अपात्र लाभार्थी शोधण्यास मदत मिळेल. यास्तव, या कामी विभागाने इतर विभागांची मदत घेतलेली नाही.

अर्जदाराने दिलेला नमुना बी १,१५,८ चे अर्ज व त्यासोबतची माहिती याबाबत संबंधित कार्यक्षेत्राच्या शिधावाटप निरीक्षकामार्फत प्रत्यक्ष पडताळणीअंती प्राप्त अहवालानुसार कार्यवाही करण्यात येते. शिधापत्रिका मिळण्यासाठी खोटी माहिती देणे हा दखलपात्र गुन्हा असून महाराष्ट्र फूड ग्रेन्स रेशनिंग (सेकंड) रेग्युलेशन, १९६६ नुसार, शिधापत्रिका रद्द करण्यात येते व खोटी माहिती देणा-याविरूद्ध फौजदारी कारवाई करण्यात येते.

२०११ नंतर अपात्र/बोगस शिधापत्रिका संबंधिची कोणतीही योजना राबविण्यात आली नाही. रोस्टरनुसार घेण्यात येणा-या अधिकृत शिधावाटप दुकानांच्या तपासणीवेळी त्या दुकानाच्या ५० शिधापत्रिका गृहभेटीदरम्यान पडताळल्या जातात.

१.३ परिच्छेद क्र. २.२.९ वित्तीय व्यवस्थापन

विभागाचा एक स्वीय प्रपंजी लेखा (PLA) असतो जो वित्तीय सल्लागार व उपसचिव सांभाळतात. पत्येक DSO कडे सुद्धा एक PLA असतो, ज्यात वित्तीय सल्लागार व उपसचिव निधीचे हस्तांतरण करतात. विभागाच्या महसूली आणि भांडवली खर्च शिर्षाखालील वर्ष २००८-०९ ते २०१२-१३ दरम्यान अर्थसंकल्पीय अंदाज आणि प्रत्यक्ष खर्च खालीलप्रमाणे होता.

तक्ता क्र.१ भांडवली आणि महसूली-अंदाज आणि खर्च

(रुपये कोटीत)

वर्ष	महसूली		भांडवली		अधिक्य(+) बचत (-)	
२००८ ते २०१३	अंतिम अंदाज	प्रत्यक्ष खर्च	अंतिम अंदाज	प्रत्यक्ष खर्च	महसूली	भांडवली
०८-०९	५८०.२८	४८१.४४	२११५.३१	२३१५.४०	-९८.८४	+२००.०९
०९-१०	६८३.८१	६७५.७९	४००९.८६	३७७८.५०	-८.०२	-२३१.३६
१०-११	७३६.७८	७३४.५४	४१२४.३७	३६७२.२७	-२.२४	-४५२.१०
११-१२	४३१.४१	४३१.६५	३८७१.६७	३४१६.९२	+०.२४	-४५४.७५
१२-१३	४८४.५१	४७७.६९	४१३९.३१	३२५४.४०	-६.८२	-८८४.९१

विभागाने असे नमूद केले (नोव्हेंबर, २०१३) वर्ष २००८-०९ दरम्यान अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा भांडवली खर्चावर झालेला अधिक खर्च हा PLA निधीतून करण्यात आला होता. हा वाढीव खर्च पामतेल, तांदुळ आणि गहू यांच्या वाढीव किंमतीला प्रतिबंध करण्यासाठी, त्याची खरेदी आणि वितरण करण्यासाठी झाला होता. विभागाने पुढे असेही नमूद केले की, २००९-१३ दरम्यान झालेली बचत ही अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीतील तांत्रिक अडचणीमुळे (२००९-१०), निधी उशिराने प्राप्त झाल्यामुळे (२०१०-११), विभागाने शिधापत्रक पुनर्विलोकनाची मोहीम राबविल्यामुळे लाभार्थ्यांच्या संख्येत झालेली घट (२००९ आणि २०११) आणि एप्रिल, २०१३ महाराष्ट्र शासनाने जिल्हानिहाय अन्नधान्याच्या वाटपाचे आदेश उशीराने जारी केल्यामुळे झाली होती.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

तक्ता क्र.१-विनियोजनानंतर भांडवली आणि महसूली-अंदाज आणि खर्च

(रुपये कोटीत)

अ.क्र.	वर्ष	महसुली					भांडवली				
		अंतिम अंदाज	खर्च म.ले.	विभाग	NOE	फरक	अंतिम अंदाज	खर्च म.ले.	विभाग	NOE	फरक
१	०८-०९	५९७.३१	४९६.४७	४९६.४७	-	-१००.८४	२१२२.८३	२१८९.५३	२३३७.४४	१४७.९१	२१४.६१
२	०९-१०	६९९.९७	६९०.०८	६९०.०८	-	-९.८९	४०१०.९५	३७७८.५३	३७७८.४९	.०४	-२३२.४६
३	१०-११	७५३.५९	७५१.७०	७५१.७०	-	-१.८९	४१२६.३७	३६६९.४६	३६७२.२७	२.८१	-४५४.१०
४	११-१२	४५३.०५	४५१.६९	४५१.६९	-	-१.३६	३९१०.८०	३४०६.१५	३४१६.९१	१०.७६	-४९३.८९
५	१२-१३	५११.३३	५०१.९०	५०१.९१	.००८७	-९.४२	४२१४.३१	३३१४.०५	३३१४.१२	०.०६९८	-९००.१९

अ.क्र.१- -२००८-०९ महसूली- परत केलेली रक्कम १०२.७४५८ सहाव्या वेतन आयोगाप्रमाणे वेतन निश्चिती न झाल्याने वेतन उद्दिष्टाखालील व्यावसायिक बचत तसेच सुधारित अंदाजपत्रकाप्रमाणे वित्त विभागाने अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर तरतुद मुक्त न केल्यामुळे बचत झाली. बचतीची रक्कम विहीत मुदतीत समर्पित केली आहे.

अ.क्र.१-२००८-०९-भांडवली- सन २००८-०९ या आर्थिक वर्षात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने भाववाढ रोखण्यासाठी पामतेल, तांदुळ व गहु खरेदीसाठी योजना राबविण्यात आल्याने पतमर्यादेच्या खर्चात वाढ झाली आहे. रु.६६.७० कोटी अधिक खर्चास विधानसभेने मान्यता दिली असुन सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१ **महाराष्ट्र शासन राजपत्र,** असाधारण भाग-४, दि.२९.१२.२०१४ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे.

अ.क्र.२-२००९-१०-महसूली-समर्पित केलेली रक्कम रु.९.८९ कोटी पदे रिक्त असल्यामुळे खर्चात बचत झाली आहे. बचतीची रक्कम विहीत मुदतीत समर्पित केली.

अ.क्र.२-२००९-१०-भांडवली-समर्पित अनुदान रु.२१०.२५ अर्थसंकल्प वितरण प्रणालीवरून BDS काढण्याकरिता तांत्रिक अडचणी आल्यामुळे पूर्ण पतमर्यादा उपयोगात न आल्यामुळे तसेच अन्नधान्याचे उचल/वाटप कमी झाल्यामुळे बचत झाली. व बचतीची रक्कम विहित मुदतीत समर्पित केली.

अ.क्र.३-२०१०-११-महसुली-समर्पित केलेली रक्कम रु.२.३८ कोटी रिक्त पदे न भरल्यामुळे वेतनात बचत झाली. तसेच इतर उद्दिष्टांखालील अपेक्षित देयके प्राप्त झाली नाहीत. मार्च अखेरीस अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीवर तांत्रिक अडचणीमुळे देयके प्राधिकार काढता आली नाहीत, त्यामुळे खर्चात बचत झाली व बचतीची रक्कम विहित मुदतीत समर्पित केली.

अ.क्र.३-२०१०-११-भांडवली-समर्पित केलेली रक्कम रु.४५१.१० कोटी पुरवणी मागणीची रक्कम विलंबाने प्राप्त झाल्यामुळे धान्याची उचल जिल्हा कार्यालयाकडून करण्यात आलेली नाही. त्यामुळे रु.४४९.६० कोटी समर्पित सा.बा.विभाग, सांगली यांचेकडून दि.३१.३.२०११ पर्यंत रक्कम खर्च न झाल्यामुळे समर्पित केली. त्यामुळे बचत झाली व बचतीची रक्कम विहित मुदतीत समर्पित केली.

अ.क्र.४-२०११-१२ - महसुली- समर्पित केलेली रक्कम रु.२.२७ कोटी कर्मचारी वेतन व भत्त्यांची पुरक देयके, कार्यालयीन खर्च व इतर उद्दिष्टांखालील देयके वेळेवर प्राप्त न झाल्यामुळे खर्चात बचत झाली व बचतीची रक्कम विहित मुदतीत समर्पित केली.

अ.क्र.४-२०११-१२ -भांडवली- समर्पित केलेली रक्कम रु.५११.२६ कोटी जिल्ह्यातील लाभार्थींची संख्या घटल्यामुळै अन्नधान्य उचल कमी होऊन खरेदी न झाल्यामुळे अन्नपूर्णा योजनेअंतर्गत लाभार्थी कमी झाल्यामुळे बचत झाली. तसेच गोदाम बांधकाम (मुफसल) योजने अंतर्गत रक्कम वित्त विभागाने मंजूर अनुदानाच्या ९०% बिम्स् प्रणालीवर मुक्त केल्यामुळे बचत झाली व बचतीची रक्कम विहित मुदतीत समर्पित केली.

अ.क्र.५-२०१२-१३-महसुली- रु.९.५० कोटी समर्पित-कर्मचारी वेतन, भत्त्यांची फरक देयके, कार्यालयीन खर्च व इतर उद्दिष्टांखालील देयके वेळेवर प्राप्त न झाल्यामुळे रिक्त पदे, सा.बां.विभागाकडून गोदाम दुरुस्तीच्या बांधकामाच्या निविदा प्रक्रिया वेळेत न झाल्यामुळे, केंद्रिय अन्नपूर्णा लाभार्थींची संख्या कमी झाल्यामुळे तसेच वित्त विभागाने मूळ मंजूर अनुदानाच्या ८०% रक्कम मुक्त केल्यामुळे बचत झाली आहे. बचतीची रक्कम विहित मुदतीत समर्पित करण्यात आली आहे.

अ.क्र.५-२०१२-१३-भांडवली-रु.८८०.९० कोटी समर्पित- अन्नधान्य उचलीचे जिल्हानिहाय वाटपाचे शासन आदेश दि.३१.३.२०१३ रोजी निर्गमित झाल्यामुळे माहे एप्रिलचे नियतन जिल्ह्यांकडून उचल करण्यात आले नाही. व खरेदीच्या रक्कमा समर्पित कराव्या लागल्या. (रु.८६०.४० कोटी) वित्त विभागाने मुळ मंजूर अनुदानाच्या ८०% रक्कम मुक्त केल्यामुळे, केंद्रिय अन्नपूर्णा योजनेच्या लाभार्थींची संख्या कमी झाल्यामुळे नाबार्ड अर्थसहाय्यित नवीन गोदामांचे बांधकाम सा.बां.विभागाकडून सुरू न झाल्यामुळे बचत झाली. बचतीचा रकमा विहित मुदतीत समर्पित करण्यात आल्या आहेत.

तक्ता क्र.१-२००८-०९ ते २०१२-१३-महसुली अंदाज व खर्च

सन २००८-०९ ते २०१२-१३ या पाच वर्षाची आकडेवारी पहाता (२००८-०९ ते २०१०-११ या तीन वर्षात) अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाने जीवनावश्यक वस्तुंची भाववाढ रोखण्यासाठी ५ आवश्यक वस्तूंचे दर स्थिर ठेवण्याचा शासनाने निर्णय घेऊन पुरवणी मागणीद्वारे अनुदान उपलब्ध करून घेण्यात आले होते. त्यामुळे प्रतिवर्षी अर्थसंकल्पित रक्कम वाढत गेलेली आहे. तसेच २००८-०९ वर्षासाठी लोकलेखा समितीची बैठक होऊन समितीने विभागाचे अनुपालन मान्य केले आहे. रु. ३९.६५ लाख अधिक खर्चास विधानसभेने मान्यता दिली असून सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१ महाराष्ट्र **राजपत्र** असाधारण भाग-४, दि.२९.१२.२०१४ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे (प्रत जोडली आहे.) **(विवरण पत्र क्र.१)**

वित्तिय वर्ष २०११-१२ व २०१२-१३ मध्ये तरतुदीत नियमित वार्षिक वाढ असून मागील वर्षाप्रमाणे पुरवणी मागणी किंवा सुधारीत अंदाजात वाढ नसल्यामुळे २०११-१२ च्या तुलनेत २०१२-१३ मध्ये कमी तरतूद आढळून येत आहे.

तक्ता क्र.१-२००८-०९ ते २०१२-१३ भांडवली अंदाज व खर्च

सन २००८-०९ ते २०१२-१३ या पाच वर्षाची आकडेवारी पहाता २००८-०९ वगळता खर्चात बचत आढळून येत आहे. सदर बचती या प्रामुख्याने अन्नधान्य खरेदीवर अवलंबून असतात. वि.स.उ.स. कार्यालय व जिल्हा कार्यालय यांना सार्वजनिक वितरण व्यवस्था व विभागाच्या इतर योजना राबविण्यासाठी स्वतंत्र स्वीय प्रपंजी लेखा खाते दिलेले आहेत. या लेख्यातील रकमा खर्च करण्यासाठी अर्थसंकल्पिय वितरण प्रणालीवर ४४०८ ००७७ व ४४०८ ००९५ या लेखाशिर्षा खाली पतमर्यादा उपलब्ध करून दिली जाते. जिल्ह्यांना किंवा विसउस कार्यालयात स्वीय प्रपंजी लेख्यातून रकमा खर्ची टाकण्यासाठी अर्थसंकल्प वितरण प्रणालीवरही पतमर्यादा असणे अनिर्वाय आहे. त्यामुळे सदर पतमर्यादेच्या तरतुदी या प्रत्यक्ष खर्चाच्या रकमा नसून अर्थसंकल्प वितरण प्रणालीवर दिलेल्या पतमर्यादेच्या रकमा आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्था ही अवितरीत चालू राहणारी योजना आहे. या योजनेच्या व्यवहारात बाधा व अडथळा येऊ नये म्हणून ४४०८ या लेखाशिर्षाखाली मागील अंदाजपत्रकावर व अंदाजित नियतन यावर आधारीत प्रस्तावित केल्या जातात. त्यामुळे २००८-०९ वर्ष वगळता इतर चारही वर्षात या लेखाशिर्षाखाली बचत आढळून येत आहे.

वित्तीय वर्ष २००८-०९ मध्ये अर्थसंकल्पित वर्षाच्या मध्यानंतर भाववाढ रोखण्यासाठी पामतेल, तांदुळ, गहू खरेदी करून वाटप करण्यासाठी योजना राबविण्यात आल्याने पतमर्यादेच्या खर्चात वाढ झालेली आढळून येत आहे. (विवरण पत्र क्र. २) सदर अनुपालन २००८-०९ वर्षासाठी झालेल्या लोकलेखा समितीच्या बैठकीत सादर करण्यात आले असून बैठकीत अनुपालन मान्य करण्यात आले आहे. रु.६६.७० कोटी अधिक खर्चास विधानसभेने मान्यता दिली असून सन २०१४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४१ **महाराष्ट्र शासन राजपत्र** असाधारण भाग-४ दि.२९.१२.२०१४ मध्ये प्रसिद्ध करण्यात आला आहे. (सोबत प्रत जोडली आहे.) **(विवरण पत्र क्र. १)** सदर कमी/अधिक खर्च हा सार्वजनिक वितरण व्यवस्था लोकहितास्तव सुरळीत व व्यवस्थित चालू राहण्यासाठी झालेला आहे. सदरचा अधिक खर्च/बचत ही त्या त्या आर्थिक वर्षात निमार्ण झालेल्या तांत्रिक कारणांमुळे प्राप्त परिस्थितीत अचूक अर्थसंकल्पिय अंदाज वर्तविणे शक्य होत नाही. त्यामुळे झालेला आहे. त्यामध्ये अनियमितता झालेली नाही. तरी वरील खुलासा मान्य करण्यात यावा व परिच्छेद २.२.९ वगळण्यात यावा ही विनंती.

१.४ परिच्छेद क्र. २.२.९.१ सबसिडीचे अनियमित आहरण

CIP अधिक हाताळणी आणि प्रशासनीक खर्च आणि गोदामातून माल निर्गमित करतानाची त्याची किंमत यातील तफावतीची रक्कम ही महाराष्ट्र शासनाकडून सबसिडी म्हणून देण्यात येते. नोव्हेंबर, १९९२ च्या शासन निर्णयानुसार (GR) अन्नधान्य, पामतेल आणि इतर वस्तूंच्या खरेदीवर अनुक्रमे १२%, ५% आणि ६% असा हाताळणी आणि प्रशासनिक खर्च ठरविण्यात आला होता. वर्ष २००८-१३ दरम्यान विभागाला रु.१९०४.३१ कोटी सबसिडी प्राप्त झाली होती. लेखा परिक्षेला खालील बाबी आढळून आल्या

वर्ष २००९-१२ दरम्यान AAY योजने अंतर्गत तांदूळ आणि गव्हाच्या वितरण, हाताळणी आणि प्रशासनिक खर्चाची टक्केवारी महाराष्ट्र शासनाने १९९२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे १२% ऐवजी २०% हिशेबात धरण्यात आली, परिणामतः रु.४१.२५ कोटीची जास्तीची सबसिडी देण्यात आली.

वर्ष २००९-१२ दरम्यान, विभागाने मागील वर्षीच्या अन्नधान्याची उचल विचारात न घेता, शिधापत्रिकांच्या संख्येवर आणि प्रति पत्रिका अनुज्ञेय असणा-या धान्याच्या आधारावर सबसिडी अंदाजित केली होती. आणि रु.१२८४.४२ कोटी सबसीडी प्राप्त केली होती. विभागाने या कालावधीसाठी गणन केलेली (ऑगष्ट,२०१२) प्रत्यक्ष सबसिडी रु.५९१.९२ कोटी इतकी होती. परिणामतः रु.६९२.५० कोटीच्या सबसिडीचे अनियमित आहरण झाले होते जी PLA मध्ये पडून होती.

वर्ष २००८-०९ आणि २०१२-१३ साठी विभागाने सबसिडीपोटी रु.६१९.८९ कोटी प्राप्त केले होते, तथापि जिल्ह्यांकडून मागणी प्रतिक्षित असल्यामुळे विभागाने सबसिडीचे गणन केले नव्हते.

शासनाने असे सांगितले (नोंव्हेबर,२०१३) की, दोन्ही योजनांमध्ये हाताळणी व प्रशासनिक खर्च सारखाच असुन AAY अंतर्गत अन्नधान्याची CIP कमी असल्याने AAY अंतर्गत हाताळणी व प्रशासनिक खर्चाची CIP टक्केवारी BPL पेक्षा कमी येते. शासनाने पुढे असेही नमूद केले की, रु.६९२.५० कोटीची उर्वरीत सबसिडी वर्ष २००९-१२ कालावधीच्या APL/BPL च्या साखर, तूरडाळ आणि पामतेलावरील सबसिडी निर्णित करतांना, वित्त विभागाला सूचित करून समायोजित केली जाईल.

हे उत्तर स्वीकारणीय नाही. कारण, १९९२ च्या शासन निर्णयानुसार, अन्नधान्याची खरेदी किंमत विचारात न घेता, १२ टक्के दराने हाताळणी आणि प्रशासनिक खर्च आकारावयाचा होता. तसेच, उर्वरीत रु.६९२.५० कोटी सबसिडीचे अंतिम समायोजन लेखापरीक्षेला प्रतिक्षीत होते. (जानेवारी,२०१४)

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

लाभार्थ्यांना धान्य प्रत्यक्ष उपलब्ध करून देण्यासाठी FCI कडून खरेदी झाल्यानंतर त्याची शासकीय गोदामापर्यंत वाहतूक करण्यासाठी, साठवणूक, सुरक्षा, हमाली तसेच दुकानदारांचे मार्जिन इत्यादीसाठी जो अनुषंगिक खर्च येतो त्याचे दर शासन निर्णय नोव्हेबर, १९९२ नुसार निश्चित केले आहेत. तथापि सद्यस्थितीत धान्य खरेदीचे व विक्रीचे दर, वाहतुकीचे दर, गोदाम भाडे, हमाली इत्यादीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढ झाली असून उपरोक्त शासन निर्णयातील अनुषंगिक खर्चाचे १२% दर व सध्या प्रत्यक्ष येणारा अनुषंगिक खर्च यामध्ये फरक असल्याने प्रत्यक्ष अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी किमान २०% दराने अनुषंगिक खर्चाची गणना अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात केली आहे. तसेच सदर १२% अनुषंगिक खर्चामध्ये वाढ करून मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला असून तो प्रलंबित आहे, प्रत्यक्ष खर्च शासन निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहे. याबाबतचा तपशिल पुढीलप्रमाणे आहे.

सन २००९-१० ते ११-१२ या कालावधीतील प्रत्यक्ष खरेदीवरील खर्चाची टक्केवारी

(रुपये लाखात)

सन	खरेदी	अनुषंगिक खर्च	टक्केवारी
२००९-१०	३३७७४९.६५	४०१००.३१	११.८७
२०१०-११	३२६३८७.१६	४०९४०.२९	१२.५४
२०११-१२	२९९०५३.००	४२६३८.८५	१४.२५

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे मासिक नियतन शिधापत्रिकाधारकांच्या संख्येवर आधारीत असते. या वितरण व्यवस्थेचा लाभापासून कुणीही लाभार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता अंदाजपत्रक तयार करताना घ्यावी लागते. त्यामुळे मागील वर्षाच्या प्रत्यक्ष उचलीवर आधारीत अंदाजपत्रक तयार केल्यास अन्नधान्य खरेदी कमी होवून काही लाभार्थी वगळले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नियतनावर आधारित अंदाजपत्रकात सबसिडीची मागणी करण्यात येते.

सन २००१-१२ या दरम्यान जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठी तूरडाळ,पामतेल साखर APL/BPL APL तांदूळ या पाच वस्तूंची खरेदी सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या सबसिडीतून करण्यात आली. त्याचा भार स्वीय प्रपंजी लेख्यात जमा झालेल्या सबसिडीवर पडला. तसेच MSP (आधारभूत किंमत योजने)अंतर्गत भरड धान्य खरेदी करिता प्रतीपूर्तीच्या अधिन राहून स्वीय प्रपंजी लेख्यातून सबसिडीचे वाटप करण्यात आले आहे. वरील सर्व व्यवहारांच्या येणे देणे रकमांच्या ताळमेळ घेवून त्याची प्रतिपूर्ती स्वीय प्रपंजी लेख्यात करण्यात आली आहे. प्रतिपूर्तीद्वारे प्राप्त झालेल्या रकमांचा आढावा घेवून शासनास परत करावयाची रक्कमेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. प्राप्त सबसिडीचा वापर हा राज्याची सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरळीत चालावी व गरजू जनतेला स्वस्त दरात जिवनावश्यक वस्तू प्राप्त व्हाव्यात याकरिता स्वतंत्र तरतूद उपलब्ध न झाल्यामुळे शासन निर्णयाचे अधिन राहून सबसिडीतील रकमांचा वापर राज्यातील जनतेसाठी केला आहे. त्यामुळे ही अनियमितता नाही अशी या विभागाची धारणा आहे.

उपरोक्त परिच्छेद क्र.२ मध्ये नमुद केलेल्या ५ जीवनावश्यक वस्तूंचे सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरण करण्यासाठी या विभागाच्या स्विय प्रपंजी लेख्यावर अतिरिक्त भार पडला होता. या व्यवहारातील विक्रीतून प्राप्त झालेल्या रकमांचा आढावा घेऊन, तसेच जिल्हयातील अन्न धान्य वितरण व्यवस्थेकरीता तूट भरुन काढण्याबाबतची वर्ष २००८-०९ ते २०१०-११ या कालावधीकरिता खरेदी व विक्रीचा आढावा घेऊन त्यानुसार जिल्ह्याना देय तूट सन २०११-१२ मध्ये वितरीत करण्यात आली. सद्यःस्थितीत जिल्ह्यांना माहे १/२०१५ अखेर तूटीचे वाटप करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. तरी उपरोक्त खुलासा मान्य करून परिच्छेद २.२.९.१ वगळण्यात यावा ही विनंती.

दिनांक २३/८/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनावरील शे-यानुसार अभिप्राय :-

राज्य शासनाच्या दिनांक २४/११/१९९२ च्या निर्णयानुसार अनुषंगिक खर्च १२ टक्के च्या मर्यादेत परिगणित करण्यात येतो. अंत्योदय योजनेसाठी बर्हिगोदाम दर गहूसाठी रूपये १५० प्रति क्विंटल (रु. १.५० प्रति किलो) तांदूळासाठी रु. २५० प्रति क्विंटल (रु. २.५० प्रति किलो) इतकेच असावेत असे केंद्र शासनाचे निर्देश आहेत. (शासन निर्णय दिनांक ८ मे २००१ ची छायांकित प्रत सोबत जोडली आहे.)

केंद्रीय विक्री दर रु. २००/- प्रति क्विंटल गहू तर तांदुळ रु. ३००/- प्रति क्विंटल वर बर्हिगोदाम दर रूपये १७० प्रति क्विंटल व तांदूळासाठी रु. २३०/- प्रति क्विंटल असे ठरविण्यात आले आहे. याउलट बी.पी.एल. योजनेसाठी गव्हाचे दर रु. ४१५/- व तांदुळासाठी रु. ५६५/- प्रति क्विंटल असे ठरविण्यात आले आहे.

या दोन्ही योजना राबविण्यासाठी अनुषंगिक खर्च सारखाच येत असतो. अंत्योदय योजनेसाठी केंद्रीय विक्री दर वर नमूद केल्याप्रमाणे कमी असल्याने अनुषंगिक खर्चातील येणारा फरक भरून काढण्यासाठी अनुषंगिक खर्चाची परिगणना १२ टक्के ऐवजी २० टक्केने केली आहे.

वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे नावे असलेल्या स्वीय प्रपंजी लेख्यामध्ये उपलब्ध असलेली शिल्लक रक्कम कमी असल्यामुळे आणि राज्य शासनाकडून माहे ऑगस्ट, २००९ पासून सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत वितरीत करण्यात येत असलेल्या गहू, तांदूळ, पामतेल व साखर या ५ वस्तूच्या किंमती स्थिर ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. सदर योजनेमधील येणारी तूट व शासनावर येणारा भार यांच्या प्रतिपुर्तीची मागणी अर्थसंकल्पिय तरतूदीद्वारे सादर केली होती. तसेच वेळोवेळी भांडवली रकमेत वाढ करून देण्याबाबत विभागामार्फत शासनाकडे प्रस्तावित करण्यात आले होते. परंतू भांडवली रकमेत शासनाकडून वाढ करून देण्यात आलेली नाही. जसे पामतेल राज्य शासनामार्फत अर्थसहाय्यित आयातीतील खाद्यतेल वितरणाची योजना सन २००८ पासून माहे डिसेंबर, २०११ पर्यंत राबविण्यात आलेली आहे. सदर योजनेसाठी

भांडवली रक्कम उपलब्ध करून देण्याबाबत, विभागामार्फत राज्य शासनाकडे प्रस्तावित करण्यात आले होते. परंतु भांडवली रक्कम उपलब्ध करून देण्यात आलेली नाही. त्यामुळे सदर योजनेसाठी वित्तीय सल्लागार व उपसचिव व जिल्हाधिकारी यांचे स्वीय प्रपंजी लेख्यात उपलब्ध असलेल्या भांडवली रकमेमधील योजनेवरील खर्च भागविण्यात येत होता. आणि शासनाकडून सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत साखर, पामतेल, तुरडाळ या योजनेवरील तूट, वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे PLA खात्यातील उपलब्ध लेख्यांतील व्यवहारांमध्ये या योजनेकरीता अर्थसंकल्पात येणा-या तूटीच्या रकमेची मागणी करण्यात आलेली होती परंतू सदर व्यवहारात आलेली तूट वित्तीय सल्लागार व उपसचिव यांचे स्वीय प्रपंजी लेख्यात आलेली असल्याने, पामतेल, साखर व तुरडाळ यांचे लेखे पूर्ण न झाल्याने, यामधील तूटीच्या रकमेची परिगणना केली नव्हती. आता लेखे पुर्ण झाले असून योजनानिहाय तूट आलेली आहे.

सन २००८-०९ ते २०१२-१३ या वर्षात अर्थसहाय्याची एकूण रूपये १९०४.३१७२ कोटी पैकी अन्नधान्य व्यवहारातील रक्कम रूपये ९४९.१४९७ कोटी व पामतेल, साखर व तुरडाळ या योजनेकरिता एकूण रक्कम रु. ६१९.५२५३ कोटी खर्ची पडली आहे. अशी आहरीत एकूण तूट रकमेपैकी रु. १५६८.६७५० कोटी खर्ची पडली असून अखर्चित रक्कम रु.३३५.६४२२ कोटी ही आधारभूत किंमत योजनेसाठी धान व भरडधान्य खरेदीकरीता वापरण्यात आलेली आहे. आधारभूत योजनेच्या प्रलंबित रकमा भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त होतील, त्याप्रमाणे अखर्चित रक्कम शासन लेख्यात भरणा करण्याची कार्यवाही सुरू आहे. सन २०१५-१६ या वर्षात रक्कम रु. २०० कोटी शासन विभागास भरणा करण्यात आली आहे.

शासन निर्णय २४/११/१९९२ नुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत अन्नधान्य हाताळणूक व वाहतूकीवरील खर्च हा अन्नधान्याच्या खरेदी दराच्या १२ टक्क्यांनुसार देय होणा-या रकमेप्रमाणे खर्च नियतनानुसार व आवश्यक बाबींवर करण्यात आला आहे. राज्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना माहे फेब्रुवारी, २०१४ पासून कार्यान्वित असून केंद्र शासन अधिसुचना दि.१५/८/२०१५ नुसार अन्नधान्य हाताळणूक व वाहतुकीकरीता प्रत्येकी रु. ६५ दर निश्चित करण्यात आला आहे. तथापि सदर खर्चाची रक्कम सुद्धा कमी पडत असून त्यामध्ये वाढ करण्याबाबत, शासन स्तरावर कार्यवाही प्रस्तावित आहे.

१.५ परिच्छेद क्र. २.२.९.२ रिकाम्या पोत्यांची विल्हेवाट न लावणे :-

महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या निर्देशानुसार (नोव्हेंबर, १९९९) धान्य वाहून नेण्यासाठी उपयोगात आणलेल्या पोत्यांची दरवर्षी निविदा/ लिलावाद्वारे विल्हेवाट लावणे आवश्यक होते. चाचणी तपासणी केलेल्या ११ पैकी नऊ कार्यालयांच्या दस्तऐवजांच्या तपासणीत असे आढळून आले की, मे, २०१३ पर्यंत २५.५६ लक्ष रिकामी पोती एक वर्षापेक्षा जास्त काळापासून पडून होती. तसेच रिकाम्या पोत्यांची विल्हेवाट न लावल्यामुळे केवळ शासनाचा रु.१.५९ कोटीचा (अंतिम निविदेतील दरांवर आधारित) महसूल अडकून पडला होता असे नाही तर ती पोती खराबही होत होती.

शासनाने असे नमूद केले की, (नोव्हेंबर, २०१३) सर्व जिल्हाधिका-यांना धान्याच्या रिकाम्या पोत्यांच्या साठ्याचा आढावा घेण्याचे आणि त्यांनी विल्हेवाट लावण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. (जुलै, २०१३).

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

दिनांक १२ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने राज्यातील शासकीय गोदामातील शिल्लक बारदान्याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. त्याची अंमलबजावणी करण्यासंदर्भात देखील सातत्याने पाठपुरावा करण्यात येतो. जुलै, २०१३ मध्ये प्राप्त झालेल्या लेखा परिच्छेदानंतर विभागाकडून दिनांक ९ जुलै, २०१३ मध्ये प्राप्त झालेल्या लेखा परिच्छेदानंतर विभागाकडून दिनांक ९ जुलै, २०१३ रोजीच्या शासन पत्रान्वये, दिनांक २२ जुलै, २०१३ रोजीच्या सह सचिवांच्या अर्धशासकीय पत्रान्वये अनुक्रमे सर्व जिल्हाधिकारी व सर्व उप आयुक्त (पुरवठा) यांना बारदाना विल्हेवाटीबाबत जिल्हा पुरवठा कार्यालयाकडे सातत्याने पाठपुरावा करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. त्यानंतर दिनांक २८ ऑगस्ट, २०१३, दिनांक ३ सप्टेंबर, २०१३, दिनांक २३ ऑक्टोबर, २०१५ रोजीच्या पत्रान्वये त्याचप्रमाणे दिनांक २९ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या उप सचिवांच्या अर्धशासकीय पत्रान्वये सातत्याने पाठपुरावा करण्यात आलेला आहे.

या विभागास प्राप्त मुळ लेखा परिच्छेदास दिलेल्या दिनांक ८ जुलै, २०१३ रोजीच्या Rejoinder सह पुरवठा आयुक्त कार्यालयाकडून प्राप्त विवरणपत्र जोडण्यात आले होते. या विवरणपत्रानुसार राज्यातील जिल्ह्यांमध्ये शिल्लक असलेल्या उपयोगी/निरुपयोगी/तुकडा बारदान्याची संख्या ४२.४५ लक्ष इतकी होती. जिल्हा कार्यालयाकडे केलेल्या पाठपुराव्यानंतर सद्यःस्थितीत शिल्लक असलेल्या बारदान्याचा तपशील सोबतच्या विवरणपत्रामध्ये सादर केला आहे.

राज्यातील सर्व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शिल्लक बारदान्याची विल्हेवाट लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने, हातच्या किमतीपेक्षा खूपच कमी दर आल्याने वारंवार निविदा प्रक्रिया राबवावी लागलेली आहे. त्यामुळे शिल्लक बारदान्याची विल्हेवाट लावण्यास विलंब होत आहे.

अद्ययावत विवरण पत्र सोबत जोडले आहे. **(विवरण पत्र क्र ३)**

१.६ परिच्छेद क्र. २.२.९.३ भारतीय अन्न महामंडळाकडे प्रलंबित असलेली अग्रीमे

TPDS अंतर्गत केंद्र शासनाकडून होत असलेल्या अन्नधान्याच्या मासिक वाटपाच्या आधारावर DSOs/FDOs यांनी अन्नधान्याच्या किंमतीपाटी संपूर्ण रक्कम आगावू भरून FCI गोदामातुन अन्नधान्याची उचल करायची असते. जर DSOs/FDOs नी धान्य संपुर्णपणे उचलले नाही तर उचल न केलेल्या अन्नधान्याची किंमत

FCI कडून परत घ्यायची होती. चाचणी तपासणी केलेल्या कार्यालयातील FCI ला प्रदान केलेल्या अग्रिमासंबंधीच्या दस्तऐवजांच्या तपासणीत असे आढळून आले की ३१ मार्च २०१३ पर्यत आठ (३६) कार्यालयात रुपये ७७.९६ कोटी रकमेचे F.C.I कडून समायोजन/वसुली प्रलंबित होती ज्यापैकी रुपये ११.४४ कोटीची समायोजन/ वसुली तीन वर्षांपेक्षा अधिक काळापासून प्रलंबित होती.

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर २०१३) की, ऑक्टोबर २०१३ पर्यंत रुपये ७७.९६ कोटी पैकी रुपये ६४.१५ कोटी FCI कडून वसूल करण्यात आले आहेत.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

जिल्हा पुरवठा अधिका-यांची भारतीय खादय निगम महामंडळाकडे थकित वसुली कार्यालयात रु. १३.१० कोटी असल्याचे परिच्छेदात म्हटले आहे.

भारतीय अखादय निगम महामंडळाकडे अन्नधान्य उचलीसाठी ४० दिवस अगोदर अगावू जमा रक्कमा महामंडळाकडे जमा होतात जमा रकमेतुन पुढील नियतनाचे समायोजन करून व्यवहार केले जात असतात. यातील शिल्लक जमा रकमा वसूल करणेबाबत जिल्हा पुरवठा अधिका-याकडे विसउस कार्यालयाकडून वारंवार पत्रव्यवहार केला जातो. वेळ पडल्यास सचिव पातळीवर पाठ पुरावा केला जात असतो.

शासन स्तरावरून वसुलीचा भाग असल्याने प्रयत्नाना विशिष्ट मर्यादा आहेत तरी देखील भारतीय खादय निगम महामंडळाकडे कमीत कमी आगाऊ रकमा रहाव्यात यासाठी अपेक्षित प्रयत्न चालु असतात. परिच्छेदात नमूद केलेल्या जिल्ह्याची सद्यः स्थिती खालीलप्रमाणे :-

जिल्हा	प्रलंबित रक्कम
१. मुंबई शि.वा. क्षेत्र	१,६९,२६,३८०/-
२. ठाणे	निरंक
३. जळगाव	निरंक
४. सोलापूर	निरंक
५. पुणे	निरंक
६. अमरावती	निरंक
७. बीड	निरंक
८. नंदुरबार	१,८७,८७,६९९/-
	३,५७,१४,०७९/-

यावरून असे आढळून येते की, भारतीय खादय निगमकडून एकूण थकित ७७.९६ कोटीपैकी फक्त ६४.१५ कोटीची वसुली करण्यांत आलेली आहे. दिनांक २३/०८/२०१६ रोजी प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनावरील शे-यानुसार (परिच्छेद २.२.९.३)नुसार कळविण्यांत येते की रक्कम रुपये १३.१० कोटीपैकी रुपये ३.५७ वगळता सर्व रक्कम वसूल झालेली आहे. उर्वरित रक्कम वसूल करण्याबाबत पाठपुरावा करण्यात येत आहे.

१.७ परिच्छेद क्र. २.२.१० अन्नधान्य आणि इतर वस्तूचे वाटप आणि वितरण

केंद्र शासनाकडून TPDS अंतर्गत अन्नधान्यांचे वाटप हे BPL आणि AYY लाभार्थ्यांची संख्या विचारात घेऊन केले जाते. अशारितीने केंद्र शासनाकडून प्राप्त ज्ञालेले अन्नधान्य जिल्ह्यांना तेथील उपभोक्त्यांच्या संख्येनुसार दरमहा वाटले जाते. अन्नधान्याच्या किंमतीचे पूर्ण आगावू प्रदान करून FCI गोदामांतू DSOs अन्नधान्याची उचल करतात. FCI गोदामांतून अन्नधान्याची उचल करून त्याची तालुक्यातील विविध गोदामांपर्यंतची वाहतूक व्यवस्था DSOs खाजगी वाहतूक कंत्राटदारांमार्फत करतात. प्रत्येक महिन्यात तालुक्यांनी वाटप केलेल्या अन्नधान्याच्या आधारे अन्नधान्याची किंमत FPS कडून कोषागारात भरली जाते. त्यानंतर ते अन्नधान्य विभागाकडून निर्धारित करण्यात आलेल्या किमतीस शिधापत्रिकाधारकांना वितरीत करण्यासाठी FPS च्या मालकांकडून उचलले जाते. मुंबई व ठाणे येथील शिधावाटप क्षेत्र तसेच FDO पुणे येथील FPS महासंघ /FPS यांच्याकडून थेट FCI डेपोमधून धान्य उचलेले जाते आणि शिधापत्रिकाधारकांना वितरीत केले जाते.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अन्नधान्य आणि इतर वस्तूचे वाटप आणि वितरण :-

सदर माहिती वस्तुस्थितीवर आधारित असून, यामध्ये बदल अपेक्षित नाही.

सदर परिच्छेद वगळण्याची विनंती करण्यात येत आहे.

१.८ परिच्छेद क्र. २.२.१०.१ अन्नधान्य वाटप आणि उचल यामधील फरक/ विसंगती

FCI व विभागाने सादर केलेली अन्नधान्य वाटप आणि उचल केल्याची वर्ष २००८-१३ या कालावधीत अन्नधान्याचे वाटप आणि उचल याविषयी सादर केलेल्या आकडेवारीची तुलना केली असता तफावत आढळून आल्या ज्या परिशिष्ट २.२.२ मध्ये दर्शविण्यात आल्या आहेत व त्याचा सारांश तक्ता २ मध्ये दिला आहे.

शिधापत्रिका धारकाची वर्गवारी	FCI च्या आकडेवारीपेक्षा कमी असलेली विभागाची आकडेवारी		FCI च्या आकडेवारीपेक्षा जास्त असलेली विभागाची आकडेवारी	
	वाटप	उचल	उचल	वाटप
APL	०	१७.२०	११६.६०	५.१४
BPL	३७.०५	३६.७३	६०.३५	१.७०
AAY	५.५८	११.६६	१.८३	०

अन्नधान्य अवैध रितीने दुसरीकडे वळविण्यात येत नाही याची खात्री करण्यासाठी व अन्नधान्याचे वाटप आणि उचल यातील तफावतीचा ताळमेळ घालणे व त्याचा तपास घेणे आवश्यक आहे.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

अन्नधान्य वाटप आणि उचल यामधील फरक/ विसंगती:-

नियतन व उचल याबाबतची अंतिम स्थिती पुढीलप्रमाणे आहे.

सन	APL		BPL		AAY	
	वाटप	उचल	वाटप	उचल	वाटप	उचल
२००८-२००९	४२१४८१	२८४५७१	१७०९४२४	१५१३१६०	१०३४८८०	८८००६२
२००९-२०१०	१९०१६९६	९६४२६५	१७०९४२४	१५७४७१०	१०३४८९८	९३७४०७
२०१०-२०११	२०७९०४८	१०३६८९९	२०८५१९८	१६७७४४७	१००८७५	९२१९४
२०११-२०१२	१९०२८१०	९१२०९५	२३३५७४७	१८३६०६७	९८२६५६	८९११३६
२०१२-२०१३	२०१४७४०	११२८३८९	२१८५२८३	१८१४२३४	१०२००८०	९५११४१
TOTAL	८३१९७७५	४३२६२१९	१००२५०७६	८४१५६१८	५०८१२६७	४५८१७४०

नियतन व उचल यातील फरक मुख्यत्वे कामगार विषयक समस्या, FCI गोदामांच्या फळ्या रिकाम्या नसणे, सुट्यांच्या दरम्यान उचल न होणे, FCI गोदामांमध्ये धान्य उपलब्ध नसणे आणि FCI कर्मचा-यांच्या असहकार या कारणांमुळे आहे. अन्नधान्याचे नियतन व वाटप यामध्ये फरक पडू नये यासाठी जिल्हा यंत्रणांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच, यासंदर्भात FCI शी चर्चा करून अन्नधान्याची जास्तीत जास्त उचल होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

या स्पष्टीकरणासह सदर परिच्छेद वगळण्याची विनंती करण्यात येत आहे.

अन्नधान्याचे नियतन व वाटप यामध्ये फरक पडू नये यासाठी जिल्हा यंत्रणांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत.

१.९ परिच्छेद क्र. २.२.१०.२ वाटप केलेल्या अन्नधान्याची FCI गोदामातून उचल न करणे

केंद्र शासनाकडून वाटप आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसांच्या आत FCI गोदामातून अन्नधान्य उचलणे गरजेचे असते. विहित कालावधीत DSOs ने जर FCI गोदामातून वाटप केलेल्या अन्नधान्याची उचल केली नाही तर उचल न केलेले अन्नधान्य रद्दबाबत होते. लेखापरीक्षेला खालील गोष्टी आढळून आल्या.

वर्ष २००८-१३ दरम्यान BPL अंतर्गत १६.०९ लक्ष मे. टन (वाटप केल्यापैकी १६.०५ टक्के) तांदुळ आणि गहू आणि AAY अंतर्गत ५.०१ लक्ष मे. टन (वाटप केल्यापैकी ९.८६ टक्के) तांदुळ आणि गहू याचे वाटप घेऊनही उलच न केल्यामुळे रद्दबाबत झाले होते. (परिशिष्ट २.२.३)

११ चाचणी तपासणी घटकांमध्ये, BPL अंतर्गत ९.२४ लक्ष मे. टन (वाटप केल्यापैकी १२.७६ टक्के) तांदुळ आणि गहू यांचे वाटप घेऊनही उचल न केल्यामुळे रद्दबाबत झाले होते. (परिशिष्ट २.२.४) परिणामतः अन्नधान्याच्या लाभापासून लाभार्थी त्या प्रमाणात वंचित राहिले.

शासनाने अन्नधान्य न उचलणे यांसाठी असल्याचे सांगितले. शासनाने पुढे असेही सांगितले की, या प्रश्नावर तोडगा काढण्यासाठी FCI शी चर्चा करण्याचे प्रयत्न केले जात आहेत.

ज्ञापन :-

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

वाटप केलेल्या अन्नधान्याची FCI गोदामातून उचल न करणे :-

कामगार विषयक समस्या, FCI गोदामांच्या फळ्या रिकाम्या नसणे, सुट्यांच्या दरम्यान उचल न होणे, FCI गोदामांमध्ये धान्य उपलब्ध नसणे आणि FCI कर्मचा-यांच्या असहकार इत्यादी कारणांमुळे या कालावधीत धान्याची पूर्ण उचल होऊ शकली नाही.

यासंदर्भात FCI शी चर्चा करून अन्नधान्याची जास्तीत जास्त उचल होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

या स्पष्टीकरणासह सदर परिच्छेद वगळण्याची विनंती करण्यात येत आहे.

भारतीय अन्न महामंडळाबरोबर सल्लामसलत करून या समस्येचे निराकरण करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. तसेच, अन्नधान्य उचलीचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न केले गेले आहेत.

सन २०१३ पासून अन्नधान्याच्या नियतन व उचल याबाबतची अंतिम स्थिती खालीलप्रमाणे आहे .—

सन	APL		BPL		AAY	
	वाटप	उचल	वाटप	उचल	वाटप	उचल
२०१३-२०१४ (१.३.२०१३ to ३१.१.२०१४)	१६७८९५०	१२२९४०८	१४२४५२०	१२२०४६६	८६२४००	८१३५६९

YEAR(NFSA)	AAY		PHH	
	वाटप	उचल	वाटप	उचल
२०१३-२०१४ (१.२.२०१४ to ३१.३.२०१४)	१७२०२८	१६९५६८	५७८२३८	५५५५२४
२०१४-२०१५	१०३२१६८	९८८९३७	३४७४१८४	३१४७३५९
२०१५-२०१६	१०४१९६२	९९५०७८	३५७८०११	३१३२९२०
२०१६-२०१७	१०५२२०८	१००६८३६	३५५२९८४	३५३०७९३

१.१० परिच्छेद क्र. २.२.१०.३ खुल्या बाजारातून तांदुळ खरेदीवर झालेला टाळतायेण्याजोगा जास्तीचा खर्च :-

जीवनावश्यक वस्तूंच्या झालेल्या भाववाढीपासून थोडा दिलासा मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रत्येक APL लाभार्थ्याला (केशरी शिधापत्रिका धारक) दरमहा पाच किलो तांदुळ तीन महिन्यासाठी स्वस्त दराने देण्याचे ठरविले (जुन २००८). या निर्णयानुसार, ह्या योजनेची सुरुवात जुलै २००८ पासून व्हायला हवी होती आणि तिची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य सहकार पणन महासंघ मर्यादीत (पणन महासंघ) व्दारे करायची होती. पणन महासंघाकडून रु. १६,८१६ प्रति मे टन या दराने तांदुळाचे प्रापण करायचे होते. ज्यांनी शासकीय गोदामात ते धान्य पाहोचवणे अपेक्षित होते. जिल्ह्यांच्या मागण्या विचारात घेऊन पणन महासंघाकडे ७०,००० मे. टनाचा पुरवठा आदेश दिला गेला होता त्यानंतर ४३,१०३ मे. टन (ऑगस्ट २००८) आणि ५,५६८ मे. टन (सप्टेंबर २००८) यासाठी आदेश दिले गेले. मागणी केलेल्या एकूण १.१९ लक्ष मे. टन धान्यापैकी पणन महासंघाने डिसेंबर २००८ पर्यंत फक्त ६६,९९४ मे. टन धान्याचा पुरवठा केला होता. लेखापरीक्षेला खालील गोष्टी आढळून आल्या.

वर्षे २००८-०९ दरम्यान केंद्र शासनाने वाटप केलेल्या ५१,२८७ मे. टन तांदळापैकी फक्त ३६,७८५ मे. टन (७२ टक्के) तांदुळाची उचल केली होती. केंद्र शासनाने वाटप केलेल्या तांदुळाची पूर्ण उचल न करता पणन महासंघाकडून तांदूळ वाढीव किंमतीस खरेदी करण्यात आला ज्यामुळे रु. १०.९१ कोटीची टाळता येण्याजोगा जास्तीचा खर्च झाला.

पणन महामंडळाकडे केलेल्या १.१९ लक्ष मे. टन अन्नधान्याच्या मागणीपैकी पणन महामंडळाने फक्त रु. ०.९६ लक्ष मे. टन अन्नधान्याचा पुरवठा केला होता ज्यामुळे महागाईपासून APL शिधापत्रिका धारकांना दिलासा देण्याचा उद्देश पुर्ण होऊ शकला नाही.

शासनाने असे नमूद केले (नोव्हेंबर २०१३) की, २००८-०९ पुर्वी केंद्र शासनाने तांदुळाचे अत्यल्प वाटप केल्यामुळे केंद्र शासनाला जास्त तांदुळ पुरविण्याची विनंती केली होती, जी पूर्ण करण्यात आली नव्हती. म्हणून महाराष्ट्र शासनाने APL शिधापत्रिका धारकांसाठी पणन महासंघाकडून जास्तीचे तांदूळ घेण्याचे ठरविले. हे उत्तर स्वीकारणीय नाही कारण, पणन महासंघाकडून वाढीव दराने तांदुळाची मागणी करण्यापूर्वी २००८-०९ या वर्षासाठी APL लाभार्थ्यांकरीता राखीव ठेवलेल्या ५१,२८७ मे. टन तांदुळाच्या संपूर्ण साठ्याची FCI कडून उचल करण्यात आली नव्हती.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासनाने सन २००८-०९ पुर्वी तांदुळाचे अत्यल्प वाटप केल्यामुळे केंद्र शासनाला जास्त तांदुळ पुरविण्याची विनंती केली होती, जी पूर्ण करण्यात आली नव्हती. तसेच, महागाई नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने APL शिधापत्रिका धारकांसाठी पणन महासंघाकडून जास्तीचे तांदूळ घेण्याचे ठरविले.

तथापि, वरील मुद्दा क्रमांक २.२.१०.२ मधील अभिप्रायांमध्ये नमूद कारणांनुसार FCI कडून १००% उचल होऊ शकली नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकार पणन महासंघ मर्यादीत (पणन महासंघ) व्दारे तांदूळ खरेदी करणे भाग पडले.

सुरुवातीच्या १.१९ लक्ष मे.टन अन्नधान्याच्या मागणी पैकी प्रत्यक्ष नियतनाच्या वेळी उपलब्ध मागणी नुसार ०.९६ लक्ष मे.टन म्हणजेच ८०% धान्याचा पुरवठा महामंडळाकडून करण्यात आला. त्यामुळे प्रत्यक्ष मागणी पेक्षा अधिक तांदळाची खरेदी टाळण्यात आली.

या स्पष्टीकरणासह सदर परिच्छेद वगळण्याची विनंती करण्यात येत आहे.

कामगार विषयक समस्या, FCI गोदामांच्या फळ्या रिकाम्या नसणे, सुट्यांच्या दरम्यान उचल न होणे, FCI गोदामांमध्ये धान्य उपलब्ध नसणे आणि FCI कर्मचा-यांचा असहकार इत्यादी कारणांमुळे या कालावधीत धान्याची उचल पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे खुल्या बाजारातून तांदुळ खरेदी करण्यात आला.

१.११ परिच्छेद क्र. २.२.१०.४ अन्नधान्याच्या गुणवत्तेची तपासणी न करणे

अन्नधान्याच्या विहित गुणवत्तेच्या सुनिश्चिततेसाठी, PDS (नियंत्रण) आदेश, २००१ मधील अटींनुसार FCI ला अन्नधान्याच्या किंमतीचे प्रदान करण्याआधी राज्य शासनाचा प्रतिनिधी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेली व्यक्ति आणि FCI यांनी संयुक्तरित्या अन्नधान्याच्या साठ्याची तपासणी करावी. PDS (नियंत्रण) आदेश, २००१ मध्ये पुढे अशीही तरतुद आहे की, FCI ने साठ्यानुसार अन्नधान्याचे बंद नमूने राज्य शासनास पाठवावे. लेखापरीक्षेला असे आढळून आले की चाचणी तपासणी केलेल्या घटकांपैकी शिधा नियंत्रक, मुंबई व्यतिरिक्त कुठल्याही कार्यालयाची संयुक्त तपासणी केली नव्हती. तसेच, चाचणी तपासणी केलेल्या एकाही कार्यालयांत विभागाला अन्नधान्याच्या साठ्याचे रकाना-निहाय बंद नमुनेदेखील प्राप्त झाले नव्हते. PDS (नियंत्रण) आदेश, २००१ मध्ये विहित केलेल्या गुणवत्ता चाचण्यांचे न झालेले पालन लक्षात घेता, TPDS अंतर्गत निर्धारित गुणवत्तेचे धान्य वितरीत केले जात होते याची काहीही खात्री देता येत नव्हती.

शासनाने नमूद केले की, (नोव्हेंबर, २०१३) जिल्हा कर्मचारी अन्नधान्याची संयुक्त तपासणी केल्यावर धान्याची उचल करतात. तथापि, लेखापरीक्षेला संयुक्त तपासणी घेतली गेल्याचे सिद्ध करणारे कुठलेही दस्तऐवज उपलब्ध करून दिले नव्हते. तसेच, FCI कडून साठ्यानुसार बंद नमूने न मिळण्याच्या आक्षेपाची उत्तरात कोणतीही दखल घेतली गेली नव्हती.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत (नियंत्रण) आदेश २००१ मधील अटींनुसार FCI कडून योजनानिहाय धान्याचे डी.ओ. घेण्यासाठी रक्कम जमा करण्यात येते व धान्याची उचल FCI च्या गोदामातून उचल करण्याअगोदर संयुक्त तपासणी करण्यात येते.

FCI ही केंद्र शासनाची संस्था असल्याने, अन्नधान्याची उचल करण्याअगोदर दोन्ही कार्यालयांच्या प्रतिनिधींकडून संयुक्त तपासणी करण्यात येते. तथापि, या संदर्भात लेखी नोंद ठेवण्यात येऊन, त्या लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करून देण्याच्या सूचना पुन्हा एकदा देण्यात आल्या आहेत.

या स्पष्टीकरणासह सदर परिच्छेद वगळण्याची विनंती करण्यात येत आहे.

क्षेत्रीय कार्यालयांच्या प्रतिनिधीद्वारे संयुक्त निरीक्षणांचे दस्तऐवज या विभागाला प्राप्त झाले आहेत. परंतु कागदपत्रांचे खंड मोठे असल्यामुळे ते लोकलेखा समितीच्या सुनावणीच्या वेळी सादर केले जातील.

१.१२ परिच्छेद क्र. २.२.११ साखरेचे वाटप आणि वितरण

केंद्र शासन महाराष्ट्र शासनाला TPDS अंतर्गत वितरणासाठी साखरेचे वाटप करते. जिल्हाधिका-यांनी नियुक्त केलेल साखर नामनिर्देशित सदस्य केंद्र शासनाने नामित केलेल्या साखर कारखान्यातून केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या किंमतीत लेव्ही साखरेची उचल करतात आणि FPS द्वारे BPL आणि AAY शिधापत्रिका धारकास वाटप करतात.

साखरेच्या वाटप आणि वितरणासंबंधीच्या दस्तऐवजांच्या तपासणीत असे आढळून आले आहे की, वर्ष २००८-१३ दरम्यान वाटप करण्यात आलेल्या १३९८ लक्ष मे.टन साखरेऐवजी फक्त ८.७५ लक्ष मे.टन साखरेची उचल झाली होती, ४.२३ लक्ष मे.टन साखरेची कमी उचल झाली होती (३२.५९ टक्के) विभागीय अधिका-यांबरोबर लेखापरीक्षेने केलेल्या लाभार्थ्यांच्या संयुक्त सर्वेक्षणात १० टक्के BPL लाभार्थ्यांनी साखरेचा कमी पुरवठा/पुरवठा होत नसल्याची तक्रार केली होती. तसेच, विभाग आणि चाचणी तपासणी केलेल्या कार्यालयांनी दिलेल्या माहितीवरून, वर्ष २००८-१ दरम्यान BPL साखरेच्या आणि वर्ष २००९-१० आणि २०१०-११ दरम्यान BPL साखरेच्या आणि वर्ष २००९-१० आणि २०१०-११ दरम्यान APL साखरेच्या वाटप आणि उचल यात तफावती आढळून आल्या जे परिशिष्ट २.२.५ आणि २.२.६ मध्ये दाखविले असून खाली तक्ता ३ मध्ये सारांश दिला आहे.

तक्ता ३ : साखरेचे वाटप आणि उचल यातील तफावती (आकडे क्विंटलमध्ये)

शिधापत्रिका धारकांची वर्गवारी	चाचणी तपासणी कार्यालयांकडून पुरविण्यात आलेल्या आकडेवारीपेक्षा विभागाची कमी असलेली आकडेवारी		चाचणी तपासणी कार्यालयांकडून पुरविण्यात आलेल्या आकडेवारीपेक्षा विभागाची जास्त असलेली आकडेवारी	
	वाटप	**उचल**	**वाटप**	**उचल**
बीपीएल	९४४७९	१३३०५६	२०१७८६	१२५६४२
एपीएल	४३४८०८	३५८४३५	५५२४३९	५०३८५८
एकूण	५२९२८७	४९१४९१	७५४२२५	६२९५००

(स्त्रोत : विभागाकडून आणि निवडक कार्यालयांकडून सादर केलेली माहिती)

चाचणी तपासणी केलेल्या कार्यालयांमधील आणि विभागामधील साखर वाटप आणि उचल यातील तफावती ह्या योग्य संनियंत्रणाचा अभाव दर्शविते आणि साखरेला अयोग्य ठिकाणी कळविण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही.

शासनाने साखरेची कमी उचल केल्याचा संबंध (नोव्हेंबर,२०१३) साखर कारखान्यात साखरेची उपलब्धता नसणे, साखर कारखान्यांकडून साखर पुरवठा करण्यास नकार, साखर कारखान्यांकडून साखर पुरवठा करण्यास नकार, साखर नामर्निर्देशित सदस्यांनी साखरेची उचल न करणे इत्यादींशी जोडला. शासनाने पुढे असेही सांगितले की, संबंधित जिल्हाधिका-यांना कसूरदार साखर कारखान्यांविरुद्ध दावा दाखल करण्याची आणि ह्या साखर नामनिर्देशितांचे परवाने रद्द करण्याची तसेच सुरक्षा ठेवी जप्त करण्यासाठी नोटीस जारी करण्याची परवानगी दिली आहे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासन, राज्य शासनास लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत बीपीएल (BPL) आणि एएवाय (AAY) शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित साखरेचे महिनानिहाय नियतन उपलब्ध करून देते. साखर कारखान्याच्या एकूण उत्पादनापैकी १० टक्के साखर केंद्र शासनास नियंत्रित साखर म्हणून लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाटपासाठी प्राप्त होत होती.

सन २००८ ते २०१३ ह्या कालावधीत नियंत्रित साखरेची कमी उचल होण्याची कारणे पुढीलप्रमाणे आहेत :–

- साखर कारखान्याकडे नियंत्रित साखर उपलब्ध नसल्याने.
- नियंत्रित साखर पुरविण्यास साखर कारखान्यांनी नकार दिल्यामुळे.
- साखर नॉमिनींनी साखरेची उचल केली नसल्याने.
- साखर ओली, खराब किंवा चांगल्या दर्जाची नसल्याने.
- सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत मंजूर साखरेचे दर खुल्या बाजारातील दरांपेक्षा जास्त किंवा दरांइतके असल्याने साखर नॉमिनींनी उचल न केल्याने.
- साखर कारखाना बंद असल्याने.
- साखर वाहतूक कंत्राट निश्चित नसल्यामुळे.
- खुल्या बाजारातील साखरेचे दर सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत मंजूर साखरेपेक्षा कमी असल्याने कार्डधारक साखर घ्यावयास तयार नसल्याने.
- नॉमिनींनी उशिरा आरटीजीएस भरणा केल्यामुळे.

केंद्र शासनाने साखर कारखान्यांना त्यांच्याकडील नियंत्रित साखरेची राज्यांमार्फत उचल करण्यासंदर्भात आदेश निर्गमित केले होते. तथापि, काही नामित साखर कारखान्यांनी केंद्राच्या आदेशानुसार साखर पुरवठा केला नाही. त्यामुळे ज्या कारखान्यांनी नियंत्रित साखर उपलब्ध करून दिली नाही ते कारखाने बदलून देण्याबाबत केंद्र शासनास वेळोवेळी विनंती करण्यात आली. संबंधित जिल्हाधिका-यांना दोषी असलेल्या साखर कारखान्यांविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करून साखर साठा कायदेशीररित्या ताब्यात घेण्याबाबत निदेश देण्यात आले होते.

राज्य शासनाने साखरेची उचल व वाटपाबाबत सातत्याने संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा केला आहे. तसेच दोषी साखर नॉमिनीचे अनुज्ञप्ती प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत व ठेवी जप्तकरण्याबाबत निदेश देण्यात आले होते.

काही नामित साखर कारखान्यांनी नियतन आदेशानुसार साखर पुरवठा केला नाही. त्यामुळे निवडक कार्यालयांकडून पुरविण्यात आलेली साखर नियतन व उचल यांची आकडेवारी व विभागाची आकडेवारी यामध्ये तफावत आढळते. **(परिशिष्ट १ व परिशिष्ट २) (विवरण पत्र क्र. ४)** सोबत जोडले आहे.

दोषी १२५ कारखान्यांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यास संबंधित जिल्हाधिका-यांना परवानगी देण्यात आली आहे.

कारखान्यांविरुद्ध गुन्हे दाखल केल्यामुळे संबंधित कारखान्यांनी उच्च न्यायालयामध्ये केंद्र शासनाविरुद्ध याचिका दाखल केल्या आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार केंद्र शासनाने साखर कारखान्यांशी त्यांच्या हंगाम २०११-१२ मधील नियतित केलेल्या प्रलंबित नियंत्रित साखरेबाबत चर्चा केली. चर्चेनुसार ज्या साखर कारखान्यांशी त्यांच्या हंगाम २०११-१२ मधील नियतित केलेल्या प्रलंबित नियंत्रित साखरेबाबत चर्चा केली. चर्चेनुसार ज्या साखर कारखान्यांनी त्यांच्या हंगाम २०११-१२ मधील नियतित केलेली प्रलंबित नियंत्रित साखर देण्याची तयारी दर्शविली त्या साखर कारखान्यांना उचल करण्यासाठी केंद्र शासनाकडून मुदतवाढ देण्यात आली व राज्य शासनास संबंधित साखर उचल करण्याबाबत केंद्र शासनाकडून विविध आदेशांद्वारे सूचना देण्यात आल्या.

त्या अनुषंगाने राज्य शासनाने आतापर्यंत १७१९८८ क्विंटल नियंत्रित साखरेची उचल १९ कारखान्यांकडून केली आहे. केंद्र शासनाकडून वेळोवेळी प्राप्त होणा-या २०११-१२ च्या हंगामातील नियतित केलेल्या प्रलंबित नियंत्रित साखरेची उचल राज्य शासनाकडून अद्यापही करण्यात येत आहे.

राज्य शासनाच्या विविध उपाययोजनांमुळे नियंत्रित साखरेच्या उचलीत सन २०११-१२ आणि सन २०१२-१३ या कालावधीत अनुक्रमे ६७.८६% व ७.७१% इतकी वाढ झाली आहे.

एप्रिल, २०१२ ते मार्च, २०१४ पर्यंत उचल करावयाची नियंत्रित साखर ही ३५,९९,३४९ क्विं. होती. त्यामधील मार्च, २०१२ ते आजतागायत या विभागाने २२,५०,१७४ क्विं. साखर उचल केली आहे.

साखर उद्योगावरील नियंत्रण केंद्र शासनाने हटविल्याने एप्रिल, २०१३ पासून राज्य शासन खुल्या बाजारातून खरेदी करून वाटप केली जाते. म्हणून या विभागातून सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरित करावयाची साखर खुल्या बाजातून ई-लिलावाद्वारे जुलै, २०१४ पासून आजतागायत पर्यंत खरेदी केली जाते.

१.१३ परिच्छेद क्र. २.२.११.१ साखर सबसिडीच्या विलंबित प्रतिपूर्तीमुळे निधीची झालेली अडवणूक :-

साखर नामनिर्देशक ज्या किमतीला FPS ला साखर विकतात ती किंमत आणि FPS ज्या किंमतीला साखर शिधापत्रिकाधारकांना वाटप करतात ती किंमत केंद्र शासनाकडून ठरविले जाते. साखरेचा हाताळणे व वाहतुकीचा खर्च व नफा यांचा समावेश करून गणन केलेल्या साखर नामनिर्देशकांच्या साखरेच्या खरेदी किमतीमधून FPS कडून केलेल्या विक्रीची किंमत वजा केल्यावर येणारी रक्कम सबसिडी म्हणून साखर नामनिर्देशकांना प्रदान केलेल्या रकमेची प्रतिपूर्ती मिळण्यासाठी विभाग केंद्रशासनाकडे (FCI) मागणी करतो.

(२) साखर सबसिडीसंबंधीच्या दस्तऐवजांची तपासणी केली असता असे आढळून आले की रकमेची १९७९-८० ते २०११-१२ या कालावधीत विभागाने केंद्रशासनाकडे केलेली रु.७३.६८ कोटीची मागणी नोव्हेंबर, २०१३ पर्यंत प्रलंबित होती. लेखापरीक्षकेला असेही आढळून आले की, वर्षे २००८-०९ ते २०११-१२ पर्यंतच्या कालवधीची मागणी विभागाने केंद्र शासनाकडे संबंधित वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिने ते १ वर्षाच्या कालावधीनंतर केली होती व वर्ष २०१२-१३ ची मागणी नोव्हेंबर, २०१३ पर्यंत सादर केली नव्हती.

(३) शासनाने असे नमूद केले की, नोव्हेंबर, २०१३ सर्व नियमांचे मासिक लेखे प्राप्त झाल्यानंतर लेव्ही साखरेवरील प्रतिपूर्तीचे दावे सादर करावे आणि दाव्यांचे सादरीकरण लवकरात लवकर होण्यासाठी पाऊले उचलली जातील.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांसदर्भात अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

सबसिडी मागणी कालावधी दि.७.१२.१९७९ ते ३१.३.२००७

(अ) जकात व विमा

जकात व विमा प्रतिपूर्तीची मागणी केंद्रशासनाने नाकारली असून सदर रकमेची तरतूद करण्यासाठी वित्त विभागाकडे पाठविण्यात आलेल्या प्रस्तावानुसार रु. १६,२२,७६,४७६/- इतकी रक्कम प्राप्त झालेली असून उर्वरित रक्कम रु.२३,४६,२३,३७४/- प्राप्त होण्याबाबत वित्त विभागाकडे पाठपुरावा करण्यात येत आहे.मात्र सदरचा खर्च केंद्र सरकारने नाकारलेला असल्याने सदर एकूण रक्कम रु. ३९,६८,९९,८५०/- ची प्रतिपूर्ती केंद्र शासनाकडून होणार नाही. सबब सदर रक्कम केंद्रशासनाकडे प्रलंबित नाही.

(ब) संकीर्ण (मार्जिन फरक, भाव फरक व वाहतूक इ.)

सन १९९५-९६ ते १९९९-२००० या कालावधीतील मार्जिन सुधारित झाल्यानुसार भारतीय अनन महामंडळ यांनी दिनांक १२/१०/२००४ रोजीच्या पत्रानुसार सन १९९५-९६ ते २००२-०३ चे सुधारित लेखे सुधारित करून रक्कम रु.२४,७५,१९,५०४/- इतकी महाराष्ट्र शासनाकडून येणे असल्याचे कळविले आहे त्यानुसार रक्कम रु.४,६०,१३,२३६/- ही रक्कम समायोजित केली असल्याने सदर रक्कम समायोजित केली असल्याने सदर रक्कम केंद्र शासनाकडे प्रलंबित नाही.

(२) व (३) सन २००७-०८ ते २०११-१२ या कालावधीतील साखर खरेदी रकमेतील फरक व नॉमिनींना आलेला प्रत्यक्ष वाहतूक खर्च

सन २०००-०१ ते २०१०-११ या कालावधीतील केंद्र शासनाने सुधारित केलेल्या मार्जिननुसार सदर कालावधीतील एसपीएफ लेखे सुधारित करून त्यानुसार रक्कम रु.२४,८८,१९,५०५/- इतकी राज्य शासनास देय असल्याचे भारतीय अन्न महामंडळ यांनी मान्य केले असून सदर रक्कम लवकरच राज्य शासनास प्राप्त होणार आहे.

नाकारलेली रक्कम	समायोजित रक्कम	सुधारित रक्कम	प्रलंबित रक्कम
३९६८९९५८०	४६०१३२३६	२४८८१९५०५	९८४६५५८४

मागील तक्त्यावरून असे दिसून येते की जकात व विम्याची रक्कम रु.३९,६८,९९,८५०/-केंद्र सरकारने नाकारलेली आहे.रक्कम रु. ४,६०,१३,२३६/- समायोजित केलेली आहे.त्यामुळे सदर रकमा केंद्र शासनाकडे प्रलंबित नाही. सन २०००-०१ ते २०१०-११ या कालावधीतील साखर मूल्य समानीकरण निधी लेखे सुधारित करून फरकाची रक्कम रु. २४,८८,१९,५०५/- भारतीय अन्न महामंडळ यांच्याकडून दि. १४-०९-१५ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. सन २०११-१२ या कालवधीतील मार्जिन व वाहतूक दर सुधारित करण्यात आलेला आहे. त्यानुसार दि.१०/०७/२०१५ च्या पत्रान्वये तफावतीची रक्कम रु.१०,०६,५३,९१८/- ची मागणी भारतीय अन्न महामंडळ यांचेकडे करण्यात आलेली आहे.सदर रक्कम प्राप्त झालेली नाही याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

सन २०१२-१३ या कालावधीतील मार्जिन व वाहतूक दर सुधारित करण्यात आलेला आहे. त्यानुसार दि.२१/०६/२०१६ च्या पत्रान्वये तफावतीची रक्कम रु.७,४२,६५,४२९/- ची मागणी भारतीय अन्न महामंडळ यांचेकडे करण्यात आलेली आहे.सदर रक्कम प्राप्त झालेली नाही याबाबत पाठपुरावा सुरु आहे.

वरील अनुपालनावरुन असे दिसून येते, आवश्यक त्या सर्व साखर सबसिडी प्रतिपूर्तीच्या मागण्या केंद्र शासनाकडे वेळेवर सादर करण्यात येत असून सदर प्रतिपूर्ती प्राप्त होण्याबाबत योग्य तो पाठपुरावा नियमितपणे करण्यात येत आहे.तरी सदरचा परिच्छेद वगळण्यात यावा, ही विनंती.

सन २०१२-१३ ते २०१५-१६ या काळातील प्रस्तावित प्राप्त व प्रलंबित रकमांचा तपशील

वर्ष		प्रस्ताव दाखल तारीख	प्रस्तावित रक्कम	प्राप्त रक्कम	प्रलंबित रक्कम	शेरा
२०११-१२		१०.०७.१५	१००६५३९१८	०	१००६५३९१८	प्रस्तुत रक्कम भारतीय अन्न महामंडळ यांचेकडे प्रलंबित आहे.याबाबत पाठपुरावा सुरू आहे.
२०१२-१३		२१.०६.२०१६	७४२६५४२९	०	७४२६५४२९	
२०१३-१४		२०.१२.२०१४	७०५८४२४२९	६९९७८४७९८	६०५७६३१	मार्जिन सुधारित न झाल्याने सदर रक्कम अदा करण्यात आलेली नाही.सुधारित मार्जिनचा प्रस्ताव तयार करण्याचे काम सुरू आहे.
२०१४-१५	दुसरी तिमाही	२३.१.१५	८५२१९९००४	८४२६९९९२४	९४९९०८०	कार्यवाही सुरु आहे.
	तिसरी तिमाही	१७.४.१५	८५३५३४४८२	१३९९११५९७	७१३६२२८८५	प्रस्तुत रक्कम ही उचल न झालेल्या ३,८५,७२४.१ क्विं. नियंत्रित साखरेपोटी कपात करण्यात आलेली आहे. त्यानुसार सन २०१५-१६ व २०१६-१७ मध्ये उचल करण्यात आलेल्या १८२६३३.६८ क्विं. नियंत्रित साखरेनुसार रक्कम रु.३३,७८,७२,३०८/- चा प्रस्ताव दि.१३.०६.१७ रोजी केंद्रशासनास सादर करण्यात आलेला आहे.याबाबत पाठपुरावा सुरू आहे.

वर्ष		प्रस्ताव दाखल तारीख	प्रस्तावित रक्कम	प्राप्त रक्कम	प्रलंबित रक्कम	शेरा
	चौथी तिमाही	३०.७.१५	७७२१७५५३३	७७२१७५५३३	०	
२०१५-१६	पहिली तिमाही	२३.९.१५	७६९८२८२९०	७६९८२८२९०	०	
	दुसरी तिमाही	०१.१२.१५	६१०१३२४०५	६१०१३२४०५	०	
	तिसरी तिमाही	०९.०२.१६	७५६४२८०००	७५६४२८०००	०	
	चौथी तिमाही	०४.०६.१६	७६५११००५०	७६५११००५०	०	
	एकूण	०	६२६०१६९५४०	५३५६०७०५९७	९०४०९८९४३	

१.१४ परिच्छेद क्र. २.२.१२ रॉकेल तेलाचे वाटप :-

केंद्र शासनाचे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालय प्रत्येक राज्याला त्यांच्या मागणीच्या आधारावर अनुदानित दराने रॉकेल वाटप करते. जिल्ह्यांच्या मागणीच्या आधारावर जिल्ह्यांना राज्य रॉकेलचे वाटप करते. वाटपाच्या आधारावर केंद्र शासनाकडून नियुक्त केलेले रॉकेलचे विक्रेते केंद्र शासनाच्या तेल कंपन्यांच्या तेल डेपोमधून रॉकेलची उचल करतात आणि FPS ना वितरित करतात. रॉकेलची त्या डेपोमधील किंमत आणि इतर प्रासंगिक खर्च जसे विक्रेत्याची / FPS ची दलाली, तापमान फरकामुळे रॉकेल कमी होणे आणि हाताळणी, वाहतूक खर्च, टोल कर व जकात इत्यादी विविध कारणे लक्षात घेऊन प्रत्येक जिल्हा, शिधापत्रिका धारकासाठी विक्रिची किंमत निश्चित करतो.

वर्ष २००८- १३ दरम्यान राज्याने रॉकेलची केलेली मागणी व केंद्र शासनाने केलेले वाटप खाली दर्शविले आहे :–

तक्ता ४ : रॉकेलची मागणी आणि वाटप

(किलोलिटरमध्ये)

वर्ष	मागणी	वाटप	कमतरता टक्केवारीत
२००८-०९	२३,०५,७३९	१६,४०,३१६	२९
२००९-१०	२३,०५,७३९	१६,४०,४१२	२९
२०१०-११	२३,०५,७३९	१५,६४,१७६	३२
२०११-१२	२२,७५,९०७	१२,५८,८७२	४५
२०१२-१३	२१,७१,५६८	९,४५,७२०	५६

वर्ष २००८- ०९ ते २०१२-१३ दरम्यान रॉकेलच्या वाटपाची कमतरता ही २९ ते ५६ क्के दरम्यान होती. केंद्र शासनाकडून रॉकेलचे कमी वाटप आणि रॉकेलच्या मात्रेचे वितरण हे प्रत्येक शिधावाटपपत्रिकेत किती व्यक्ति आहेत आणि त्यांच्याकडे किती गॅस सिलेंडर आहेत हे विचारात घेऊन केले जाते म्हणून शिधावाटपपत्रिकेचे वेळोवेळी पुनर्विलोकन करणे गरजेचे आहे जेणेकरून अपात्र लाभार्थ्यांना काढून टाकता येईल. ज्यामुळे रॉकेलच्या योग्य वितरणाची सुनिश्चिती होईल. परंतु वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, असे पुनर्विलोकन झाले नव्हते कारण रॉकेलसाठी पहिल्या तीन वर्षात (२००८-०९ ते २०१०-११) मागणी २३.०६ किली. इतकी स्थिर होती आणि २०११-१२ मध्ये २२.७६ लक्ष (KL) तर २०१२-१३ मध्ये २२.७६ लक्ष (KL) इतकी कमी झाली होती.

लेखा परीक्षेत पुढे असेही आढळून आले की, विभागाने निर्धारित केलेल्या माहितीनुसार राज्यात ४२.७९ लक्ष कुटुंबांकडे दोन गॅस सिलेंडर्स होती तर तेल कंपन्यांच्या माहितीनुसार राज्यात ६२.२३ लक्ष कुटुंबांकडे दोन गॅस सिलेंडर्स होती. तसेच राज्यात ५.८३ लक्ष घरांना पाईप गॅसची जोडणी दिलेली होती (महानगर गॅस लिमिटेडच्या माहितीनुसार) (मार्च २०१३) जे, विभागाने पात्र लाभार्थ्यांची ओळख पटवितांना विचारात घेतले नव्हते. अशारीतीने, रॉकेलचा पुरवठा करतांना पात्र लाभार्थ्यांची योग्य निर्धारणा केली नव्हती.

शासनाने असे नमूद केले (नोव्हेंबर २०१३) की जे लाभार्थी सिलेंडरधारक आहेत त्यांच्या शिधापत्रिकेवर ऑगस्ट २०१२ पर्यंत शिक्का मारण्याचे निर्देश मे २०१२ मध्ये सर्व जिल्ह्यांना दिले आहेत. त्यानंतरच गॅस सिलेंडरधारक लाभार्थ्यांची नक्की संख्या मिळू शकेल. तथापि, नोव्हेंबर २०१३ पर्यंत शिधापत्रिकांवर शिक्के मारुन पूर्ण झाले नव्हते ही वस्तुस्थिती कायम राहते ज्यामुळे रॉकेलच्या वाटपासाठी अपात्र लाभार्थ्यांना काढून टाकण्यात विलंब झाला.

असेही आढळून आले की विभागाकडून जिल्ह्यांना करण्यात आलेले वाटप हे जिल्ह्यांच्या मागणीशी सुसंगत नव्हते आणि ते ५०.८२ टक्के (पुणे) आणि ७७.५७ टक्के (यवतमाळ) इतके बदलत होते. जे परिशिष्ट २.२.७ मध्ये दर्शविले आहे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांसदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे :—

राज्यात शिधापत्रिकांची संख्या, शिधापत्रिकेवरील व्यक्तींची संख्या व गॅसधारकांची संख्या वेळोवेळी बदलत असते. राज्यात शिधापत्रिकांवर गॅस स्टँपिंग करण्याची कार्यवाही करण्याबाबत शासनाने क्षेत्रिय कार्यालयांना वेळोवेळी सूचना केलेल्या आहेत. त्यानुसार राज्यात शिधापत्रिकांवर गॅस स्टँपिंग करण्याची कार्यवाही क्षेत्रिय कार्यालयांकडून करण्यात येते. तसेच केरोसिनचे वाटप केरोसिन मिळण्यास पात्र शिधापत्रिकाधारकांनाच करण्यात येईल, याबाबत दक्षता घेण्यात येते. शिधापत्रिकेवरील गॅस असल्याची नोंद विचारात घेऊन केरोसिनचे वाटप शिधापत्रिकाधारकास करण्यात येते. तथापि, राज्यात शिधापत्रिकाधारकांची मोठ्या प्रमाणात असलेली संख्या व त्यामानाने पुरवठा विभागात असलेला अपुरा कर्मचारी वर्ग, यामुळे राज्यात गॅसस्टँपिंग मोहिम यशस्वीपणे राबविणे शक्य झालेले नाही. तसेच, तेल कंपनीकडून गॅस कनेक्शनचे वितरण करताना शिधापत्रिका विचारात घेतली जात नाही. यास्तव गॅसधारकांची विभागाची माहिती व तेल कंपन्यांची माहिती यात तफावत आढळून येते व प्रत्येक जिल्ह्याची केरोसिनची अचूक मागणी शासनास प्राप्त झालेली नसल्यामुळे केरोसिनचे वाटप मागणीशी सुसंगत नसल्याचे दिसून येते.

(१) राज्यात शिधापत्रिकांवर गॅस स्टँपिंग करण्याची कार्यवाही करण्याबाबत शासनाने क्षेत्रिय कार्यालयांना वेळोवेळी सूचना केलेल्या आहेत. त्यानुसार राज्यात शिधापत्रिकांवर गॅस स्टँपिंग करण्याची कार्यवाही क्षेत्रिय कार्यालयांकडून करण्यात येते. राज्यातील शिधापत्रिकाधारकांच्या संख्येत वेळोवेळी वाढ होत आहे. राज्यात शिधापत्रिकाधारकांची मोठ्या प्रमाणात असलेली संख्या व त्यामानाने पुरवठा विभागात असलेला अपुरा कर्मचारी वर्ग, यामुळे राज्यात गॅसस्टँपिंगची कार्यवाही माहे ऑगस्ट, २०१२ पर्यंत पूर्ण करणे शक्य झालेले नाही.

माहे सप्टेंबर, २०१६ अखेर राज्यातील २ गॅसधारक शिधापत्रिकाधारकांची संख्या ५७९५८९८ इतकी आहे.

(२) पाईप गॅस कनेक्शन या विभागाशी संबंधित नाही. तथापि, शिधापत्रिकांवर पाईप गॅस कनेक्शन असल्याची नोंद घेण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर करण्यात येते.

(३) केंद्र शासनाकडून राज्यास तिमाही केरोसिन नियनत प्राप्त होते. राज्यातील सर्व जिल्ह्यांची केरोसिनची मागणी विचारात घेऊन केंद्र शासनास राज्यास प्राप्त झालेल्या नियतनाच्या प्रमाणात राज्याकडून जिल्हानिहाय नियतन मंजूर करण्यात येते. शिधापत्रिकांवर गॅस स्टँपिंगची कार्यवाही वेळोवेळी करण्यात येत असल्यामुळे जिल्ह्यांची केरोसिनची मागणी व जिल्हानिहाय नियतन वेळोवेळी बदलत असते.

१.१५ परिच्छेद क्र. २.२.१२.१ तेल कंपन्यांचे राज्य पातळीवरील समन्वयक आणि विभाग यांच्याकडील रॉकेलच्या वाटप व वितरणाच्या माहितीमधील तफावत.

तेल कंपन्यांच्या राज्य स्तरीय समन्वयकांकडील (SLC) आणि विभागाकडील २००८-१३ या कालावधीमधील रॉकेलच्या वाटप व वितरणाचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

तक्ता ५ : २००८-१३ दरम्यान रॉकेलच्या वाटप व वितरणात असणारी तफावत

(किलोलिटर मध्ये)

वर्ष	तेल कंपन्यांच्या राज्यस्तरीय समन्वयकाकडील माहितीनुसार		विभागाकडील माहितीनुसार		तफावत	
	वाटप	वितरण	वाटप	वितरण	वाटप	वितरण
१	२	३	४	५	६ (४-२)	७ (५-३)
२००८-०९	१६,४०,७८६	१६,४०,२५६	१६,४०,३१६	१६,३९,६६८	-४७०	-५८८
२००९-१०	१६,४०,४१६	१६,४०,५४६	१६,४०,४१२	१६,३८,२७३	-४	-२२७३
२०१०-११	१५,६४,१७६	१५,६२,७४४	१५,६४,१७६	१५,५७,९२७	०	-४८१७
२०११-१२	१२,५८,८१२	१२,५७,०८५	१२,५८,८७२	१२,६२,९८४	६०	५८९९
२०१२-१३	९,४५,७२०	९,४५,०३६	९,४५,७२०	९,४९,४६८	०	४४३२

स्त्रोत : तेल कंपन्यांचे SLC आणि विभाग यांनी सादर केलेली माहिती

वरील तक्त्यावऊन असे दिसून येते की, २००८-११ मध्ये रॉकेल वितरणाची विभागाकडील आकडेवारी ही तेल कंपन्यांकडील आकडेवारीपेक्षा ७,६७८ कि.ली.ने कमी होती. त्याचवेळी, २०११-१२ आणि २०१२-१३ दरम्यान विभागाकडील रॉकेल वितरणाची आकडेवारी तेल कंपन्यांच्या आकडेवारीपेक्षा १०,३३१ कि.ली.ने जास्त होती. तसेच, रॉकेलच्या २००८-१० मधील वाटपाची विभागाची आकडेवारी तेल कंपन्यांच्या आकडेवारीपेक्षा ४७४ कि.ली.ने कमी होती व २०११-१२ मध्ये ती ६० कि.ली.ने जास्त होती.

विभागाने रॉकेलच्या वाटप व वितरणाच्या आकडेवारीतील तफावतीचा तेल कंपन्यांच्या माहितीबरोबर ताळमेळ साधावा, जेणेकरून रॉकेलचे अनधिकृत हस्तांतरण होणार नाही याची खात्री करता येईल.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांसदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत केरोसीनचे नियतन राज्यास केंद्र शासनाकडून प्राप्त होते. सदर केरोसीन नियतन हे त्रैमासिक (Qurterly) अथवा मासिक (Monthly) स्वरूपात प्राप्त होते. केंद्र शासनाकडून केरोसीनचे नियतन राज्याच्या मागणीच्या ज्या प्रमाणात (टक्केवारी) प्राप्त होते त्याच प्रमाणात ते सर्व जिल्ह्यांना वितरित केले जाते. सन २००८ ते २०१३ या कालावधीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले केरोसिन नियतन, राज्याने मंजूर केलेले केरोसीन नियतन याबाबतचा तुलनात्मक तक्ता व जिल्हास्तरावरून वितरित करण्यात आलेले केरोसिन नियतन याबाबतचे विवरणपत्र सोबत पाठविण्यात येत आहे. तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या केरोसीन नियतनाच्या आदेशाच्या प्रती व राज्याने निर्गमित केलेल्या जिल्हानिहाय केरोसीन नियतनाच्या आदेशाच्या प्रती सोबत पाठविण्यात येत आहेत.

यावरून सन २००८ ते २०१३ या कालावधीकरिता केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले केरोसीन पूर्णतः राज्यातील सर्व जिल्ह्यांना वाटप केले असल्याचे दिसून येते. त्यामुळे उक्त अहवालात उपस्थित केलेला केरोसीन नियतन व वाटप यामधील तफावतीबाबतचा मुद्दा वस्तुस्थितीस धरून नाही.

सन २००८ ते २०१३ या कालावधीत सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या केरोसीन नियतनाच्या आदेशाच्या प्रती व राज्याने निर्गमित केलेल्या जिल्हानिहाय केरोसीन नियतनाच्या आदेशाच्या प्रती, तसेच केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले केरोसिन नियतन, राज्याने मंजूर केलेले केरोसीन नियतन याबाबतचा तुलनात्मक तक्ता व जिल्हास्तरावरून वितरित करण्यात आलेले केरोसिन नियतन याबाबतचे विवरणपत्र यापूर्वीच पाठविण्यात आलेले आहे. (सोबत सदर प्रती प्राप्त झाल्याची प्रत जोडली आहे.) **(विवरण पत्र क्र. ५).**

१.१६ परिच्छेद क्र. २.२.१२.२ रॉकेलवरील रोख सबसिडीचे परस्पर हस्तांतरण करण्यास सुरूवात न करणे.

रॉकेलचे अवैध हस्तांतरण कमी करण्यासाठी आणि त्याचवेळी लाभार्थ्यांना PDS रॉकेलवरील सबसिडीचा लाभ थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये प्राप्त होईल याची खात्री करण्यासाठी केंद्रीय वैशिष्ट्यपूर्ण ओळख प्राधिकरण (UIDAI) यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या कृती गटाच्या शिफारशींच्या आधारावर केंद्र शासनाच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालयाने राज्यामध्ये रॉकेलवरील रोख सबसिडीचे थेट हस्तांतरण (DTCK) करण्याची योजना राबविण्याचे निश्चित केले (ऑक्टोबर २०११). राज्यांनी शिधापत्रिकाधारकांच्या बँक खात्यात रॉकेलवरील सबसिडीचे रोख हस्तांतरण करण्यासाठी संस्थात्मक कार्यतंत्र स्थापित करायचे होते. केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाने, ३१ मार्च २०१२ पूर्वी ज्या राज्यांनी DTCK योजना अवलंबिली त्यांना रु.१०० कोटीचे एकरकमी अनुदान देण्याचे निश्चित केले.

महाराष्ट्र शासनाने मार्च, २०१२ मध्ये योजनेची अंमलबजावणी करण्याचे मान्य केले आणि केंद्र शासनाने महाराष्ट्रातील वर्धा, मुंबई, मुंबई उपनगरे, अमरावती, पुणे आणि नंदुरबार या ६ जिल्ह्यांमध्ये लाभार्थ्यांची बँक खाती त्वरेने उघडण्याचे निर्देश दिले (जुलै २०१२). ३१ मार्च २०१३ पर्यंत संपूर्ण राज्यात योजनेची अंमलबजावणी करावयाची होती. मार्च २०१३ मध्ये केंद्र शासनाने रु.१० कोटीचे अनुदान मुक्त केले आणि संपूर्ण राज्यात पूर्ण किरकोळ विक्री किमतीस रॉकेलची विक्री पूर्ण होऊन एक महिना पूर्ण झाल्याविषयीचे वैयक्तिक प्रमाणपत्र दिल्यानंतर रु.५० कोटीचा पुढचा हप्ता मुक्त करायचा होता. दस्तऐवजांची तपासणी केली असता असे आढळून आले की, विभागाने ऑगस्ट २०१२ ला योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सुरूवात केली. तथापि, मार्च, २०१३ पर्यंत अमरावती (५१ टक्के), नंदुरबार (६६ टक्के) आणि वर्धा (७१ टक्के) या ३ जिल्ह्यांमध्ये लाभार्थ्यांची बँकेत खाती उघडण्याचे काम अंशतः पूर्ण झाले होते.

शासनाने असे नमूद केले (नोव्हेंबर २०१३) की, MGNREGA च्या धर्तीवर अंदाजपत्रकाबाहेर सबसिडी हस्तांतरण करण्याची पद्धत आणि रॉकेलच्या किरकोळ व्यापा-यांकडून बाजारभावावर होत असलेल्या विक्रीच्या व्यवहारांना इलेक्ट्रीक पद्धतीने हस्तगत करण्यासाठीच्या मूलभूत सुविधा केंद्र शासनाने उपलब्ध करून न दिल्यामुळे योजना जुलै २०१३ पासून कार्यान्वित झाली नाही.

तरीही, राज्यात जरी योजनेची सुरूवात ऑगस्ट २०१२ पासून झाली होती आणि केंद्र शासनाने रु.१० कोटी मुक्त केले होते तरी राज्यातील सहा जिल्ह्यांपैकी फक्त तीनच जिल्ह्यांत DTCK ची अंशतः अंमलबजावणी झाली होती. रॉकेलचे अवैध हस्तांतरण रोखण्याचे आणि लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रोख सबसिडी परस्पर हस्तांतरित करण्याचा उद्देश साध्य झाला नव्हता ही वस्तुस्थिती कायम रहाते.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांसदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासनाने दि.९ जुलै २०१२ च्या पत्रान्वये दिलेल्या निदेशानुसार केरोसिनवरील अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्याच्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी वर्धा, मुंबई व मुंबई उपनगर, अमरावती, पुणे व नंदुरबार या ६ जिल्ह्यांतील शिधापत्रिकांची बँक खाती सुरू करण्याच्या सूचना शासनाच्या दि.९ ऑगस्ट २०१२ च्या पत्रान्वये संबंधित जिल्हाधिकारी व नियंत्रक शिधावाटप व संचालक, मुंबई यांना देण्यात आल्या. तथापि उपरोक्त ६ जिल्ह्यांपैकी नंदुरबार, वर्धा व अमरावती या ३ जिल्ह्यांतील बँक खाती सुरु केल्याची टक्केवारी तुलनात्मकदृष्ट्या जास्त असल्याने सदर योजना प्रथम या ३ जिल्ह्यांत राबविण्याबाबत केंद्र शासनास शासनाच्या दि.२१ मार्च २०१३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. तसेच सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शन करण्याबाबत केंद्र शासनास दि.१० एप्रिल २०१३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. तथापि केंद्र शासनाने शासनास अद्याप काहीही कळविलेले नाही.

केरोसिनवरील अनुदान शिधापत्रिकाधारकांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याच्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यास सन २०१२-१३ मध्ये प्राप्त झालेली रु.१० कोटी इतकी रक्कम सन २०१३-१४, सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये वापरण्यात आली नाही. सन २०१६-१७ मध्ये DBTK योजनेसाठी सदर रक्कम वळती करण्याबाबतची विनंती केंद्र शासनास शासनाच्या दि.१ मार्च २०१६ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे. तथापि केंद्र शासनाकडून राज्यास याबाबत काहीही कळविण्यात आलेले नाही.

१.१७ परिच्छेद क्र. २.२.१२.३ वाहन मागोवा प्रणालीच्या अंमलबजावणीत विलंब.

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालयाने (केंद्र शासन) महाराष्ट्र शासनास PDS रॉकेलची वाहतूक करणा-या वाहन/टँकर्सच्या हालचाली मागोवा घेण्यासाठी ग्लोबल पोझीशनींग सिस्टीम आधारित वाहन मागोवा प्रणाली (VTS) बसविण्याची विनंती (फेब्रुवारी २०११) केली होती. प्रणालीला PDS रॉकेलची वाहतूक करणा-या वाहन मार्गाचे आणि वेळेचे उल्लंघन केल्यास सतर्कतेचा इशारा द्यायचा होता आणि अशा रितीने वाहतूक वाटेवरील भुरट्या चो-या आणि अवैध हस्तांतरणावर नजर ठेवण्याचे एक परिणामकारक साधन म्हणून काम करणे अपेक्षित होते. केंद्र शासनाने या बाबतीत तेल विकणा-या कंपन्यांकडून तांत्रिक आणि संस्थात्मक मदत देण्याचा प्रस्ताव दिला होता आणि असे कळविले (मार्च २०११) होते की प्रत्येक वाहनावर VTS बसविण्याची अंदाजित किंमत रु.१३,००० राहील जो खर्च महाराष्ट्र शासनाला आणि तेल कंपन्यांना करायचा होता.

लेखापरीक्षणात असे आढळून आले की, नोव्हेंबर २०१३ पर्यंत एकूण रु.१.३९ कोटी खर्च करून संपूर्ण राज्यात १,१०७ वाहनांपैकी जरी १,०६८ वाहनांवर VTS बसविण्यात आले होते तरीही, कोल्हापूर जिल्ह्यातील VTS बसविलेली फक्त ३४ वाहने प्रत्यक्षात वापरली जात होती.

शासनाने हे सत्य स्वीकार (नोव्हेंबर २०१३) करताना इतर जिल्ह्यातील VTS च्या अकार्यरत असण्याचा संबंध तांत्रिक समस्यांशी जोडला. VTS बसविलेल्या वाहन/टँकर्सपैकी ९७ टक्के अकार्यरत असल्यामुळे PDS रॉकेलच्या गळतीवर बंधन घालण्याचे/अवैध हस्तांतरण रोखण्याचे उद्दीष्ट सफल झाले नव्हते.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांसदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना वितरित करण्यात येणा-या केरोसिनची वाहतूक करणा-या टँकर्सवर जी.पी.एस.यंत्रणा बसविण्याच्या सूचना शासन परिपत्रक दि.२८ मे २०१० अन्वये देण्यात आलेल्या होत्या. सदर यंत्रणा घाऊक केरोसिन परवानाधारकांनी सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांच्यामार्फत स्वखर्चाने बसविली होती.

तथापि, सदर यंत्रणा पुढे सुरळीत सुरू राहण्याबाबत सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांनी खबरदारी न घेतल्यामुळे, तसेच प्रस्तुत यंत्रणा राबविण्याकरिता घाऊक केरोसिन परवानाधारकांनी आवश्यक ती रक्कम सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांना अदा न केल्यामुळे राज्यातील सर्व जिल्ह्यातील केरोसिन टँकर्सवरील जी.पी.एस.यंत्रणा सद्यःस्थितीत कार्यान्वित नाही. केरोसिनची वाहतूक करणा-या टँकर्सवर जी.पी.एस.यंत्रणा बसविण्यासाठी येणा-या खर्चाच्या विभागणीबाबत केंद्र शासनाकडून दि.१६ जुलै २०११ च्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. तथापि, अद्यापपर्यंत केंद्र शासनाकडून कोणतेही अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत.

तथापि केरोसिनच्या वितरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच केरोसिनची अवैध विक्री रोखण्यासाठी सद्यःस्थितीत खालील उपाययोजना करण्यात येतात.

१. वेळोवेळी दुकानांच्या तपासण्या केल्या जातात.

२. विविध स्तरावर दक्षता समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत.

३. परवानाधारकांविरुद्ध तक्रारी प्राप्त झाल्यास दक्षता पथकांमार्फत धाडी टाकण्यात येतात.

४. ग्राहकांना तक्रार करता यावी याकरिता हेल्पलाईन (१८००-२२-४९५०) सुरू करण्यात आली आहे.

रॉकेलचा टँकर डेपोमधून निघाल्यानंतर त्या भागातील नागरिकांना एसएमएसद्वारे कळविले जाते.

१.१८ परिच्छेद क्र. २.२.१३ पाम तेलाचे वितरण अत्यल्प भागात होणे.

केंद्र शासनाकडून कमी दरात प्राप्त झालेल्या पाम तेलाचे वाटप, APL पांढ-या शिधापत्रिकाधारकांना वगळून सर्व लाभार्थ्यांना एक लिटर प्रति माह प्रति शिधापत्रिका या दराने सर्व पात्र लाभार्थ्यांना करण्याचे ठरविले (जून, २००८). राज्य व्यापारी महामंडळाकडून (STC) प्रापण केलेल्या पाम तेलाची शिधापत्रिकाधारकांना अंतिम वितरणासाठी पणन महामंडळाकडून शासकीय गोदामांत वाहतूक करायची होती.

लेखापरीक्षेला असे आढळून आले की, पाम तेलाचा पुरवठा नियमित नव्हता. आठ चाचणी तपासणी केलेल्या कार्यालयांच्या ४३ सरासरी मासिक ५,५३६.०६ KL (२१.९३ टक्के), इतकेच होते. पाम तेलाचे प्रत्यक्ष वितरण देखील खुपच कमी होते. चाचणी तपासणी केलेल्या आठ कार्यालयांमधील फक्त ८.७८ ते ३४.२२ टक्के पात्र शिधापत्रिका धारकांनाच पाम तेल वितरण केले होते. लेखापरीक्षेने विभागीय अधिका-यांबरोबर संयुक्तपणे लाभार्थ्यांचे सर्वेक्षण केले असता, ९८ टक्के लाभार्थ्यांनी पाम तेल कमी प्रमाणात मिळत असल्याची/अजिबात मिळत नसल्याची तक्रार केली.

शासनाने असे नमूद केले (नोव्हेंबर, २०१३) की, केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांबरोबर करार न करणे, तेलाची आयात, उपलब्धता, प्रत्यक्ष जहाजातून पाठविलेला माल, पॅकींग आणि लाभार्थ्यांना वाटप याकरिता वेळ लागण्यामुळे कमी दरातील पाम तेलाचा पुरवठा अनियमितपणे होत होता.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांसदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांबरोबर करार न करणे, तेलाची आयात, उपलब्धता, प्रत्यक्ष जहाजातून पाठविलेला माल, पॅकींग आणि लाभार्थ्यांना वाटप याकरिता वेळ लागण्यामुळे कमी दरातील पाम तेलाचा पुरवठा अनियमितपणे होत होता. सद्यःस्थितीत सरकारकडून सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत पामतेलाचा पुरवठा करण्यात येत नाही.

या स्पष्टीकरणासह सदर परिच्छेद वगळण्याची विनंती करण्यात येत आहे.

१.१९ परिच्छेद क्र. २.२.१४ एफपीएस आणि शिधापत्रिका धारकांना अन्नधान्य वितरण करण्याच्या प्रणालीत सुधारणा करण्यासाठीच्या योजनेच्या अंमलबजावणीत झालेला विलंब :-

TPDS अंतर्गत अन्नधान्याच्या वितरण यंत्रणेत सुधार आणण्यासाठी शासकीय गोदामातून शासनाच्या स्वतःच्या किंवा आदिवासी विकास महामंडळाकडून चालविलेल्या भाड्याच्या वाहनांतून आणि पणन महासंघाच्या कंत्राटी वाहनांतून अन्नधान्याची वाहतूक FPS पर्यंत करण्याची योजना महाराष्ट्र शासनाने आदिवासी आणि दुष्काळ प्रवण क्षेत्रात अनुक्रमे मार्च, १९९३ आणि मार्च, १९९८ पासून अंमलात आणली होती.

ही योजना जुलै, २००३ पर्यंत सर्व जिल्ह्यांत अंमलात आणली पण ऑक्टोबर, २००५ पासून बंद करण्यात आली. जे केंद्र शासनाच्या एप्रिल, २००५ च्या अन्नधान्य दारी पोहचविण्यासाठी कार्यक्षम आणि प्रभावी वितरण यंत्रणा प्रस्थापित करण्याच्या शिफारशीच्या विरुद्ध होती. अन्नधान्य दारी पोहचविण्याच्या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणा-या अडचणींचा अभ्यास करण्यासाठी आणि ही यंत्रणा जास्त प्रभावी होण्यासाठी उपाययोजना सुचविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने उशिराने एक समिती गठीत (जुलै, २००९) केली. या समितीने फेब्रुवारी, २०१० ला शिफारशी दिल्या आणि त्या शिफारशींच्या आधारावर महाराष्ट्र शासनाने अखेर फेब्रुवारी, २०१२ मध्ये " धान्य हमी योजना " या नावाची एक योजना आखली ज्याद्वारे शासकीय गोदांमातील धान्य BPL व AAY शिधापत्रिका धारकांना थेट वितरण व्हावे यासाठी एक ठराविक दिवशी FPS/ गावातील चौक/ सार्वजनिक ठिकाण येथे पोहचविणे, अन्नधान्याची वाहतूक करणा-या वाहनांवर GPS प्रणाली बसविणे इत्यादी उद्दीष्टे साध्य करायची होती.

शासनाने असे नमूद केले (नोव्हेंबर, २०१३) की, समिती गठीत करण्यातील विलंब आणि नवीन योजना तयार करण्यातील विलंब हा प्रशासकीय कारणांमुळे झाला होता. शासनाने पुढे असेही सांगितले की, नवीन योजनांच्या अंमलबजावणीवर ब-याच संख्येत न्यायालयीन दावे दाखल केले गेले. समिती गठीत करायला झालेल्या विलंबामुळे महाराष्ट्र शासनाला नवीन योजना तयार करण्यास विलंब झाला होता. परिणामतः FPS आणि शिधापत्रिका धारकांना अन्नधान्याचे वितरण करण्याच्या प्रणालीच्या सुधारणेत सहा वर्षांपेक्षा अधिक विलंब झाला होता. (एप्रिल, २००५ ते फेब्रुवारी, २०१२) ही वस्तुस्थिती कायम राहते.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांसदर्भात अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

केंद्र शासनाच्या अर्थसहाय्यातून खरेदी केलेल्या वाहनांद्वारे राज्यात सुरू केलेली द्वार वितरण योजना ही आदिवासी व अवर्षणप्रवण क्षेत्रातील १० जिल्ह्यांमध्ये कार्यान्वीत करण्यात आली होती. ही योजना टप्प्याटप्प्याने राज्यातील २३ जिल्ह्यांमध्ये कार्यान्वीत करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या होत्या. या जिल्ह्यांचा कंत्राट कालावधी दिनांक ३१ मे २००६ पर्यंत होता. या योजनेंतर्गत जिल्ह्यातील एका तालुकामध्ये प्रायोगिक स्तरावर

द्वार वितरण करण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. सन २००५ मध्ये जेव्हा यानुसार आणखी ६ जिल्ह्यांत वाहतूक कंत्राटे देखील निश्चित करण्यात येणार होती, त्यावेळी द्वार पोच योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येत असलेल्या विविध अडचणी विचारात घेऊन शासनाने सदर द्वार पोच योजना दिनांक ३१ मे २००६ पासून बंद करण्याचा निर्णय घेतला.

नियोजन आयोगाने एप्रिल, २००५ मध्ये गरीब जनतेला खात्रीशीररित्या अन्नधान्याचा पुरवठा होण्यासाठी प्रचलित वितरण व्यवस्था सक्षम करण्याचे सुचविले. त्याअनुषंगाने ऑक्टोबर, २००६ मध्ये केंद्र शासनाकडून विभागास तपशीलवार सूचना प्राप्त झाल्या. या सूचनांच्या अनुषंगाने गाव पातळीवर अन्नधान्याच्या वाहतुकीमध्ये होणारी गळती रोखण्यासाठी द्वार पोच योजना पोच योजना प्रभावीरितीने कशी राबवावी, यासंदर्भात शासन स्तरावर विचारविनिमय सुरू होता. (त्यामध्ये निवडक जिल्ह्यांमध्ये सुरू असलेल्या घरपोच योजना/द्वार पोच योजना इ.योजनांचा अभ्यास सुरू होता.)

द्वार पोच योजनेमध्ये येत असलेल्या अडचणी व तरीही धान्य दुकानांपर्यंत पोहोचविण्याची आवश्यकता, याचा विचार करून गोदाम व्यवस्थापन योजना विभागाने प्रस्तावित केली. यामध्ये गोदामाचे संपूर्ण व्यवस्थापन व अन्नधान्य वाहतुकीच्या संदर्भात केंद्र शासन किंवा राज्य शासन पुरस्कृत संस्थांवर जबाबदारी सोपविण्याचा विचार आला. मात्र, ही योजना प्रत्यक्षात आली नाही.

त्यानंतर अमरावती विभागांतर्गत प्रायोगिक स्तरावर शासकीय कार्यप्रणालीमध्ये बदल न करता तसेच शासनावर अधिक आर्थिक बोजा पडणार नाही, अशारितीने द्वार पोच योजना राबविण्याचा निर्णय एप्रिल, २००६ मध्ये घेण्यात आला. या योजनेच्या अंमलबजावणीतही अनेक त्रुटी निदर्शनास आल्या.

ज्या २ जिल्ह्यांतील वाहतूक कंत्राटदारांमार्फत द्वार पोच योजना सुरू करण्याचा निर्णय सन २००१ व २००३ मध्ये घेण्यात आला होता. त्यांनी दिनांक ३१ मे २००६ मध्ये सदर योजना बंद करण्याचा निर्णय शासनाने घेतल्यानंतर त्यांना शासन निर्णयातील तरतुदीनुसार दरवाढ न मिळाल्याने मा. उच्च न्यायालयामध्ये याचिका क्र.६६७/२००७ दाखल केली होती. या याचिकेवर दिनांक २२ ऑक्टोबर २००८ मध्ये दिलेल्या निर्णयामध्ये मा. उच्च न्यायालयामध्ये यासंदर्भात अधिकृत फोरमकडे दाद मागण्याच्या सूचना दिल्या.

तत्कालिन अध्यक्ष, ग्राहक कल्याण सल्लागार समिती यांनी शासनास पत्र लिहून सदर याचिकेच्या अनुषंगाने उचित मंचाकडून निकाल लागल्याशिवाय नव्याने द्वार पोच योजना राबविण्याचा विचार करून नये, असे शासनास सुचविले होते. तरीही विभागाने दिनांक १३ जुलै २००९ मध्ये द्वार पोच योजनेचा अभ्यास करण्यासाठी श्री. सुधाकर जोशी (निवृत्त आयएएस) यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्याचा निर्णय घेतला. समितीने अभ्यासाअंती दिनांक ६ फेब्रुवारी २०१० रोजी अहवाल शासनास सादर केला.

राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्था व इतर योजनांतर्गत धान्याच्या वाहतुकीच्या धोरणांच्या अनुषंगाने मा. उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठामध्ये रिट याचिका क्र.५०१०/२००९ दाखल केली. यामध्ये याचिकाकर्त्यांनी सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत अन्नधान्य व इतर जीवनाश्यक वस्तूंचे धोरण द्वार पोच योजना राबवून सुधारित करावे, जोशी समितीने अहवाल सादर करावा. सबब, खुली निविदा स्थगित ठेवावी इ. मागण्या केल्या होत्या.

सुधाकर जोशी समितीने अहवालाच्या अनुषंगाने धान्य हमी योजना अंमलात आणण्यासाठी मंत्री मंडळ प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया विभागाने एप्रिल, २०१० मध्ये सुरू केली होती. या प्रस्तावावर वित्त विभागाने ५ वेळा उपस्थित केलेल्या त्रुटी, त्या अनुषंगाने मागवावयाची/संकलित करावयाची माहिती यामुळे कालापव्यय होऊन शेवटी मंत्रीमंडळाच्या मान्यतेनंतर दिनांक २ फेब्रुवारी २०१२ रोजी धान्य हमी योजनेचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला.

१.२० परिच्छेद क्र. २.२.१४.१ FCI ला चूकीने प्रदान केलेल्या जकातीचा परताव्यासाठी दावा न करणे.

मुंबई महापालिका (MMC) अधिनियम, १८८८, च्या कलम १९४(१) सह मुंबई प्रांतिय महापालिका (BPMC) अधिनियम, १९४९ च्या कलम १४६ (१) मधील तरतुदीनुसार, एखादी वस्तू आयात करताना, या बाबतीत संबंधित शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने, ती शासनाच्या मालकीची असून तिचा वापर केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठी होणार असल्याचे किंवा तसा वापर करण्याचा उद्देश असल्याचे, तसेच नफा मिळण्यासाठी तिचा वापर होणार नसल्याचे किंवा तसा वापर करण्याचा उद्देश नसल्याचे प्रमाणित केल्यास अशा वस्तूवर जकात आकारणीय नसावी. तसेच दोन्ही अधिनियमांच्या उप-कलम (२) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, ज्या वस्तूवर जकात भरण्यात आली आहे, ती वस्तू आयात करताना आयातदाराने सदर वस्तू शासनाबरोबर केलेल्या विशिष्ट कराराची पूर्तता करण्यासाठी किंवा शासनाच्या वापरासाठी किंवा केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठी आयात केल्या विषयीचे स्वाक्षांकीत लेखी घोषणा पत्र सादर केल्यास त्यावर भरलेल्या संपूर्ण शुल्काचा परतावा देण्यात यावा.

वर्ष २००८-१२ या कालावधीचे विभागाचे लेखे तपासले असता असे आढळून आले की १३ जिल्ह्यांमध्ये विभागाने FCI ला अन्नधान्याच्या किंमतीबरोबरच रु. ६.५५ कोटी एवढी जकात रक्कम प्रदान केली होती. परंतु वरील अधिनियमांच्या उप-कलम (२) मधील तरतूदींच्या अंतर्गत विहित केले असूनही विभागाने FCI कडून कुठलाही परताव्याचा दावा केला नव्हता.

शासनाने नमूद केले (नोव्हेंबर, २०१३) की, BPMC अधिनियम, १९४९ च्या कलम १२७ (२) (a) व १४९ (१) मधील तरतुर्दीअंतर्गत FCI ला जकातीचे प्रदान करण्यात आले होते.

BPMC अधिनियम, १९४९ च्या कलम १४६ (१) व MMC अधिनियम, १८८८ च्या कलम १९४ (१) मधील तरतूदींनूसार अन्नधान्यावर जकात आकारणीय नसल्याने हे उत्तर चूकीचे ठरते.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांसदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

सन २००८-२०१२ या कालावधीच्या महालेखाकार कार्यालयास सादर केलेल्या प्रपत्रलेख्याची पडताळणी करता, उपरोक्त कालावधीत सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेल्या एकुण ३३ जिल्हा पुरवठा कार्यालयापैकी फक्त १० जिल्हा पुरवठा कार्यालयांनी जकात कर भरल्याचे स्पष्ट होते. त्यासंदर्भात संबंधीत १० जिल्हा पुरवठा कार्यालयाशी संपर्क साधला असता, महानगरपालिका क्षेत्रातील भारतीय खाद्य निगम मंडळाच्या डेपोमधून धान्याची उचल करण्याकरीता महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १२७(२) (अ) १४९(१) अन्वये जकात कर आकारणी करण्यात येत असल्याबाबत व भारतीय खाद्य निगम मंडळास अन्नधान्याच्या रकमेबरोबर जकात कराची भरणा न केल्यास धान्याचे वितरण आदेश भारतीय खाद्य निगम मंडळाकडून दिले जात नसल्याबाबत निवेदन सादर केले आहे. त्यावरुन सदर जिल्हा कार्यालयाकडुन महानगरपालिका क्षेत्रातील भारतीय खाद्य निगम मंडळास जकात कराची भरणा करण्यात येते.

महालेखाकार कार्यालयाच्या परिच्छेदांच्या अनुषंगाने वित्तीय सल्लागार व उप सचिव कार्यालयाकडून दिनांक २९.११.२०१३ रोजी पत्र निर्गमित करण्यात आलेल्या पत्रान्वये भारतीय खाद्य निगम मंडळाकडून पावती (Cash Memo) प्राप्त करून यापुर्वी जकात करापोटी भारतीय खाद्य निगम मंडळास प्रदान करण्यात आलेल्या रकमेची वसुली करण्याबाबत कळविले आहे.

तसेच महालेखापाल कार्यालयाच्या नियमित लेखापरीक्षण पथकाने जिल्हा पुरवठा कार्यालय सोलापुर व कोल्हापुर यांच्या लेखापरिक्षण अहवालात जकात कराच्या भरणा करण्यात आल्याबाबत आक्षेप घेण्यात आला होता. त्याबाबत संबंधीत जिल्हा पुरवठा कार्यालयांनी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ चे कलम १२७(२) (अ) १४९(१) चे परिशिष्ट अवलोकनार्थ अनुपालनासह महालेखाकार कार्यालयास सादर केले, त्यास अनुसरुन विभागाच्या जबाबदारीवर महालेखापाल कार्यालयाने सदर परिच्छेद वगळण्यात आल्याबाबत कळविले आहे.

१० जिल्हा पुरवठा अधिकारी यांना नोव्हेंबर २०१३ च्या महालेखाकार कार्यालयाच्या निरीक्षण अहवालातील परिच्छेदात नमूद केल्यानुसार चुकीचे जकात करापोटी FCI ला अदा केलेल्या रकमेची वसूली करणेबाबत या कार्यालयामार्फत दि.१४.०१.२०१४, १०.०२.२०१५, १७.११.२०१६, २१.०९.२०१७, २.१.२०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि १० जिल्ह्यांपैकी ९ जिल्हा पुरवठा अधिकारी जळगांव, पुणे, उस्मानाबाद, सांगली, औरंगाबाद, अहमदनगर, धुळे, नाशिक, व कोल्हापूर यांनी सदर वसूलीबाबत कार्यवाही सुरू असल्याचे पत्राद्वारे कळविले आहे. उर्वरीत १ सोलापूर जिल्हा पुरवठा अधिकारी या जिल्ह्याकडून अद्याप अनुपालन प्रलंबित आहे.

तथापि सन २०१४-१५ पासून कोल्हापूर वगळता इतर उर्वरीत ९ जिल्ह्यांनी जकात भरणे बंद केले आहे. तसेच सन २०१५-१६ पासून कोल्हापूरने जकात भरणे बंद केले आहे.

१.२१ परिच्छेद क्र. २.२.१५ गोदामे बांधण्यातील विलंब-

FCI डेपोमधून प्राप्त झालेल्या धान्याचे FPS द्वारे शिधापत्रिकाधारकांना वितरण करण्याकरीता ते शासकीय गोदामांमध्ये साठविले जाते. महाराष्ट्र राज्यात TPDS अंतर्गत जीवनावश्यक वस्तूंची साठवणूक करण्यासाठी प्रत्यक्षात वापर होत असलेल्या ९३१ गोदामांची साठवण क्षमता जून, २०१२ रोजी ५.२६ लक्ष मे.टन होती.

अन्नधान्य फक्त ४३ दिवस साठवण्याएवढीच गोदामाची सध्याची क्षमता असल्याने आणखी दोन महिने साठवण करण्याची गरज आणि भविष्यातील अन्नधान्याची वाढीव प्राप्ती विचारात घेऊन विभागाने शासकीय गोदामांची साठवण क्षमता वाढविण्याचे निश्चित केले. साठवण क्षमता ५.९५ लक्ष मे.टनने वाढविण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने ३४ जिल्ह्यांमध्ये ५८४ अतिरिक्त गोदामांचे बांधकाम करण्याविषयीचा एकूण रु.४८४.१३ कोटी खर्चाचा कृती आराखडा तयार केला (मार्च, २०१२) जो मार्च,२०१२ मध्ये राष्ट्रीय कृषी व ग्रामीण विकास बँक (NABARD) च्या ग्रामीण पायाभूत सुविधा विकास निधी अंतर्गत मंजूर करण्यात आला. NABARD कडून रु.४५९.९३ कोटी कर्जरुपात प्राप्त व्हावयाचे होते व उर्वरित रु.२४.२० कोटी निधी महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करून द्यावयाचा होता. सर्व ५८४ गोदामांचे बांधकाम मार्च, २०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.

मार्च, २०१२ मध्ये NABARD ने रु.९१.५८ कोटी (२० टक्के) सुसज्जता अग्रीम मुक्त केला आणि प्रकल्पावर प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या आधारावर/प्रमाणात उर्वरित रकमेची प्रतिपूर्ती करावयाची होती. NABARD कडून मुक्त करण्यात आलेला निधी राज्याच्या एकत्रीकृत निधीमध्ये जमा करायचा होता जो महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने प्रत्येक वर्षी अर्थसंकल्पात तरतूद करून वितरीत करायचा होता.

अभिलेख्यांच्या तपासणीतून असे आढळून आले की, ज्या १२८ गोदामांसाठी वित्त विभागाने निधी वितरीत केला होता, त्यापैकी फक्त ३१ गोदामांचे बांधकाम नोव्हेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण झाले होते. जमिनीच्या अनुलब्धतेमुळे आठ गोदामाचे काम सुरू होऊ शकले नव्हते. ६६ गोदामांचे काम प्रगतीपथावर होते. एका गोदामाच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्याची प्रक्रिया सुरू होती. २२ गोदामांच्या बाबतीत निविदेची प्रक्रिया सुरू होती. ज्या गतीने गोदामांचे बांधकाम पूर्ण होत होते. ते विचारात घेता, सर्व ५८४ गोदामांचे बांधकाम मार्च, २०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट साध्य होणे अशक्य असल्याचे दिसुन येते. सबब, अन्नधान्याच्या साठवणीसाठी अतिरिक्त साठवण क्षमता निर्माण करण्याच्या उद्दीष्टाला बाधा निर्माण झाली.

शासनाने गोदामांच्या बांधकामाची प्रगती असमाधानकारक असल्याचे मान्य करताना असे नमूद केले आहे. (नोव्हेंबर, २०१३) की, ३.२४ लक्ष मे.टन क्षमतेची २३४ गोदामे बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांसदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

नाबार्डच्या मंजूरी पत्रानुसार ५.९५ लक्ष मे .टन क्षमतेची ५८४ गोदामे बांधणे अपेक्षित आहे. माहे ऑगस्ट, २०१७ पर्यंत ३.३३ लक्ष मे. टन क्षमतेच्या २३७ गोदाम बांधकामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. वित्त विभागाकडून उपलब्ध होणा-या निधीचा विचार करून गोदाम बाधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत/येत आहेत. दरसूचीमध्ये होणा-या वाढीमुळे व भाववाढीमुळे बांधकाम खर्चातील होणा-या वाढीचा विचार करता निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

सन २०१०-११ ते २०१७-१८ या कालावधीत २१४ गोदाम बांधकामासाठी सार्वजनिक बाधकाम विभागास रु.२७५.९५ कोटी निधी उपलब्ध करून दिला आहे. या गोदाम बांधकामांपैकी १७६०६० मे. टन क्षमतेची १४६ गोदाम बांधकामे पूर्ण झालेली असून ५४ बांधकामे प्रगती पथावर आहेत. ३ गोदाम बांधकामाच्या निविदा प्रक्रियेबाबत व १२ गोदामांच्या तांत्रिक मान्यतेबाबतची कार्यवाही सुरू आहे. १८ गोदाम बांधकामांना पुरेशी योग्य जमीन उपलब्ध नाही.

प्रस्तुत गोदाम बांधकामाच्या पुर्णत्वसाठी वेळोवेळी आढावा घेऊन समस्यांचे निराकरण करून गोदाम बांधकामे तातडीने करण्यास विभाग प्रयत्नशील आहे.

१.२२ परिच्छेद क्र. २.२.१५.१ गोदामांमध्ये साठविलेल्या अन्नधान्याचा विमा न उतरविणे :-

महाराष्ट्र शासनाच्या वित्त विभागाने फेब्रुवारी, १९६६ मध्ये दिलेल्या आदेशांनुसार शासकीय गोदामांमध्ये तपासणी केलेल्या ११ पैकी सात कार्यालयातील तपासणीत असे आढळून आले की, एकंदर १.०५ लक्ष MT साठवण क्षमता असलेल्या १९९ गोदामात साठवलेल्या अन्नधान्याच्या विभागाने विमा उतरविला नव्हता.

शासकीय /भाड्यावर घेतलेल्या गोदांमामध्ये साठविलेल्या अन्नधान्याचा विमा उतरविण्यासाठी DSOs आणि FDOs ना सूचना देण्यात आल्याचे शासनाने नमूद केले. (नोव्हेंबर, २०१३).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायांसदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

महालेखापाल मुंबई यांच्या दि.२५.०९.२०१३ च्या गोपनिय अहवालातील परिच्छेद क्र.१५-१ नुसार जिल्हा पुरवठा कार्यालयास अन्नधान्याच्या साठवणूक विम्याबाबत विचारणा करता तसेच सन २००८-१२ च्या प्रपत्रलेखा पडताळणी करता, बहुतांश जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून अन्नधान्याचा साठ्याचा विमा उतरविण्यात आला असून, प्रपत्रलेख्यात सदर रकमेची नोंद Insurance on Storage या लेख्यात दर्शविण्यात येते. तसेच जिल्हा पुरवठा कार्यालय नाशिक, कोल्हापूर, नांदेड व लातूर यांच्यामार्फत विमा संचालनालय महाराष्ट्र राज्य, वांद्रे, मुंबई कार्यालयास शासकीय गोदामात साठवणूक करण्यात आलेल्या अन्नधान्याच्या विम्याचे हप्ते स्विय प्रपंजी लेख्यातून (PLA) वार्षिक भरण्यात येत असल्याबाबत कळविले आहे. सदर कार्यालयाने अन्नधान्याच्या विमा संदर्भात Godown Manual Para ७.११ नुसार कार्यवाही केल्याचे कळविले आहे.

उर्वरित जिल्हा कार्यालयाने शासकीय गोदामात साठवणूक करण्यात आलेल्या अन्नधान्याच्या विम्याची रक्कम न भरण्यात येत असल्याबाबत कळविले आहे. तसेच संचालनालय, नागरी पुरवठा, परेल यांच्याकडे विचारणा केली असता वार्षिक धान्याच्या विम्याची रक्कम कार्यालयाच्या स्विय प्रपंजी लेख्यातून (PLA) प्रदान केली आहे.

ज्या जिल्हा पुरवठा कार्यालयाने अद्यापपर्यंत अन्नधान्याच्या साठवणूक विम्याबाबत कार्यवाही केली नाही अशा कार्यालयांना अन्नधान्य साठ्याचा विमा उतरविण्याची कार्यवाही करण्याबाबत वित्तीय सल्लागार व उपसचिव कार्यालयाकडून दिनांक २९ नोव्हेंबर २०१३ रोजी पत्र निर्गमित केले आहे.

४ जिल्हा पुरवठा अधिकारी नंदुरबार, अमरावती, ठाणे, जळगांव व अन्नधान्य वितरण अधिकारी, सोलापूर यांना नोव्हेंबर, २०१३ च्या सूचनेनुसार अन्नधान्याचा विमा उतरविणेबाबत दिनांक २९ नोव्हेंबर २०१३, १८ फेब्रुवारी २०१५, २१ सप्टेंबर २०१७, २ जानेवारी २०१८ च्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. तथापि सद्य:स्थितीत सर्व ५ जिल्ह्यांनी अन्नधान्याचा विमा उतरविलेला नाही.

१.२३ परिच्छेद क्र. २.२.१६ संनियंत्रण :

TDPs चे कामकाज सुरळीत होण्याची खात्री करण्याच्या उद्देशाने PDS (नियंत्रण) आदेश, २०११ मध्ये, दुकानांची तपासणी, दक्षता समित्यांचे गठन, नियतकालीक विवरणपत्रांचे सादरीकरण, संगणक प्रणालीचा वापर इत्यादी सारख्या वेगवेगळ्या कार्यतंत्राद्वारे पर्याप्त संनियंत्रण करण्याच्या गरजेवर भर देण्यात आला होता.

१.२४ परिच्छेद क्र. २.२.१६.१ गोदामांची तपासणी निर्धारीत संख्येत होणे :

महाराष्ट्र शासनाने मे २००६ च्या परिपत्रकामध्ये जिल्ह्यातील वेगवेगळ्या तपासणी प्राधिका-यांनी तसेच पुरवठा आयुक्त, मुंबई यांच्या दोन गोदाम तपासणी पथकांनी (GIS) गोदामांच्या लेख्यांची तसेच गोदामात साठविलेल्या अन्नधान्यांची कसून तपासणी करण्याची गरज असल्याचा पुनरूच्चार केला. अशा तपासणीच्या वेळी GIS नी प्रत्यक्ष साठे, पोत्यांची शास्त्रोक्त मांडणी, धूरी देण्याची पद्धत तपासणे अपेक्षित होते. दरवर्षी प्रत्येक GIS ने २०० गोदामांना भेट देणे आवश्यक होते. पुरवठा आयुक्तांच्या कार्यालयाने वार्षिक तपासण्यांचा एक एकत्रित अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर करणे आवश्यक होते.

अभिलेख्याच्या तपासणीतून असे निदर्शनास आले आहे की, २००८-२०१३ दरम्यान तपासणी करणे अपेक्षित असलेल्या २००० गोदामापैकी फक्त ७३९ गोदामांची तपासणी या पैकी दोन GIS नी केली होती.अशाप्रकारे GIS नी एकूण गोदामांपैकी ६३ टक्के कमी गोदांमांची तपासणी केली होती. वर्ष २००८-१३ दरम्यान महाराष्ट्र शासनाला गोदामांच्या तपासणी विषयीचे एकत्रित वार्षिक अहवालही सादर करण्यात आले नव्हते.

शासनाने असे नमूद केले (नोव्हेंबर, २०१३) की, कर्मचा-यांच्या कमतरतेमुळे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रधान सचिवांनी दोन GIS नी गोदामांची तपासणी करण्याची निर्धारित संख्या ऑक्टोबर, २००७ मध्ये सुधारित करून ती प्रतिवर्ष १०० इतकी करण्याचे ठरविले. पुढे असेही नमूद करण्यात आले की, २००८-०९ ते २०१२-१३ दरम्यान १,२८७ गोदामांची तपासणी करण्यात आली होती.

हे उत्तर मान्य करता येत नाही कारण मे, २००६ च्या महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकातील GIS ने करावयाच्या तपासण्यांची संख्या कमी करण्याविषयीच्या दुरुस्तीची घोषणा करणारे परिपत्रक जारी करण्यात आले नव्हते तसेच प्रत्येक GIS ने तपासणी करावयाच्या गोदामांच्या संख्येत घट केल्यामुळे संनियंत्रणाची यंत्रणा कमकुवत होण्याची शक्यता होती. लेखा परिक्षकांनी पुनर्पडताळणी केली असता असे आढळून आले की शासनाने जरी १२८७ गोदामांची तपासणी करण्यात आल्याचा दावा केला होता तरी प्रत्यक्षात दोन GIS नी फक्त ७३९ गोदामांची तपासणी केली होती.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

दिनांक २४ एप्रिल १९८४ रोजीच्या परिपत्रकान्वये जिल्हा स्तरावर गोदाम तपासणीसाठी तीन स्तरीय पद्धत चालू केली आहे. तसेच तपासणी अधिका-यांसाठी मागदर्शक सूचना व जबाबदा-या तसेच गठीत करावयाच्या तपासणी पथकांबाबत परिपत्रके निर्गमित करण्यात आलेली आहेत.

त्यानुसार पुरवठा आयुक्त कार्यालयाकडून नियतकालिक गोदाम तपासण्यासाठी विस्तृत आराखडा तयार केला जाते.

पुरवठा आयुक्त कार्यालयाने सन २०१५-१६ या आर्थिक वर्षापर्यंतचा गोदाम तपासणी एकत्रित अहवाल शासनास सादर केलेला असून सन २००८-२००९ ते २०१५-१६ या कालावधीपर्यत पुरवठा आयुक्त कार्यालयाच्या तपासणी पथकांनी २५४६ गोदामांची तपासणी केलेली आहे.

वर्ष	तपासलेले गोदाम लेखे संख्या	तपासलेली गोदाम संख्या
(१)	(२)	(३)
२००८-०९	१६१	४१५
२००९-१०	१५१	२७३

(१)	(२)	(३)
२०१०-११	१७०	३४०
२०११-१२	१३६	२५८
२०१२-१३	१२१	२२९
२०१३-१४	१११	२२७
२०१४-१५	१६०	३५५
२०१५-१६	२२५	४४९
एकूण	**१२३५**	**२५४६**

शासन परिपत्रकान्वये विहित तपासण्या करण्यासाठी आवश्यक तांत्रिक प्रशिक्षित अधिकारी /कर्मचारी नसल्याने गोदाम तपासणीचा इष्टांक पूर्ण करता आला नाही. यापुढे गोदाम तपासणीचा इष्टांक पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

१.२५ २.२.१६.२ स्वस्त धान्य दुकाने व शिधापत्रिकांची अपर्याप्त सदोष तपासणी :

PDS (नियंत्रण) आदेश, २००१ च्या परिशिष्टाच्या परिच्छेद ६ सह उप वाक्य ८ नुसार राज्य शासनाने FPS ची पदाधिका-यांद्वारे नियमितपणे तपासणी होत असल्याची, म्हणजेच, प्रत्येक सहा महिन्यांच्या कालावधीत कमीत कमी एक वेळा खात्री करावयाची होती. राज्य शासनाने तपासणीचे वेळापत्रक तपासणी थांब्याची यादी विनिर्दिष्ट करणारे आदेशही जारी करावयाचे होते आणि त्यामध्ये या आदेशांचे अनुपालन करण्यास जबाबदार असणारे अधिकारी नमूद करावयाचे होते. तसेच, FPS ची तपासणी अधिक प्रभावीपणे होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने असेही निर्देश दिले (एप्रिल २००५) की, FPS च्या तपासणी दरम्यान पुरवठा निरीक्षकांनी लाभार्थ्यांना बोलावून अथवा त्यांच्या निवासस्थानांना भेट देऊन कमीत कमी ५० शिधापत्रिकांची पडताळणी करावी. भारताचे नियंत्रक महालेखापरीक्षक यांच्या मार्च २००६ रोजी संपलेल्या वर्षासाठीच्या अहवालामध्ये (नागरी) FPS ची तपासणी कमी संख्येत झाल्याचे निदर्शनास आणून देण्यात आले होते. लेखापरीक्षणात असे निदर्शनास आले की FPS ची सातत्याने कमी प्रमाणात तपासणी होत होती, ज्याचा तपशील खालीलप्रमाणे आहे :—

- जानेवारी २००८ ते डिसेंबर २०१२ दरम्यान FPS च्या निर्धारित ५.१० लक्ष तपासण्यांपैकी फक्त ३.११ लक्ष तपासण्या विभागाकडून करण्यात आल्या होत्या. ज्यामुळे तपासण्यांमध्ये ३९.०२ टक्के तूट झाली होती. विभागाने FPS च्या तपासण्यांच्या माध्यमातून FPS च्या मालकांकडून वेगवेगळ्या त्रुटींप्रित्यर्थ रुपये ५.३७ कोटी एवढी रक्कम दंडाच्या रुपात जमा केली होती (जानेवारी, २००८ ते मार्च, २०१३), या वस्तुस्थितीवरून हे स्पष्टपणे दिसून येते की निर्धारित संख्येत तपासण्या होण्याची खात्री करणे विभागासाठी अत्यावश्यक होते. लेखापरिक्षणात पुढे असेही आढळून आले की विभागाने तपासणी केलेल्या एकूण FPS पैकी अनुक्रमे परभणी येथील ९१ टक्के, औरंगाबाद येथील ५५.१७ टक्के आणि सोलापूर जिल्ह्यातील ५३.७३ टक्के FPS मध्ये त्रुटी निदर्शनास आल्या होत्या.

- चाचणी तपासणी करण्यात आलेल्या ११ कार्यालयांमध्ये FPS च्या तपासण्यांच्या संख्येतील तूट एक टक्का (मुंबई शिधावाटप क्षेत्र २०११ ते ७९ टक्के (DSO पुणे, २००८) या दरम्यान होती.

- चाचणी तपासणी करण्यात आलेल्या एकाही कार्यालयात ५० शिधापत्रिकांची पडताळणी करण्याचे निर्धारित लक्ष्य असूनही ती केली गेली नव्हती. तीन कार्यालयांनी ४९ शिधापत्रिकांची पडताळणी केली असल्याचा दावा केला, परंतु त्याच्या पुष्ठ्यर्थ ते एकही पुरावा दाखल दस्तऐवज लेखापरीक्षकांना सादर करू शकले नाहीत.

शासनाने असे प्रतिपादन केले (नोव्हेंबर, २०१३) की विहित संख्येत FPS ची तपासणी करण्यात ज्या अधिका-यांना अपयश आले होते त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याविषयी, जिल्हाधिका-यांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या आहेत. परंतु लेखापरिक्षणात असे आढळून आले की, चाचणी तपासणी करण्यात आलेल्या कार्यालयातील अधिका-यांनी निर्धारित संख्येत तपासण्या केल्या नसूनही त्यांच्याविरुद्ध शिस्तभंगाची कोणतीही कार्यवाही करण्यात आली नव्हती.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

रास्तभाव दुकानांच्या नियमित तपासण्या करण्याबाबत क्षेत्रिय अधिका-यांना शासन स्तरावरून वेळोवेळी सूचना देण्यात येतात. शासन परिपत्रक दिनांक १२ जानेवारी २०१२ अन्वये विहित मानांकाप्रमाणे तपासणी न करणा-या अधिकारी व कर्मचा-यांवर उप आयुक्त (पुरवठा) व जिल्हाधिकारी, यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करावी अशा सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

राज्यातील ज्या रास्तभाव दुकानांच्या तपासण्या इष्टांकाप्रमाणे झालेल्या नाहीत त्यास कारणीभूत असणा-या अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुद्ध कारवाई करण्याबाबत तत्कालिन प्रधान सचिव स्तरावरून संबंधित जिल्ह्याच्या जिल्हाधिका-यांना दिनांक २६ एप्रिल २०१२, दिनांक ४ सप्टेंबर २०१२ तसेच २० फेब्रुवारी २०१३ अन्वये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

शासन परिपत्रक दिनांक १९ एप्रिल २००५ अन्वये रास्तभाव दुकानांची तपासणी करताना प्रत्येक वेळी रास्तभाव दुकानास जोडण्यात आलेल्या एकूण शिधापत्रिकांपैकी किमान ५० शिधापत्रिकांची तपासणी करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सदर प्रकरणी प्रत्येक सहामाही कालावधीत प्रत्येक रास्तभाव व केरोसीन दुकानाची किमान एक वेळा तपासण्या होतील, त्याप्रमाणे नियोजन करून परिणामकारक तपासण्या करणेबाबत कळविण्यात आले आहे. तसेच त्याप्रमाणे ज्या अधिकारी/कर्मचारी यांनी तपासण्या केल्या नाहीत. त्याबाबत त्यांना कारणे दाखवा नोटीस बजविण्यात आलेल्या आहेत. तसेच यापुढे मुदतीत तपासणी अहवाल सादर न करण्या-या अधिका-याविरुद्ध कारवाई करण्याची दक्षता घेत आहोत.

१.२६ परिच्छेद क्र. २.२.१६.३ दक्षता समित्यांचे कमी संख्येत गठन न करणे :

PDS (नियंत्रण) आदेश, २००१ आणि जानेवारी, २००८ च्या शासन निर्णयानुसार PDS अंतर्गत वस्तूंच्या वितरणावर संनियंत्रण ठेवण्यासाठी गाव/FPS, तालुका, जिल्हा नगरपरिषद, महापालिका आणि राज्य पातळीवर दक्षता समित्या गठित (VC) करायच्या होत्या. अन्नधान्याचे वाटप, उचल आणि वितरण यावर संनियंत्रण ठेवणे, अन्नधान्याची गुणवत्ता तपासणे, FPS च्या अभिलेख्यांची तपासणी आणि शिधापत्रिकाधारकांनी केलेल्या तक्रारीविषयीचा अहवाल सादर करणे यांचा समावेश VCs च्या कार्यात होतो. राज्य पातळी वगळता इतर सर्व पातळ्यांवर VCs ची प्रत्येक महिन्यात किमान एकदा व राज्य पातळीवर प्रत्येक महिन्यांच्या कालावधीत बैठक होणे आवश्यक होते.

गठीत करावयाच्या प्रत्यक्ष गठित केलेल्या VCs आणि VC गठन करण्यातील तूट यांचा तपशील तक्ता ६ मध्ये दर्शविला आहे.

तक्ता ६ : दक्षता समित्या गठन करण्यातील तूट

पातळी	दक्षता समित्यांची संख्या			
	गठीत करावयाच्या	प्रत्यक्षात गठीत केलेल्या	तूट	तूटीची टक्केवारी
गाव/FPS	४३९२४	३१६५०	१२२७४	२७.९४
तालुका	३५१	३२६	२५	७.१२
महापालिका	७७	७४	३	३.९०
नगरपरिषद	२२१	१८६	३५	१५.८४

वरील तक्त्यावरून असे दिसून येते की, मार्च २०१३ पर्यंत VC चे गठन करण्यात राज्यात गाव पातळीवर १२,२७४, तालुका पातळीवर २५ आणि महापालिका व नगरपरिषद पातळीवर ३८ इतकी तूट होती.

तसेच VCs नी नियमितपणे मासिक बैठकाही घेतल्या नव्हत्या आणि २०११-१३ मधील बैठका घेण्यातील ही तूट २९ टक्के ते ७० टक्के या दरम्यान होती. त्याचप्रमाणे, २००८-१३ दरम्यान राज्यस्तरीय VCs च्या घ्यावयाच्या ३० बैठकींपैकी फक्त चारच बैठका घेण्यात आल्या होत्या. लाभार्थ्यांच्या सर्वेक्षणाच्या वेळी ९५ टक्के लाभार्थ्यांनी VCs विषयी अनभिज्ञ असल्याचे सांगितले.

वेगवेगळ्या पातळ्यांवर VCs चे गठन न करणे, नियतकालीक बैठका न घेणे आणि VCs विषयी लाभार्थी अनभिज्ञ असणे यावरून योजनेचे सदोष संनियंत्रण दर्शविले गेले.

शासनाने सांगितले (नोव्हेंबर, २०१३) की वेगवेगळ्या पातळ्यांवर मध्ये अशासकीय सदस्य नियुक्त करणे ही वेळखाऊ प्रक्रिया होती. शासनाने पुढे असे सांगितले की, ज्या सदस्य सचिवांनी VCs च्या बैठका आयोजित केल्या नव्हत्या त्यांच्याविरुद्ध कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिका-यांना देण्यात आल्या होत्या. त्यांनी पुढे असेही सांगितले की, प्रत्येक लोकशाही दिनास VC च्या बैठका घ्याव्या आणि त्याला जाहीर प्रसिद्धी द्यावी अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

शासनाकडून दक्षता समित्यांच्या बैठकांबाबत घेण्यात आलेल्या विभागवार आढाव्यामध्ये दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे घेतल्या जात नसल्याचे आणि अशा बैठका न घेणा-या संबंधित सदस्य सचिवांविरुद्ध यथोचित शिस्तभंगाची कारवाई केली जात नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे. या पार्श्वभूमीवर, शासन निर्णय दिनांक ८ जानेवारी २०१५ अन्वये खालीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना पुन्हा निर्गमित करण्यात आलेल्या आहेत :

(१) राज्यामध्ये स्थानिक स्वराज्य संस्थांच्या तसेच विधानसभा व विधानपरिषदेच्या जागांसाठी वेळोवेळी निवडणूका होत असतात. त्यानुसार परिस्थितीनुरुप व आवश्यकतेनुसार विविध स्तरावरील दक्षता समितीतील अशासकीय सदस्य बदलणे क्रमप्राप्त आहे. दक्षता समित्या स्थायी स्वरुपाच्या असून, प्रत्येक स्तरावरील दक्षता समित्यांचे गठण, अशासकीय सदस्यांची नियुक्ती व परिस्थितीनुरुप आवश्यकतेनुसार त्यांची नियमानुरुप पुनर्रचना करणे ही जबाबदारी शासन निर्णयातील तरतुदीनुसार सदस्यांची नियुक्ती करणा-या संबंधित क्षेत्रिय अधिका-यांची आहे.

(२) जिल्हा व तालुकास्तरीय दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे होण्यासाठी सदर बैठका प्रत्येक महिन्याच्या लोकशाही दिनी घेण्यात याव्यात. सदर बैठकांना वृत्तपत्रांद्वारे व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.

(३) यापुढे सर्व स्तरावरील दक्षता समित्यांच्या बैठकांबाबतचा त्रैमासिक अहवाल तिमाही समाप्तीनंतर पुढील महिन्याच्या १५ तारखेपर्यंत आणि आर्थिक वर्षाचा एकत्रित अहवाल एप्रिल महिन्याच्या २० तारखेपर्यंत न चुकता सर्व उप आयुक्त (पुरवठा) व मुंबई ठाणे शिधावाटप क्षेत्रामध्ये नियंत्रक शिधावाटप व संचालक, नागरी पुरवठा, मुंबई यांनी शासनास सादर करावा.

(४) दक्षता समितीच्या बैठका नियमितपणे घेण्याची संपूर्ण जबाबदारी समितीच्या सदस्य सचिवांची राहील. दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे आयोजित न करणा-या, सर्व स्तरावरील दक्षता समित्यांच्या सदस्य सचिवांविरुद्ध केलेल्या शिस्तभंगाच्या कारवाईबाबतचा अहवाल न चुकता शासनास सादर करावा असे निर्देश दिलेले आहेत.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील देखरेखीत जनतेचा सहभाग रहाण्याच्या दृष्टीने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरित करण्यात येणा-या जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणावर देखरेख ठेवण्यासाठी शासन निर्णय दिनांक २३ जानेवारी २००८ अन्वये राज्यात विविध स्तरावर समित्या गठीत करण्यात आल्या असून, या विविध स्तरावरील दक्षता समित्यांच्या बैठका दरमहा नियमितपणे घेण्याची तरतूद करण्यात आली आहे. त्यानुसार डिसेंबर, २०१६ अखेर राज्यात विविध स्तरावरील स्थापन झालेल्या दक्षता समित्या व दक्षता समितीच्या बैठका याबाबतची माहिती खालीलप्रमाणे आहे :—

दक्षता समिती स्तर	स्थापन करण्यात आलेल्या दक्षता समित्या	दक्षता समित्यांच्या घेतलेल्या बैठका
गाव/FPS	३०३३०	१०७१५५
तालुका स्तर	२८८	८०४
जिल्हा स्तर	३१	९८
नगरपालिका स्तर	१४४	३५९
महानगरपालिका स्तर	२५	७४

१.२७ परिच्छेद क्र. २.२.१६.४ TOPDS चे संगणकीकरण :

TPDS च्या संगणकीकरणासाठी विभागाने मेसर्स ३i इन्फोटेक लिमिटेड यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली (मार्च, २००६) रुपये २४.२६ लक्ष मोबदल्यास हे काम दिले गेले आणि या कामामध्ये अभ्यास व आवश्यक माहिती हस्तगत करणे, निविदा प्रक्रियेचे व्यवस्थापन, समन्वय, अंमलबजावणीवरील संनियंत्रण तसेच प्रशिक्षण याचा समावेश होता. कामाच्या पूर्णत्वाच्या टप्प्यानुसार सल्लागाराला रक्कम प्रदान करायची होती. सल्लागाराने मागणी केलेल्या रुपये १०.९२ लक्ष रकमेपैकी विभागाने रुपये सात लक्षाचे प्रदान केले (ऑक्टोबर, २००८)

पायाभूत सुविधा प्रस्थापित करण्यासाठी कुटुंब प्रमुखाचे छायाचित्र तसेच वैयक्तिक ओळखीसाठी बारकोड आणि होलाग्राम, कुटुंबातील सर्व सदस्यांचे हाताचे ठसे यांची संगणकीकृत माहिती ची नोंद घेता येईल. संगणक सॉप्टवेअर विकसित करण्यासाठी सर्व FPS ना हस्तचलित यंत्राचा पुरवठा करणे, लेखांकनासाठी तालुका व गोदामाच्या ठिकाणी संगणकांची व्यवस्था करणे इत्यादी साठी निविदा मागवण्यात आल्या (जून, २००७). शिधापत्रिका जारी करताना /पुन्हा जारी करताना तसेच इतर सेवांकरिता शिधापत्रिका धारकांकडून शुल्क वसूल करून त्याद्वारे हा खर्च वसूल करायचा होता.

बांधा, वापरा, मालकी प्राप्त करा व हस्तांतरीत करा (BOOT) या तत्वावर सर्वसमावेशक सेवा पुरवठादार म्हणून रुपये १२४.९८ कोटीची बोली सादर केलेल्या मे. स्पॅन्को टेलिसिस्टिम सोल्युशन लिमिटेड (STSL) यांचा प्रस्ताव न्यूनतम असल्याचे आढळले. कंत्राट देण्याविषयीचा प्रस्ताव प्रधान सचिवांकडे (वित्तीय सुधारणा) मंजुरीसाठी पाठवण्यात आला ज्यांनी निविदेत तरतूद केलेल्या बारकोड पद्धती ऐवजी स्मार्ट कार्ड तंत्राचा वापर करण्याविषयी शिफारस केली. स्मार्ट कार्ड तंत्राचा समावेश असलेली योजना कार्यान्वित करणे खर्चिक असल्याने प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) यांची शिफारस उच्चाधिकार समितीने मान्य केली. (फेब्रुवारी, २००८) कालांतराने STSL बरोबर रुपये १२४.९८ कोटीचा सप्टेंबर २०११ पर्यंतच्या कालावधीसाठी तीन वर्षाचा करार करण्यात आला (सप्टेंबर, २००८) जो संपल्यावर मत्ता विभागाकडे हस्तांतरीत करायची होती.

बायोमेट्रिक पद्धत खर्चिक असूनही जास्त परिणामकारक असल्याचे निदर्शनास आल्याने फेब्रुवारी २००९ मध्ये विभागाने कामाच्या व्याप्तीचे पुनर्विलोकन केल्याचे लेखापरिक्षणांत आढळून आले आणि अशाप्रकारे करार केल्यावर चार महिन्यांच्या आत विभागाने बारकोड पद्धतीऐवजी बायोमेट्रिक तंत्राचा अवलंब करण्यासाठी कामाच्या व्याप्तीत बदल करण्यासाठी STSL ला विनंती केली. STSL ने कामाच्या व्याप्तीत बदल करण्यास नकार दिल्यावर (ऑगस्ट, २००९) विभागाने कंपनीला करार समाप्तीची नोटीस अखेर जारी केली (डिसेंबर, २०१०) विभागाच्या या निदर्शनास STSL ने विरोध दर्शविला (ऑक्टोबर, २०११)आणि सदर प्रकरण दोन वर्षापेक्षा जास्त काळ लवादाकडे (प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग प्रलंबित आहे (जानेवारी, २०१४)

शासनाने यावर असे सांगितले की (जानेवारी, २०१४) सदर योजनेचे पुनर्विलोकन करण्यात आले होते आणि बायोमेट्रीक पद्धत खर्चिक असूनही जास्त परिणामकारक असल्याचे आढळून आले होते आणि यावर तज्ञ समितीने (जुलै, २००९) मध्ये शिक्कामोर्तब केले होते. अशाप्रकारे, प्रारंभी वित्त विभागाच्या यावरील मतास जरी सहमती दर्शविण्यात आली नव्हती तरी शेवटी त्यास मान्यता देण्यात आली.

प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) प्रथम बायोमेट्रीक शिधापत्रिकांसाठी केलेली शिफारस फेब्रुवारी, २००८ मध्ये मान्य न करणे आणि त्यांनतर तीच शिफारस फेब्रुवारी, २००९ मध्ये म्हणजेच करार केल्यानंतर चार महिन्यांनी मान्य करणे यामुळे फक्त करार रद्द करावा लागला असा नाही तर प्रकरण लवादाकडे गेले जे दोन वर्षापासून प्रलंबित आहे. TPDS चे संगणकीकरण जे सप्टेंबर २०११ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते ते अजूनही साध्य झालेले नाही. (जानेवारी, २०१४)

लेखापरीक्षणात पुढे असेही आढळून आले की महाराष्ट्र शासनाने TPDS चे संपूर्ण संगणकीकरण या योजनांतर्गत योजनेखाली रुपये १०२.७७ कोटी खर्चाचा एक प्रस्ताव केंद्र शासनाला सादर केला होता (डिसेंबर, २०११) जो खर्च राज्य शासन आणि केंद्र शासनाने सारख्या प्रमाणात विभागून करायचा होता. महाराष्ट्र शासनाने प्रकल्पावरील खर्च सुधारुन तो रुपये ७४.८८ कोटी निर्धारित (जून, २०१३). कामाच्या व्याप्तीमध्ये सॉप्टवेअर तयार करणे, माहिती केंद्राची निर्मिती, माहिती आकडेवारीच्या स्वरुपात मांडणे इत्यादीचा समावेश होता. महाराष्ट्र शासन व केंद्र शासनामधील सामंजस्य करारानुसार लाभार्थ्यांची व इतर माहितीची आकडेवारी तयार करण्याचे आणि पुरवठा साखळीचे संगणकीकरण करण्याचे काम अनुक्रमे मार्च २०१३ व ऑक्टोबर २०१३ पर्यंत पूर्ण करायचे होते. केंद्र शासनाने रुपये ६९.७२ कोटी इतक्या प्रस्ताव खर्चास मंजुरी दिली (जून, २०१३) आणि रुपये २०.९१ कोटी रक्कम मुक्त केली (जुलै, २०१३) मे, २०१३ पर्यंत या योजनेवर रुपये ६.२८ कोटीचा खर्च करण्यात आला आहे.

शासनाने असे सांगितले की (नोव्हेंबर, २०१३) NIC कडून प्राप्त झालेल्या डेपो कोड व्यवस्थापन यंत्रणा, स्टेकहोल्डर व्यवस्थापन यंत्रणा यामध्ये माहितीची नोंद घेण्याचे काम पूर्ण झाले असून सध्याच्या शिधाव्यवस्थापन यंत्रणेत माहितीची नोंद घेण्याचे काम ९९ टक्के पूर्ण झालेले आहे, परंतु प्रणालीत नोंद केलेल्या माहितीची पडताळणी करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करण्यासाठी अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागातर्फे या प्रकल्पासाठी मेसर्स ३i इन्फोटेक लिमिटेड यांची सल्लागार म्हणून मार्च २००६ मध्ये नियुक्ती केली. या कंपनीची निवड शासनाच्या मार्गदर्शक धोरणांचे पालन करून विहित पद्धतीने करण्यात आलेली होती. सदर सल्लागार कंपनीच्या मदतीने प्रकल्पासाठी आवश्यक तांत्रिक बाबींची पूर्तता करण्यासाठी विहित पद्धतीने निविदेद्वारे मे. स्पॅनको या कंपनीची प्रकल्प अंमलबजावणीसाठी शासनाने निवड केली.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण करण्यासाठी मे. स्पॅन्को लि. ३ सप्टेंबर २००८ रोजी करार (MSA) करण्यात आला होता. या करारातील अटी व शर्तीनुसार मे. स्पॅन्को लि. यांनी दोन वर्ष कालावधी उलटल्यानंतरही काम सुरू न केल्याने मे. स्पॅन्को लि. यांना दिनांक २ डिसेंबर २०१० च्या बरोबर झालेला करार का रद्द करण्यात येऊ नये अशी नोटीस बजावण्यात आली. त्या विरुद्ध मे. स्पॅन्को लि. मा. उच्च न्यायालयात अर्ज सादर केला होता मा. उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभाग यांच्याकडे कंपनीच्या विनंतीवर सुनावणी घेण्यात आली. या सुनावणी वेळी परफॉर्मन्स बँक गॅरंटीची (PBG) वैधता समाप्त होत असल्याचे निदर्शनास येता

लवादाने PBG चा अवधी वाढविणेसंबंधी आदेश दिले. परंतू, मे.स्पँन्को लि. हे PBG अवधी वाढविण्यास असमर्थ ठरल्याने शासनाने त्यांची रुपये १७.१९ कोटी ची बँक गॅरन्टी जमा करून घेतलेली आहे.

Sole Arbitrator यांनी अंतिम निर्णय घेतला नाही म्हणून मे. स्पँन्को लि. मा. उच्च न्यायालयात Sole Arbitrator बदलण्याबाबत Arbitration petition No. २०४/२०१५ दाखल केले होते. या प्रकरणी न्यायालयाकडून दिनांक १० मार्च २०१५ रोजी निकाल दिला असून त्यानुसार Sole Arbitrator म्हणून सेवानिवृत्त न्यायाधीश श्री. एस. राधाकृष्णनन यांची नेमणूक केली असून सध्या मा. उच्च न्यायालय यांनी मे. स्पॅन्को यांचेविरुद्ध दिवाळखोरीचे काढलेल्या आदेशान्वये प्रकरणाची लवादासमोर सुनावणी बंद असून मा. उच्च न्यायालय यापुढे Liquidator म्हणून काम पाहणार आहे.

मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेले निर्देश तसेच केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्वांनुसार शिधावाटप यंत्रणेचे व्यवस्थेचे End to End Computerization करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानुसार राज्यात सुरू असलेल्या सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संगणकीकरण प्रकल्पाची सद्यःस्थिती खालीलप्रमाणे :

(अ) Food & Essential Commodities Assurance & Security Target (FEAST)—रायगड व सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये प्रायोगिक तत्वावर पुरवठा साखळी व्यवस्थापन सुरू

(आ) Stakeholder Identity Management System (SIMS)—रास्तभाव दुकाने व गोदामांच्या माहितीचे डिजीटायझेशन पूर्ण

(इ) Existing Ration Card Management System (ERCMS)—२.३७ कोटी शिधापत्रिकांचे डिजीटायझेशन १००% पूर्ण

(ई) Online Ration Card Management System (e-PDS)—सद्यःस्थितीत कस्टमायझेशन सुरू आहे.

सद्यःस्थितीत, राज्य शासनाने End to End Computerization योजनेसंबंधी शिधापत्रिकांचे संगणकीकरण, पुरवठा साखळीचे व्यवस्थापन, पारदर्शक संकेतस्थळ तसेच तक्रार निवारण केंद्र इ. आवश्यक बाबींची पूर्तता केलेली आहे.

राज्य शासनाने लाभार्थ्यांना शिधावस्तूचे वाटप बायोमेट्रीक ओळख पटवून (Aadhaar Base) करण्यास दिनांक ११ मार्च २०१५ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता दिली आहे. तसेच रास्तभाव दुकानांचे ऑटोमेशन करण्यासाठी मोबाईल टर्मिनल टेक्नॉलॉजीचा वापर करण्यात येणार आहे. तद्नुषंगाने, राज्य शासनाने या ऑटोमेशनसाठीच्या निविदा प्रक्रियेसाठी मे. ॲक्सेंचर (Accenture) यांची प्रकल्प सल्लागार म्हणून नेमणूक केलेली आहे. या कंपनीने Fair Price Shop (FPS) Automation (रास्तभाव दुकानातील व्यवहारांचे ऑटोमेशन) करिता निविदा प्रक्रिया सुरू करण्यासाठी Request For Proposal (RFP) तयार केली असून शासनाच्या मान्यतेनंतर निविदा प्रक्रिया राबवून Fair Price Shop (FPS) Automation (रास्तभाव दुकानातील व्यवहारांचे ऑटोमेशन) सुरू करण्यात येणार आहे. तसेच सध्याच्या सर्व शिधापत्रिकांचे डिजीटायझेशन पूर्ण करण्यात आलेले असून लाभार्थ्याचे आधार क्रमांक, मोबाईल क्र. व बँक खाते क्र. इ. माहिती PDS Database मध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. दिनांक ३ फेब्रुवारी २०१६ अखेर राष्ट्रीय अन्न सुरक्षा अधिनियमांतर्गतचे ७ कोटी लाभार्थींपैकी ४.४३ कोटी लाभार्थ्यांच्या आधार क्रमांकांचे सीडींग पूर्ण झालेले आहे.

लाभार्थ्यांची आधारबेस ओळख पटवून शिधावस्तूचे वितरण करण्यासाठी बारकोडेड शिधापत्रिका देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. रास्तभाव दुकानांत ई-पॉस उपकरणांद्वारे लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख निश्चित केली जाईल. ई-पॉस उपकरणांसाठी आरएफपी १८ जुलै २०१६ रोजी www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आली आहे. सद्यःस्थितीत, राज्याचे POs मशीन मधून धान्य वितरणासाठी प्रशासकीय कारणास्तव ३ गटांमध्ये वर्गीकरण करण्यात आलेले असून या गटांसाठी ३ System Intergrators ची पुढील ३ वर्षासाठी नेमणूक करण्यात आलेली आहे. तसेच, माहे जानेवारी, २०१७ मध्ये, राज्यातील ४२ शिधावाटप जिल्ह्यांमधील प्रत्येकी २ दुकानांमध्ये (संपूर्ण राज्यातील एकूण ८४ दुकानांत) Proof of Concept (POC) ही संकल्पना यशस्विरित्या राबविण्यात आली. आता सद्यःस्थितीत, राज्यातील एकूण ५१३६३ रास्तभाव दुकानांत POs मशीन बसविण्यात आलेल्या असून रास्तभाव दुकानांतून या मशीनद्वारे वितरित करण्यात आलेल्या शिधावस्तूंचा तपशील *www.mahafood.gov.in* या संकेतस्थळावर ' ऑनलाईन सेवा ' या शीर्षकाखाली ' ऑनलाईन रास्तभाव दुकाने ' या लिंकवर उपलब्ध आहे.

पीडीएस डेटाबेसमध्ये आधार सिडींगची प्रक्रिया चालू आहे. सध्या, ७.०० कोटी NFSA लाभार्थ्यांपैकी, ६.१० कोटी लाभार्थींची आधार सिडींग पूर्ण झाले आहे. विविध व्हेरिफीकेशन प्रणालीचा वापर करून डेटाचे प्रमाणीकरण केले जात आहे. बल्क प्रमाणीकरण यूआयडीएआयला डेटा पुरवून केले जाते. ॲडव्हान्स सर्व सुविधेसह तसेच डीएसडीव्ही (डाटा सीडिंग डेटा व्ह्यूअर) टूलचा वापर क्षेत्रीय स्तरावरील डाटा प्रमाणीकरणसाठी केला जात आहे.

१.२८ परिच्छेद क्र.२.२.१६.५-उपयोगिता प्रमाणपत्रे आणि नियतकालिक अहवाल सादर न करणे :

PDS (नियंत्रण) आदेश २००१ च्या परिशिष्ट I सह उप वाक्य ८ मधील तरतुदीनुसार संबंधित राज्यांकडून प्राप्त होणारे सर्वसाधारण अहवाल आणि ज्या महिन्यात अन्नधान्याचे वाटप करण्यात आलेले आहे त्या महिन्यापासून दोन महिन्यांच्या आत उपयोगिता प्रमाणपत्रे (UCs) सादर होणे या दोन बाबींच्या आधारावर राज्याला नंतरच्या कालावधीत अन्नाधान्यांचे वाटप करावयास हवे.

पुरवठा आयुक्तांच्या कार्यालयांतील अभिलेख्यांच्या तपासणीत असे दिसून आले की ऑक्टोबर, २००८ पासून विभागाने केंद्र शासनाला UCs तसेच PDS (नियंत्रण) आदेश २००१ अंतर्गत सादर करावयाचे मासिक अहवाल सादर केले नव्हते.

शासनाने असे नमूद केले (नोव्हेंबर, २०१३) की ऑक्टोबर, २००८ ते मार्च, २००९ आणि एप्रिल, २००९ ते सप्टेंबर, २००९ या कालावधीची UCs केंद्र शासनाने असेही सांगितले की ऑक्टोबर, २००९ पासून कालावधीसाठीची UCs यथावकाश सदर करण्यात येतील परंतु ऑक्टोबर, २००९ पासून त्यानंतरच्या कालावधीची UCs अद्यापही केंद्र शासनास सादर केली गेली नाहीत (जानेवारी, २०१७).

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

साविव्य (नियंत्रण), २००१ च्या आदेशानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत मासिक धान्य उचल व वितरण यांचा अहवाल विहित नमुन्यात राज्य शासनाने केंद्र शासनास सादर करणे आवश्यक आहे.

खालील पत्रान्वये केंद्र शासनास मासिक धान्य उचल व वितरण यांचा अहवाल मासिक धान्य उचल व वितरण यांचाअहवाल पाठविण्यात आला आहे.

पत्राचा दिनांक : साविव्य (नियंत्रण), २००१ च्या आदेशासोबत जोडलेल्या नमुना क्र. सी, इ व एफ मासिक अहवाल व उपयोगिता प्रमाणपत्र :

(१) दिनांक १२ ऑगस्ट २०१३ — ऑक्टोबर, २००८ ते मार्च, २००९

(२) दिनांक २५ ऑक्टोबर २०१३ — एप्रिल, २००९ ते सप्टेंबर, २००९

(३) दिनांक ६ मार्च २०१४ — ऑक्टोबर, २००९ ते मार्च, २०१०

(४) दिनांक २८ मार्च २०१४ — एप्रिल, २०१० ते मार्च, २०११

(५) दिनांक ५ ऑगस्ट २०१४ — एप्रिल, २०११ ते मार्च, २०१२

(६) दिनांक ११ जून २०१५ — एप्रिल, २०१२ ते डिसेंबर, २०१२

जानेवारी, २०१३ ते डिसेंबर, २०१४ चे मासिक अहवाल मागविण्याबाबत क्षेत्रिय कार्यालयास कळविण्यात आले आहे. त्यांच्याकडून अहवाल प्राप्त होताच सदर अहवाल केंद्र शासनास सादर करण्यात येतील.

१.२९ परिच्छेद क्र. २.२.१७ निष्कर्ष :

राज्यात निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणालीच्या कामकाजात अनेक त्रुटी होत्या. दारिद्र्यरेषेखालील कुटूंबांची निवड अयोग्य प्रकारे केल्यामुळे मोठ्या संख्येने अपात्र कुटूंबांचा समावेश होऊन कित्येक लाभपात्र कुटूंबांना मात्र योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागले होते. संबंधित विभागाकडून माहितीची प्रती पडताळणी न करता स्वतः सादर केलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याच्या आणि प्रतिज्ञापत्राच्या आधारावर शिधापत्रिका देण्यात आल्या होत्या. सबसिडीचे नियमबाह्यपणे आहरण केल्याचे आणि FCI कडे मोठ्या प्रमाणात अग्रीमांचे समायोजन प्रलंबित असल्याचेही काही प्रकरणांत दिसून आले होते. FCI कडून अन्नधान्याची उचल न केल्यामुळे BPL लाभार्थी योजनेचा लाभ मिळविण्यापासून वंचित राहीले होते. त्याचवेळी खुल्या बाजारातून तांदूळ खरेदी करण्यावर खर्च करण्यात आला होता जो टाळता आला असता. FCI कडून उचल करण्यात आलेला अन्नधान्याची गुणवत्ता तपासण्यात आली नव्हती. ग्राहकाकडे असलेली गॅस सिलेंडर्स किंवा गॅसच्या पाईप जोडण्या असलेले ग्राहक यांच्या माहितीशी PDS रॉकेलचे वितरण करण्यासाठी निर्धारित करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची माहिती प्रभावीपणे न जोडल्यामुळे हे निर्धारण पर्याप्त प्रमाणात झाले नव्हते. रॉकेल वरील रोख सबसिडीचे थेट हस्तांतरण करण्याची योजना मागे पडली होती. तसेच वाहनांचा माग घेण्याच्या प्रणालींची अंमलबजावणीही प्रभावीपणे करण्यात आलेली नव्हती. वेगवेगळ्या पातळ्यांवर निर्धारित संख्येमध्ये दक्षता समित्यांचे गठन करण्यात न आल्यामुळे योजनेवरील संनियंत्रण कमकुवत होते. पदाधिका-यांकडून गोदामांची, स्वस्त धान्य दुकानांची आणि शिधापत्रिकांची तपासणी कमी संख्येत केली जात होती.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

उत्पन्नाच्या दाखल्याच्या व प्रतिज्ञापत्राच्या आधारावर शिधापत्रिका देण्याबाबत दिनांक २९ जून २०१३ च्या शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेले आहे. त्यानुसारच कार्यवाही करण्यात येते.

- राज्य शासनाकडून माहे ऑगस्ट, २००९ मध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत वितरित करण्यात येत असलेल्या गहू, तांदुळ, तुरडाळ, पामतेल व साखर या ५ वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्याचा निर्णय घेण्यात आलेला होता. सदर योजनेमध्ये येणारी तुट व शासनावर येणारा भार याच्या प्रतिपूर्तीची मागणी अर्थसंकल्पिय तरतुदीद्वारे मागणी सादर केलेली होती. परंतु तुरडाळ, पामतेल व साखर या योजनेतील व्यवहारात आलेली तुट विसउस यांचे स्वीय प्रपंजी लेख्यातील होती आणि तपासणी कालावधीत पामतेल, साखर व तुरडाळ यांचे लेखे पूर्ण न झाल्याने यामधील तुटींच्या रक्कमेची परिगणना केलेली नव्हती, आता लेखे पूर्ण झालेले असून योजनानिहाय तुट परिगणा करण्यात आलेली आहे.

- अतिरीक्त तुट शासन लेख्यात भरण्यात आलेली आहे. तसेच FCI कडील प्रलंबित अग्रीमांचे समायोजन करण्यात आले असून काही प्रलंबित अग्रीमाच्या प्रकरणी वेळोवेळी FCI यांचेसोबत चर्चा व पत्रव्यवहार करून निकाली काढण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

कामगार विषयक समस्या, FCI गोदामाच्या फळ्या रिकाम्या नसणे, सुट्यांच्या दरम्यान उचल न होणे, FCI गोदामामध्ये धान्य उपलब्ध नसणे आणि FCI कर्मचा-यांचा असहकार इत्यादी कारणांमुळे या कालावधीत धान्याची उचल पूर्ण होऊ शकली नाही. त्यामुळे खुल्या बाजारातून तांदूळ खरेदी करण्यात आला.

यासंदर्भात FCI शी चर्चा करून अन्नधान्याची जास्तीत जास्त उचल होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले. FCI ही केंद्र शासनाची संस्था असल्याने, अन्नधान्याची उचल करण्याअगोदर दोन्ही कार्यालयांच्या प्रतीनिधींकडून संयुक्त तपासणी करण्यात येते.

राज्यात शिधापत्रिकांवर गॅस स्टॅपिंग करण्याची कार्यवाही करण्याबाबत शासनाने क्षेत्रिय कार्यालयांना वेळोवेळी सूचना केलेल्या आहेत. त्यानुसार राज्यात शिधापत्रिकांवर गॅस स्टॅपिंग करण्याची कार्यवाही क्षेत्रिय कार्यलयांकडून करण्यात येते. राज्यातील शिधापत्रिकाधारकांच्या संख्येत वेळोवेळी वाढ होत आहे. राज्यात शिधापत्रिकाधारकांची मोठ्या प्रमाणात असलेली संख्या व त्यामानाने पुरवठा विभागात असलेला अपुरा कर्मचारी वर्ग, यामुळे राज्यातील गॅसस्टॅपिंगची कार्यवाही पूर्ण करणे शक्य झालेले नाही. पाईप गॅस कनेक्शन या विभागाशी संबंधित नाही. तथापि शिधापत्रिकांवर पाईप गॅस कनेक्शन असल्याची नोंद घेण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर करण्यात येते.

केरोसिनवरील अनुदान शिधापत्रिकाधारकांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याच्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यास सन २०१२-१३ मध्ये प्राप्त झालेली रुपये १० कोटी इतकी रक्कम सन २०१३-१४, सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये वापरण्यात आली नाही. सन २०१६-१७ मध्ये DBTK योजनेसाठी सदर रक्कम वळती करण्याबाबतची विनंती केंद्र शासनास शासनाच्या दिनांक १ मार्च २०१६ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे. तथापि केंद्र शासनाकडून राज्यास याबाबत काहीही कळविण्यात आलेले नाही. यास्तव सदर योजना मागे पडली.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना वितरित करण्यात येणा-या केरोसिनची वाहतूक करणा-या टँकर्सवर जी. पी. एस. यंत्रणा बसविण्याच्या सूचना शासन परवानाधारकांनी सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांच्यामार्फत स्वखर्चाने बसविली होती. तथापि, सदर यंत्रणा पुढे सुरळीत सुरू राहण्याबाबत सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांनी खबरदारी न घेतल्यामुळे,तसेच प्रस्तुत यंत्रणा राबविण्याकरिता घाऊक केरोसिन परवानाधारकांनी आवश्यक ती रक्कम सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांना अदा न केल्यामुळे राज्यातील सर्व जिल्ह्यातील केरोसिन टँकर्सवरील जी. पी. एस. यंत्रणा सद्य:स्थितीत कार्यान्वित नाही. केरोसिनची वाहतूक करणा-या टँकर्सवर जी.पी.एस.यंत्रणा बसविण्यासाठी येणा-या खर्चाच्या विभागणीबाबत केंद्र शासनाकडून दिनांक १६ जुलै,२०११ च्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. तथापि, अद्यापपर्यंत केंद्र शासनाकडून कोणतेही अभिप्राय प्राप्त झालेले नाही. यास्तव वाहनांचा माग घेण्याच्या प्रणालीची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यात आलेली नाही.

शासन निर्णय दिनांक २६ नोव्हेंबर २०१२ अन्वये विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मुख्यालयाच्या वाहनांवर प्रायोगिक स्तरावर जी. पी. एस. यंत्रणा बसविण्याच्या सुचना देण्यात आल्या होत्या त्यानुसार अमरावती जिल्ह्यामध्ये जी. पी. एस. यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती.

दिनांक २० एप्रिल २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्ह्याचे संगणीकरण पूर्ण होईपर्यंत लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत अन्नधान्याच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणा-या सर्व साहनांवर जी. पी. एस. यंत्रणा बसविणे सक्तीचे केले आहे.

(१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील देखरेखीत जनतेचा सहभाग राहण्याच्या दृष्टीने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरित करण्यात येणा-या जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणावर देखरेख ठेवण्यासाठी वितरित करण्यात येणा-या जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणावर देखरेख ठेवण्यासाठी शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी २००८ अन्वये राज्यात विविध स्तरावर दक्षता समित्या गठीत करण्यात आल्या असून, या विविध स्तरावरील दक्षता समित्यांच्या बैठका दरमहा नियमितपणे घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.

दक्षता समित्या स्थायी स्वरुपाच्या समित्या असून, प्रत्येक स्तरावरील दक्षता समित्यांचे गठण, अशासकीय सदस्यांची नियुक्ती व परिस्थितीनुरुप आवश्यकतेनुसार त्यांची नियमानुरुप पुर्नरचना करणे ही जबाबदारी शासन निर्णयांतील तरतूदींनुसार सदस्यांची नियुक्ती करणा-या संबंधित क्षेत्रिय अधिका-यांची आहे. असे असले तरी, शासन निर्णय, दिनांक २१ ऑक्टोबर २०१० अन्वये तालुका पातळीवरील, जिल्हा पातळीवरील अ, ब, आणि क वर्ग नगरपालिका आणि महानगरपालिका स्तरावरील (मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र वगळून) तसेच, मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रातील दक्षता समित्यांवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतर करण्यात येतात. मात्र अशा प्रकारच्या शिफारशी संबंधित पालकमंत्र्यांकडून वेळेवर प्राप्त होत नसल्याने दक्षता समितीची अशा प्रकारच्या शिफारशी संबंधित पालकमंत्र्यांकडून वेळेवर प्राप्त होत नसल्याने दक्षता समितीची स्थापना करून, बैठका नियमितपणे होण्यास मर्यादा येतात. ही बाब विचारात घेवून, दक्षता समित्या वेळोवेळी गठीत करण्यासाठी तालुका, जिल्हा पातळीवरील अ, ब आणि क वर्ग नगरपालिका आणि महानगरपालिका स्तरावरील तसेच, मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रातील नगरपालिका आणि महानगरपालिका स्तरावरील तसेच, मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रातील दक्षता समित्यांवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्यांकरिता संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या शिफारशी एक महिन्याच्या आत प्राप्त करून घेणे व ज्या स्तरावरील दक्षता समितीसाठी अशा प्रकारच्या शिफारशी संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांकडून एक महिन्याचा कालावधी उलटून गेला असतानाही प्राप्त होत नसतील. त्या ठिकाणी अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या विभागाचे मंत्री, महोदय यांच्या शिफारशीने करण्याबाबतच्या सूचना शासन निर्णय, दिनांक २५ ऑक्टोबर २०१६ अन्वये देण्यात आल्या आहेत.

(२) याव्यतिरिक्त सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये अधिक पारदर्शकता आणणे व सुधारणा सुचविणे यासाठी शासन निर्णय, दिनांक ३० ऑगस्ट २००८ अन्वये राज्यस्तरीय सल्लागार समिती देखील गठित करण्यात आलेली आहे.

१.३० परिच्छेद क्र. २.२.१८ शिफारशी :

- अपात्र लाभार्थ्यांची नावे यादीतून काढून टाकण्यासाठी प्रत्येक वर्षी TPDS अंतर्गत BPL लाभार्थ्यांच्या यादीचे पुनर्विलोकन करावे.
- अन्नधान्यावरील सबसिडीचे अंदाजपत्रक वास्तववादी असावे.
- केंद्र शासनाने वाटप केलेल्या अन्नधान्यांची संपूर्णपणे उचल होण्याची खात्री करण्यासाठी आणि FCI कडून अन्नधान्यांची उचल करण्याआधी त्याच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी संयुक्त तपासण्या केल्या जातील त्यासाठी प्रयत्न करावे.
- साठवण क्षमता वाढविण्यासाठी उर्वरित गोदामांचे आधीच बसविण्यात आलेल्या वाहन माग यंत्रणेस कार्यरत करण्यासाठी प्रयत्न करावे आणि
- योजनेवर प्रभावीपणे संनियंत्रण ठेवण्यासाठी गोदामे, स्वस्त धान्य दुकाने आणि शिधापत्रिका यांच्या विहित संख्येत तपासण्या करण्यात याव्या आणि वेगवेगळ्या पातळ्यांवर निर्धारित संख्येत दक्षता समित्यांचे गठन करण्यातील तूट कमी करावी.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्रायासंदर्भात अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे.

- राज्य शासनाने त्यांच्या दिनांक २१ जुलै २०१४ च्या पत्रान्वये अपात्र शिधापत्रिका रद्द करणे व नवीन वितरित केलेल्या शिधापत्रिकांची तपासणी (Cross verification) करण्याच्या सूचना सर्व विभागीय आयुक्तांना निर्गमित केल्या आहेत.

उपरोक्त नमूद सूचना व उपाय योजना व्यतिरिक्त राज्य शासनाने सर्व शिधापत्रिकांचे संगणकीकरण करून सर्व शिधापत्रिका आधारकार्डसोबत जोडण्याचे पाऊल उचलेले असून त्यासोबतच संपूर्ण सार्वजनिक वितरण जोडण्याचे पाऊल उचललेले असून त्यासोबतचे संपूर्ण सार्वजनिक वितरण योजनेसाठी Biometric प्रणालीचा वापर करण्याची कार्यवाही सुरू केली आहे. अपात्र शिधापत्रिकांचा शोध घेऊन त्या रद्द करण्यासाठी वरील उपाययोजना केलेल्या आहेत.

- राज्यामध्ये सार्वजनिक वितरण व्यवस्थे अंतर्गत ज्या योजना आहेत. त्याअनुषंगाने खरेदी खर्च,हाताळणुकी/वाहतुकवरील अनुषंगिक खर्च व दुकानदार मार्जिन वरील खर्च आणि अन्नधान्य विक्रीतून जमा होणारी रक्कम वजा जाता येणारी तुट रक्कमेची परिगणना करून वास्तववादी तुट रक्कम सबसिडीचे अंदाजपत्रकात मागणी सादर करण्यात येत आहे.

- FCI शी चर्चा करून अन्नधान्याची जास्तीत जास्त उचल होण्यासाठी प्रयत्न करण्यात आले.

FCI ही केंद्र शासनाची संख्या असल्याने, अन्नधान्याची उचल करण्याअगोदर दोन्ही कार्यालयांच्या प्रतिनिधींकडून संयुक्त तपासणी करण्यात येते.

- नाबार्डच्या ग्रामीण पायाभूत विकास निधी मालिका १७ अंतर्गत नवीन गोदाम बांधकामासाठी साठवण क्षमता ५९६००० मे. टनाकरिता ५९८ गोदामांचे बांधकामांचे नियोजन असून ३.२९००० मे. टनाच्या २३३ गोदामास प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. सन २०१२-१३ ते २०१७-१८ या कालावधीत २१२ गोदामांचे बांधकामाकरिता रक्कम रुपये २९१.२८ कोटी निधी वितरित केला असून १८०१४० मे. टन क्षमतेचे एकूण १३६ गोदामे पूर्ण झाले आहेत. सन २०१७-१८ या आर्थिक वर्षात रुपये ८० कोटी इतका निधी अर्थसंकल्पीय करण्यात आला असून त्यापैकी ६२.६९ कोटी इतका निधी नवीन गोदाम बांधकामासाठी वितरित करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत गोदाम बांधकामाच्या पूर्णत्वासाठी वेळोवेळी आढावा घेऊन समस्या निराकरण करून गोदाम बांधकामे तातडीने करण्यास विभाग प्रयत्नशील आहे. शासन निर्णय, दिनांक २६ नोव्हेंबर २०१२ अन्वये विभागीय आयुक्त कार्यालयाच्या मुख्यालयाच्या जिल्ह्यांमध्ये वाहनांवर प्रायोगिक स्तरावर जी.पी.एस. यंत्रणा बसविण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या त्यानुसार अमरावती जिल्ह्यामध्ये जी.पी.एस.यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली होती.

दिनांक २० एप्रिल २०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये जिल्ह्याचे संगणकीकरण पूर्ण होईपर्यंत लक्ष्यनिर्धारीत सार्वजनिक वितरण प्रणाली अंतर्गत अन्नधान्याच्या वाहतुकीसाठी वापरण्यात येणा-या सर्व वाहनांवर जी. पी. एस. यंत्रणा बसविणे सक्तीचे केले आहे.

- सन २०१६-१७ या कालावधीत पुरवठा आयुक्त कार्यालयाच्या तपासणी पथकांनी ४४९ गोदामांची तपासणी केलेली आहे.

रास्तभाव दुकानांच्या नियमित तपासण्या करण्याबाबत क्षेत्रिय अधिका-यांना शासन स्तरावर वेळोवेळी सुचना देण्यात येतात. शासन परिपत्रक दिनांक १२ जानेवारी २०१२ अन्वये विहित मानंकाप्रमाणे तपासणी न करणा-या अधिकारी व कर्मचा-यांवर उप आयुक्त (पुरवठा) जिल्हाधिकारी, यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करावी अशा सुचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत.

(१) सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील देखरेखीत जनतेचा सहभाग राहण्याच्या दृष्टीने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरित करण्यात येणा-या जीवनावश्यक वस्तूंच्या वितरणावर देखरेख ठेवण्यासाठी शासन निर्णय, दिनांक २३ जानेवारी २००८ अन्वये राज्यात विविध स्तरावर दक्षता समित्या गठीत करण्यात आल्या असून, या विविध स्तरावरील दक्षता समित्यांच्या बैठका दरमहा नियमितपणे घेण्याची तरतूद करण्यात आली आहे.

दक्षता समित्या स्थायी स्वरुपाच्या समित्या असून, प्रत्येक स्तरावरील दक्षता समित्यांचे गठण, अशासकीय सदस्यांची नियुक्ती व परिस्थितीनुरुप आवश्यकतेनुसार त्यांची नियमानुरुप पुनर्रचना करणे ही जबाबदारी शासन निर्णयांतील तरतूदींनुसार सदस्यांची नियुक्ती करणा-या संबंधित क्षेत्रिय अधिका-यांची आहे. असे असले तरी, शासन निर्णय दिनांक २१ ऑक्टोबर २०१० अन्वये तालुका पातळीवरील, जिल्हा पातळीवरील अ, ब, आणि क वर्ग नगरपालिका आणि महानगरपालिका स्तरावरील (मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्र वगळून) तसेच, मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रातील दक्षता समित्यांवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या संबंधित जिल्ह्याच्या पालक मंत्र्यांच्या शिफारशी प्राप्त झाल्यानंतर करण्यात येतात. मात्र अशा प्रकारच्या शिफारशी संबंधित पालकमंत्र्यंकडून वेळेवर प्राप्त होत नसल्याने दक्षता समितीची स्थापना करून, बैठका नियमितपणे होण्यास मर्यदा येतात. ही बाब विचारात घेवून, दक्षता समित्या वेळोवेळी गठीत करण्यासाठी तालुका, जिल्हा पातळीवरील अ, ब आणि क वर्ग नगरपालिका आणि महानगरपालिका स्तरावरील तसेच, मुंबई/ठाणे शिधावाटप क्षेत्रातील दक्षता समित्यांवरील अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्यांकरीता संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांच्या शिफारशी एक महिन्याच्या आत प्राप्त करून घेणे व ज्या स्तरावरील दक्षता समितीसाठी अशा प्रकारच्या शिफारशी संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांकडून एक महिन्याच्या आत प्राप्त करून घेणे व ज्या स्तरावरील दक्षता समितीसाठी अशा प्रकारच्या शिफारशी संबंधित जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांकडून एक महिन्याचा कालावधी उलटुन गेला असतानाही प्राप्त होत नसतील, त्या ठिकाणी अशासकीय सदस्यांच्या नियुक्त्या विभागाचे मंत्री, महोदय यांच्या शिफारशीने करण्याबाबतच्या सूचना शासन निर्णय, दिनांक २५ ऑक्टोबर २०१६ अन्वये देण्यात आल्या आहेत.

(२) या व्यतिरिक्त सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये अधिक पारदर्शकता आणणे व सुधारणा सुचविणे यासाठी शासन निर्णय, दिनांक ३० ऑगस्ट २००८ अन्वये राज्यस्तरीय सल्लागार समिती देखील गठित करण्यात आलेली आहे.

१.३१ परिच्छेद क्रमांक २.२ " महाराष्ट्रात निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणालीची अंमलबजावणी " :

साक्ष :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने दिनांक ८, ९ व ३१ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिव व इतर विभागीय प्रतिनिधी यांची साक्ष घेतली.

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक ८ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिवांनी तसेच इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली. बैठकीच्यावेळी वरील परिच्छेदाबाबत विभागास सादरीकरण करण्यास सांगितले. सादरीकरणाच्या अनुषंगाने विभागीय सचिवांनी समितीस असे विदित केले की,महाराष्ट्र राज्यातील ६ विभागांना दोन-दोनचा एक गट याप्रमाणे विभाजित करण्यात आले होते. त्यामध्ये नागपूर व अमरावती मिळून एक विभाग, औरंगाबाद व पुणे असा एक आणि कोकण, मुंबई व नाशिक याप्रमाणे विभाग करण्यात आले होते यासाठी ट्रान्झॅक्शन बेस मॉडेल निवडले होते. सन २०१५ व २०१६ मध्ये याबाबत एच.पी.सी. मध्ये सुमारे दहा-बारा बैठका झाल्या. एच.पी.सी.मध्ये प्रत्येक टप्प्यावर याची मंजुरी घेतली. मे, २०१६ मध्ये याला प्रथम कॅबिनेटची परवानगी मिळाली. पॉस मशिन वापरुन ही कार्यवाही करायची होती. ट्रान्झॅक्शन बेस मॉडेल स्विकारणारे महाराष्ट्र हे देशातील एकमेव राज्य असून या मॉडेलमध्ये मशिनची खरेदी करण्याची जबाबदारी आपली नाही. दोन-दोन विभागांचे मिळून आपण जे विभाग तयार केले आहेत त्यासाठी आपण एक सिस्टिम इंटीग्रेटर निवडला. एन.आय.सी. व मशिनच्या सॉफ्टवेअरची सांगड घालून व आपल्या डाटाबेसचा वापर करून ट्रान्झॅक्शन करणे हे त्याचे काम होते. प्रत्येक ट्रान्झॅक्शनचे ते किती पैसे घेणार आहेत त्यानुसार आपले टेंडर डिसाइड झाले. नागपूर व अमरावती विभागासाठी इंटिग्रा, पुणे व औरंगाबादसाठी लिंकवेल व कोकण, मुंबई व नाशिक विभागासाठी ओएसिस नावाची कंपनी मिळाली. माहे नोव्हेंबर मध्ये मंजुरी मिळाल्यानंतर माहे डिसेंबर मध्ये त्यांच्याशी करार करून वर्क ऑर्डर देण्यात आली. माहे जानेवारीमध्ये प्रूफ ऑफ कन्सेप्ट करायचा होता. प्रत्येक जिल्ह्यातील दोन दुकानांमध्ये प्रूफ ऑफ कन्सेप्ट केला त्यामधून सर्व प्रकारचा अनूभव आला तसेच माहिती मिळाली. हा अत्यंत महत्त्वाचा टप्पा जानेवारी महिन्यामध्ये पूर्ण करण्यात आला. मे, २०१७ मध्ये याबाबतचे ट्रान्झॅक्शन्स सुरू झाले. मे महिन्यामध्ये २३ लाख, जून महिन्यामध्ये ४० लाख व जुलैमध्ये ६७ लाख असे ट्रान्झॅक्शन वाढत जाऊन आता १ कोटी १४ लाख ट्रान्झॅक्शन झाले आहेत. एकूण १.५ कोटींपैकी हे ट्रान्झॅक्शन आहेत. सुमारे ७२ टक्के धान्य वाटप हे ट्रान्झॅक्शन मार्फत होत आहे. ज्या ठिकाणी डाटा एन्ट्री नाही किंवा आधार लिंक नाही तेथेच केवळ हे सुरू नाही.

ब्रॉडबॅण्ड बाबत काय स्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता नंदूरबार किंवा गडचिरोली अशा काही जिल्ह्यांमध्येच ब्रॉडबॅण्डचा प्रश्न येत आहे. ट्रान्झॅक्शन करताना यामध्ये काहीही अडचण येत नाही केवळ ते अपलोड करताना अडचण येत आहे. ज्यावेळी माहिती अपलोड केली जाते त्यासाठी नेटवर्कची आवश्यकता असते. धान्य वाटप करताना सध्या तरी नेटवर्कची आवश्यकता नाही. चार जिल्ह्यांमध्ये ए. ई. पी. डी. एस. सुरू केले आहे. त्यामध्ये नागपूर, सोलापूर, जालना व वाशिम या जिल्ह्यांचा समावेश आहे. यामध्ये लाईव्ह आधारचा वापर करण्यात येतो. सध्या इतर जिल्ह्यांमध्ये डाटाबेस आधारचा वापर सुरू असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

ज्या ठिकाणी डाटाबेससाठी ब्रॉडबॅण्ड नाही तेथे ही सर्व माहिती कशी अपलोड केली जाणार आहे असा प्रश्न समितीने केला असता याच्या तीन-चार पद्धती असून त्यांना दोन सिम देण्यात आलेले आहेत. एअरटेल किंवा बी. एस. एन. एल. सर्व ठिकाणी चालते व त्याचाच वापर यामध्ये करण्यात येत आहे. तसेच एक अँटिना देण्यात आला आहे. त्याच्या साहाय्याने रेंज एक्स्टेंड होते. तरीही जी काही ठराविक दुकाने आहेत त्यांची यादी आपण टी. आर. ए. आय. च्या ग्राहकांच्या विभागीय बैठकीमध्ये दिली आहे. नेटवर्क नसलेल्या दुकानांची संख्या हळूहळू कमी होत चालली आहे. प्रामुख्याने दुर्गम व डोंगराळ भागामध्ये ही अडचण येत आहे. गडचिरोली, नंदूरबार, मेळघाट यांचा त्यामध्ये समावेश आहे. असे असले तरी याचा ट्रान्झॅक्शन करताना काहीही अडथळा येत नाही केवळ माहिती अपलोड करताना अडचण येत आहे. ए. ई. पी. डी. एस. मध्ये आपले नेटवर्क सुधारायला लागतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

What is the target to be completed अशी विचारणा समितीने केली असता १०० टक्के पूर्ण झाले असून ५२ हजार दुकानांमध्ये पॉस मशिन्स बसविल्या असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

विभागाने सांगितले आहे की, १.५ कोटीपैकी १ कोटी १४ हजार ट्रान्झॅक्शन झाले आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता जे दुकानदार मशिनमार्फत धान्य वाटप करतील त्यांना प्रति क्विंटल १५० रुपये व पावतीने धान्य वाटप करणा-या दुकानदारांना ७० रुपये प्रती क्विंटल असा दरामध्ये फरक करण्यात आला आहे त्यामुळे सर्वांचा कल मशिनकडेच असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

रेशन दुकानदार मोठ्या प्रमाणामध्ये आपले परवाने सरेंडर करीत आहेत, हे खरे आहे काय अशी पृच्छा समितीने केली असता रेशन दुकानदार परवाने सरेंडर करीत नाहीत. त्यांना सक्षम करण्यासाठी देखील आपण योजना हाती घेतल्या होत्या त्याचा परिणाम देखील झालेला आहे. यासाठी प्रति क्विंटल १५० रुपये दर करण्यात आला आहे. हे दर मशिनमार्फत ट्रान्झॅक्शन केले तरच मिळतील अन्यथा ७० रुपये प्रति क्विंटल प्रमाणे पैसे मिळतील. याशिवाय, साम-दाम-दंड-भेद या सर्वांचा वापर करण्यात येत आहे. कारण नसताना जर ट्रान्झॅक्शन केले जात असतील तर त्यांना नोटिसा देण्यात आल्या आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

ज्या ठिकाणी ब्रॉडबॅण्डची अडचण आहे त्यांना यामधून सूट देण्यात यावी. इतर ठिकाणी काहीही अडचण नसताना जे दुकानदार मशिनवर ट्रान्झॅक्शन करीत नाहीत त्यांना माहिती आहे की, मशिनमुळे आपल्याला प्रति क्विंटल ८० रुपये जास्त मिळतील परंतु तेच धान्य बाजारात विकल्यास दीड हजार रुपये मिळतील असे समितीने निदर्शनास आणले असता ट्रान्झॅक्शन करताना कोणतीही अडचण येत नाही. केवळ अपलोड करताना अडचण येत आहे. त्यामुळे मशिन ट्रान्झॅक्शनवर १५० रुपये प्रति क्विंटल हा दर त्यांना सद्य:स्थितीत योग्य असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

समितीचा मुद्दा आहे की, ट्रान्झॅक्शन वेळी जर पॉस मशिनच्या वापरामध्ये काही अडचण नसेल तर अशा दुकानदारांना कोणत्याही परिस्थितीमध्ये पावती देवून विक्री करण्याची परवानगी देता कामा नये असे समितीने सांगितले असता आधार बेस ट्रान्झॅक्शन करण्यासाठी देखील केंद्र शासनाने अधिसूचना काढून मार्च, २०१८ पर्यंतची मुभा दिलेली आहे ही तारीख प्रत्येक वेळी वाढते. त्यामुळे आपण त्यांना नॉन आधार ट्रान्झॅक्शन न करण्याची सध्या तरी सक्ती करीत आहोत. आपले ८७ टक्के आधार लिंकेज झालेले आहे त्यामुळे १३ टक्के आधार लिंकेजच नाही. त्यांचा डाटा आहे, परंतु तो फिड केलेला नाही. काही ठिकाणी डाटा बेस डाउनलोड बाबत किंवा एन.आय.सी. ची काही अडचण असते. अशा वेळी ट्रान्झॅक्शन करता येत नाही याची ही जेन्युइन कारणे आहेत. वाढीच्या दिशेनेच प्रवास सुरू असून दोन-तीन महिन्यांमध्ये आपण १०० टक्क्यांपर्यंत नक्की पोहचू असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागीय सचिवांनी सांगितले आहे की, सुमारे ७२ टक्क्यांपर्यंत कव्हर केले आहे तथापि, यामध्ये मोठ्या प्रमाणामध्ये अपात्र लाभार्थी आढळून आले असतील असे समितीने विचारले असता अपात्र लाभार्थी मोठ्या प्रमाणावर आढळून आलेले नाहीत. दुबार, मयत किंवा स्थलांतर अशा मिळून सुरूवातीला १० लाख शिधापत्रिका रद्द केल्या. त्यांचा डाटा नव्हता किंवा त्यामध्ये आधारची कोणतीही माहिती आपल्याकडे येत नव्हती. याबाबत आपण प्रथम माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये शासन निर्णय काढला व सुधारित शासन निर्णय मार्च, २०१७ मध्ये काढला. त्यानुसार दिनांक ३० सप्टेंबर २०१६ पर्यंत ९२ लाख लोकांचा समावेश करून घेतला असून सर्व जिल्ह्यांमध्ये टार्गेट देण्यात आले होते. ग्रामीण भागामध्ये ४४ हजार व शहरी भागामध्ये ५९ हजार उत्पन्न असणा-यांचा यामध्ये समावेश करून घेतला याबाबत एन.एफ.एस.ए. चा शासन निर्णयही असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

Should they be under BPL अशी विचारणा समितीने केली असता Not under BPL It is Keshari Sheedha-Patrika. Non-BPL, Non-Antyodaya but in PHH असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाच्या या सर्व प्रक्रियेला काय आधार आहे ? दारिद्र्य रेषेखालील किंवा अंत्योदय योजनेबाबत समितीला माहिती आहे, परंतु आपण आता प्राधान्य कुटुंबाबाबत जे ठरविले जात आहे ते कसे ठरविले जात आहे अशी पृच्छा समितीने केली असता याबाबत सन २०१५ मध्ये शासन निर्णय काढण्यात आला व त्यानुसार उत्पन्नाची मर्यादा निश्चित करण्यात आली. त्या उत्पन्न मर्यादेबाबत संबंधितांचे डिक्लेरेशन असते. तसेच शिधापत्रिका देताना इतर काही कागदपत्रे असतात. त्या आधारे ग्रामीण भागामध्ये ४४ हजार व शहरी भागामध्ये ५९ हजार रुपये उत्पन्न असणा-या लाभार्थ्यांचा यामध्ये समावेश करण्यात आला असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

अनेक कुटुंबे आहेत ज्यांचे कागदोपत्री उत्पन्न ५९ हजार किंवा त्यापेक्षा कमी आहे, परंतु तरी देखील त्यांचा प्राधान्यांच्या यादीमध्ये समावेश नसल्याचे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता याचा दिनांक ३० सप्टेंबर २०१६ चा कट ऑफ आहे. काही ठिकाणी टार्गेट संपले असेल तर याबाबत आढावा घेवून १५ दिवसांमध्ये एक सुधारीत आदेश काढणार आहोत, आधार सक्ती केल्यामुळे काही ठिकाणी लोक धान्य घेत नाहीत तसेच, संपूर्ण राज्याची प्राधान्य मर्यादा ७ कोटी १६ हजार एवढी अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

यामध्ये आपल्याकडे किती तफावत आहे? राज्याचा अभ्यास करताना, आपण एका बाजूला उच्च दरडोई उत्पन्न असणारे व एका बाजूला अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत संरक्षण द्यावयाचे लोक पाहिले तर उच्च दरडोई उत्पन्न असणा-या लोकांची संख्या ५० लाख देखील नसेल. यापूर्वी दारिद्र्य रेषेवरील लोकांना देखील अन्नधान्याचे वाटप केले जात होते. आपण राष्ट्रीय अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत ७ कोटी १६ हजार लोकांना कव्हर करीत आहात. याचा अर्थ महाराष्ट्र राज्यातील ६० टक्के लोकांना अन्नसुरक्षा कायद्यांतर्गत संरक्षणाची गरज आहे असे समितीने नमूद केले असता आत्महत्याग्रस्त १४ जिल्ह्यांमधील ५७ लाख शेतक-यांना विना मर्यादा लागू केले असून नागपूर विभागामधील केवळ वर्धा जिल्ह्याला हा निकष लागू आहे. सन २०१४ च्या अगोदर तीन वर्षे होणारी उचल ही ७ कोटी १६ हजार एवढी होती असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यामध्ये आपण जे ५७ लाख शेतकरी समाविष्ट केले, हे संपूर्ण राज्याच्या योजने नुसार आहे काय यावर विभागीय सचिवांनी असे विदित केले की होय, यावर प्रति महिना अतिरिक्त ७० कोटी रुपयांचा खर्च होत आहे. ज्यावेळी दुष्काळ असतो त्यावेळी बेसिक पर्चेस प्राईसवर तर ज्यावेळी दुष्काळ नसतो त्यावेळी इकॉनॉमिक कॉस्टवर मिळते. दुष्काळ पडला तर कमी दराने व दुष्काळ नसेल तर जास्त दराने मिळते. मार्च, २०१४ मध्ये डाटाऐंट्री करण्याचे काम सुरू होते. सन २०१६ पासून यासाठी जनजागृती मोहिम राबविण्यात आली होती. त्यामध्ये डाटाक्लिनिंग, आधार सिडींगचे

ट्रायल घेण्यात आलेले होते. जून, २०१६ मध्ये सप्लाय चेन मॅनेजमेंट सुरू करण्यात आले होते. यामध्ये सर्व नोंदी ऑनलाईन आहेत. यामध्ये सर्व व्यवहार म्हणजेच वाहतूक, पुरवठा आशा प्रकारच्या सर्व बाबी ऑनलाईन करण्यात आलेल्या आहेत. मे, २०१६ मध्ये ऑनलाईन ग्रेव्हिएन्स तयार करण्यात आलेले होते. यामध्ये प्रत्येक दुकानामध्ये बॅनर, पोस्टर तयार करण्यात आलेले आहेत. तसेच राज्य, जिल्हा आणि तालुका व गाव स्तरावर यासाठी व्हॅट्स ॲप ग्रुप तयार करण्यात आलेला आहे. ऑनलाईन सप्लाय चेन मॅनेजमेंट जुलै, २०१७ मध्ये सुरू करण्यात आलेली आहे. नोव्हेंबर महिन्यामध्ये अन्न दिन आणि अन्न सप्ताह सुरू करण्यात आला आहे. दिनांक ७ नोव्हेंबर रोजी अन्न दिन साजरा करण्यात येतो आणि त्यापुढील एक आठवडा अन्न सप्ताह साजरा करण्यात येतो. दक्षता समितीमध्ये जर या सर्व प्रणालीचा रिव्ह्यू होत नसेल तर तेथील गावांमध्ये हे अभियान सुरू करण्यात आलेले आहे. तसेच, बोर्ड आणि बॅनर तयार करण्यात आलेले आहेत. दुकानदारांसाठी भरपूर योजना तयार करण्यात आलेल्या आहेत. पॉसद्वारे माहे डिसेंबर, २०१७ मध्ये दिड लाख टन धान्य वितरित करण्यात आलेले आहे. १ लाख १७ हजार टन गहू वितरित करण्यात आलेला आहे. त्याचबरोबर साखर, तांदूळ या सर्व धान्याचे वितरण ६९ टक्के करण्यात आलेले आहे. आधारनुसार ४२ टक्के ट्रान्झॅक्शन झालेले आहेत. यामध्ये AePDS झाल्याशिवाय धान्य वाटप होत नाही. तरी देखील ही योजना सध्या केवळ चार जिल्ह्यामध्ये राबविण्यात आलेली आहे. उर्वरित जिल्ह्यांमध्ये ही योजना टप्प्याटप्याने राबविण्यात येणार आहे.

कॅशलेस व्यवहारांबाबत काय सद्यःस्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता कॅशलेस व्यवहार फार कमी होतात. कारण १३ रुपयांमध्ये ३ किलो तांदूळ आणि दोन किलो गहू देण्यात येतो त्यामुळे १३ रुपयांसाठी ऑनलाईन ट्रान्झॅक्शन करण्यासाठी दिड रुपये आकारणी करावी लागत असल्यामुळे असे व्यवहार जास्त प्रमाणात होत नाहीत. तरीदेखील युपीआयद्वारे पेमेंट करता येते. नागपूर, वाशिम, जालना, सोलापूर या ठिकाणी ३ हजार ५० दुकानांमध्ये AePDS सुरू करण्यात आलेले आहे. AePDS योजना उर्वरित सर्व महाराष्ट्रामध्ये सुरू करण्यात येईल. नागपूर शहरामध्ये ५० हजार लोकांनी धान्य रेशन दुकानांमधून घेण्याचे बंद केलेले आहे. याचे कारण असे की, धान्य द्यावयाचे असेल तर त्या ठिकाणी त्या व्यक्तीचा आंगठा नोंदवावा लागतो. पुर्वी अशा प्रकारचे धान्य कोणालाही देण्यात येत होते. परंतु धान्य वितरण AePDS द्वारे सुरू केल्यामुळे ५० हजार लोकांनी अशा प्रकारचे धान्य घेण्यास नकार दिलेला आहे. कारण असे धान्य कमी उत्पन्न असणा-यांना मिळते परंतु यामध्ये जास्त उत्पन्न असणारे लोक आता धान्य घेत नसल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले. तसेच ज्यांची आधारद्वारे नोंदणी करण्यात आलेली आहे त्याच व्यक्तीला धान्य घेण्यासाठी जावे लागणार आहे. जर एखादा व्यक्ती आयकर भरण्यास पात्र असेल तर त्यांना धान्य मिळू शकत नाही आणि जर त्यांनी धान्य घेतले तर त्यांच्याविरुद्ध तक्रार दाखल होऊन कारवाई होऊ शकते. त्यामुळे AePDS ही योजना ताबडतोब सर्व ठिकाणी सुरू करणे आवश्यक आहे. विभाग सात कोटी लोकांना धान्य वाटप करण्याचे उद्दिष्ट ठेवत आहे. त्या अनुषंगाने नवीन लोकांचा समावेश करण्यात येत आहे. तसेच, कोणत्या महिन्यामध्ये किती लोकांना किती किलो धान्य वितरित करण्यात आलेले आहे, याबाबतची माहिती mahafood.nic.in या संकेतस्थळावर ऑनलाईन पाहता येते. जिल्हा, तालुका आणि दुकानदार यांच्यापर्यंत व्हेल डाऊन करता येते यामध्ये कोणत्या वेळेस धान्य घेण्यात आलेले आहे, हे पाहता येणे शक्य होते असेही समितीस अवगत केले.

डिजीटल शिधापत्रिका केव्हा तयार करण्यात येणार आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता याबाबतची डाटा ऐंट्री झाल्यानंतर डिजीटल शिधापत्रिका तयार करण्यात येतील. माहे जानेवारी, २०१७ मध्ये फुड ऑफ कन्सेप्टचे उद्घाटन झालेले होते. त्यावेळेस चंद्रपूर येथे माननीय मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलेले आहे. तसेच, नागपूर, पुणे येथे देखील असे उद्घाटन करण्यात आलेले आहे. तसेच, या ऑनलाईन प्रणालीमध्ये एक डॅशबोर्ड तयार करण्यात आलेला आहे. यामध्ये किती ट्रान्झॅक्शन झालेले आहेत, किती ट्रान्झॅक्शनमध्ये आधारची नोंदणी करण्यात आलेली आहे आणि किती ट्रान्झॅक्शन मशिनवर होत आहेत, याबाबतची माहिती या डॅशबोर्डवरून मिळते. काही ठिकाणी पाच ते दहा मशिन आहेत आणि काही ठिकाणी २०० पर्यंतच्या मशीन आहेत. याशिवाय डाटा करेक्शन सिस्टीम आणि सप्लाय चेन मॅनेजमेंट व ट्रान्झॅक्शन मिळून दर आठवडयाला जिल्ह्यांची आकडेवारी काढण्यात येते. Completion status मध्ये कॅशलेस व्यवहार कमी आहेत. यामध्ये एफपीएस ॲटोमेशन ९९ टक्के करण्यात आलेले आहे. संपूर्ण प्रशिक्षण देण्यात आलेले आहे. सप्लाय चेन मॅनेजमेंटसाठी गोडाऊनपर्यंतच्या स्तरावर लॅपटॉप देण्यात आलेले आहेत. एस.एम.एस. ची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली असून ऑनलाईन ग्रेव्हिएन्ससाठी मेलवर तक्रार करता येते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

यामध्ये असे करता येईल का, की जे शिधापत्रिकाधारक आहेत त्यांच्या कुटुंबातील प्रमुखाला एस.एम.एस. पाठविण्यात यावा. जेणेकरून त्या कुटुंबामध्ये धान्याचे वाटप झालेले आहे किंवा नाही हे कळू शकेल याबाबत समितीने पृच्छा केली असता एस.एम.एस. साठी ४५ लाख लोकांचे भ्रमणध्वनी मिळविलेले असून अशा प्रकारचे एस.एम.एस. दुकानदारांना पाठविण्यात येतात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

जर एखाद्याने धान्य खरेदी केल्यानंतर त्या धान्य खरेदीची पावती देण्यात येते. आता सर्व प्रणाली ऑनलाईन झालेली असल्यामुळे त्यांना एस.एम.एस. द्वारे धान्य मिळाल्याचे कळविण्यात यावे. तसेच प्रत्येक शिधापत्रिकाधारकांना वैयक्तीक धान्य मिळाले किंवा नाही याबाबत एस.एम.एस. पाठविण्यात यावा असे समितीने सूचित केले असता अशा प्रकारचे एस.एम.एस. रेशन दुकानदारांना पाठविण्यात येतात. तसेच डिजीटल सप्लाय चेन आणि डिजीटायझेशन करण्यात आलेले असल्याचेही विभागीय सचिवांनी सांगितले.

साधारणपणे एका कुटुंबामध्ये दहा लोकांसाठी एक रेशन कार्ड असेल तर त्या कुटुंबातील कोणत्या व्यक्तीने धान्य घेण्यासाठी जावे अशी विचारणा समितीने केली असता किमान कुटुंबप्रमुखांनी धान्य घ्यावयास पाहिजे असे ठरविण्यात आले होते. परंतु आता असे ठरविण्यात आले आहे की, त्या कुटुंबातील ज्या व्यक्तीकडे आधार कार्ड आहे, त्यानेच धान्य घेण्यासाठी जावे त्याशिवाय धान्य मिळत नसल्याचे तसेच कुटुंबातील ज्या व्यक्तीकडे आधार आहे त्यांच्यापैकी कोणतीही एक व्यक्ती धान्य घेण्यासाठी गेली तर त्यांना ते मिळते असे विभागीय सचिवांनी विदित केले.

काही लोकांचे अंगठ्यांचे ठसे व्यवस्थित उमटत नाहीत, त्यामुळे अशा लोकांना कशा प्रकारे धान्य देण्यात येते या समितीच्या प्रश्नाला विभागीय सचिवांनी असे विदित केले की, त्यांना सूचना करण्यात येते की, दोन्ही हाताच्या आंगठ्यांचे नमूने ठेवण्यात यावेत. काही ठिकाणी आधारवरून आंगठ्याने धान्य देण्याचे प्रमाणे ६० ते ७० टक्क्यांपर्यंत करण्यात आलेले असून काही ठिकाणी हेच प्रमाण २० ते ३० टक्के आहे.

महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य आहे की, ज्याने पॉस मशिनसाठी दोनशे कोटी रुपये खर्च केलेले आहेत. दोनशे कोटी रुपये खर्च करून पॉस मशिन खरेदी करण्यात आलेली असल्याची माहिती प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी दिली.

अशा प्रकारच्या मशिन कोणी खरेदी केल्या आहेत अशी विचारणा समितीने कली असता यामध्ये शासनाने ज्या एस.आय. ची नियुक्ती केलेली होती त्यांनी पॉस मशिन बसवून प्रति व्यवहारामधून त्यांना पैसे द्यावयाचे. यामध्ये केवळ २० टक्के ॲडव्हान्स देण्यात आलेला आहे. उर्वरित ८० टक्के रक्कम ट्रान्झॅक्शनप्रमाणे देण्यात येणार असल्याचा खुलासा प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी केला.

प्रत्येक ग्राहकांच्या व्यवहारावर उर्वरित रक्कम देण्यात येणार आहे. परंतु जर तेथील दुकानदार जर अशा प्रकारचे व्यवहार पॉस मशिनमध्ये करीत नसेल तर काय करण्यात येते अशी पृच्छा समितीने केली असता जर दुकानदार असे करीत असेल तर त्यांनादेखील कमी फायदा होईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. तसेच अत्यंत चांगल्या प्रकारचा प्रकल्प महाराष्ट्र राज्यामध्ये राबविण्यात येत आहे. परंतु या प्रकल्पाची संपूर्ण फलश्रुती करावयाची असेल तर यामध्ये संपूर्ण शिधापत्रिकांची सांगड आधारशी घालावी लागेल. कारण जो पर्यंत शिधापत्रिकांची आधारशी जोडणी होत नाही तो पर्यंत AePDS पूर्णपणे करता येणार नाही. दुसरे असे की, भारत नेट प्रकल्पामुळे १५ हजार ग्रामपंचयातींना नेट कनेक्टिव्हिटी देण्यात आलेली आहे. ५२ हजारांपैकी किमान ४५ हजार अशी रास्त भाव दुकाने असतील की, ज्या ठिकाणी नेट कनेक्टिव्हिटी असते. द्वया दोन गोष्टीवरं प्रामुख्याने भर दिला तर हा प्रकल्प अत्यंत चांगला असल्याचे प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी अवगत केले.

यामध्ये वाहतूक रिबेट जवळपास आठ वर्षांनंतर वाढविण्यात आलेली आहे. तसेच, दुकानदारांना बँकिंग कॉरस्पॉंडन्स करण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली असून यामध्ये पुरविण्यात आलेली मशिन ही मायक्रो ए.टी.एम. स्टँडर्डची आहे. त्यामुळे बँक प्रतिनिधी करून दिले तर त्यावर बँकेचे व्यवहार करता येणे शक्य होते. तसेच, खुल्या बाजारातील भरपूर वस्तू विकण्याची संधी रेशन दुकानदारांना देण्यात आलेली आहे. यामध्ये बि-बियाणे, खते विकण्याची संधीदेखील देण्यात आलेली आहे. तसेच, पाच किलो सिलेंडर आणि व्हाईट केरोसिन विकण्याची मान्यता देण्यात आलेली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली. तसेच खुल्या बाजारातील वस्तू विकाण्याची जी परवानगी देण्यात आलेली आहे ती बाजारमुल्याप्रमाणे विकण्याची मान्यता देण्यात आलेली असल्याचे समितीस अवगत केले.

अशा वस्तू जर ते बाजारमुल्याप्रमाणे विकत असतील तर ते तेथील रेशनचे साहित्यदेखील बाजारमुल्याप्रमाणेच विकू शकतात असे समितीने निदर्शनास आणून दिले असता ठराविक वस्तू सोडून आणि त्यामध्ये गहू आणि तांदुळाच्या इतर व्हरायटीज त्यांनी ठेवल्या पाहिजेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

ग्रामपंचयात आणि तालुका स्तरावर दक्षात समित्या आहेत. ग्रामपंचायत स्तरावरील समित्यांना कोणत्याही प्रकारची माहिती पुरविली जात नाही. तेथील दक्षता समित्यांच्या बैठका होत नाहीत त्यामुळे या सर्वांची माहिती त्यांना मिळणार काय अशी विचारणा समितीने केली असता ४० दुकांनदारांचा एक ग्रुप आहे, त्यांना त्यामधून एस. एम. एस. पाठविण्यात येतो. दर महिन्याच्या सात तारखेला धान्य वाटप करण्यात यावे आणि त्यापुढील एक आठवडा हा अन्न सप्ताह ठेवण्यात येतो. यामध्ये लाभार्थ्यांची यादी वाचन किंवा इतर सर्व गोष्टी गावातील लोकांसमोर होतात अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

ग्रामपंचयातीमध्ये यादीचे जे वाचन करण्यात येते त्यावर कोणीही आक्षेप घेत नाही त्यामुळे या याद्यांची तपासणी त्रयस्थ व्यक्तीमार्फत करण्यात यावी असे समितीने सूचित केले असता AePDS सर्व ठिकाणी करण्यात येत आहे. ज्या लाभार्थ्यांनी मागील तीन महिन्यांपासून धान्य घेतले नसेल त्यांचे नाव अशा याद्यांमधून कमी करण्यात येणार असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.३२ परिच्छेद क्र. २.२.८.१ लाभार्थ्यांचे अयोग्य निर्धारण :

उपरोक्त परिच्छेदा संदर्भात चर्चा करताना समितीने असे विदित केले की, ५० टक्के रेशन कार्डची तपासणी विभागाकडून केली पाहिजे या अनुषंगाने विभागीय सचिवांनी असा खुलासा केला की, सन २००५, २००८ आणि सन २०११ मध्ये रेशन कार्डाची तपासणी करण्यासाठी मोहिम राबविण्यात आलेली होती. सन २००८ मध्ये २९ लाख रेशन कार्ड कमी करण्यात आले. सन २००९-१० मध्ये १२ लाख आणि सन २०१०-११ मध्ये

११.८६ लाख रेशन कार्ड कमी करण्यात आलेले आहेत. सन २०१२ मध्ये संगणकामध्ये दुबार, मयत किंवा माहिती नसलेले असे एकूण १० लाख रेशन कार्ड रद्द करण्यात आलेले आहेत. तसेच, २०१६-१७ मध्ये एक लाख रेशन कार्ड रद्द करण्यात आलेले आहेत.

सन २००८ पासून किती नवीन रेशनकार्डांची नोंदणी झाली आहे या समितीच्या प्रश्नाला माहे ऑक्टोबर, २०१६ मध्ये याबाबत एक शासन निर्णय प्रसारित करून ९२ लाख लोकांना समाविष्ट करण्यात आलेले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

एका बाजूला रेशन कार्ड कमी केल्याची आकडेवारी सांगण्यात येते परंतु या सर्व वर्षांमध्ये किती नवीन रेशन कार्डांची नोंदणी झालेली आहे अशी पृच्छा समितीने केली असता त्याबाबतची माहिती समितीला देण्यात येईल परंतु पांढ-या शिधापत्रिकेमध्ये नोंदणी होत असून बी.पी.एल. ची नोंदणी करण्यात येत नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

बी.पी.एल. चे लाभधारक सन २००२ च्या आधारे घेण्यात येतात का सन २०११ च्या अधारे घेण्यात येतात यावर सन १९९७ च्या आधारे बी.पी.एल.चे लाभधारक घेण्यात येतात. दिनांक ३० सप्टेंबर, २०१६ पर्यंत शिधापित्रका घेत असताना जी माहिती दिली आहे त्या आधारे उत्पन्नाची मर्यादा ठेवण्यात आलेली आहे. बी.पी.एल. ही योजना आता एनएफएसए मध्ये नाही आता ही योजना ए.सी.सी. मध्ये मोडत असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

अंत्योदय योजना कोणासाठी आहे ? बी.पी.एल. ही योजना ज्यांचे उत्पन्न ४४००० पेक्षा कमी आहे त्यांच्यासाठी आहे. तर अंत्योदय योजनेची परिभाषा काय आहे अशी विचारणा समितीने केली असता सर्वात गरीब जो घटक होता त्यांच्यासाठी अंत्योदय योजना होती. असे घटक आता प्राधान्य कुटुंबामध्ये घेण्यात येत असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

If there is no BPL, then there is no condition as to १९९७, २००२, २०११ असे समितीने अवगत केले असता यामध्ये केवळ शिधापत्रिका न बदलल्यामुळे पिवळी शिधापत्रिका आणि केशरी शिधापत्रिका तसेच, अंत्योदय योजनेची शिधापत्रिका यांचे स्टॅम्पींग करून देण्यात आलेले आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

अंत्योदय योजनेची परिभाषा काय आहे ? ज्याप्रमाणे बी.पी.एल. ला स्क्रेपऑऊट करण्यात आलेले आहे त्याप्रमाणे आता अंत्योदयची परिभाषा बदलण्यात आलेली आहे कायय या समितीच्या प्रश्नाला जूने अंत्योदय सुरू असून नवीन अंत्योदय सुरू करता येत नसून २५ लाख रुपयांची मर्यादा असल्यामुळे त्यावर ३५ किलो धान्य मिळत असते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

अंत्योदय योजनेमध्ये लाभार्थी कमी किंवा जास्त होऊ शकतात. मुंबई शहरामध्ये याबाबत एक वेगळी समस्या समोर येते. शिधापत्रिका रद्द करण्याचे नियम काय आहेत. कारण एस.आर.ए.च्या ज्या योजना सुरू होतात त्याठिकाणी असलेले लोक तात्पुरत्या स्वरुपात दुस-या ठिकाणी राहण्यासाठी जातात. त्यामुळे तात्पुरत्या स्वरुपात दुसरीकडे राहण्यासाठी गेलेल्या लोकांच्या शिधापत्रिका रद्द करण्यात येतात. कारण विभागाचा एखादा अधिकारी त्याठिकाणी तपासणी करण्यासाठी गेल्यावर तेथे एस.आर.ए. च्या योजनेमुळे स्थलांतरित झालेले लोक मिळत नाहीत याबाबत काय उपाययोजना करता येतील. तसेच झोपडपट्टीमध्ये राहणारी व्यक्ती नियमित धान्य घेत असते. तेथे राहणारी व्यक्ती काही अपरिहार्य कारणास्तव तात्पुरत्या स्वरुपात स्थंलातरित झालेली असते. गावामध्ये ज्यावेळी तपासणीसाठी शिधावाटप निरीक्षक जातात, त्यावेळी तेथे कोणतीही व्यक्ती आढळून येत नाही. त्यामुळे शिधावाटप निरीक्षक त्यांचे रेशन कार्ड रद्द करतात असे समितीने निदर्शनास आणले असता संबंधित व्यक्ती सातत्याने धान्य घेत नसेल तर त्याचे रेशन कार्ड रद्द केले जाते असे विभागीय सचिवांनी अवगत केले. तथापि, एखादी व्यक्ती दुस-या गावामध्ये स्थलातंरित होत असताना त्या गावातील रेशन कार्ड रद्द करून जेथे स्थलांतरित होतो तेथील रेशन कार्ड तो घेऊ शकतो असेही अवगत केले.

ज्यावेळी शासन तात्पुरत्या स्वरुपात एसआरएची योजना राबविते, त्यावेळी तेथील सर्व जागा रिकामी करावी लागते. सदर जागा रिकामी केल्यामुळे त्याला आवश्यक तेवढी जागा भाड्याने घ्यावी लागते. ज्यावेळी आपले अधिकारी तपासणीसाठी जातात त्यावेळी तेथे काही कुटुंब आढळून येत नाहीत, त्यामुळे संबंधित व्यक्तीच्या नावावरील रेशन कार्ड रद्द केले जाते. अशा व्यक्तींचे रेशन कार्ड कमी केली जात असुन विभागाकडून १ लाख रेशन कार्ड कमी केली आहेत, अशी माहिती समिती समोर देत आहात असे समितीने विभागास अवगत केले असता ग्रामीण भागातील रेशन कार्ड मोठ्या प्रमाणावर कमी करण्यात आलेली असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

येथे ग्रामीण भागाचा प्रश्न उद्भवत नसून मुंबई, ठाणे व पुणे येथे या शहरातील धान्य वाटपाचा प्रश्न आहे. जेथे जेथे झोपडपट्टी पुनर्वसन योजना सुरू आहे, अशा केसेसमध्ये तेथील व्यक्ती तात्पुरत्या स्वरुपात कोठेतरी स्थलांतरित झालेला आहे का? या सर्व गोष्टीची चौकशी करूनच आपण तेथील रहिवाशांचे रेशन कार्ड रद्द करण्याचा निर्णय घेण्यात यावा असे समितीने विभागास सूचित केले असता यामध्ये पोर्टेबिलिटीची सुविधा उपलब्ध झालेली असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सदर योजनेमध्ये संबंधित व्यक्तीचे नाव आहे पण त्या व्यक्तीचे रेशन कार्ड रद्द झाल्यानंतर त्या व्यक्तीला सदर योजनेचा कोणताही लाभ मिळत नाही याबाबत समितीने विचारणा केली असता ईपीडीएसनुसार या योजनेस पात्र असलेला व्यक्ती आता कोणत्याही रेशन दुकानातून धान्य खरेदी करू शकतो या पद्धतीनेच नागपूर शहरामध्ये धान्य वाटप केले जात असल्याचे समितीस अवगत केले.

एखाद्या व्यक्तीचे शासनाने रेशन कार्ड रद्द केल्यानंतर त्याला कोठेही धान्य कसे काय मिळणार? जे तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतरित झालेले आहेत, अशा लोकांचे रेशन कार्ड रद्द केलेले आहेत या बाबत शासन काय निर्णय घेणार आहे? या समितीच्या प्रश्नाला एखादी व्यक्ती तात्पुरत्या स्वरुपात स्थलांतर झाली तर सदर व्यक्तीचे रेशन कार्ड धान्य खरेदी करण्यासाठी वैध राहील. याबाबत शासन सकारात्मक विचार करून योग्य तो निर्णय घेईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

संपूर्ण शहरामध्ये अशा प्रकारचा प्रश्न निर्माण झालेला आहे. या विषयाच्या संदर्भात समितीचे म्हणणे असे आहे की, अतिक्रमण केलेल्या व्यक्तीचे ज्यावेळी स्थलांतरण केले जाते त्यावेळी त्यांनी तशी कल्पना संबंधित विभागास दिली पाहिजे असे समितीने सूचित केले असता सदर माहिती ही संबंधित विभागास कळविणे आवश्यक असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

याच अनुषंगाने प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी असे अवगत केले की, ePDS आल्यानंतर हा मुद्दाच निघून जाईल. सद्यःस्थितीत डाटा कनेक्टिव्हिटी खूप सोपी झालेली आहे. एसआरएकडे देखील कम्प्युटराइज्ड डाटा उपलब्ध आहे असे जे रीलोकेशन आहे त्याला फक्त लिंक करावे.

अशा प्रकारचा निर्णय घेऊन सदर निर्णयाची एक प्रत समितीस सादर करावी असे समितीने विभागास सूचित केले असता विभागीय सचिवांनी याबाबत सकारात्मक असल्याचे समितीस अवगत केले.तसेच सोशिअल इकॉनॉमिक कास्ट सेन्ससचे काम पूर्ण सन २०१६ मध्ये पूर्ण झालेले असल्याचेही सांगितले.

एका दारिद्र्य रेषेखालील कुटुंबांचे दोन कुटुंब झाले तर त्या नवीन कुटुंबास धान्य दिले जात नाही. या संदर्भात आतापर्यंत तीन वेळा बैठक घेतली आहे. ज्या कुटुंबामध्ये नैसर्गिकरित्या वाढ झालेली आहे, त्यांच्या युनिटमध्ये वाढ झाली पाहिजे असे समितीने सूचित केले असता याचा इष्टांक वाढवून दिलेला असून पुढील काही दिवसांमध्ये नियतन देखील देण्यात येणार असल्याचे समितीस सांगितले.

बीपीएल यादी संदर्भात समितीने विचारणा केली असता तो विषय आता संपुष्टात आलेला आहे या संदर्भातील यादी देखील उपलब्ध नाही. यामध्ये उत्पन्न मर्यादा ४४ हजार करण्यात आली होती त्यानंतर ५९ हजार करण्यात आली होती. सन २००२ व २००६ ची यादी कन्फर्म केली नाही. सन २०१४ नंतर हा विषय संपुष्टात आलेला असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

या संदर्भात शासनाचे धोरण असे होते की, सन १९९७ च्या बीपीएल यादीमधील जी नावे आहेत, त्यातील १०० व्यक्तींना या योजनेतील सर्व सुविधांचा लाभ देऊन त्यांची आर्थिक परिस्थिती चांगली करावी. त्यानंतर परत १०० व्यक्तींना अशाच प्रकारच्या सुविधा देऊन या यादीतील सर्व व्यक्तींची आर्थिक परिस्थती सुधारावी पण या यादीतील नावे कमी होण्याऐवजी ती वाढत गेली असून बीपीएलमधील लोकांना मोठ्या प्रमाणावर सोयी व सुविधा दिल्यानंतर देखील बीपीएलमधील नावे कमी होण्याऐवजी वाढत आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता.

या संदर्भातील माहिती अन्न नागरी पुरवठा विभागाकडे नसून ग्रामविकास विभागाकडे असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी तो बीपीएलमध्ये आहे का? याची आवश्यकता नसून ज्या व्यक्तींचे उत्पन्न ४४ हजार रुपयांपेक्षा कमी आहे अशा सर्व लोकांना या योजनेचा लाभ मिळू शकतो. राज्यातील काही जिल्ह्यांचे उत्पन्न कमी आहे अशा जिल्ह्यांसाठी वेगळे उद्दीष्ट आहे का या समितीच्या प्रश्नाला राज्यासाठी एकच उद्दीष्ट असल्याचे समितीस अवगत केले.

राज्याचे एकूण उद्दीष्ट ७ कोटी १६ हजार लोकांचे असल्याचे समितीने अवगत केल असता सद्याचे एकूण लाइफ कार्ड किती आहेत, त्यासाठी नियतन किती दिलेले आहे. तसेच यामध्ये समाविष्ट करण्याचे एकूण किती कार्ड प्रलंबित आहेत, या सर्व बाबींचा विचार करून सदर रेशन कार्ड वितरित केले जातात असे विभागीय सचिवांनी सांगितले.

जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुक्यामध्ये लवकरात लवकर ॲटोमायझेशन करण्याबाबत समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी याबाबत सकारात्मक असल्याचे सांगितले.

आता जी आपण ७ कोटी १६ हजारांची संख्या सांगितलेली आहे ती युनिटची संख्या आहे की अन्य कोणती संख्या आहे अशी विचारणा समितीने केली असता ही राज्यातील एकूण मांणसांची संख्या आहे असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

राज्यातील प्रत्येक माणसांसाठी किती धान्य वाटप करण्याची तरतूद केलेली आहे, या समितीच्या प्रश्नाला प्रत्येक व्यक्तीस २ किलो गहू व ३ किलो तांदळाचे वाटप केले जाते. काही ठिकाणी गहूऐवजी ज्वारीचे वाटप केले जाते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.३३ परिच्छेद क्रमांक २.२ ८.२ शिधापत्रिकांचे पुनर्विलोकन :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देण्याबाबत समितीने सांगितले असता सदर परिच्छेद शिधापत्रिकांच्या पुनर्विलोकनासंदर्भात असून रोस्टरनुसार शिधापत्रिकांची तपासणी करून रेशन कार्ड कमी केले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सर्व जिल्ह्यांना युनिफॉर्मली व प्रत्येक कुटुंबास सारखेच वाटप होते की, त्यामध्ये कमी जास्त प्रमाणात वाटप केले जाते अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी केली असता राज्यातील सर्व जिल्ह्यांना व जिल्ह्यातील सर्व कुटुंबांना सारखेच धान्य वाटत केले जात असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सर्व जिल्ह्यांना सारखेच धान्य वाटप केले तर सदर धान्याची मुंबई शहरामध्ये जास्त मागणी नाही. जेथे जास्त मागणी आहे तेथे जास्तीचे धान्य वाटप केले जात नाही का या समितीच्या प्रश्नाला सदर योजना ही केंद्र शासनाची आहे सदर योजनेमध्ये अशा प्रकारची तरतूद केलेली नसल्याचे समितीस अवगत केले.

राज्यातील प्रत्येक रेशन दुकानामध्ये थम्बची व्यवस्था केलेली आहे. यामुळे धान्य खरेदी विक्रीमध्ये काय परिणाम झालेला आहे, तसेच सदर योजनेमध्ये अद्यापही अनियमितता होत असल्याचे समितीने विदित केले असता यामुळे १० टक्के धान्यांची बचत होत असून या धान्यातून नवीन लोकांना संधी दिली जाणार असल्याचे तसेच आणखी यामध्ये आणखी सुधारणा करीत असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

अजूनही थम्ब चुकीचे लावून धान्याचा काळा बाजार होत आहे यामध्ये शासन काय सुधारणा करणार आहे अशी विचारणा समितीने केली असता ePDS ही नवीन यंत्रणा ४ जिल्ह्यांमध्ये अंमलात आलेली आहे, त्याची अंमलबजावणी राज्यातील पूर्ण जिल्ह्यामध्ये करणार असून संबंधित व्यक्तीकडे आधार असेल तरच त्या व्यक्तीस धान्य मिळेल अन्यथा मिळणार नाही. दोन किंवा तीन महिन्यांमध्ये राज्यातील पूर्ण जिल्ह्यामध्ये या यंत्रणेद्वारेच धान्य वाटप करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रायगड जिल्ह्यातील रोहा तालुक्यातील लोकसंख्या ५० हजार आहे आणि रेशन कार्डची संख्या ही १ लाख ५० हजार आहे. यातील सर्व लोकांनी धान्य घेतलेले आहे. अनियमितता केलेल्या व ज्या रेशन दुकानदारांची ग्राहकसंख्येत मोठ्या प्रमाणावर घट झाली, अशा दुकानांवर शासन कारवाई करणार आहे का अशी विचारणा समितीने केली तसेच एखादा दुकानदार प्रति महिना १० क्विंटल धान्य खरेदी करीत असेल आणि थम्ब आल्यांनतर तोच दुकानदार १ क्विंटल धान्य खरेदी करत असेल तर इतकी दिवस तो ९ क्विंटल धान्य जास्तीचे का खरेदी करीत होता. या सर्व गोष्टींची चौकशी करून त्यावर शासन कारवाई करणार का ?असता या सर्व दुकानांवर कारवाई करावयाची झाली तर सर्व वेळ कारवाई करण्यामध्ये जाऊ शकतो त्यामुळे प्रकल्प राबविण्यासाठी वेळ मिळणार नाही. सदर योजनेच्या कामासाठी एका तालुक्यासाठी फक्त चारच कर्मचारी काम करीत आहेत. ज्या दुकानांची धान्य खरेदी मोठ्या प्रमाणावर कमी झाली असेल अशा सर्व दुकानांना कारणे दाखवा नोटिस पाठविण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

ज्या गावाची लोकसंख्या ५०० आहे त्या गावाची लोकसंख्या ७०० दाखविण्यात येते. हे काम अन्न नागरी पुरवठा विभागाचे नाही. अशा प्रकारच्या कामावर अंकुश ठेवण्यासाठी माननीय जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणाखाली तलाठी, कोतवाल या यंत्रणेचा वापर करून सदर दुकानदाराची चौकशी करून त्यावर योग्य ती कारवाई करावी असे समितीने विभागास सूचित केले असता ज्या दुकानदारांनी पूर्वीपेक्षा १० टक्के इतक्या कमी प्रमाणात धान्याची खरेदी केली तर अशा दुकानदारांवर कारवाई करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

ज्या दुकानदारांनी पूर्वीपेक्षा ९० टक्के अधिक खरेदी केली अशा दुकानावर कारवाई करण्याचे प्रस्तावित करावे. तसेच रेशन कार्डवर चुकीची माहिती दिल्यानंतर सदर रेशन कार्डवर कारवाई करण्यात येते असे नमूद केले आहे. अशी खोटी माहिती आढळून आल्यानंतर शासन अशा रेशन कार्डवर कोणती कारवाई करू शकते अशी पृच्छा समितीने केली असता सदर रेशन कार्ड रद्द करता येते व संबंधित व्यक्तीवर गुन्हा देखील दाखल करता येऊ शकतो. गुन्हा दाखल केल्यानंतर खोटी महिती दिल्याबाबत ज्या शिक्षेची तरतूद आहे ती शिक्षा संबंधित व्यक्तींना होऊ शकते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.३४ परिच्छेद क्रमांक २.२.९.१ सबसिडीचे अनियमित आहरण :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात चर्चा करताना समितीने अशी विचारणा केली की, जेव्हा १२ टक्के प्रमाणे अनुषंगिक खर्च आहे तर शासन २० टक्क्यांची मागणी का करीत आहे यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, योजना बदलत राहतात, त्यातील किंमतीत बदल होतात त्यामुळे शासन २० टक्क्यांची मागणी करीत आहे. १२ टक्के या प्रमाणे मी माहिती देत आहे. १७२ रुपये प्रति क्विटंल धरले तर ८५, ७० आणि १७ असा आहे. ८५ रुपये रीबेट, ७० रुपये दुकानाचे कमिशन आणि १७ रुपये संगणीकरणासाठी द्यावे लागतात. तो आजच्या स्थिती २८३ रुपये एवढा झालेला आहे. ११३ रुपये रीबेट, १५० रुपये दुकानांचे कशिमन आणि २० रुपये संगणीकरणाचा खर्च आहे. या संदर्भातील फाईल अनेक वेळा वित्त विभागाकडे पाठविलेली आहे. यावर चर्चा करून असे ठरविले आहे की, आर्टिफिशिअल लिमिट लाऊन तीमाही आढावा घेऊन जेवढी तूट असेल तेवढी तूट भरुन काढली जाते. उदा. सन २००८-९ ते सन २०१२-१३ मध्ये १९०० कोटी रुपये दिले होते त्यापैकी १७६८ कोटी खर्च झालेले आहेत. १३५ कोटी रुपयांची रक्कम शिल्लक आहे. प्रति वर्षी १३०० ते १४०० कोटी रुपयांची तूट असते. तसेच विभागाला जास्तीचे पैसे मिळाले ते ते सरेंडर झाले. त्यांनी २०० कोटी रुपये घेतले नंतर १३५ कोटी रुपये शिल्लक राहीले. परंतु, करंट हिशोब न झाल्यामुळे पुष्कळवेळा आपला पी.एल.ए. मायनसमध्ये असतो.

विभाग सन १९९२ मधील शासन निर्णय विथ्ड्रॉ करणार आहे काय ? कारण आपण त्याप्रमाणे १२ टक्क्यांचा दर निश्चित केला होता अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी केली असता विभागीय सचिवांनी नाही, आणि म्हणूनच २० टक्के करण्यासाठी आपण शासन निर्णय जारी केला होता. परंतु, नंतर असे ठरले की, क्वार्टरली रिव्ह्यूमध्ये आपल्याला रिअलिस्टिक पोझिशन कळते व रिअलिस्टिक पोझिशन पाहूनच वित्त विभाग आपल्याला निधी रिलिज करीत असते त्यावेळेस ते वाहतूक कशी झाली वगैरे सर्व प्रश्न विचारतात असे समितीस सांगितले.

Then G.R. is of no use now. Shall we take it like that? असे महालेखाकारांनी विदित केले. याअनुषंगाने वित्त विभागाच्या प्रधान सचिवांनी असे अवगत केले की, तो शासननिर्णय आता उपयोगाचा राहीलेला नाही त्यामुळे आपण जे डायजेनिक बास्केट केले आहे त्या बास्केटनुसार तो शासन निर्णय केला पाहिजे यावर अन्न नागरी पुरवठा विभागाच्या सचिवांनी तसे आपण मुव्ह करू असे समितीस आश्वासित केले.

शासन निर्णयाचे पालन न करता रिअलिस्टिक बेसवर अंदाजाप्रमाणे घेता असे विभागाचे म्हणणे आहे काय अशी विचारणा समितीने केली असता रिअलिस्टिक बेसीसवर जो ॲक्चुअल खर्च होतो तो खर्च जस्टिफाय करून आता विभागाला मिळतो. तसेच १२ टक्क्यांची जी मर्यादा आहे ती पाळता येत नसून It has gone up असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाने ज्या ५ वस्तुंची खरेदी केली, त्याकरिता वेगळे प्रयोजन का केले नाही याबाबत समितीने विचारले असता ती योजना नॉनप्लान मधूनच राबविली गेली. प्लानसाठी वेगळे पैसे मिळाले नाहीत, त्यामुळे नॉनप्लान मधूनच याच पी.एल.ए. मधून त्याचा खर्च जात होता त्याकरिता वेगळे काही त्यांनी दिले नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच त्यांनी ती प्लान योजना म्हणून जाहीर केली होती परंतु, विभागाला नॉनप्लान मधूनच पैसे मिळाले असल्याचे समितीस अवगत केले.

सभागृहात एखादी योजना जाहीर करताना त्याबाबतचा प्लान करूनच ती जाहीर केली पाहिजे ना, what do you mean अशी विचारणा समितीने केली असता It is not a plan scheme, money was given in non-plan only. याच पी.एल.ए. मधूनच आपल्याला मिळत होते. जसे कुक्कुटपालन आहे, कुक्कुटपालनाचे प्रत्येक जिल्ह्यामध्ये मदर सेंटर उघडले त्याबाबत सांगावयाचे झाले तर, नॉनप्लानच्या हेडखालीच पैसे आले आणि ते प्रत्येक ठिकाणी उघडले गेले असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सबसिडीमध्ये जी अनियमित विथ्ड्रॉवलची तफावत होती, ती आपण ॲक्चुअल लिफ्टिंग कन्सीडर न करता, जितके शिधापत्रिका धारक आहेत, त्यांच्या एनटायटलमेंट प्रमाणे वर्कआऊट करीत होता त्यामुळे एवढी जास्त सबसिडी आपल्या पी.एल.ए.मध्ये असल्याचे दिसत होते. या वर्किंगमध्ये विभागाने काही फरक केला आहे काय ? Still, you have not refunded or adjusted that final excess balance subsidy of Rs. 692.50 crore अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी केली असता That is adjusted असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सबसिडीबाबत प्रत्येक वेळेस रिव्ह्यू होतो वित्त विभागाकडे जेव्हा फाईल सादर करतो त्यावेळेस त्याचा रिव्ह्यू होतो की, प्रत्यक्षात तूट किती आलेली आहे व जेवढी तूट आलेली आहे, त्यापेक्षा कमी रक्कमच वित्त विभागाकडून दिली जाते. जास्त रक्कम आता निघतच नसून सध्या जास्त विथ्ड्रॉ होतच नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

किती तूट अलाऊड आहे अशी पृच्छा समितीने केली असता टक्केवारीवर तूट अलाऊ नाही कारण ॲक्चुअल बेसिस आहे व अनुषंगिक खर्चाच्या बाबी सतत बदलत राहतात. त्यामुळे ॲक्चुअल बेसिसवर जी तूट येते तेवढी तूट अलाऊ होते त्याचा ॲव्हरेज २० टक्क्यांच्यावर गेला आहे. क्विंटलच्या मानकाप्रमाणे पाहिले तर पर क्विंटल २८३ रुपयांची तूट येत आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

गोदामामध्ये जी तूट आहे त्याबाबत समितीने विचारणा केली असता ती डिफरन्ट आहे ती आपण दिडपटीने वसूल करतो. त्यांना १ टक्के अलाऊड आहे १ टक्क्यांच्या वर गेल्यास दिडपट वसूल करण्यात येते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विभागाचे बजेटिंग कसे करता, बजेट करताना पैसे कसे मागण्यात येतात, तसेच सबसिडीच्या बजेटिंगबाबत समितीस सांगावे असे समितीने सूचित केले असता सबसिडीच्या बजेटिंगबाबत सांगावयाचे झाले तर अनुषंगिक खर्चाच्या ज्या ज्या बाबी आहेत जसे आता दुकानदाराचे मार्जिन पर क्विंटल १५० रुपये आहे तर टोटल ॲलोकेशन किती आहे हे पाहिले व त्यामुळे किती डिस्ट्रीब्युशन किती होणार आहे याबाबतच्या साधारणत: मागच्या ३ वर्षांच्या फिगर्स पाहिल्या तर त्या हिशोबाने आम्ही ते काऊंट करतो. अनुषंगिक खर्च जसे की, वाहतूक, हाताळणूक याचा खर्च साधारणत: ८५ रुपये येतो. आता पॉसची रक्कम १९ रुपये ही फिक्स आहे. पॉसवर किती ट्रॅन्झॅक्शन अपेक्षित आहे तर, आम्हाला मार्चपर्यंत ६० टक्क्यांपर्यंत किंवा ८० टक्क्यांपर्यंत जाऊ असे अपेक्षित आहे. पुढच्या वर्षी ते कदाचित १०० टक्क्यांपर्यंत जाईल त्या हिशोबाने विभाग कॅल्क्युलेट करून सबसिडीसाठी बजेट सबमिट करतो अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली. तसेच सर्व मंजूर होत नसून सप्लीमेंटरी काढावी लागते असेही विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

Will subsidy also reimburse from FCI? त्याची पेन्डसी किती आहे,अनुषंगिक खर्चाची पूर्तता एफ.सी.आय. कडून घ्यायची आहे त्याची पेन्डन्सी जास्त आहे, त्याबाबत सांगावे असे समितीने सूचित केले असता सबसिडीचा परतावा भारतीय अन्न महामंडळाकडून (FCI)

होत नाही. त्याची पेन्डसी भरपूर दिसत असून एन.एफ.एस.ए.मध्ये काही पेन्डसी नाही असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला. या योजनांमध्ये आपण सध्या माहे सप्टेंबर, २०१७ पर्यंतची यु.सी. दिलेली आहे त्यामध्ये १०० टक्के सर्व पैसे आलेले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

परंतु, तसे दिसत नाही अनेक ठिकाणी ते पेंडिंग असल्याचे समितीने अवगत केले असता पॅडीमध्ये काही ठिकाणी पेंडिंग आहे. पी.डी.एस. मध्ये पेंडिंग नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

याबाबतची सद्य:स्थिती पाहिली तर ती अपडेट आहे मात्र सन २०११, २०१२, व २०१३ चे पेंडिंग आहे असे समितीने निदर्शनास आणले असता शुगरबाबत करंट अपडेट आहे मागचे बाकी आहे. शुगरची मेजर फिगर ७१ कोटी रुपयांची आहे. त्यामध्ये आपल्याकडून लेव्ही शुगरची उचल झाली नाही, कारण कारखानदार कोर्टामध्ये गेले होते. त्यामुळे त्यांनी ७० कोटी रुपये रोखून ठेवले आहेत. आपल्याला जसजशा ऑर्डर मिळत गेल्या, त्याप्रमाणे ३० कारखान्यांची उचल केली. आपण केंद्र शासनाकडे ३३ कोटी रुपयांचा दावा सबमिट केला आहे तोही लवकर प्राप्त होईल. जुन्या वसुलीसाठी आपण प्रयत्न करीत असून सद्य:स्थितीत करंटला आपण काहीही पेंडिंग ठेवत नाही. आता ते व्यवस्थित अद्ययावत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

करंटचे आपले अपडेट आहे. विभागाने मागची वसुली करावी कारण जूने खूप प्रलंबित आहे असे समितीने अवगत केले असता विभागीय प्रतिनिधींनी होय असे उत्तर समितीस दिले.

या पिरियडची फायनल शिल्लक रक्कम १३५.६४ कोटी रुपये आहे काय अशी विचारणा समितीने केली असता शिल्लक रक्कम १३५.६४ कोटी रुपये असून २०० कोटी रुपये परत केलेले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच ही रक्कम पी.एल.ए. मध्ये पेंडिंग नसून ती सर्व खर्च झाल्याचे अवगत केले.

सन २०१२-२०१३ बाबत समिती बोलत असून After surrendering Rs.200 crore, Rs.135 crore is again pending अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी होय असे उत्तर समितीस दिले.

त्यानंतर हे विभागाने ॲडजस्ट केले ही सद्य:स्थिती आहे काय अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी केली असता आजच्या तारखेला हिशोब मांडायला गेलो तर, १३५ कोटी रुपये शिल्लक दिसतात त्याचे कारण असे आहे की, ही जरी पी.एल.ए.मध्ये शिल्लक असली तरी, जसे आता पॅडीचे काम आहे म्हणजे मिलरकडे तांदूळ शिल्लक राहीलेला आहे, त्याबाबत रिकव्हरी केंद्राकडून धान्य यामध्ये हे पैसे खर्च झालेले असतात. जेव्हा ती रिकव्हरी पूर्ण होते, त्यावेळेस आपण ही रक्कम परत करू शकतो अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली. ॲसेट जरी दिसत असले तरी लायाबिलिटीजही आहेत. All Bills are not paid. असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

हा जर असा रनिंग राहीला तर त्याचे रिकन्सीलेशन विभाग कसे करतो अशी विचारणा प्रधान सचिव वित्त विभाग यांनी केली असता क्वॉर्टरली फायनान्स पाहत असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

१३५.६४ कोटी रुपये ही त्यावेळेची परिस्थिती आहे. ती एक बुक फिगर आहे, त्याच्या अगेन्स्ट अन्न नागरी पुरवठा विभागाकडे दरवर्षी ज्या काही फिगर्स येतात, रिकव्हरी झाली नाही वगैरे त्यामध्ये ॲडजस्ट होत राहतात असा खुलासा प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी केला.

धान्याचा सर्व हिशोब मिळतो आहे, त्यावरून कॉम्प्युटराईज फायनान्शिअल अकाऊंट्स तयार करायचे असा पुढचा प्रकल्प असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

विभागाच्या टोटल अनुषंगिक खर्चाचे बजेटिंग परफेक्ट झाले पाहिजे. पैसा इतक्या मोठ्या प्रमाणावर सरेंडर करायचे कारण नंतर तो शिल्लक राहतो हे योग्य होणार नाही. आपल्या राज्यामध्ये आपण ३-३ वेळा सप्लीमेंटरी घेतो ती कधीही घेता येते याला कोणी नाकारु शकत नाही कारण हा नॉनप्लानसारखा खर्च आहे पगारासारखी पोझिशन आहे असे समितीने अवगत केले असता आता विभागाची मागणी ६०० कोटी रुपयांची असून सर्व देणी पाहिली तर, मायनस ६०० कोटी रुपयांची मागणी आहे. त्याची सप्लीमेंटरी नाकारली गेली. त्यामुळे पूर्ण पैसे मिळाले नाहीत याचे कॉम्प्युटराईज अकाऊंट याच प्रकल्पामध्ये तयार करण्याचाही विभाग प्रयत्न करीत असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

वर्षाच्या अखेरिस हे रिकन्साईल होऊन शून्य झाले पाहिजे. क्वॉर्टरली बेसीस रिकन्सीलेशनवर शून्य झाले पाहिजे मग ते मॅच होईल. मग त्याबाबतचे कन्फ्युजन होणार नाही असे मत प्रधान सचिव, वित्त विभाग यांनी व्यक्त केले.

१.३५ परिच्छेद क्रमांक : २.२.९.२ रिकाम्या पोत्यांनी विल्हेवाट न लावणे :

उपरोक्त परिच्छेदाबाबतची सद्य:स्थिती सांगावी. विभाग जे अन्नधान्य खरेदी करतो त्या एम.एस.पी. ची ही बारदाने आहेत ना अशी विचारणा समितीने केली असता ही पी.डी.एस. मधील बारदाने असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. तसेच भारतीय अन्न महामंडळाकडून (FCI) मधून जे घेतो त्याची ही बारदाने असून ही खरेदीसाठी मिसयूस होणारी बारदाने नसल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

पी.डी.एस. मध्ये आपल्याला जे धान्य मिळते त्याची बारदाने रेशन दुकानदार तुमच्याकडे जमा करतात काय या समितीच्या प्रश्नाला काही ठिकाणी बारदाने खराब होतात किंवा काही वेळेस वाटप करताना ते छोट्या बारदानामध्ये केल्यामुळे अशी बारदाने शिल्लक राहतात किंवा जूनी बारदाने शिल्लक आहेत, असा तो हिशोब आहे. ४२ लाखावरून ती संख्या १७ लाखांवर आली व आता टोटल १४ लाख बारदाने शिल्लक असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

ती १४ लाख बारदाने सन २०१२-२०१३ मधील आहेत काय या समितीच्या प्रश्नाला नाही. As on today. यामध्ये मेन ७ लाख औरंगाबादला आहेत आणि कोकणामध्ये ५ लाख आहेत बाकी सर्वांनी संपविले आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विभागाकडून विकण्यासाठी जे टेंडर काढण्यात येते त्यामध्ये एक मोठी पूर्ण रिंग बांधून ५-६ रुपयांचे बारदान २-३ रुपयांमध्ये विकले जाते असे समितीने निदर्शनास आणले असता ती डॅमेज बारदाने असल्याचे समितीस अवगत केले.

समिती डॅमेज बारदानाबाबतच बोलत असून आपण नवीन बारदान २ रुपयांनी विकणार काय ? इ - टेंडर म्हणजे ते ३ लोकांचे टेंडर भरतात, रिंग करतात सर्व इकडचे स्थानिक लोक यांच्यामध्ये रिंग असते, याला कुठे तरी चाप बसला पाहिजे यावर कुठे तरी कंट्रोल झाला पाहिजे असे समितीने अवगत केले असता विभागीय सचिव सहमत असल्याचे सांगितले.

समितीच्या माहितीप्रमाणे आपण आता धानामध्ये ५० टक्के नवीन बारदाने खरेदी करता व त्या बारदानांचा भाताकरिता पुनर्वापर करता. आपण जी ५० टक्के जूनी बारदाने खरेदी करता ती देखील योग्य मिळत नाहीत. या सर्व खरेदीचे अधिकार तुम्ही सेंटरला दिले, सोसायटीला दिले आहेत याबाबत समितीने विचारणा केली असता ते काम मार्कफेड टी.डी.सी. करते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

याचे पेमेंट तर अन्न नागरी पुरवठा विभाग करते असे समितीने विभागास अवगत केले असता काम मार्कफेड व टी.डी.सी. करते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

टी.डी.सी. मध्ये जास्त घोळ असून टी.डी.सी. मध्ये कुठेही नियंत्रण नाही. त्यामध्ये मोठे गौडबंगाल सुरू आहे. आपण जी जूने बारदाने खरेदी करता त्यामध्येही कोठे तरी काऊंटरचेक ठेवला पाहिजे. आपण जी जूने बारदाने विकत घेता त्याचे काय करता, ती परत वापरता येतात काय अशी विचारणा समितीने केली असता जुन्या बारदानांबाबत आपण ब-याचदा मार्केटिंग फेडरेशन व टी.डी.सी. अशा दोन्ही एजन्सींना परत पाहिजे आहेत काय, ते विचारतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच एका वर्षाचे बारदान एम.एस.पी. मध्ये वापरता येते त्यावर त्या वर्षीचा के.एम.एस. नमूद केलेला असतो असे विभागीय प्रतिनिधींनी अवगत केले.

what they make out of that अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी केली असता, There are two types of gunny bags. One is of PDS. In that, one can reuse, sale or whatever. In case of procurement, you cannot use old gunny bags. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.यावर प्रधान महालेखाकारांनी What they do अशी विचारणा केली तसेच You are using old gunny bags for purchasing paddy असे समितीने विभागास अवगत केले असता त्याच बारदानाला नेक्स्ट टर्ममध्ये टर्न करून स्टॅम्प केले जाते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

For purchasing Support Price procurement you are taking 50 per cent new gunny bags and 50 per cent old gunny bags. न्यू गनी बॅग्जचा काही मुद्दा नाही ओल्ड गनी बॅग्जचा मुद्दा असा आहे की विभाग सध्या १३-१५ रुपयांनी खरेदी करतो त्यामध्ये १० ते २० टक्के मटेरिअल is not fit for five rupees असे समितीने विदित केले असता We will get that inspected properly. आपल्याला हे सेंटरला किंवा मार्कफेड व टी.डी.सी.ला हे करायला सांगावे लागेल असे विभागीय सचिवांनी नमूद केले.

टी.डी.सी. मध्ये हे जास्त आहे शेवटी पैसे विभागालाच द्यायचे आहेत असे समितीने नमूद केले असता विभागीय सचिवांनी We will take care असे समितीस आश्वासित केले.

ते रियुजेबल आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. परंतु, आपण प्रथम ते सेल करीत आहात व परत विकत घेत आहात ते रियुजेबल असेल तर ते का विकले जात आहेत, याबाबत समितीस सांगावे असे समितीने अवगत केले असता पी.डी.एस.ची बारदाने वेगळी आहेत व प्रोक्युअरमेंटची बारदाने वेगळी आहेत. प्रोक्युअरमेंटच्या बारदानावर स्टॅम्प असतो ते रिव्हर्स केले जाते. जेव्हा आपण पॅडी घेतो तेव्हा एक साईड असते जेव्हा मिलकडून येते तेव्हा दुसरी साईड असते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

आपण न्यु गनीबॅगबाबत सांगत आहात, परंतु समिती ओल्ड गनी बॅगबाबत चर्चा करित आहे. विभागाने आता नवीन चांगली सिस्टम केली आहे. कारण एक क्विंटल धानाकरिता विभागाला १.३३ बॅग्ज लागतात. तांदुळाकरिता फक्त १ बॅग लागते. Therefore, now, you are taking 50 percent old and 50 percent new. ओल्ड गनीबॅगबाबत महालेखाकारांचे असे म्हणणे होते की, विभागाकडे असलेल्या १२ लाख बॅग्ज का वापरत नाही अशी विचारणा समितीने केली असता त्या चांगल्या कंडिशनमध्ये असल्या तर त्यांनाही ऑफर करतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

समितीचे असे म्हणणे आहे की, ही १२ लाख बारदाने विभागाकडे इतक्या वर्षांपासून पडून आहेत. ती एम.एस.पी.च्या योजनेमध्ये वापरण्यायोग्य तयार करावीत किंवा वापरण्या योग्य असलेली तेथे वापरावीत जी जूनी बारदाने खरेदी करता, त्याबाबतही काऊंटरचेकची पद्धती अवलंबावी. जूनी बारदाने ही वापरलेली बारदाने आहेत. परंतु, ultimately it is a new purchase. That should be 100 per cent utilised असे समितीने सूचित केले असता जी चांगले बारदाने असतील ती त्यांना देऊ असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

१.३६ परिच्छेद क्रमांक २.२.९.३. भारतीय अन्न महामंडळाकडे प्रलंबित असलेली अग्रीमे :

या परिच्छेदाच्या अनुषंगाने अधिक माहिती समितीस द्यावी. तसेच माहे नोव्हेंबर, २०१३ पर्यंत प्रलंबित असलेल्या १३.१० कोटी रुपयांबाबतची सद्यःस्थिती सांगावी असे समितीने सूचित केले असता यामध्ये फक्त मुंबई-ठाणे शिधावाटप क्षेत्राची जूनी १ कोटी ५९ लाख रुपये एवढी रक्कम शिल्लक आहे ती देखील आपण वसूल करून घेऊ बाकी सर्व रक्कम वसूल झालेली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सन २०११-२०१२ मधील हे पैसे असून ते का मिळत नाहीत या समितीच्या प्रश्नाला त्याच्या आधीचे देखील असल्याने विलंब होत आहे. परंतु, विभाग सर्व वसुली करीत असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

१.३७ परिच्छेद क्र. २.२.१० अन्नधान्य आणि इतर वस्तूचे वाटप आणि वितरण :

१.३८ परिच्छेद क्र.२.२.१०.१ : अन्न धान्य वाटप आणि उचल यामधील फरक/विसंगती :

समितीने उपरोक्त परिच्छेदासंदर्भात दिनांक ९ जानेवारी २०१८ रोजी साक्ष घेतली साक्षीच्या वेळी वाटप आणि उचल यामध्ये तफावत आहे त्यासंबंधी विभागाचे काय म्हणणे आहे याबाबत विचारणा केली असता सन २०१४ पूर्वी यात तफावत होती. सन २०१४ नंतर यामध्ये सुधारणा झाली आहे. त्यावेळी एपीएलमध्ये उचल कमी होत होती कारण ती उचल पेमेंटवर होती. त्यावेळी रुपये ७.२० पैसे गहू आणि रुपये ९.०० तांदुळाचा दर होता. तसेच एफसीआयच्या देखील भरपूर अडचणी असतात. एफसीआयची उचलण्याची विंडो ही खूप कमी दिवसाची असते तेथे हमालांच्या, रेक्सच्या व सायडींगमध्ये इत्यादी अडचणी असतात. या बरोबरच सुट्टया आल्या तर ते कशालाही अनुमती देत नव्हते. अशा प्रकारे एफसीआयमध्ये माल उचलण्यामध्ये अडचण येते याबाबत त्यांच्या सोबत बैठका घेऊन खूप अडचणी सोडविण्याचा प्रयत्न केलेला असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

आपण वाटपचे पैसे पूर्णपणे भरता आणि उचल कमी करता असे समितीने नमूद केले असता वाटपाचे पैसे पूर्ण भरतो आणि उचलाप्रमाणेच पैसे भरतो असे विभागीय सचिवांनी नमूद केले.

आपणास जेवढे धान्य वाटप झाले आहे त्या संपूर्ण धान्याचे पैसे भरावे लागतात त्यानंतर आपण उचल करू शकत नाही. ते पैसे त्यांच्याकडे वर्षानुवर्षे राहतात अशी समितीची धारणा आहे त्यासंबंधी विभागाचे काय म्हणणे आहे अशी विचारणा समितीने केली असता जेवढे वाटप असते त्या हिशोबाने आपण पैसे भरतो. काही कारणांमुळे आपली उचल होत नाही त्यावेळी एफसीआयकडे पैसे राहतात. सद्यःस्थितीत आपण व्यवस्थितपणे पैसे वसुली करीत आहोत. जुन्या काही केसेसे आहेत त्यात निधी खूप प्रलंबित आहे. यासंबंधातील कागदपत्रे आपल्याकडून व एफसीआयकडून मिळण्यासाठी थोड्या अडचणी येत आहेत यासंबंधात आम्ही आढावा घेतलेला आहे. जूनी कागदपत्रे शोधून जुन्या प्रलंबित रकमा वसूल करण्यासाठी प्रयत्न करीत असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

आपला शेवटचा जो महिना असतो त्याच्या अगोदर समायोजन केले तर ते पैसे त्याचवेळी प्राप्त होतील. आपण फक्त वर्षानुवर्षे पैसे जमा करण्याचे काम करता आणि माल उचलत नाही. एवढेच नव्हे तर शिल्लक पैसे देखील परत घेत नाही ते पैसे एफसीआयकडे पडून राहतात, तर शासन दुस-या बाजूला त्या पैशावरील व्याज देत असते. यासंबंधात काय स्पष्टीकरण आहे अशी विचारणा समितीने केली असता त्या वाटपामध्ये काहीच ॲडजेस्टमेंट होत नाही प्रत्येक वाटपाचा स्वतंत्रपणे परतावा घ्यावा लागतो. त्यामुळे अडचण येते. सन २०१४, २०१५, २०१६, २०१६ या वर्षातील जे वाटप आहे त्या प्रमाणेच उचल करण्यात येत आहे. एक-दोन जिल्ह्यांमध्ये थोडासा विलंब होत आहे. १७२०२८, १६९५६८ १०५२२०८, १००६८३६ असा माल उचलत आहे. आता गॅप फार कमी होत चालली आहे त्या आधी गॅप खूप जास्त होती त्यावेळी दुकानदारांकडूनसुद्धा एपीएलसाठी असणा-या मालाची उचल होत नव्हती असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

वाटप आणि उचल याची तफावत एपीएलमध्येच आहे असे नाही. ती बीपीएलमध्ये देखील आहे याचे मूळ कारण काय आहे ? एपीएलच्या मालाचा दर जास्त होता त्यामुळे लोक माल घेत नव्हते. तेव्हा यासंबंधातील अंदाज आपल्याला एक महिन्यामध्ये यावयास पाहिजे होता. पहिल्या पंधरवड्यामध्ये अमूक एवढा माल उचलून त्यापैकी अमूक एवढा माल विकला गेला नाही याचा अंदाज आपणास यावयास पाहिजे होता असे समितीने नमूद केले असता वाटप आणि उचल याची तफावत ही सगळीकडेच होती आता आम्ही ड्राईव्ह घेत आहोत. तसेच आपल्याला वाटप हे द्यावेच लागते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आपणास त्यावेळी वर्षातून २४ वेळा माल उचलावा लागत होता अशी समितीची माहिती आहे. ६ उचल झाल्यानंतर ही बाब विभागाच्या का लक्षात येत नव्हती असा समितीचा पहिला प्रश्न आहे. दुसरा प्रश्न असा आहे की, बीपीएलमध्ये तफावत का येत आहे ? आपण दुकानदारांना मालाचा पुरवठा केला असेल त्यापैकी किती माल जनतेला देण्यात आला याचा आपण हिशोब केला आहे काय ? माल घेतला जात नसल्यामुळे आपण वाटपापेक्षा कमी माल उचलला आहे. जेवढा माल आपण उचलला तो दुकानात पुरविण्यात आला. पण दुकानात शिल्लक राहीलेला माल कुठे गेला ? यात जी बिलींग सिस्टीम आली ती याचे मूळ कारण आहे तेव्हा बीपीएलमध्ये फरक का दिसतो आहे, तसेच विभागीय सचिवांनी सांगितले की, एपीएलचा माल कोणीही घेत नाही. एपीएलचा माल रुपये ७.०० या दराने विकण्यात येतो. त्याची कणी देखील रुपये ७.०० या दराने मिळत नाही तेव्हा आपण माल उचलण्यामध्ये कुठे तरी कमी पडला आहात. त्याच बरोबर बीपीएलधारकांसाठी रुपये २.०० ते रुपये ३.०० या दराने माल मिळत होता तेथे देखील ५ लाख टन माल कमी घेतला आहे. २३ लाख टन माल घेण्याऐवजी आपण १८ लाख टन माल घेतला आहे. पैसे भरताना २३ लाख टनाचे भरले आहेतत म्हणजे ५ लाख टनाचे पैसे एफसीआयकडेच राहीले. तेव्हा यासंबंधात आपल्या विभागाने जबाबदारी निश्चित केली आहे काय ? तो निधी कॅरिफॉरवर्ड होतो काय किंवा तो निधी लॅप्स होतो काय तसेच आतापर्यंत एफसीआयकडे किती निधी प्रलंबित आहे अशी विचारणा समितीने केली असता ते पैसे आपणास परत मिळतात असे विभागीय सचिवांनी विदित केले तसेच साधारणत: १०० कोटी रुपये एफसीआयकडे जमा असून करंटमध्ये आपण शून्यावर आलेलो आहोत ही मागील रक्कम असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

करंटमध्ये देखील आपण १० हजार मे. टन माल कमी घेतलेला आहे त्या मालाचे पैसे परत आले आहेत काय ? तसेच सन २०१३-१४, २०१४-१५ मधील निधी परत आला आहे काय अशी पृच्छा समितीने केली असता हे पैसे आता नियमितपणे परत येत आहेत. आता फक्त १ कोटी ६९ लाख इतकी रक्कम शिल्लक आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

सन २०१२-१३ पर्यंतचे पैसे आपणाकडे जमा झाले आहेत काय ? विभाग उचल मध्ये कमी पडला आहे त्यामुळे याचा मोठा फटका बीपीएलधारकांना बसला आहे. आता परिस्थिती सुधारली आहे असे समितीला सांगत आहातत आता एपीएलचा त्रास नाही. पूर्वीचा व आताचा जो शॉर्टफॉल आहे त्याचे पैसे आपणास नियमित मिळाले आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता ॲडव्हान्स दिल्याशिवाय एफसीआय धान्यच देत नाही त्यामुळे ॲडव्हान्स हा द्यावाच लागतो असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाने ॲडव्हान्स जरूर द्यावा त्याला समितीची हरकत नाही. विभागाने मालच उचलला नाही तर ती रक्कम परत घेतली पाहिजे ती विभागाने घेतलेलीच नाही. दुसरीकडे माल देखील उचलला नाही. ती रक्कम पाच ते सात वर्ष मिळत नाही. येथे लेखेच्या दृष्टीने समायोजनाचा प्रश्न हा सर्वात महत्त्वाचा आहे. आपण सर्व जिल्ह्यांचे समायोजन करणे आवश्यक आहे ती एक प्रोसेस आहे. या सर्व प्रोसेसमध्ये आपली यंत्रणा कुठे तरी कमी पडते आहे हे मान्य करावेच लागेल. सन २०१६-१७ मध्ये मालाची कमी उचल केल्यामुळे एफसीआयकडून आपल्याकडे किती रक्कम येणे बाकी आहे यासंबंधातील समितीला वर्षनिहाय माहिती पाहिजे. माल उचलीसाठी कोणती कारणे होती ती सचिवांनी सांगितली आहेत शेवटी आपण लोकांना अन्नधान्यापासून वंचित ठेवण्याचे काम करता अंत्योदयच्या लोकांना माल मिळत नाही. बीपीएलधारकांना माल मिळत नाही. वाटप मिळाल्यानंतर त्याची उचल करणे ही जबाबदारी शासनाची आहे. वाटप मिळाल्यामुळे आपण पैसे भरले आहेत पण माल उचलला नाही. तसेच उर्वरित पैसे परत मिळविण्यासाठी कोणीही पुढाकार घेतलेला नाही. पैसे आले तर येतील नाही तर एफसीआयकडे पडून राहतील असा विचार विभागाने केलेला दिसतो असे समितीने अवगत केले. विभागाकडून १०० टक्के ॲडव्हान्स देता काय अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी केली असता विभागीय सचिवांनी होय असे उत्तर दिले. तसेच पुढील जो हप्ता असतो त्यात समायोजन होत नसल्याचे समितीस सांगितले प्रत्येक स्वतंत्र वाटपाप्रमाणे त्यांच्याकडे कागदपत्रे जमा करावी लागतात आणि त्यानंतरच एफसीआयकडून परतावा मिळतो यात आम्ही दोन गोष्टी करतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सन २०१६-१७ पर्यंत एकूण किती रक्कम एफसीआयकडून येणे बाकी आहे या समितीच्या प्रश्नाला सन २०१६-१७ पर्यंत १०० कोटी रुपयांपर्यंतची रक्कम येणे बाकी आहे. तंतोतंत किती रक्कम येणे बाकी आहे याची आकडेवारी समितीस नंतर सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

सन २०१७ पर्यंतची थकित रक्कम आणण्यासाठी विभागीय सचिवांनी प्रयत्न केले पाहिजेत ही समायोजनाची बाब असल्याचे समितीने विदित केले असता एफसीआय थेट जनतेला सामोरे जात नाही आपणास थेट जनतेला सामोरे जावे लागते. एफसीआयचे नियम हे फार कठोर असतात याच दिवशी एवढाच माल घेतला पाहिजे असे त्यांचे म्हणणे असते. तसेच त्यांचे हमाल देखील ठराविक दिवसांमध्येच माल उचलतात. यासंबंधी एफसीआयला पुष्कळवेळा पॉईंट आऊट केले आहे की, आपण जनतेला सामोरे जात नाही आम्हाला जनतेला सामोरे जावे लागते. असेही कधी होते की, ते कधी तांदूळ देतात, तर गहू देत नाही, गहू देतात तर तांदूळ देत नाहीत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

उचलसंबंधातील सर्व कारणे समितीला मान्य आहेत पण रकमेच्या समायोजनाचे काय ? आता आपली परिस्थिती का सुधारली आहे अशी विचारणा समितीने कली असता आता विंडो कमी करून देण्यात आली आहे पूर्वी २०-२१ दिवस असायचे. आता वाटप आदेश देखील लवकर काढण्यात येतात. पहिल्या किंवा दुस-या आठवड्यापर्यंतच जास्तीत जास्त उचल करण्यात यावी असे बंधन घालण्यात आले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच ४ जिल्हे सोडले तर उर्वरित सर्व जिल्ह्यांमध्ये वाहतूकदार निश्चित करण्यात आले असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

अन्नधान्य अवैधरित्या दुसरीकडे वळविण्यात येत आहे, त्याची खात्री करण्यासाठी, त्याचा तपास घेणे आवश्यक आहे अशी शंका महालेखाकारांनी व्यक्त केली आहे. ही जबाबदारी स्वाभाविकपणे आपण जिल्हाधिकारी यांच्यावर सोपविणार या व्यतिरिक्त तपास करण्यासाठी विभागाकडे दुसरी कोणती यंत्रणा आहे अशी विचारणा समितीने केली असता माल उचललाच नाही तर तो दुसरीकडे वळविण्याच्या शक्यतेचा प्रश्नच येत नाही. चेक्स अँड बॅलेन्सेसचे खालपासून वर पर्यंतचे हिशोब येत असतात. जेथे लॅप्स झाले तेथे कंत्राटदारावर दंड आकारून वसुली देखील करीत असतो. जो कंत्राटदार असतो त्याला देखील जबाबदार धरून दंड वसुली करण्यात येते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

अन्न व नागरी पुरवठा विभाग एफसीआयकडून धान्य घेते. बाहेर कोणी धान्य विकले तर त्याच्याविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येते एफसीआयचे धान्य खाण्यायोग्य नसल्यामुळे ते त्यांच्याकडून कशाला उचलता ? शासकीय गव्हाला कोणीही हात लावणार नाही इतका खराब गहू असतो असे समितीने निदर्शनास आणून दिले असता आता आम्ही स्वत:चाच गहू वापरत आहोत. तांदूळ एमएसपीखाली प्रोक्यूरमेंटमध्ये घेण्यात येतो त्याचप्रमाणे गहू देखील घेण्यात येत आहे आता त्यांचा गहू नसतो. आपण जॉईंट टेस्टींग देखील घेतो त्याचा लिफाफा ठेवलेला असतो हा लिफाफा तक्रार येईपर्यंत किंवा महिन्यापर्यंत ठेवण्यात येतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

वाटपासंबंधात आपण वरिष्ठ पातळीवर वेळोवेळी बैठका घेण्यात येतात काय तसेच वाटप घेतले नाही तर पूर्ण पैसे मिळत नाही काय अशी विचारणा समितीने केली असता व्यवस्थापक पातळीवर बैठक घेण्यात येते. तसेच आता सर्व पैसे मिळत असून आता तीन महिन्यांमध्ये इश्यू सेटल करण्यात येतात पण जूने सेटलमेंट बाकी राहीले असल्याचा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

समितीची अशी सूचना आहे की, दरवर्षी समायोजन करून पैसे मिळवून घेण्यासंबंधातील पद्धत आपल्याला स्वीकारता येते किंवा कशी हे पहावे असे समितीने सूचित केले असता आता आम्ही तिमाहीत हे करतो ही रक्कम जास्त पुढे जाणार नाही त्या त्या तिमाहीत सेटल करण्याचा प्रयत्न करीत आहोत यात ब-यापैकी प्रगती करीत आहोत. बरेच जूने इश्यू आहेत त्यात त्यांना कागदपत्रे पुरवावी लागतात ते आम्ही सॉर्ट आऊट करीत आहोत. यातील बरीच वसुली झालेली आहे जी प्रकरणे राहीली आहेत त्याचा देखील निपटारा करण्यात येत असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

१.३९ परि.क्र. २.२.१०.३ खुल्या बाजारातून तांदूळ खरेदीवर झालेला टाळतायेण्याजोगा जास्तीचा खर्च :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, केंद्र शासनाने सन २००८-२००९ मध्ये १ लाख ३७ हजार ४८८ पासून वाटप अचानकपणे २९८७ असे केले. एपीएलधारकांसाठी तांदूळाचे वाटप होते ते खूप मोठ्या प्रमाणावर कमी केले आहे. ते कमी करत असताना चार महिन्यांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणावर भाव वाढ झाली.

सन २००८-२००९ मध्ये एपीएल अंतर्गत ४२१४८१ मे. टन माल मिळाला. त्यापैकी फक्त २८४५७१ इतकी मालाची उचल केली आहे. सन २००८-२००९ मध्ये आपण एकूण ६६९९४ मे. टन माल खरेदी केला आहे हे बरोबर आहे काय ? विभागास १.१९ लक्ष मे. टन धान्य खरेदी करावयाचे होते ७० हजार मे. टनाची आपण ऑर्डर दिली होती त्यांनी आपणास ६६९९४ मे. टन धान्याचा पुरवठा केला होता. आपण रुपये १६.८१

पैसे या दराने माल खरेदी केला आहे. दुस-या बाजूला केंद्र शासनाकडून रुपये ७.०० दराने मिळणारा १ लक्ष ३७ हजार मे. टन माल उचललाच नाही. एका बाजूला आपल्याकडे मालाची उचल करण्यासाठी यंत्रणा नाही दुस-या बाजूला आपण खुल्या बाजारातून धान्य खरेदी केले होते अशी विचारणा समितीने केली असता त्यावेळी वाटप फार मोठ्या प्रमाणावर कमी झाले. तेव्हा ५१ हजार टन इतका माल होता त्याच्या बदलात ३६ हजार टन माल उचलण्यात आला म्हणजे ७२ टक्के माल उचलण्यात आला असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाची सन २००८-२००९ मधील आकडेवारी समितीकडे आहे. त्यात एपीएल वाटप संख्या ४२१४८१ इतकी नमूद करण्यात आली आहे. समिती अन्नधान्य वाटप आणि उचल संबंधात बोलत असून आपण एका बाजूला खुल्या बाजारातून रुपये १६.०० या दराने माल विकत घेतला आहे याबाबत समितीने विचारणा केली असता त्याची कारणे अशी आहेत की, पुढच्या वर्षी अचानकपणे वाटप कमी झाले त्याचा परिणाम सन २००९-२०१० मध्ये झाला. मध्ये चार महिने भाववाढ झाली वाटप हे अचानकपणे कमी झाले २९८७ टन वाटप झाले. भाववाढ झाल्यामुळे कॅबिनेटने उप समिती नेमली. त्यामध्ये तत्कालीन मंत्री सर्वश्री. सुनील तटकरे, श्री. जयंत पाटील, श्री. अनिस अहमद व राज्यमंत्री श्री. बाबासिद्धीकी तसेच प्रधान सचिव, वित्त विभाग, नियोजन विभाग, अन्न व नागरी पुरवठा हे होते. एपीएलसाठी धान्य कमी पडत होते त्यामुळे या समितीने धान्य खरेदी करण्याचे निश्चित केले अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

रुपये ७.०० इतक्या दराचा माल आपण उचलला नाही आपण खुल्या बाजारातील रुपये १६.०० इतक्या दराने माल उचलला आहे. हा कुठला न्याय आहे ? भाव वाढीवर नियंत्रण ठेवावे. आपणास माल मिळत नसेल तर आपण रुपये १६.०० ऐवजी रुपये ३२.०० रुपयाने माल घेतला तर त्यासंबंधी समितीचे काहीच म्हणणे नाही पण आपण उचल देखील पूर्ण केलेली नाही असे समितीने अवगत केले असता माहे जुलै, ऑगस्ट, सप्टेंबरमध्ये माल दिलेला असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

आपणास एफसीआयकडून तांदूळ देण्यात येणार होता त्याची पूर्णपणे उचल करण्यात आली नाही तो तांदूळ आपणास स्वस्त दरामध्ये मिळत होता, त्याची उचल न करण्याचे कारण काय आहे अशी विचारणा समितीने केली असता त्यावेळी हमालीची, सायडींगची, रेक्सची, सुट्टयांची अडचण होती. त्यामुळे नेहमीचा एपीएलचा जो ट्रेंड होता तोच सुरू राहीला त्यावेळी एपीएलसाठी उचल देखील कमी होत होती अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

७ ते ७.५ रुपये प्रति किलो या दराने केंद्र शासनाकडून धान्य मिळू शकत होते. तरी देखील ते खरेदी न करता बाजारातून १६ रुपये प्रति किलो या भावाने धान्य विकत घेतले, याचे कारण काय आहे ? अन्नधान्याच्या दुष्काळामुळे भाववाढ झाली हा नंतरचा विषय आहे. हमालांची कमतरता व इतर बाबी हे नेहमीचेच विषय आहेत आपली यंत्रणा अनेक वर्षापासूनची आहे. यामुळे एपीएल मधील लोकांचे नुकसान झाले, त्यांना धान्य मिळू शकले नाही, हा समितीचा आक्षेप आहे. ५१ हजार ऐवजी ३६ हजार टन माल उचलला गेला. एफसीआय कडून माल उचलला जात नाही व खुल्या बाजारातून अधिक दराने माल विकत घेतला त्या क्वार्टरमध्ये माल मिळाला नाही असे सांगितले, मात्र तेव्हा देखील माल घेतला नाही खरे तर हा माल उचलला असता व आणखी घेतला असता तर काही अडचण नव्हती. १४ हजार मे. टन माल उचलला नाही, त्यामुळे जास्त माल घ्यावा लागला असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले असता १ लाख १९ हजार मे. टन धान्य घेतले होते. त्यापैकी ९६ हजार मे. टन धान्य वाटले. यामध्ये साधारणपणे १० कोटी रुपयांची खरेदी झाली अधिकचा खर्च १० कोटी रुपयांचा झालेला आहे. प्रति किलो १६ रुपयांनी माल खरेदी केला व प्रति किलो १२ रुपयांनी माल विकला. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

जो माल ७ रुपयांना मिळाला असता तो बाजारातून १६ रुपये प्रति किलो या भावाने घेतला व प्रति किलो १२ रुपये या किमतीला विकला तसेच तांदूळ कोठून खरेदी केला होता अशी विचारणा समितीने केली असता कॅबिनेटच्या सब कमिटीने धान्य खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता.तसेच मार्केटींग फेडरेशनने टेंडर काढून तांदूळ खरेदी केली होती व खरेदी करण्याचा निर्णय शासनाचा होता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

७ रुपये दराने ३ महिन्यात माल उचलला नाही, जी खरेदी केली त्याचे वाटप झाले नाही. पुन्हा १२ रुपये प्रति किलो या दराने माल विकला. यामुळे झालेल्या नुकसानीकरिता कोणावर जबाबदारी निश्चित करण्यात आली आहे अशी पृच्छा समितीने केली असता अधिका-यांनी लॅप्स केले आहे मात्र धान्य खरेदी करून वाटप करण्याचा निर्णय कॅबिनेट सब कमिटीचा होता अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

हे केवळ १० कोटी रुपयांचे नुकसान असू शकत नाही परिच्छेदामध्ये ६६ हजार उल्लेख असून आपण ९६ हजार मे. टन खरेदी केली असे म्हणत आहात. १२ रुपये प्रति किलो या भावाने विक्री केलेली आहे. असे समितीने निदर्शनास आणले असता १ लाख १९ हजार मे. टन धान्यापैकी ९६ हजार मे. टन. धान्य विकले असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

९६ हजार मे.ट धान्य ५ रुपयांना विकले असे गृहीत धरले तरी देखील ५० हजार कोटी रुपये होतात. १४ हजार मे.ट. धान्य उचलले असते तर तेवढे नुकसान कमी झाले असते या करीता कोण जबाबदार आहे, तसेच या बाबत निर्णय घेण्यापूर्वी कॅबिनेटला विभागाने सर्व माहिती दिली होती काय तसेच मागील अनुभव घेतल्यानंतर आता यंत्रणा रेग्युलराईज्ड झालेली आहे एफसीआयचे अॅलोकेशन उचलले नाही, अशा आणखी काही केसेस आहेत काय यावर विभागीय सचिवांनी एफसीआयचे अॅलोकेशन उचलले नाही अशा केसेस नाहीत. दुकानांकडून २ ते ३ टक्के कमी माल उचलला जातो यामुळे ते मॅच होत.

या निर्णयाबाबत विभागाने प्रस्ताव पाठवला होता काय, तसेच प्रस्तावामध्ये सर्व बाबी विषद केल्या होत्या काय अशी विचारणा समितीने केली असता ही मागची वस्तुस्थिती होती नंतर अडचण आली व भाववाढ झाली लोकांना धान्याची गरज होती. लोकांना धान्याचा पुरवठा करण्यासाठी तत्कालीन शासनाने निर्णय घेतला असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

एका बाजुला एपीएल करीता माल उचलला जात नाही व दुस-या बाजुला बाहेरून माल खरेदी केला जातो. सचिवांनी सांगितले की एपीएलचा माल खपत नाही म्हणून बाहेरून धान्याची उचल केली जाते असे समितीने अवगत केले असता १.९० मे.टन माल खरेदी झाला व ९६ हजार टन माल उचलला होता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

संपूर्ण वर्षात १ लाख ३७ हजार मे.टन कमी माल एपीएल करीता उचलला. लोकांना देखील हा माल कमी दराने मिळाला असता मात्र लोकांना १२ रुपये प्रति किलो या दराने विकत घ्यावा लागला. सुट्यांच्या दरम्यान मालाची उचल न होणे, एफसीआयच्या कामगारांनी असहकार पुकारणे, हे कसे काय होऊ शकते? आता सर्व सुरळीत सुरू आहे काय अशी विचारणा समितीने केली असता आता गॅप कमी केलेली आहे तरी देखील अडचण येते. ९६ ते ९८ टक्केच माल उचलला जातो दुकानातून उचल ९७ ते ९८ टक्के आहे यामुळे ते मॅच होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

१४ हजार मे.ट. माल न उचलता तत्कालीन शासनाने चांगल्या भूमिकेतून निर्णय घेतला. भाववाढ होत होती यामुळे १२ रुपये प्रति किलोने लोकांना धान्य दिले. तत्कालीन अधिका-यांना या बाबत अधिकार होते. त्यांनी हा माल उचलला नाही. ७ रुपयांऐवजी १२ रुपये दराने माल घ्यावा लागला. शासनाला ५० कोटी रुपयांपेक्षा अधिक रकमेचा तोटा सहन करावा लागला. हा माल बाजारात आला असता तर भाववाढ झाली नसती असे समितीने विदित केले असता पुढच्या काळात तांदूळ कमी आला, अॅलोकेशन कमी झाल्यामुळे भाववाढ झाली असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

बीपीएल, अंत्योदय व एपीएल करीता माल उचलला नाही याकरीता समिती तीव्र नाराजी व्यक्त करते. एफसीआयच्या अडचणींव्यतिरिक्त माल न उचलण्या करीता जे जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी. अधिका-यांच्या चुकीमुळे मध्ये गॅप निर्माण झाला त्यांच्यावर देखील कारवाई करण्याची शिफारस समितीने करावी आता जसे नियंत्रण ठेवण्यात आले आहे तसे या पूर्वी देखील करता आले असते. आर्टिफिशीयल शॉर्टेज तयार केले त्यामुळे भाववाढ झाली. व्यापा-यांनीच सरकारला कंट्रोल केले की काय, अशी शंका निर्माण होते. या काळात जे अधिकारी जबाबदार असतील, त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी असे समितीने विभागास सूचित केले.

१.४० परिच्छेद क्र. २.२.१०.४ गुणवत्ता तपासणी

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी असे विदित केले की, गुणवत्तेची तपासणी करण्यात येते, त्याचे रेकॉर्ड विभागाकडे आहे. एक महिन्याचे सँपल ठेवले जाते तक्रार आली तर एक-दोन महिन्याचे सँपल ठेवले जाते. त्या बाबत दर वेळेला सूचना दिल्या जातात. टेस्टींग करूनच ऑर्डर घ्यायची असते.

दोन्ही एफसीआय व नागरी पुरवठा विभागाच्या अधिकारी सँपल गोळा करतात, सील करतात वव सही करतात. या पद्धतीमध्ये बदल करावा. सँपल गोळा करतानाचे व्हिडीओ शूट करावे ते एखाद्या सीडी किंवा पेनड्राईव्हमध्ये रेकॉर्ड करावे. डेटवाईज रेकॉर्ड तयार करावेत घेतलेले नमुने व येणारा माल यामध्ये बराच फरक असतो आता जीपीएस यंत्रणा सुरू केली आहे असे समितीने अवगत केले. याच अनुषंगाने प्रधान महालेखाकार यांनी असे विदित केले की, it is mentioned in this Para that the stock wise samples were not obtained. यावर विभागीय प्रतिनिधींनी असे विदित केले की, त्यावेळी प्रुफ देऊ शकले नाही मात्र आपण ते करतो त्याचे रेकॉर्ड आहे. दर महिन्याच्या अॅलोकेशनमध्ये त्याची नोंद घेतली जाते की, सँपर्लींग करावयाचे आहे. एक महिन्याच्या वर रेकॉर्ड ठेवले जात नाहीत यामुळे आता ते रेकॉर्ड सापडत नाहीत. प्रत्येक महिन्याचे रेकॉर्ड उपलब्ध आहे.

१.४१ परिच्छेद क्र. २.२.११ साखरेचे वाटप व वितरण

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, सन २०१३ पासून मार्केट खुले झाले साखर वितरणाची जबाबदारी आपल्यावर नाही. उचल बाकी आहे त्याची काय परिस्थिती आहे ? सन २०१२ पासून आजपर्यंत ३५ लाख पैकी २२ लाख क्विंटल साखरेची उचल झालेली असून साखर कारखान्यांकडून १३ लाख क्विंटलपेक्षा अधिक साखर घ्यावयाची होती असे समितीने निदर्शनास आणले असता ३१ कारखान्यांमधून ३३ कोटी रुपयांची साखर उचलली त्यावेळी ॲलोकेशन ऑर्डर रिव्हाईज्ड झालेले होते. १.८२ लाख क्विंटल टन साखर उचलली ३३ कोटी रुपयांची साखर असताना ३१ कारखान्यांकडून साखर उचलली. सर्व जिल्हाधिका-यांना कारवाई करण्यास सांगितले होते ते कारवाई करण्यास सक्षम आहेत. ६ साखर कारखान्यांनी केंद्र शासनाकडून स्थगिती आणली त्यापैकी एक साखर कारखान्यावर गुन्हा दाखल केला असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३५ लाख ९९ हजार ३३९ क्विंटल उचल करावयास हवी होती. आतापर्यंत २२ लाख ५० हजार ७४ क्विंटल साखर उचलली. १३ लाख ४९ हजार साखरेची उचल कधी केली जाणार आहे याबाबत समितीने विचारले असता ३३ कोटी रुपयांची उचल झालेली असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

संबंधित जिल्हाधिका-यांनी कसुरदार साखर कारखान्यांच्या विरोधात दावा दाखल केला आहे असे विभागाच्या स्पष्टीकरणामध्ये म्हटले असल्याचे समितीने सांगितले असता समितीला टोटल व्हॅल्यू सांगितली असून ३० कारखान्यांवर कारवाई करण्याचा प्रस्ताव दिलेला आहे. त्यापैकी ६ कारखांन्यांची स्थगिती झाली आणि एक कारखान्यावर गुन्हा दाखल झालेला आहे. बाकीची कारवाई जिल्हाधिकारी यांच्या स्तरावर सुरू असून जिल्हाधिकारी यांनी नोटीस इश्यू केलेल्या आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१२५ कारखान्यांपैकी ६ कारखान्यांना स्थगिती मिळाली तर एका कारखान्यावर गुन्हा दाखल झाला उर्वरित ११८ कारखान्यांच्या बाबतीत काय परिस्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता आपल्याकडे लेव्ही न दिलेले ३० कारखाने असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

३० पैकी ६ कारखान्यांना स्थगिती, एका कारखान्यावर गुन्हा दाखल झालेला आहे तर २३ कारखान्यांच्या बाबतीत काय स्थिती आहे जर सहा-सहा वर्षे कारवाई होत नसेल तर काय उपयोग आहे अशी पृच्छा समितीने केली असता काही कारखाने बंद आहेत तर काही ठिकाणी नॉमिनी नाहीत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

यास कोण जबाबदार आहे या समितीच्या प्रश्नाला जिल्हाधिका-यांना वेळोवेळी सूचना दिलेल्या असून जिल्हाधिकारी हे सक्षम आहेत असे उत्तर विभागीय सचिवांनी दिले.

What is the penalty? Have you collected the penalty from them? What is the remedy अशी विचारणा समितीने केली असता यामध्ये जप्ती आहे आणि जीवनावश्यक वस्तू कायद्याखाली गुन्हा आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विभागाने कारवाई न करण्याचे कारण काय आहे तसेच आपण जिल्हाधिका-यांना सूचना दिलेल्या आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता विभागाने भरपूर सूचना दिलेल्या असून दरवर्षी सर्वांना कळविण्यात येते असे विभागीय सचिवांनी नमूद केले.

हे केंद्र सरकारचे धोरण आहे शुगर कंट्रोल कायद्यांतर्गत साखर कारखान्यांनी २०१३ पर्यंत त्यांनी माल दिला पाहिजे. आपण सांगितले की, ३० कारखान्यांपैकी ६ कारखान्यांनी स्थगिती आणली एका कारखान्यावर गुन्हा दाखल झाला. उर्वरित २३ कारखान्यांपैकी किती कारखाने सुरू आहेत ? सुरू असलेल्या कारखान्यांकडून वसुली केली आहे काय, पाच-पाच वर्षे वसुली केली नाही त्यास कोण जबाबदार आहे, ज्यांनी ही कारवाई केली नाही त्यास कोण जबाबदार आहे ? जर जिल्हाधिकारी जबाबदार असतील तर त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी विभागाने समितीला यादी द्यावी असे समितीने सूचित केले. तसेच कोणकोणत्या जिल्ह्यातील साखर कारखाने आहेत? हा अतिशय गंभीर विषय आहे विभागाने समितीला अचूक माहिती द्यावी. किती क्विंटल साखर घ्यायची होती याची माहिती द्यावी साखर कारखाना सुरू असताना कारखान्यांनी साखर दिली नसेल तर कारखान्यांकडून वसुली करण्यात यावी. जर वसुली दिली नाही तर त्यांच्यावर गुन्हा दाखल करावा कारखाना बंद झाला किंवा विकण्यात आला तर समजू शकतो असे समितीने विभागास अवगत केले असता कोणकोणत्या जिल्ह्यात साखर कारखाने आहेत याची माहिती समितीस नंतर सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले. तसेच केंद्र शासनाने सांगितले आहे की, सन २०११-२०१२ पर्यंत ३ लाख ८५ हजार क्विंटल लेव्ही साखर उचलावयाची राहिली आहे. सन २०१४ मध्ये ओपन मार्केट सुरू झाले त्यापूर्वीची ही स्थिती आहे या कारखान्यांवर केंद्र शासन स्तरावर कार्यवाही होते. केंद्र सरकार आणि कारखाना यांच्यामध्ये सेंटलमेंट होऊन केंद्र सरकार त्या त्या कारखान्याची साखर रिलिज करते आणि त्या संदर्भातील पत्र विभागाकडे येते त्याप्रमाणे विभाग साखर उचल करते. अमुक कारखान्याची साखर उचल असे महिन्याला एखाद-दुसरे पत्र येते. सन २०११-२०१२ च्या तेव्हाच्या किंमतीनुसार कारखान्यांनी साखर पुरविण्याचे मान्य केलेले आहे त्याप्रमाणे विभाग उचल करते त्याप्रमाणे विभागाने ३१ कारखान्यांची प्रलंबित असलेली साखर उचलली आहे. अमुक एका कारखान्याचे सेटलमेंट झालेले आहे त्या कारखान्याची साखर उचलू शकता

असे केंद्र सरकार सांगते. त्याप्रमाणे विभाग ३.८५ लाख क्विंटल साखर उचलणार आहे. विभागाने १.८२ लाख क्विंटल साखर उचलली आहे जी मागील लेव्हीची साखर आहे. ओपन मार्केट असले तरी केंद्र सरकारच्या निर्देशाप्रमाणे आणि मान्यतेप्रमाणे आम्ही ती साखर उचलत आहोत. जशा सूचना मिळत आहेत त्याप्रमाणे विभाग कार्यवाही करीत आहे २ लाख क्विंटल साखर पेन्डींग असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

ही सर्व कारवाई करण्याचे अधिकार केंद्र सरकारचे आहेत की राज्य सरकारचे आहेत अशी विचारणा समितीने केली. तसेच The issue here is that they have not supplied the sugar असे प्रधान महालेखाकारांनी मत व्यक्त केले असता कारखान्यांनी साखरेचा पुरवठा केला नाही हे बरोबर आहे परंतु साखर न पुरविण्याबाबत कारखान्यांचे काही इश्यू होते तसेच ते न्यायालयात देखील गेले आहेत. काही कारखान्यांनी केस मागे घेतली तर काही कारखान्यांची केस न्यायालयात आहे. सेटलमेंटचा इश्यू केंद्र सरकारच्या स्तरावर सुरू आहे जे जे कारखाने सेंटलमेंट करतात त्यांची शुगर फ्री होते. केंद्र शासनाने सहा कारखान्यांच्याबाबतीत स्टे दिला आहे. काही कारखान्यांमध्ये साखरेचा साठा कमी आहे. काही कारखाने बंद आहेत किंवा वाहतुकीची अडचण, नॉमिनी नाही, नॉमिनींनी उशिरा आरटीजीएस भरणा केल्यामुळे अशी अनेक कारणे आहेत हे सर्व प्रश्न केंद्र सरकार सोडवीत आहे. तरी देखील आपण जिल्हाधिकारी यांना वसुली करण्यास सांगत आहोत. आपण कारवाई करण्यास सुरूवात केली तर कारखाने केंद्र सरकारकडे जातात अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

Let them go and take the orders, केंद्र सरकारने आदेश दिला असला तरी आपण कारवाई कशाला थांबवीत आहात अशी विचारणा समितीने केली असता कारखाने सेटलमेंटसाठी केंद्र सरकारकडे जात असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

कारखाने कोणत्या सेटलमेंटसाठी केंद्र सरकारकडे जातात अशी पृच्छा समितीने केली असता लेव्ही लावावयास नको किंवा कमी लावावयास पाहिजे असे मुद्दे मांडतात. त्यांच्या केसेस सुरू आहेत असे विभागीय सचिवांनी नमूद केले.

समितीला केंद्र सरकारच्या अधिकाराबाबत काही बोलावयाचे नाही. केंद्र सरकारला अधिकार आहेत केंद्र सरकार आदेश देत नाही तोपर्यंत विभागाने कार्यवाही कशाला थांबविली असे समितीने विचारले असता विभागाने कारवाई थांबविलेली नसून खालच्या स्तरावर थांबलेली आहे आपण त्यांना नेहमी कळवितो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आपल्या अखत्यारित जिल्हाधिकारी काम करतात आपण जिल्हाधिका-यांना कारवाई करण्याबाबतचे आदेश दिले पाहिजेत असे समितीने सूचित केले असता विभागाने आदेश दिलेले असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाने आदेश देऊनही जिल्हाधिकारी कारवाई करीत नसतील तर त्यांची नावे समितीला सांगावीत. समिती त्यांच्यावर कारवाई करण्याची शिफारस करील. विभागाने समितीला नावे सांगितल्यास समिती त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करील. संबंधितांवर कारवाई आणि साखरेची वसुली केली पाहिजे अशी समितीची अपेक्षा असल्याचे समितीने मत व्यक्त केले असता विभागीय सचिवांनी सकारात्मक असल्याचे समितीस सांगितले.

१.४२ परिच्छेद क्रमांक २.२.११.१ साखर सबसिडीच्या विलंबित प्रतिपूर्तीमुळे निधीची झालेली अडवणूक :

साखर सबसिडीच्या विलंबित प्रतिपूर्तीमुळे निधीची झालेली अडवणूक याबाबत समितीने विचारणा केली असता एकूण ३९ कोटी रुपयांपैकी १६ कोटी रुपये मंजूर झाले तर २३ कोटी रुपये प्रलंबित असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच ही रक्कम सन १९७९ ते २००७ मधील आहे. १६ कोटी रुपये मंजूर झाले आणि उर्वरित २३ कोटी रुपये मिळण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यांच्याकडून काही मुद्दे काढण्यात आल्यानंतर आपण त्यांची पूर्तता करतो. सन २००१ ते २०१०-२०११ याा कालावधीतील २४ कोटी ८८ लाख रुपये रक्कम वसूल झालेली असून जकात आणि विमा प्रतिपूर्तीची उर्वरित रक्कम १६ कोटी रुपये मिळाले तर २३ कोटी रुपये शिल्लक आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी अवगत केली.

सन १९७९ पासून २००७ पर्यंतचे हे पैसे आहेत आणि विभागास २३ कोटी रुपये घ्यावयाचे आहेत असे समितीने नमूद केले असता राज्य शासनाकडे २३ कोटी रुपये असून जकात आणि विम्याची रक्कम केंद्र सरकार अलाऊ करीत नाही केंद्र सरकारने ती रक्कम नाकारलेली आहे. जकात आणि विमा देणार नाही असे केंद्र सरकारने सांगितलेले आहे. ही रक्कम केंद्र सरकारच्या पातळीवर प्रलंबित नसून राज्य शासनाच्या पातळीवर प्रलंबित असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सन २०११-२०१२ या कालावधीच्या एसपीएफ लेख्यातील मार्जिन व वाहतूक दरानुसार फरकाची रक्कम रुपये ९ कोटी ८४ लाख ६५ हजार ५८४ प्रलंबित आहे. ही रक्कम कोणाकडून येण बाकी आहे तसेच ही रक्कम मिळण्यासाठी विभागाने पाठपुरावा केला काय? अशी विचारणा समितीने केली असता ही रक्कम एफसीआयकडून येणे बाकी आहे. याबाबत विभागाकडून पाठपुरावा सुरू आहे फक्त लेव्हीच्या संदर्भात बरेच इश्यू होते ते इश्यू अजून सेटल व्हावयाचे आहेत. एफसीआयच्या पातळीवर सेटल होत नाहीत विभागाच्या एफसीआयसोबत बैठका होतात काही रकमा राहिलेल्या आहेत. एफसीआयच्या जी.एम. यांना बोलावितो. या संदर्भातील स्टेटमेंट शेवटच्या पानावर दिलेले आहे त्या फक्त प्रलंबित रकमा आहेत बाकी रक्कम वसूल झालेली आहे असा खुलासा विभागीय प्रतिनिधींनी केला.

ही प्रलंबित रक्कम सन २०१२-२०१३ पासूनची असल्याचे समितीने नमूद केले. तसेच जुन्या प्रकरणातील ९ कोटी रुपये प्रलंबित आणि २३ कोटी रुपयांचा डिस्पूट आहे हे दोन विषय प्रलंबित आहेत. हे दोन्ही विषय लवकरात लवकर पूर्ण करावेत आणि आवश्यकता वाटल्यास दिल्लीला जाऊन एफसीआय सोबत चर्चा करावी असे समितीने सूचित केले असता विभागीय सचिवांनी सकारात्मक असल्याचे सांगितले.

वाहतुकीचे दर सुधारित होईपर्यंत सदर रकमेची मागणी एफसीआयकडे करता येणार नाही असे विभागाने म्हटले असल्याचे समितीने नमूद केले असता त्यांनी जे दर दिलेले आहेत त्या दरापेक्षा जास्त असेल तर त्याचे रिव्हीजन झाल्याशिवाय आपणास देता येणार नाही असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच कालावधीतील मार्जीन आणि वाहतूक दर सुधारित करण्यात आलेला असून दिनांक १० जुलै २०१५ रोजी एफसीआयकडे प्रस्ताव पाठविलेला आहे त्यानंतर त्यांना स्मरण दिलेले आहे आम्ही एफसीआयच्या पातळीवर सेटल करून घेतो अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी दिली.

विभागाने सुधारित करून पाठविले परंतु विभागास पैसे मिळाले पाहिजेत. माहे फेब्रुवारी, २०१५ पासून सुरू असून आता माहे फेब्रुवारी, २०१८ येईल म्हणजे जवळपास तीन वर्षे होतील असे समितीने नमूद केले असता ब-याचदा असे होते की, विभागाकडून पाठविलेले प्रस्ताव त्यांच्याकडे उपलब्ध होत नाहीत मग पुन्हा प्रस्ताव पाठवितो. बैठका घेतो जुने विषय सेटल होण्यास थोडा उशीर होतो परंतु आम्ही ते करून घेतो असे विभागीय सचिवांनी विदित केले.

In this matter series of weekly discussions should be taken, then this issue would be resolved. असे समितीने अवगत केले असता आपणास जिल्ह्यातील पेपर्स लागतात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सन २०१२-२०१३ चे ७ कोटी ४२ लाख रुपये प्रलंबित आहेत. तर सन २०१३-२०१४ चे ६० कोटी रुपये प्रलंबित आहेत. मार्जीन सुधारित न झाल्यामुळे ही रक्कम प्रलंबित आहे असे विभागाने शे-यामध्ये म्हटलेले आहे. तर सन २०१३-२०१४ दुस-या तिमाहीमधील ९४ लाख ९९ हजार इतक्या प्रलंबित रकमेबाबत कार्यवाही सुरू आहे असे नमूद केले आहे. सन २०१४-२०१५ (तिसरी तिमाही) चा माल न उचलण्याची रक्कम ७१ कोटी रुपये प्रलंबित असल्याचे समितीने निदर्शनास आणले असता लेव्हीचा माल उचलला नाही म्हणून केंद्र सरकारने ती रक्कम अडवून ठेवली आहे. ज्या साखर कारखान्यांची साखर उचलली त्याचा ३३ कोटी रुपयांचा दावा केंद्र सरकारकडे सादर केलेला आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

या चर्चेच्या अनुषंगाने समितीची अपेक्षा आहे की, एफसीआय आणि जिल्ह्याच्या प्रमुखांसोबत टाईम बॉऊंडमध्ये रिकन्सीलिएशन करावे आणि ती काही तरी नवीन पद्धतीने करावी आता आय.टी. चे युग आहे. पाच-दहा वर्षे रक्कम येत नाही हे योग्य नाही. सन १९७९ पासून रक्कम प्रलंबित आहे तेव्हा याच कामासाठी एका अधिका-याची नियुक्ती करून या कामाचा पाठपुरावा करावा असे समितीने सूचित केले असता सन १९७९ मधील रक्कम राज्याच्या वित्त विभागातील असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागास या सर्व गोष्टींचा पाठपुरावा करावा लागणार असून एफसीआयचे कार्यालय मुंबईत आहे. एफसीआयच्या अधिका-यांना मंत्रिमहोदयांकडे बोलवावे. या सर्व बाबींची पूर्तता चार महिन्यांत करावी अशी समितीची सूचना आहे सन २०१६-२०१७ पर्यंत सर्व रिकन्सीलिएशन करावे असे समितीने विभागास सूचित केले असता त्यांचे अधिकार मर्यादित आहेत ते ब-याच गोष्टी वरच्या पातळीवर पाठवितात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला तसेच केंद्र सरकार आणि राज्य सरकारचे परस्पर देणे-घेणे असते. ही फक्त बुक ॲडजेस्टमेंट नसून या सर्व गोष्टी प्रत्यक्षात होतात असेही समितीस अवगत केले.

या संदर्भात समितीची अशी सूचना आहे की, विभागाने याचे एक सॉफ्टवेअर तयार करावे. विभागाने पूर्ण करावयाच्या गोष्टीं आणि त्यांनी पूर्ण करावयाच्या गोष्टीं याचा एक कॉमन सॉफ्टवेअर प्रोग्राम तयार करावा. सुरूवातीला काही अडचणी येतील पण त्यामध्ये नंतर सुधारणाा करता येईल. आपण असे केल्यास या सर्व गोष्टींचे डिजिटायझेशन होईल. म्हणजे आपणास या सर्व गोष्टी एका क्लीकवर समोर येतील असे समितीने विभागास सांगितले असता कागदपत्रे बरोबर असतील तर आपणास रिफंड आणि रिएबर्समेंट मिळण्यास सोपे जाते असे विभागीय सचिवांनी विदित केले. या विभागाचे संगणकीकरणाचे काम हाती घेतलेले असल्याचेही समितीस अवगत केले.

सन २०१४ पासून साखर वाटप करणे बंद केले आहे आता आपण साखरेची जी उचल करता ती कोणाला आणि कोणत्या दराने देता, तसेच ज्या साखर कारखान्यांनी कारण सांगून साखरेचा पुरवठा केला नाही त्या साखर कारखान्यांची साखर आता का उचलायची ? The benefeciaries were deprived of sugar at that time. So, why are you lifting it now? अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी केली असता We are still buying sugar now. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. यावर But at that time they had defaulted असे मत प्रधान महालेखाकारांनी व्यक्त केले असता Do you want us not to lift the sugar ? It is cheaper than market rate असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

They had not supplied sugar at that time, so why are you lifting the sugar now असे प्रधान महालेखाकारांनी विदित केले असता We are purchasing the sugar at the rate of 36/37. We will get cheaper rate. What should we do? मग आम्ही फक्त गुन्हा दाखल करायचा काय अशी विचारणा विभागीय सचिवांनी केली असता आपण एका बाजूला प्रॉसिक्युशन करीत आहात आणि दुस-या बाजूला साखरेची उचल देखील करीत आहात असे मत प्रधान महालेखाकारांनी व्यक्त केले.

सध्या बीपीएलधारकांना साखरेचे वाटप करण्यात येते काय या समितीच्या प्रश्नाला बीपीएलधारकांना साखर देत नाही तर अंत्योदय योजनेमध्ये एका कुटुंबाला एक किलो साखर २० रुपये दराने देण्यात येते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

त्या ॲलोकेशनला काही सॅक्टीटी आहे हे त्या वर्षाचे ॲलोकेशन असून शासनाने ॲडजेस्टमेंटची भूमिका घेतलेली आहे त्यामध्ये आपण काय करू शकतो अशी विचारणा समितीने केली असता ३६ रुपये किलो दराने विकली जाणारी साखर २० रुपये किलो दराने मिळत असेल तर शासनाची १६ रुपयांची बचत होते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

समितीने सांगितल्याप्रमाणे संबंधितावर कडक कारवाई करण्याचे आदेश द्यावेत असे निदेश समितीने विभागास दिले.

१.४३ परिच्छेद क्रमांक २.२.१२ रॉकेल तेलाचे वाटप :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने दिनांक ३१ जानेवारी २०१८ रोजी विभागीय सचिवांची तसेच इतर विभागीय प्रतिनिधींची साक्ष घेतली साक्षीच्या वेळी शिधापत्रिकेवर गॅस होल्डर स्टॅम्पींगचे काम हे सन २०१३ पर्यंत पूर्ण करण्यात आले नव्हते याबाबतची सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा समितीने केली असता आता आपण १ कोटी ६७ लाख लोकांच्या स्टॅम्पींगचे काम पूर्ण केलेले असून यासोबत त्यांचे आधारकार्ड देखील घेतले जात आहे. यासंदर्भातत माननीय उच्च न्यायालय नागपूरमध्ये पीआयएल सुरू असून, त्याबाबतचा प्रोग्रेस वेळोवेळी दिला जात असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

इंडियन ऑईल कंपनी, बीपीसीएल आणि एचपीसीएल कंपन्या गॅस सिलेंडरचा पुरवठा करीत आहेत द्वअशा कंपन्यांकडून माहिती घेतली आहे काय? यामध्ये किती नावांचा समावेश केलेला आहे अशी पृच्छा समितीने केली असता संबंधित कंपन्यांकडून सीडी घेतलेल्या आहेत. तसेच यामध्ये २ कोटी ६३ लाख नावे आहेत. संबंधित कंपन्यांसोबत आढावा बैठक घेतल्यानंतर सीडीज घेतल्या होत्या. सीडींची माहिती सर्व जिल्ह्यांना पाठविलेली आहे. त्यामध्ये रेशनकार्ड सोडून इतर पुरावे ग्राह्य धरून गॅस कनेक्शन देण्यात आलेली आहेत. परंतु, याबाबतची संख्या त्यांना सांगता आलेली नाही. २७ लाख डेड कनेक्शन आहेत यामध्ये ते गॅस कनेक्शनचा वापर करीत नाही. आज आपण ९० लाख पर्यंत अलॉकेशन देत असून यामध्ये १ कोटीचा हिशेब येत आहे. आता जास्त फरक शिल्लक राहिलेला नाही ज्यांच्याकडे गॅस कनेक्शन आहेत, अशी लोक आता रॉकेलचा दुरुपयोग करीत आहेत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

परिमंडळाची शिधावाटपाची रिटेलची दुकाने आहेत. अशा दुकानातून केरोसिन घेतले जाते जे शिधापत्रिकाधारक आहेत, ते आज रॉकेल घेत आहेत, अशा लोकांकडून हमी पत्रे घेण्याची गरज असल्याचे समितीने नमूद केले असता जे शिधापत्रिकाधारक आहेत ते आज रॉकेल घेत आहेत अशा लोकांकडून हमी पत्रे घेतली जात आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

यासंदर्भात विभागाने रॅण्डमली तपास करण्याची गरज असून, तशी व्यवस्था केलेली आहे काय अशी विचारणा समितीने केली असता रिटेल डिलर्सकडून स्टॅम्पींगचे काम करून घेतलेले आहे तसेच त्यांच्याचमार्फत आधारकार्ड जमा केली जात आहेत. आजघडीला २.८७ लाख रेशनधारकांची संख्या आहे सद्यःस्थितीत रॉकेलचा कोटा कमी होत आहे. सन २०१५-२०१६ मध्ये ५० टक्के रॉकेलचा पुरवठा झालेला होता. काल ११ लाख कि.लो.लीटर रॉकेलचा पुरवठाकेलेला आहे. सन २०१६-२०१७ मध्ये ५ लाख कि.लो. लीटर रॉकेलचा पुरवठा केलेला आहे. याचा लाभ ८० ते ९० लाख लाभार्थ्यांनाच दिला जातो. एक लाभार्थी असेल तर दोन लीटर, दोन लाभार्थी असेल तर तीन आणि तीन लाभार्थी असेल तर ४ लिटर असे प्रमाण आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सदरहू प्रमाण केंद्र शासनाने ठरवून दिले आहे की राज्य शासनाने ठरविलेले आहे या समितीच्या प्रश्नाला विभागाकडून पूर्वी जास्तीचा रॉकेल पुरवठा व्हावा म्हणून मागणी केली जात होती. सन २०१६-२०१७ मध्ये ५ लाख कि.लो.लीटर रॉकेलचा पुरवठा केलेला आहे. आजघडीला रॉकेलचा पुरवठ्याची कमी प्रमाणात मागणी केलेली असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ज्यांच्याकडे गॅस सिलेंडर नाहीत, अशा लोकांना रॉकेलचा पुरवठा केलाच पाहिजे. आज विभागाकडून रॉकेलच्या पुरवठ्याची कमी प्रमाणात मागणी केलेली आहे. सर्वात जास्त मागणी महाराष्ट्र राज्याने केली अशाप्रकारचा विक्रम करता कामा नये असे समितीने सूचित केले असता विभागाकडून कोणत्याही लाभार्थ्यांवर अन्याय होऊ दिला जाणार नाही. स्टॅम्पींग आणि आधारकार्ड गोळा करण्याची मोहिम हातामध्ये घेतलेली आहे. ऑडिट परिच्छेदात अवास्तव मागणी केली आणि त्याची पूर्तता केली जात नाही, असे देखील नमूद केलेले होते. गत वर्षाच्या तुलनेत यावर्षी ४ लाख ९० लीटर रॉकेलची मागणी केलेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

मागणीचे धोरण कोणाकडून निश्चित केले जाते ? रॉकेलचा पुरवठा किती करावयाचा याबाबतचे धोरण राज्य शासन किंवा केंद्र शासनाकडून निश्चित केले जात असल्याचे समितीने नमूद केले असता प्रत्येक लाभार्थ्यांना किती रॉकेलचा पुरवठा करावयाचा याबाबतचे प्रमाण अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून निश्चित केले जाते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मघाशी सचिवांनी "एक लाभार्थी असेल तर दोन लिटर, दोन लाभार्थी असेल तर तीन आणि तीन लाभार्थी असेल तर ४ लिटर लिटर असे प्रमाण आहे " असे उत्तर दिले होते. एक लाभार्थ्याला दोन लिटर रॉकेल महिनाभर तरी पुरेल काय? यासंदर्भातील प्रमाणामध्ये वाढ केली पाहिजे. केंद्र शासनाची उज्वला योजना आहे त्यामध्ये लाभार्थी मिळवून देण्यासाठी अन्न व नागरी पुरवठा विभागाने रेकॉर्ड उपलब्ध करून देण्याची गरज असल्याचे समितीने नमूद केले असता विभागाने गॅस कंपन्यांशी चर्चा केल्यानंतर उज्वला योजनेमध्ये टार्गेट निश्चित करण्यात आले नव्हते, असे निदर्शनास आले होते उज्वला योजनेमध्ये अनलिमिटेड टार्गेट आहे. उज्ज्वलामध्ये गॅस कंपन्यांशी चर्चा केली, त्यामध्ये टार्गेट नाही. त्यामध्ये अनलिमिटेड टार्गेट आहे. जितके लोक समोर येतील त्यांना सर्वांना योजनेमध्ये समाविष्ट करीत आहोत असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

आता तर मोफत देतात आता दारिद्रय रेषेखालच्या लोकांना मोफत देतात. बाकीच्या उज्ज्वला -२ योजनेमध्ये सीएसआरचे पैसे घेऊन सिलेंडरचे डिपॉजिट त्याना भरावयाचे आहे गॅसचा चुल्हा असतो, तो सीएसआरमधून देत आहोत असे समितीने विदित केले असता टार्गेट नाही, अनलिमिटेड आहे जितकी मागणी असेल जितका गॅस सप्लाय करू शकतात ती सर्व त्यांनी पुर्तता करायची आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

रिटेल्सच्या लोकांकडून याकरीता काहीतरी इन्स्टेंटिव्ह ठरविण्यात यावा, त्यांना त्यावर कमिशन मिळते असे समितीने अवगत केले असता हा गॅस कंपनीचा विषय असून त्यांना त्यांच्या कमिशनबाबत विनंती करू शकतो असे विभागीय सचिवांनी विदित केले.

उज्ज्वलाची जी गॅस सॉर्ट अप झालेले आहे, त्याचा रेकॉर्ड आपल्याकडे येतो का, तसेच लाभार्थ्यांची संख्या कशी ठरवितो अशी विचारणा समितीने केली असता नाही, आपल्याकडे येत नाही आपण त्याच्यामध्ये त्यांना को-ऑर्डिनेट करतो लाभार्थ्यांच्या संख्येबाबत गॅस कंपनी त्यांची जी नियम नॉर्म्स आहेत, त्याप्रमाणे ते अर्ज मागवितात ते त्याप्रमाणे त्यांना वाटप करतात अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

जर एखाद्या व्यक्तीने उज्ज्वलामधून गॅस घेतला असेल तर त्याला जुने केरोसिन ॲलॉट करीत असले पाहिजे अशी विचारणा समितीने केली असता त्याकरीता आपण शिधापत्रिकेवर गॅस ॲलोकेशन झाले तर शिधापत्रिकेवर गॅस स्टॅम्पिंग करतो याबाबत कॅम्प घेतला तर याची माहिती आमच्याकडे येते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

याचाच अर्थ आपल्याकडे रेकॉर्ड असतो. अनुसूचित जाती जमातीच्या लाभार्थ्यांना व दारिद्रयरेषेखालील लाभार्थ्यांना उज्ज्वला योजनेंतर्गत गॅस कनेक्शन मोफत आहे. मोठ्या प्रमाणावर गॅस कनेक्शनचे ग्रामीण भागामध्ये वाटप झालेले असून त्या गावातील ज्याचे स्टॅम्पिंग झाले नाही, त्याला रॉकेलही सब्सिडाईज्ड रेटमध्ये मिळत आहे, याकरीता आपण विशेष मोहीम हाती घेतलेली आहे अशी विचारणा समितीने केली असता स्टँपिंगचा आकडा दर महिन्याला मोहिमेंतर्गत वाढत जातो जस जसे उज्ज्वला वाढेल १५,००,००० त्याचे टार्गेट आहे, एक मोघम असे त्यांनी ठरविलेले असून १५ लाख कनेक्शन आम्ही त्याप्रमाणे स्टॅम्पिंग करतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ज्यांच्याकडे उज्वला गॅस योजनेंतर्गत सिलेंडर आणले त्याच्या शिधापत्रिकेवर स्टॅम्पिंग नसल्यामुळे अनुदानित रॉकेलही घेतो आणि गॅस सिलेंडरही त्याच्याकडे आहे याकरीता कालमर्यादा ठरवावी लागेल, हे जिल्हानिहाय काम पूर्ण करावे लागेल असे समितीने अवगत केले असता विभागीय सचिवांनी होय असे उत्तर दिले.

काही मतदारसंघात वन विभागानेसुद्धा गॅस सिलेंडर वाटले. कारण जंगलामधून इंधन तोडू नये त्याचा परिणाम डी फॉरेस्ट सेक्शनमध्ये होऊ नये म्हणून सर्व जंगलाला विशेषतः चिरोडी वगैरे भाग आहे, त्या सर्व जंगलातील आजुबाजूच्या लोकांना मोठ्या प्रमाणात सिलेंडर वाटले, तरीही रॉकेल वाटपही सुरू आहे. हे तपास करण्याची यंत्रणा आहे स्टॅम्पिंग करण्याची यंत्रणा आहे, ती कोण राबविते, त्याबाबत समितीस सांगावे असे समितीने विभागास सांगितले असता डीलर्स असतात किंवा जे आपले किरकोळ विक्रेते असतात, त्यांच्याच मार्फत दरवेळी लाभार्थींची स्टॅम्पिंग करून घेतो असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

त्याला याचे कमिशन मिळते त्याला ब्लॅकमध्ये दाखवून विकता येते, त्याच्या भरवशावर स्टॅम्पिंग ठेवून चालणार नाही असे समितीने विभागास अवगत केले असता आधार आणि स्टॅम्पिंग करण्याकरीता कर्मचारी वर्ग अपुरा असून तालुक्याअंतर्गत दहाच्या वर कर्मचारी वर्ग नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

लाभार्थ्यांचे डिक्लेरेशन आणि त्याचे डिक्लेरेशन हे दोन उज्ज्वला योजनेच्या अनुषंगाने जे काही नवीन वाटप झालेले आहे, त्या सर्वांची स्टॅम्पिंगची मोहीम आपण हाती घेऊन या टार्गेटकरीता आपण एक विशिष्ट कालावधी ठेवणे आवश्यक आहे सहा महिन्यांच्या आत आपण हे करणे

आवश्यक असल्याचे समितीने सूचित केले असता हे प्रमाण पाच वर्षामध्ये १/५ झालेले आहे आता केरोसिन एकदम हॅण्ड टू माऊथ झालेले आहे. केरोसिनचे दर केंद्र शासनाने वाढविल्यामुळे आता भेसळीसाठी केरोसिन आणि डिझेलमध्ये विशेष काही फरक राहिलेला नाही. आधी भेसळ व्हायची निळ्या रंगाचे केरोसिन असल्यामुळे निळा रंग येत होता डिझेलला आता सेकंड इश्यू असा आहे की, रेट ओपन मार्केटमध्ये जर सब्सिडाईज्ड केरोसिन वगळण्याचा प्रयत्न केला, विकण्याचा प्रयत्न केला तर त्यामध्ये प्रोफिट नाही असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

केंद्र शासनाने केरोसिनचे भाव काय ठरविले आहेत अशी विचारणा समितीने केली असता केरोसिनचे भाव २२ रुपये आणि २७ रुपयांच्या मध्ये आहेत दर महिन्याला हे बदलत असतात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सब्सिडाईज्ड २२ रुपये आणि नॉन सब्सिडाईज्ड २७ रुपये इतका यामध्ये फरक आहे. फारसा फरक नाही असे कसे म्हणता, डिझेलमध्ये आणि रॉकेलमध्ये फारसा फरक राहिला नसून डिझेलचा भाव ६७ व ६८ इतका आहे असे समितीने निदर्शनास आणले असता रुपये २२ चे केरोसिन विकताना ते रुपये ४०-४५ या भावाने विकतात. तसेच आजकाल भेसळीसाठी व्हायेबल राहिलेले नाही असे कंपनीचे म्हणणे असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले. यावर समितीने आपण विभागीय सचिव असून जबाबदार अधिकारी आहात आपण असे व्हेग स्टेटमेंट करू शकत नाही असे समितीने सूचित केले असता आता पांढरे रॉकेल इन्ट्रोडयुस केले असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

आपण जिल्हानिहाय टार्गेट ठरवा समितीला ठरविलेल्या टार्गेटची माहिती पुढील पंधरा दिवसांमध्ये द्यावी तसेच स्टॅम्पिंग कधी संपेल या समितीच्या प्रश्नाला एक-दोन महिन्यात उज्ज्वलाची स्टॅम्पिंग पूर्ण करू असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

स्वयंपाकासाठी आणि घरगुती वापरासाठी रॉकेल आहे. दिवा लावण्याकरीता आता केरोसिनची आवश्यकता नसते कारण आता शंभर टक्के विद्युतीकरणाकडे आलो आहोत म्हणून त्याचा कोटा कमी व्हायला पाहिजे असे समितीने नमूद केले तसेच मागील वर्षी ११,९६,००० लीटर रॉकेलची मागणी केली होती, त्यामध्ये कमी झालेला कोटा दाखविलेला आहे त्याच्या अगेन्स्ट १०,२१,००० लीटर मिळाले. पर कॅपिटा देखील याचा कोटा कमी झाला पाहिजे. ज्याच्याकडे खरच सिलेंडर नाही, त्याला दोन लिटरमध्ये महिनाभर स्वयंपाक करता येत नाही. गावांमध्ये विद्युत शवदाहिनी नसल्याने मृतदेह जाळण्याकरीता लाकडाचा वापर करण्यात येतो पावसाळ्यात रॉकेल मिळत नसल्याने अडचण येते असे समितीने अवगत केले असता त्याकरीता व्हाईट केरोसिन देण्यात येते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

इतर राज्यात प्रती माणशी दोन लिटर केरोसिन दिली जाते,काही राज्ये केरोसिन मुक्त झालेली आहेत असे समितीने अवगत केले असता याबाबत माहिती घेऊन समितीस देण्यात येईल. तसेचच झारखंडमध्ये डीपीटी झालेला असून काही छोटी छोटी राज्ये केरोसिन मुक्त झालेली असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

दुकानदार यांचे मेन सोर्स ऑफ इन्कम केरोसिन होते आता केरोसिन दिले जात नाही त्यामुळे आता या दुकानांची काय परिस्थिती आहे अशी पृच्छा समितीने केली असता याचे कमिशन आता ७० पासून १५० केलेले आहे मशिनमार्फत केलेल्या व्यवहारावर दीडशे रुपये कमिशन देतो अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.४४ परिच्छेद क्र. २.२.१२.२ रॉकेलवरील रोख सबसिडीचे परस्पर हस्तांतरण करण्यास सुरूवात न करणे :

रॉकेलवरील रोख सबसिडीचे परस्पर हस्तांतरण करण्यास सुरूवात न करणे, याबाबत निर्णय २०११-१२ मध्ये घेण्यास सांगितला होता. आता रॉकेलवरील सबसिडी डायरेक्ट कन्झ्यूमरच्या अकाऊंटमध्ये गेली पाहिजे याबाबत सद्यःस्थिती काय आहे अशी विचारणा समितीने केली असता यामध्ये असे धोरण ठरविलेले आहे की, मुंबई शहरामध्ये ही योजना राबविण्याचा निर्णय घेतलेला आहे याबाबत माहितीपुस्तिकेत तपशील आहे. इतर राज्यातील रेशन दुकानदार हेच केरोसिनचे वाटप करतात. महाराष्ट्रात सेमी होलसेलर, किरकोळ विक्रेते व घाऊक हे वेगवेगळे आहेत. फक्त मुंबई व ठाणे येथील एमटीआरए रिजनमध्ये दुकानदार व केरोसीन विक्रेते सेम आहेत, ही एक अडचण आहे. त्यामुळे या ई-पॉस मशीनवर हे काम होऊ शकणार नाही. मुंबईपुरते हे ई-पॉस मशीन कामाला येईल कारण लाभार्थ्यांना बोलावून, त्याचा अंगठा घेऊन त्याच्या खात्यामध्ये सबसिडीची रक्कम ट्रान्सफर करावी लागेल. ही सर्वात मोठी अडचण आहे. आपण केंद्र सरकारला खर्चाची मागणी केली तर त्यांच्याकडून काहीच प्रतिसाद मिळाला नाही. १० कोटीमध्ये हे काम होणार नाही एका मशीनला १५ हजार रुपये लागत असून एकूण ५८ हजार दुकाने आहेत. त्यामुळे हा एक प्रश्न अनुत्तरीत राहिला आहे. सरसकट रक्कम देणे योग्य होणार नाही, परंतु सध्याचा खर्च सरसकट देण्यामध्ये होईल, म्हणून मशीन देणे गरजेचे आहे. आधार व बँक खाते लिंक करून त्यांच्या खात्यामध्ये सबसिडी दरमहा हस्तांतरीत करणे योग्य होणार नाही. जो माणूस केरोसीन घेण्याकरीता प्रत्यक्ष येईल त्याला सबसिडी देता येईल, जशी सध्या गॅस सिलेंडर वाटपामध्ये योजना आहे म्हणून आपणास मशीनची गरज आहे या सर्व अडचणी असल्यामुळे मुंबईपुरता हा निर्णय आपण घेतला आहे. आधार व बँक खाते लिर्कींगही आपण आता करीत आहोत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यामध्ये दोन प्रकार आहेत शिधा वाटप करणा-या दुकानांमधून रॉकेल दिले जाते तसेच रॉकेलचा पुरवठा करणारे काही लायसन्स होल्डर आहेत ते डेपोमधून लायसन्स घेतात. सध्या लायसन्स होल्डरचा रोल काय आहे, एकेकाळी लघुउद्योगांमधून व काही कंपन्यांमध्ये रॉकेलचा वापर होत होता. ज्यांना शासकीय कोटयातून मिळत नव्हते, त्यांना काही ठरावीक इन्सेंटीव्ह देऊन व्हेंडींग करणा-या लोकांकडून रॉकेल देत होतो सध्या त्यांचा काय रोल आहे याबाबत समितीने विचारणा केली असता त्यांना मार्जीन वाढवून दिलेली आहे तरीसुद्धा ५० ते १५० लीटर रॉकेल त्यांच्याकडे वाटपाकरीता येते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१० कोटी रुपये मशीनकरीता खरेदी केली, ते काम २-३ वर्षांत होणार नाही समजा त्यांना २५ कोटी रुपये दिले तर ते काम होईल का अशी विचारणा समितीने केली असता १५,००० गुणिले मुंबईची दुकाने वजा केले तर साधारणपणे ५० हजार दुकानांमध्ये मशीन द्यावे लागतील याकरीता ७५ कोटी रुपये लागतील असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

या मशीनचा गॅरंटी पिरेड दोन वर्षांत संपतो यावर काय उपाय आहे याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, आम्ही मुंबईमध्ये अगोदर सुरू करीत असून ही योजना बाहेर फार प्रसिद्ध झाली नाही, फक्त झारखंडमध्ये डीबीटी योजना प्रसिद्ध झाली. बाकी कोठेही डीबीटी झालेले नाही. डायरेक्ट डीबीटी आपण कोठेही करीत नाही आता मुंबईमध्ये पहिल्यांदा केले जात असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

अमरावती व इतर जिल्ह्यांत या योजनेच्या अंमलबजावणीबाबत समितीस माहिती द्यावी असे अवगत केले असता या जिल्ह्यांना अगोदर योजनेमध्ये घेण्याचे ठरले होते पण पुढे त्यामध्ये काही प्रगती झाली नाही कारण शासनाकडून निधीचा प्रतिसाद मिळाला नाही. १० कोटी रुपये आल्यानंतर रि-व्हॅलीडेटकरीता दिलेले आहेत, तो विषय आमच्याकडेच आहे. ही रक्कम केव्हाही मिळू शकेल परंतु या रकमेत आमचे भागत नाही एक तर सर्वांना आधार क्रमांक घेण्यासाठी इन्सेंटीव्ह घ्यावा लागेल. यामुळे प्रत्येक कार्डमागे २-२ रुपये वाढतात दुसरी बाब म्हणजे ई-पॉस मशीनचा खर्च वाढणार असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

बँक खात्यात आपण सबसिडी जमा करण्याची शासनाची योजना होती. विभागाने सांगितले होते की, ३ जिल्ह्यांत पायलट बेसीसवर करणार आहोत. अमरावती, नंदूरबार व वर्धा या तीन ठिकाणी करणार होता आपण ती केली नाही. तसेच मुंबईमध्ये करावयाचे होते असे प्रधान महालेखाकारांनी विभागाच्या निदर्शनास आणले असता विभागीय सचिवांनी असे विदित केले की, आता आधार व बँक खाते लिंक करून ते काम सुरू करणार आहोत.

दुस-याही योजना सुरू आहेत जनधन योजना, रेशन कार्डला आधार लिंक केले जाणार आहे, यामध्ये समन्वय नाही का या समितीच्या प्रश्नाला सर्वांकडे बँक खाती आहेत, तथापि त्याची माहिती आपल्या डाटाबेसमध्ये फिड करावयास पाहिजे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जनधन योजना किंवा बँक अकौंट असतील, अशा लोकांकरीता तुम्ही सहा महिन्यांची कालमर्यादा देण्यात यावी, नाही तर बंद करण्यात यावीत असे केल्याशिवाय होणार नाही. तसेच डीबीटी करायचे नाही असा सरकारने निर्णय घेतला आहे का अशी विचारणा समितीने केली असता असे काही नसून पहिल्यांदा मुंबईमध्ये चालू करायचे आहे. मशीनशिवाय डीबीटी करायला गेलो तर सर्वांना सबसिडी द्यावी लागेल. त्यापेक्षा जेथे मशीन आहे, त्याला बोलावून, त्याचा अंगठा घेऊन जो रॉकेल घेण्याकरीता आला आहे, त्यालाच आपण सबसिडी ट्रान्सफर करीत आहोत. दुकाने व रिटेलर्स वेगळी असल्यामुळे आपण पहिल्यांदा मुंबईमध्ये हे काम करीत आहोत डाटा फिडींग अकौंटससुद्धा करीत असून हे काम झोनवाईज करावे लागेल कारण फक्त ४० टक्के बँक अकौंट सीडीएफ आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

म्हणजे विभागाची अशी योजना आहे की, एखाद्याने रॉकेल घेतले व अंगठा दिला तर ताबडतोब त्याच्या खात्यात डीबीटीची रक्कम जमा होईल. मात्र त्याला त्या दुकानात पूर्ण पेमेंट करावे लागेल अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी हे बरोबर असल्याचे समितीस अवगत केले.

सरसकट डीबीटी केले तर, एखाद्याने त्या महिन्यात रॉकेल घेतले नाही तरीसुद्धा त्याच्या खात्यावर पैसे जमा होतील. त्यामुळे ई-पॉस मशीनमध्ये एंट्री झाली तर ती सबमीट होईल. बाकींचे डिटेल्स तुम्ही किती वेळात जमा करणार या समितीच्या प्रश्नाला येत्या सहा महिन्यात मुंबई विभाग कव्हर करण्याचा विभागाचा मानस असून तशी कमीटमेंट केंद्र सरकारला दिलेली असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

केंद्र शासनाकडून माहे एप्रिल २००८ मध्ये काही मार्गदर्शन मागतिले होते काय अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी केली असता मशीनकरीता १० कोटी रक्कम कमी आहे, ती वाढविण्याबाबतचा तो विषय होता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

You are linking the scheme with the POS machine. The Government uof Maharashtra is not following the directives of Central Government of putting their subsidy in Bank Accounts. They are linking with the POS machines.असे प्रधान महालेखाकारांनी विदित केले. तसेच अन्य राज्यामध्ये याबाबत काय परिस्थिती

आहे याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी असे अवगत केले की, झारखंडमध्ये योजना सुरू असून पाँडेचरीमध्ये म्हणत आहेत की डीबीटी नको डायरेक्ट पाहिजे आहे, आम्हाला सबसिडी द्यावयाची नाही.

केरोसीनचा जेवढा कोटा आपण दुकानदारांना देतो, त्यातील काही माल अन-सोल्ड राहतो का तसेच सन २०१४ साली २१ लाख २७ हजार लिटरची डिमांड होती, आता किती डिमांड करीत आहात अशी विचारणा समितीने केली असता असा काही डेटा नाही आपण ऑलरेडी कमी करून १/५ वर म्हणजे माल २० टक्केवर आणलेला आहे. अन-सोल्डची माहिती आपणाकडे येत नाही. तसेच आता ५ लाख लीटरची डिमांड करण्यात येते व ४ लाख ९० हजार लीटर मिळते अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

या सर्व सिस्टीममुळे डिमांड ५ पटीने कमी झालेली असून रॉकेल माफीया कोणत्या जिल्हयात जास्त आहेत हे अधिका-यांना माहिती असते. तेथे आपण कोणत्या उपाययोजना केल्या आहेत. पहिले तीन जिल्हे कोणते आहेत की, जेथे रॉकेल जास्त उचलले जाते. जीपीएस सिस्टीम ट्रान्सपोर्टेशनमध्ये तो प्रश्न येणार आहे. केरोसीन सबसिडी डायरेक्ट बँक अकौंटमध्ये जमा होणार असून आधार कार्ड लिंक करणे या सर्व योजना आपण किती दिवसांत पूर्ण करण्यात येणार आहेत या समितीच्या प्रश्नाला मुंबईपुरते काम सहा महिन्यांत पूर्ण करण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या संदर्भात फक्त मुंबईपुरती कार्यवाही न करता त्यात सर्व जिल्हयांमधील शहरांचा समावेश केला पाहिजे असे समितीने सूचित केले असता ॲलॉकेशननुसार ही बाब शक्य होणार नाही. आपल्याला निधी मिळाला तर स्पॉस मशीन बसवून सदर कार्यवाही करावी लागेल. रॉकेल घेण्यासाठी येणा-या ग्राहकाचे ॲटेंडन्स घेतले नाही तर.. गॅस घेतल्यानंतर त्याकरीता सबसिडी मिळत असते. गॅस घेतला नाही तर सबसिडी मिळू शकत नाही. आपण विनामशीन कार्यवाही केल्यास सर्वांना सबसिडी दयावी लागेल. बायोमॅट्रिक ॲथोंटिकेशन याचा अर्थ सदर व्यक्ती तीच आहे व ती रॉकेल घेण्यासाठीच आली आहे हे समजून येईल. त्यामुळे यासंबंधी मशीनमार्फत कार्यवाही करायला पाहिजे अन्यथा कोणी येऊन सबसिडी घेऊन जाईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सर्वप्रथम गॅस सिलेंडरचे स्टॅम्पिंग केल्यानंतर यात बरीच सुसूत्रता येऊ शकेल असे समितीने नमूद केले असता या संदर्भात असे धोरण आहे की, रॉकेलच्या संदर्भात वाटप हळूहळू कमी करून १०० टक्के गॅससंबंधी कार्यवाही करायची असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

खेडयापाडयामध्ये रॉकेलची आवश्यकता लागणार आहे तेथे रॉकेल देण्यास हरकत नाही फक्त पुरवठा कमी करू नये. तसेच एखादा लाभार्थी गॅस सिलेंडर घेऊ शकत नसल्यास त्याकरीता रॉकेलची आवश्यकता असल्यामुळे त्याचा कोटा देखील वाढवून दिला पाहिजे असे समितीने विदित केले असता यामध्ये नाशिक, नागपूर आणि सोलापूर जिल्ह्यांचा समावेश असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

Does Mumbai requires Kerosine अशी पृच्छा प्रधान महालेखाकार यांनी केली असता मुंबईतील काही झोपडपट्टीच्या भागामध्ये केरोसीनचा पुरवठा होत नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

मुंबईमध्ये सुद्धा केरोसीनची आवश्यकता असून We are encouraging Slumdwellers असे प्रधान महालेखाकारांनी मत व्यक्त केले. तसेच In the place like Mumbai you are saying that you are going to implement Kerosine DBT Scheme. We should select the poorest of the poor District to implement it on pilot basis. Earlier you had selected Wardha, Nandurbar and Amravati. Now, you are saying Mumbai The selection of Mumbai per se does not appeared to be correct असे विभागास अवगत केले असता But it is the policy. असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. यावर प्रधान महालेखाकारांची पुनश्चः असे विचारले की, Your policy was earlier for backward Districts. आपण ते का बदलले याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, In discussion with Finance Department, it has been decided to take up in Mumbai, where POS machines were already there.

केंद्र शासनाच्या प्रत्येक स्कीममध्ये आपल्याकडून ट्वीकिंग करून दुस-या अटी टाकल्या जातात. ते लोक स्पॉस मशीनसाठी गॅरंटी निधी देणार आहेत यासंबंधी केंद्र शासनाने हमी दिलेली नव्हती. Only they gave it one time grant before 31st March 2012 after that State Governments are required to established their own institutional mechanism for this scheme असे प्रधान महालेखाकारांनी अवगत केले असता We have decided that we should be done with biometric authentication through POS असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या संदर्भात प्रथम मुंबई येथे मॉडल म्हणून कार्यवाही करण्यासंबंधी शासनाने निर्णय घेतलेला असून या संदर्भात शासनाने घेतलेल्या निर्णयाची एक प्रत समितीकडे सादर करावी असे समितीने सूचित केले असता प्रशासकीयदृष्टया सोयीसाठी आणि फायनांनशिएली रिक्वायरच्या दृष्टीने सदर निर्णय घेतलेला आहे. व निर्णयाची प्रत समितीकडे सादर करण्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

सदर निर्णयात या संदर्भात करावयाच्या कार्यवाहीचे कारण सुद्धा नमूद केलेले असणार. त्यात प्रथम वर्धा, नंदुरबार व अमरावती असे तीन जिल्हे होते असे समितीने विचारले असता त्यावेळी उक्त जिल्हयांमध्ये बँक खात्यांची संख्या जास्त असल्यामुळे त्या जिल्हयांची निवड करण्यात आली होती. केरोसीनकरीता होणारा सर्व खर्च केंद्र शासनाकडून केला जातो, यासंबंधी राज्य शासनाकडून कोणताही खर्च केला जात नाही. यामुळे केंद्र शासनाकडे निधीची मागणी करण्यात आली होती की, केरोसीनच्या संदर्भात १० कोटी रुपयांचा निधी पुरेसा नसल्यामुळे त्यात वाढ करून द्यावी असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

"Number of bank accounts opened in Nandurbar, Wardha and Amravati was more and hence it was decided to implement it there." असे विभागाच्या उत्तरात नमूद केले असल्याचे प्रधान महालेखाकारांनी विभागाच्या निदर्शनास आणून दिले असता या संदर्भात सन २०१३ पासून २०१७ पर्यंत केंद्र शासनाकडे अनेक वेळा पत्रव्यवहार करून सुद्धा त्यांच्याकडून कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

स्पॉस मशीनऐवजी पर्यायी व्यवस्था शोधून त्याचा सुद्धा विचार करणे गरजेचे आहे. केरोसीनपेक्षा त्याचा खर्च मोठा आहे. आपल्याकडे ५८ हजार किरकोळ विक्रेते आहेत. अशा परिस्थितीत १५ हजार रुपये स्पॉस मशीनची किंमत असल्यास त्याकरीता जवळपास ७५ कोटी रुपयांची आवश्यकता लागणार आहे. परिस्थितीत २५ कोटी रुपयांची सबसिडी देऊन ७५ कोटी रुपये मशीन्ससाठी खर्च होणार असल्यास ही बाब संयुक्तिक होणार नाही असे समितीने सूचित केले असता पर्यायी व्यवस्था करायची असल्यास बॉयोमॅट्रिक ॲथोंटिकेशन बाजूला ठेवून ज्याने मागणी केली असेल त्यानुसार त्याला पुरवठा करावा लागेल असे विभागीय सचिवांनी विदित केले असता समितीने ही बाब योग्य होणार नसल्याचे विभागास अवगत केले.

गॅस स्कीमप्रमाणे ही स्कीम राहणार असून गॅस खरेदी केल्याशिवाय सबसिडी मिळू शकत नाही. मुंबईतील मुंबई ठाणे रिजनमधील रिटेलर व युझरची संख्या किती आहे या समितीच्या प्रश्नाला ३५९८ इतकी दुकानांची संख्या असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

सर्व रेशनकार्ड धारक हे युझर्स आहेत असे होऊ शकत नाही असे समितीने अवगत केले असता केरोसीनच्या संदर्भात तशीच परिस्थिती आहे. केरोसीनमध्ये प्राधान्य गट नाही यामुळे ज्या लोकांकडे गॅस नाहीत त्या सर्वांना केरोसीन दिले पाहिजे असे शासनाचे धोरण असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

मुंबई रिजनमधील रेशनकार्डधारकांची संख्या किती आहे व त्यापैकी ज्या रेशनकार्डधारकांकडे गॅस नाहीत ते केरोसीन मिळण्यास पात्र आहेत अशा रेशनकार्डधारकांची एकूण संख्या किती आहे अशी विचारणा समितीने केली असता सदर माहिती आता उपलब्ध नसून ती माहिती विभागाला घ्यावी लागेल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

स्पॉस मशीन घेण्यासाठी होणारा खर्च परवडण्यासारखा आहे का याकरीता समितीने सदर मुद्दा उपस्थित केला असल्याचे समितीने विदित केले असता मुंबईमध्ये यापूर्वीच स्पॉस मशीन्स बसविल्यामुळे त्याकरीता पुन्हा खर्च होणार नसल्याचे सचिवांनी अवगत केले.

२ वर्षांनंतर सदर मशीनचा गॅरंटी पिरीएड संपणार असून मशीनकरीता एक वर्षाकरीता संपूर्ण राज्यात किती खर्च होणार आहे अशी विचारणा समितीने केली असता मशीनकरीता एक वर्षासाठी ७५ कोटी रुपये खर्च होणार आहे. आपल्याला कॉम्पुटराईझेशन प्रोग्राममध्ये ट्रान्झेक्शन मॉडेलमध्ये स्पॉस मशीन्स मिळालेल्या आहेत आपण त्यांचा वापर करू शकतो अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

१.४५ परिच्छेद क्र. २.२.१२.३ वाहन मागविणे प्रणालीची अंमलबजावणी :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात महिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, यासंदर्भात ऑईल कंपनीने कार्यवाही केली पाहिजे असे विभागाचे मत असून त्यांचे होलसेलर तेथून ऑईल घेऊन निघतात. सध्या अशी सिस्टीम कार्यरत आहे की, डाटा ट्रॅकिंग शीटवर एन्ट्री घेतल्यानंतर ती डाटा ट्रॅकिंग शीट तालुक्यात आल्यानंतर त्याची पुन्हा रि-व्हेरिफिकेशनसाठी एन्ट्री घेतली जाते. तालुक्यानंतर त्या ट्रकसोबत असलेल्या व्यक्तीमार्फत सर्व किरकोळ विक्रेत्यांना ऑईलचे वाटप केले जाते. आता कोणत्याही ठिकाणी जीपीएस यंत्रणा लावलेली नाही. ती यंत्रणा तेल कंपन्यांनी लावली पाहिजे असा विभागाचा स्टँड आहे. धान्याच्या संदर्भात जीपीएस सिस्टीम सुरू करण्यात आली असून ती जबाबदारी कंत्राटदारावर टाकण्यात आली आहे.

जे कंत्राटदार केरासीन आपल्याला आणून देतात त्याचे इन्कॉर्पोरेट कॉस्टमध्ये करावे आपल्याला त्याचा काही फरक पडणार नाही. या संदर्भात यापूर्वीच निर्णय का घेण्यात आला नाही ? त्यामुळे माफिया या गोष्टीचा फायदा घेत असतात. या संदर्भात त्यांना रुट सुद्धा बदलता येत नाही. आता या संदर्भात गुगलवरुन सर्व माहिती घेता येते.आता गुगलवरुन गाडी कोठे थांबली, किती वेळ थांबली याची माहिती घेता येते आता पर्यंत हे न करण्याचे कारण काय आहे अशी विचारणा समितीने केली.तसेच मग ज्यावेळी धान्याच्याबाबतीत निर्णय घेण्यात आला त्यावेळी याबाबत

निर्णय का घेण्यात आला नाही आम्हाला जीपीएस चे पैसे द्यावेत असे विभागाने सन २०११ मध्ये केंद्र शासनाला सांगितले असल्याचे समितीने अवगत केले यावर रेशनचा सर्व खर्च केंद्र शासनानेच करावयाचा असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभाग किती दिवसात करून घेणार आहे अशी पृच्छा समितीने केली असता आपल्याला हे कंपनीकडून करून घ्यावे लागेल त्यांनी हे मान्य केले तर लगेच होईल परंतु, त्यांनी ते मान्य करावयास पाहिजे असे विभागीय सचिवांनी सांगितले.

आता सुद्धा हा खर्च संबंधित कंपनीनेच करावा असा पॉलिसी डिसिजन झालेला आहे काय तसेच राज्यात नवीन शासन सत्तेवर आल्यानंतर सुद्धा विभागाने असाच निर्णय घेतला आहे काय या समितीच्या प्रश्नाला शासनाचा असा स्टँड असून त्या कंपन्यांनी खर्च करावा असा स्टँड असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

कंपनीच्या डेपोवरुन केरोसीन उचलल्यानंतर आऊटलेट पर्यंत ज्या ठिकाणी केरोसीन जाते तेथपर्यंतचा ट्रान्सपोर्टेशनचा खर्च आपण देतो का कंपनी देते अशी विचारणा समितीने केली असता तो खर्च कंपनी देते तालुका प्लेस पर्यंत ते देतात आणि त्या पुढील आपण देतो. राज्य शासन केरोसीनवर कोणताही खर्च करीत नसल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

राज्य सरकार केरोसीनवर कोणताही खर्च करीत नाही हे विभागीय सचिवांनी दुस-यांदा समिती समोर सांगितले आहे. परंतु, हे जरी खरे असले तरी केरोसीनची किंमत २२ रुपये आहे आणि डिझेलची किंमत ६७ रुपये आहे. म्हणजे केरोसीन व डिझेलच्या किंमतीत तिप्पट फरक आहे. मग केरोसीन डिझेलमध्ये भेसळ करण्यासाठी वापरण्याची शक्यता आहे किंवा नाही ? हे विभागाच्या लक्षात का येत नाही की, आपण धान्याच्या ट्रान्स्पोर्टेशनवर जीपीएस सिस्टीम बसवितो, मग येथे का नाही ? केरोसीनची डिझेलमध्ये भेसळ होण्याची शक्यता जास्त आहे माफीया यामध्ये सक्रिय आहेत. मग आपण या संदर्भातील जीपीएस सिस्टीम सुरू करण्यासाठी केंद्र शासनावर का अवलंबून राहावयाचे ? आपण संबंधित कंपन्यांबरोबर कॉन्टॅक्ट करावा आणि त्यांच्या कॉस्टमध्ये ते इन्कॉर्पोरेट करून घ्यावे असे मत समितीने व्यक्त केले असता ट्रान्सपोर्टेशनचे जे कॉन्ट्रक्टर्स असतात त्यांच्या डिलर्सकडून ते त्यांच्या कॉन्ट्रॅक्टमध्ये समाविष्ट केले आणि तसे टेंडर मागविले तर ते इन्कॉर्पोरेट होईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच हे तीन महिन्यांत कंपनीकडून करून घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल असेही अवगत केले.

सदर निर्णय तीन महिन्यात झाला पाहिजे की, राज्यात शासकीय यंत्रणेमार्फत केरोसीन सप्लाय करणारी कोणतीही गाडी असली तरी त्या गाडीवर जीपीएस सिस्टीम असेल. जेणेकरून आपण त्याचा ट्रॅक रेकॉर्ड चेक करू. ट्रान्सपोर्टेशन कोठून कोठपर्यंत आहे, रुट कोणता आहे हे सर्व त्यावरुन कळते. असे समितीने विदित केले असता एकूण १५०० पेक्षा जास्त टँकर्स आहेत त्यामुळे आपल्याला प्रत्येक टँकरवर जीपीएस सिस्टीम बसविण्यासाठी ८ ते ९ हजार रुपये खर्च करावे लागतील. तसेच, त्याच्या मेंटेनन्ससाठी वेगळा खर्च येईल आपण नवीन कॉन्ट्रॅक्टमध्ये हा क्लॉज इन्कॉर्पोरेट करण्यासाठी प्रयत्न करू असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सर्वांचे कॉन्ट्रॅक्ट एकाच वेळी संपणार नसतील तर विभागाने तशी ऑर्डर काढावी अशी समितीने सूचित केले असता ते आपले कॉन्ट्रॅक्ट नाहीत, ते कंपनीचे कॉन्ट्रॅक्टस् आहेत आपण तसा आग्रह कंपनीला करू असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

तो निर्णय बीपीसीएल कंपनीने करावयाचा असून आपण कॉन्ट्रॅक्टमध्ये असा क्लॉज इन्कॉर्पोरेट करण्याबाबत निर्देश दिले पाहिजेत असे मत समितीने व्यक्त केले असता पूर्वीच्या कॉन्ट्रॅक्टची मुदत संपल्यानंतर नवीन कॉन्ट्रॅक्टमध्ये हा क्लॉज इन्कॉर्पोरेट करता येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

मधाशी सांगितल्याप्रमाणे राज्य सरकार केरोसीनवर एक रुपया देखील खर्च करीत नाही. त्यामुळे केंद्र शासनाने किंवा तेल कंपन्यांनी सप्लाय करताना तो कशा पद्धतीने करावयाचा आणि किती जास्तीचा खर्च करावयाचा याबाबत आपण तशी मागणी करू शकतो असे समितीने सूचित केले असता प्रॅक्टीकल अडचण अशी आहे की, त्यांचा कॉन्ट्रॅक्टचा कालावधी संपल्यानंतर नवीन कॉन्ट्रॅक्टमध्ये ही अट नमूद करता येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

भेसळीचे प्रमाण खूप मोठ्या प्रमाणावर असून शासनाला जीपीएस सिस्टीम बसविण्यासाठी जास्त खर्च करावा लागणार नाही जीपीएस सिस्टीम जास्त महागडी नाही. एका महिन्याला ५ लाख लिटरचे ट्रान्सपोर्टेशन आहे. समितीला वाटते की, १०० पेक्षा जास्त टँकर्स नसतील यावर विभागीय सचिवांनी एकूण ११०० टँकर्स असल्याचे विदित केले.

राज्य सरकारने त्या गाडीवर जीपीएस सिस्टीम बसविण्यासाठी खर्च केला आणि एका वर्षानंतर कॉन्ट्रॅक्ट संपले तर मग काय करावयाचे अशी पृच्छा समितीने केली असता ते ऑईल कंपनीने कंट्रोल करणे योग्य राहील म्हणून आपण तसा आग्रह धरीत आहोत असे विभागीय सचिवांनी विदित केले.

समिती या संदर्भात राज्य शासनाला शिफारस करेल असे समितीने विभागास सांगितले.

विभागाने लेखी माहितीमध्ये नमूद केलेले आहे की, "VTS बसविलेल्या वाहन/टँकर्सपैकी ९७ टक्के अकार्यरत असल्यामुळे PDS रॉकेलच्या गळतीवर बंधन घालण्याचे/अवैध हस्तांतरण रोखण्याचे उद्दिष्ट सफल झाले नव्हते. " म्हणजे तसे बघितले तर १०० टक्के वाहन/टँकर्स अकार्यरत असल्याचे समितीने नमूद केले. तसेच आज पर्यंत केरोसीनच्या ट्रान्सपोर्टेशन संदर्भात किती तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत अशी विचारणा समितीने केली असता ऑडिटच्या कालावधीत प्राप्त झालेल्या तक्रारींची संख्या ६३६८ आहे आणि १ लाख ३७ हजार तपासण्या करण्यात आलेल्या असून निलंबित, रद्द करण्यात आलेल्या परवान्यांची संख्या १९१४ आहे. तसेच, वसूलल करण्यात आलेली दंडाची रक्कम १ कोटी २८ लाख रुपये आहे. ३३ लाख लिटर केरोसीन जप्त करण्यात आले आणि त्याची किंमत ६ कोटी रुपये असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

१.४६ परिच्छेद क्र.२.२.१३ : पाम तेलाचे वितरण अत्यल्प भागात होणे :

सध्या शिधापत्रिकेवर पाम तेल देण्यात येते काय अशी विचारणा समितीने केली असता सध्या पाम तेल देण्यात येत नसून ते देणे बंद करण्यात आले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.४७ परि.क्र.२.२.१४ : एफपीएस आणि शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य वितरण करण्याच्या प्रणालीत सुधारणा करण्यासाठीच्या योजनेच्या अंमलबजावणीत झालेला विलंब :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी असे अवगत केले की, योजनेच्या अंमलबजावणीत झालेला विलंब विभागाला मान्य आहे. धोरणात्मक निर्णय घेण्यास वेळ लागलेला आहे. केंद्र शासनाची ही वाहने सन २००१ पर्यंत सुरू होती त्यानंतर हे बंद झाले. परंतु, ज्या कन्डिशनमध्ये वाहने आहेत त्या कन्डिशनमध्ये ती आताही सुरू आहेत ती बंद झालेली नाहीत. तसेच, सुधारीत धान्य हमी योजना किंवा घरपोच धान्य योजना सुरू करण्यासाठी सन २००६ मध्ये समिती नियुक्त करण्यात आली होती त्या समितीने सन २००९ मध्ये अहवाल सादर केला आणि सन २०१२ मध्ये या संदर्भात शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. विभागाने माहे एप्रिल, २०१७ मध्ये तो शासन निर्णय रिव्हाईज केलेला आहे.

सन २००६ मध्ये समिती नियुक्त करण्यात आली होती समितीने सन २००९ मध्ये अहवाल सादर केला. त्यानंतर सन २०१२ मध्ये शासन निर्णय निगमित करण्यात आला मग तीन वर्षे विलंब का झालेला आहे अशी विचारणा समितीने केली असता सन २००१ ते २००६ मध्ये सुरू होते सन २००६ मध्ये केंद्र शासनाने निर्णय घेतला त्यानंतर सन २००९ मध्ये समिती नियुक्त करण्यात आली. सन २००६ ते २००९ या कालावधीत विलंब झालेला आहे. सन २००९ मध्ये समिती नियुक्त केल्यानंतर सन २०१० मध्ये समितीने आपला अहवाल सादर केला. त्यानंतर दिनांक २३ फेब्रुवारी, २०१२ रोजी या संदर्भातील शासन निर्णय निर्गमित करण्यात आला असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली आहे काय अशी पृच्छा समितीने केली असता शासन निर्णयाची अंमलबजावणी झालेली आहे. राज्यातील ८-१० जिल्ह्यात अंमलबजावणी झाली नव्हती. ज्या ठिकाणी कॉन्ट्रॅक्ट फिक्स झाले तेथे सदर योजनेची अंमलबजावणी झाली. आपण माहे एप्रिल, २०१७ मध्ये सुधारीत शासन निर्णय काढलेला आहे. आता सर्व जिल्ह्यात द्वारपोच योजनेची अंमलबजावणी झालेली आहे. आता ३ जिल्ह्ये राहिलेले आहेत. रायगड, नांदेड व सातारा येथील केस न्यायालयात असून रायगड आणि रत्नागिरी जिल्हे राहिलेले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. ज्यांना कॉन्ट्रॅक्ट मिळाले नाही त्यांनी चॅलेन्ज केले असल्याचे अवगत केले.

त्यामुळे आपण सिस्टीमचे काम कसे काय थांबवू शकतो ? न्यायालयाने या संदर्भात काही निर्देश दिलेले आहेत काय या समितीच्या प्रश्नाला कोर्टाने स्थगिती दिलेली असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

न्यायालयाने अंमलबजावणी करण्याबाबत स्थगिती दिलेली आहे मग आपण त्या विरुद्ध अपिल केले नाही का अशी विचारणा समितीने केली असता होय, नांदेडचे व्हॅकेट झाले आहे आता ते उघडतील व काम करतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आपण जेव्हा सुधारीत पद्धतीने काम करण्यास घेतो तेव्हा सिस्टीमची अंमलबजावणी झाली पाहिजे. सिस्टीमची अंमलबजावणी कोर्टास मान्य नसेल तर वरच्या कोर्टात जाऊन त्या विरोधात अपील करू शकतो असे समितीने सूचित केले असता नांदेड जिल्हा कोर्टाने निर्णय दिला. हायकोर्टात अपील करण्याऐवजी जिल्ह्याचे प्रकरण असल्यामुळे जिल्हाधिकारी कार्यालयाकडून कन्व्हेन्स करण्यात आले. दोन महिन्यांची स्थगिती होती, ती स्थगिती उठविण्यात आली. त्यामुळे आता नांदेडचा प्रश्न सुटेल, रायगड, रत्नागिरी व सातारा येथे स्थगिती आहे. स्पेशल कॉन्सिल नियुक्त करून साता-याची स्थगिती व्हॅकेट करून घेतो साता-याची केस ॲडव्होकेट जनरल घेणार आहेत. रायगड व रत्नागिरी येथे वारंवार टेंडर काढून कार्यवाही झालेली नसून आता ही कार्यवाही अंतिम टप्प्यात असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

साता-यातील वाई येथे एक प्रकरण घडले आहे, विकलेला माल गोडाऊनमध्ये सापडला होता असे समितीने विदित केले असता यासंदर्भातील शासन निर्णय आता सुटसुटीत केल्यामुळे गैरप्रकार करणा-यांची साखळी तुटलेली आहे त्यामुळे जास्त चॅलेंजेस होऊ लागले आहेत. १० ठिकाणी गोडाऊनपासून डायरेक्ट दुकानापर्यंत थेट वाहतूक झाली असल्याचेही समितीस विभागीय सचिवांनी अवगत केले.

सुधाकर जोशी समिती नियुक्त करण्यात आली होती, त्या समितीने ज्या शिफारशी केल्या त्या जशाच्या तशा स्वीकारल्या आहेत की त्यामध्ये काही बदल केलेला आहे. अशी पृच्छा समितीने केली असता, समितीच्या सर्व शिफारशी स्वीकारण्यात आल्या नाहीत. सन २०१० मध्ये त्या शिफारशी कॅबिनेट समोर गेल्या होत्या व त्यासंदर्भातील निर्णय सन २०१२ मध्ये झालेला होता. सन २००९ मध्ये समिती नियुक्त केली होती. सन २०१० मध्ये शिफारशी आल्या होत्या व सन २०१२ मध्ये त्याची निर्णय प्रक्रिया सुरू झाली असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

समितीचा केवळळ फार्स केला आहे, जुन्या नार्मस् प्रमाणे सुधारित वितरण पद्धतीमध्ये सूचविलेल्या प्रक्रियेनुसार बदल करण्यात आला. मागील काळात शासननिर्णयाचा मसूदा तयार करण्यात आला तोच लागू करण्यात आला आहे. सुधाकर जोशी समितीच्या शिफारशींचा विभागाने केवळ नावापुरता उपयोग करून घेतला असल्याचे समितीने विदित केले असता, समितीने महामंडळ करावे असे नमूद केले होते ते काम आपण आपल्या यंत्रणेमार्फत केले आहे ते आता कालबाह्य झाले आहे. त्यासंदर्भात दोन शासन निर्णय काढण्यात आले असून सर्व जिल्ह्यात यासंदर्भात अंमलबजावणी झाली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

यासंदर्भात वर्तमानपत्रात अशी बातमी आली आहे की, ३०० ते ३२५ पट जास्त वाहतुकीचे टेंडर येतात असे समितीने निदर्शनास आणले असता, आता तसे होत नसून आता बेस रेट पेक्षा ब-याच ठिकाणी कमी टेंडर आले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या अगोदर बेस रेट पेक्षा किती जास्त रकमेचे टेंडर येत होते अशी विचारणा समितीने केली असता, आपण पर्याची वाहतुकीला परवानगी देत होतो. जेथे टेंडर फिक्स झाले नाही किंवा वारंवार टेंडर होते त्या ठिकाणी जिल्हाधिकारी यांना अधिकार होते की, स्पॉट कोटेशन मागविण्यात यावे. निवडणुकीची वाहतूक केली असेल किंवा आरटीओचे रेट मागवून तसेच इतर लोकल माहिती घेऊन दोन तीन पट रेट जास्त दिले जात होते. ३०० पट वगैरे रेट जास्त दिले जात नव्हते. अगोदर पेक्षा आता आपण सेव्हींग करीत आहोत. ५ ते १० टक्के अबोव्ह टेंडर येत असते ५ टक्के अबोव्हपर्यंतचे टेंडर मंजूर करण्याचे अधिकार जिल्हाधिकारी यांना आहेत. ५ टक्केच्यावर टेंडर असेल तर शासनाची मंजुरी घ्यावी लागते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.४८ परिच्छेद क्र.२.२.१४.१ FCI ला चुकीने प्रदान केलेल्या जकातीचा परताव्यासाठी दावा न करणे :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, यामध्ये जवळपास ६ कोटी रुपयांची रक्कम आहे. हे अतिशय किचकट काम असून या कामाबाबत शासनाकडून पाठपुरावा सुरू आहे. १० जिल्ह्यातील महानगरपालिकांकडून रेकॉर्ड घेऊनन एफसीआयकडून परतावा घ्यावा लागेल. त्यासंदर्भातील कार्यवाही सुरू आहे त्यामध्ये अद्याप आम्ही यशस्वी झालो नाही. काही ठिकाणी कंत्राट देऊन जकात वसूल केली जात होती.

हे पेमेंट करण्याची आवश्यकता नव्हती हे एक्झमटेड आहे असे समितीने विदित केले असता, काही ठिकाणी जकात वसुलीचे कंत्राट होते ते सर्वांकडून रक्कम वसूल करून घेत होते. ही सर्व माहिती गोळा करून पावत्यांसह महानगरपालिकेकडून परतावा घ्यावा लागेल. सदर परतावा एफसीआयच्या नावाने महानगरपालिकेला द्यावा लागेल त्यानंतर ते पेमेंट शासनाला मिळेल अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

सदर पेमेंट एफसीआयला केले की, महानगरपालिकेला केले आहे या समितीच्या प्रश्नाला सदर पेमेंट आपण एफसीआयला केले असून एफसीआयने महानगरपालिकेला केले असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, आता ते परतावा करणार नाहीत कारण जीएसटी लागू झाला आहे . यासंदर्भात विभागीय सचिवांनी मागच्या रेकॉर्डमध्ये त्यांनी चुकीने केले असेल तर त्यांना पेमेंट रिटर्न करावे लागेल असा खुलासा केला.

तसा क्लेम विभागाने केला आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, त्या संदर्भातील पावत्या व सर्व पेपर गोळा करावे लागतील. Unless we facilitate them with all the records we will not be able to get....असा खुलासा केला याअनुषंगाने प्रधान महालेखाकार यांनी असे विदित केले की, Why should we facilitate FCI. They quoted rate which was inclusive of octroi. यावर If you have dealt with FCI, you will come to know असे विभागीय सचिवांनी विदित केले.

You have to take it from FCI असे प्रधान महालेखाकार यांनी सांगितले असता They will not give असे विभागीय सचिवांनी विदित केले.

We don't know whether they had paid to the BMC or what they have done. It is their problem अशी विचारणा समितीने केली असता : We have not been able to get it from FCI. Now, taking all the records असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सन २००८ ते २०१२ मध्ये महालेखाकर यांनी ही बाब लक्षात आणून दिल्यानंतर ही कार्यवाही आपण केव्हा सुरू केली आहे. त्यानंतर आपण एफसीआयकडे आपल्या क्लेमचे पत्र कोणत्याही जिल्ह्याकडून दिले नाही अशी समितीची माहिती आहे असे समितीने अवगत केले असता, असे पत्र देण्यात आले आहे त्यासंदर्भातील माहिती समितीला उपलब्ध करून देण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

या बाबत कन्क्ल्यूजन का होत नाही स्पष्टपणे सूचना दिल्या असत्या तर ही कार्यवाही झाली असती असे समितीने नमूद केले असता काही कंत्राटदार कोणत्याही आयटमवर रक्कम वसूल करीत होते तो माल पास करून देत नव्हते त्या अनुषंगाने ही बाब झालेली आहे. काही बाबी अनावधानाने झालेल्या असतील असे, विभागीय सचिवांनी सांगितले.

आपण जे जकातीचे पेमेंट केले त्याची पावती एफसीआयने आपणाला दिली असेल. एफसीआयच्या अधिका-यांनी जकात स्वत: भरली नसेल तर त्याची पावती आपणाकडून कशी काय घेणार. त्यांनी जकात भरली किंवा नाही त्याची खातरजमा आपण कसे करणार आहात अशी पृच्छा समितीने केली असता, त्यांनी जकात भरलेली आहे म्हणून सहा कोटीचे रेकॉर्ड आपणाला माहिती आहे. त्यांनी महानगरपालिकेला पैसे भरले आहेत. आपण एफसीआयला त्यापोटी सहा कोटी रुपये दिले आहेत. १० शहरातील महानगरपालिकेच्या पावत्या गोळा करून एफसीआयच्या नावाने परतावा घ्यावा लागेल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२००८ ते २०१२-१३ पर्यंत ही कार्यवाही झालेली असल्याचे समितीने अवगत केले असता, कोल्हापूर येथील जकात २०१५-१६ मध्ये बंद झाली असल्याचे समितीस अवगत केले.

सन २०१३ मध्ये महालेखाकार यांनी सांगितल्यानंतर ही बाब विभागाच्या लक्षात आली. २०१४ ते २०१६ व २०१७ च्या पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे. यासंदर्भात आताची परिस्थिती काय आहे अशी विचारणा समितीने केली असता महानगरपालिकांशी संपर्क केला असून त्यांच्याकडून कागदपत्रे मिळविण्याचा प्रयत्न सुरू आहे एफसीआयकडे पाठपुरावा करण्यात आला असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

यासंदर्भात महानगरपालिकेने रिस्पॉन्स दिला किंवा नाही या समितीच्या प्रश्नाला या विषयाच्या संदर्भात निधी मिळालेला नाही निधी मिळविण्याचे प्रयत्न सुरू आहेत. जिल्हाधिकारी यांना पत्र लिहितो, जिल्हाधिकारी महानगरपालिकांकडे पाठपुरावा करतात. महानगरपालिकेला रेकॉर्ड मिळाल्यावर ते एफसीआयकडे रिफंडची प्रोसेस करतील अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

सन २००८ पासून २०१२ पर्यंतचा हा कालावधी असून सन २००८ च्या अगोदर आपण जकातीचे पेमेंट कधीच केले नाही. या स्पेसिफिक कालावधीत हे पेमेंट कसे काय झाले आहे. त्यासंदर्भात काही परिपत्रक आले होते काय की या पुढील जकातीचे पेमेंट सरकारने करावे. हे पेमेंट कोणत्या हेडमधून केले आहे. ज्या अधिका-यांनी पेमेंट केले असेल, डीएसओ यांनी पेमेंट केले असेल त्यांनी कोणत्या आधारावर व कोणत्या अधिकारात पेमेंट केले. त्यांना शासनाकडून कोणत्या सूचना आल्या होत्या. यासंदर्भातील तपास कोण करणार याची माहिती घेतली पाहिजे. ज्या अधिका-यांनी पेमेंट केले हे पेमेंट शासनाच्या ट्रेझरीमधून गेले आहे. ट्रेझरीमधून पेमेंट करण्यासाठी शासनाचे आदेश पाहिजेत, सूचना पाहिजेत असे नसेल तर पेमेंट कसे काय केले जाईल ॲडव्हॉन्स पेमेंट कसे करण्यात आले. एफसीआयने पेमेंट केले म्हणून तुम्ही त्यांना पेमेंट करणार. एफसीआयने ॲडव्हॉन्स पेमेंट केले असेल तर त्याची पावती ॲडव्हॉन्समध्ये तुमच्याकडे आली तरच तुम्ही त्यांना पेमेंट करणार. आपण एफसीआयच्या गोडाऊनमधून माल घेतो त्यामुळे तुम्हाला जकात लागण्याचा प्रश्न निर्माण होत नाही असे समितीने अवगत केले असता, कडधान्य व इतर धान्याचे पैसे ॲडव्हॉन्समध्येच द्यावे लागतात त्यावेळी तो पैसा त्यांनी आपणाकडून घेतला असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

त्या अगोदर तसे पेमेंट करण्यात आलेले नाही अशा नवीन पेमेंटची सुरूवात सन २००८ मध्ये कशी काय करण्यात आली. यासंदर्भात नुसती माहिती घेऊन चालणार नाही तर कोणत्या अधिका-यांनी हे केले याची चौकशी करावी लागेल. पूर्ण राज्यात हे झालेले नाही १० ठिकाणच्या महापालिकांमध्ये हा प्रकार झालेला आहे असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले. याअनुषंगाने प्रधान महालेखाकारांनी असे मत व्यक्त केले की, My suggestion to the Committee is that, if they are able to establish how much payment was done to the MCGM and other Corporations on account of octroi by the FCI, there should be triparte meeting with MCGM, and your department, and make them refund it to FCI and FCI refund it to us. यावर विभागीय सचिवांनी We will take meeting with UD-2 which deals with all the Corporations. असे सांगितले.

तुम्ही ते त्यांच्याकडून घ्यावे असे समितीने सांगितले असता पावती व रिफंड प्रोसेस झाल्याशिवाय करता येत नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. प्रत्येक महानगरपालिकेची प्रोसेस आहे. पावती मिळाल्याशिवाय त्यांना रिफंड देता येणार नाही त्यामुळे पावती गरजेची आहे. त्यांच्याकडेही ऑडिट, इंटर्नल ऑडिट, एक्स्टर्नल ऑडिट, महालेखाकारांचे ऑडिट आहे. त्यामुळे आपल्याला असे करता येणार नाही असेही समितीस अवगत केले.

या संदर्भात हा पेमेंट देण्याचा निर्णय कसा झाला, ते पाहिले पाहिजे, त्यामुळे चौकशी करावी, त्यांचे कोण अधिकारी जबाबदार आहेत, त्याची माहिती घ्यावी.विभागाने त्यांच्यावर कारवाई केली पाहिजे कारण हे अचानक का सुरू झाले. तसेच ६ कोटी ५५ लाख रुपये हा आकडा कुठून आला आहे अशी विचारणा समितीने केली असता जबाबदार व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत विभागीय सचिवांनी सकारात्मक असल्याचे सांगितले. तसेच विभागाने एफसीआयला काय भरले, ते आपल्याला माहीत असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले असता, तुम्ही फक्त ४ कोटी ७५ लाख रुपये दाखवित आहात हा ६ कोटी ७५ लाख रुपयांचा आकडा आहे हा आकडा कुठून आला आहे? आपल्याकडे याची पावती असेल असे समितीने विचारले असता आपण ते एफसीआयमध्ये भरले असून महालेखाकारांनी आक्षेप घेतला असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

त्यामुळेच समिती असे सांगत आहे की, आपली पावती त्यांच्याकडे एफसीआयकडे सबमिट करावी, ते डेट पाहतील असे समितीने सूचित केले असता, तेही प्रयत्न केले असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

पावतीवरुनच आकडा आला आहे ६ कोटी ५५ लाख रुपयांच्या पावत्या आपल्याकडे आहेत का ? अशी विचारणा समितीने केली असता, एफसीआयचे रेकॉर्ड आपल्याकडे आहे आपण एफसीआयला जिल्ह्यामध्ये जमा केले, त्याची माहिती आपल्याकडे आहे असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

६ कोटी रुपयांचा आकडा ५ वर्षांचा आहे महालेखाकार कार्यालयाने दरवर्षीच्या फुटनोटला दिले आहे सन २००८-०९ मध्ये २ कोटी रुपये आहेत असा खुलासा प्रधान महालेखाकार यांनी केला. अशी रुपये ६.५५ कोटी इतकी रक्कम वसूल करायची आहे असेही समितीस अवगत केले.

ही अतिशय मोठी रक्कम असून समितीला असे वाटत आहे की, विभागाकडे पावती नाही ६ कोटी ५५ लाख रुपयांची पावती नाही का अशी विचारणा समितीने केली असता एफसीआयची, महानगरपालिकेची रिसिट असेल, एफसीआयची माहिती आहे त्या माहितीवरुन काढले असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच एफसीआयला ऑन रेकॉर्ड जकातीचे पेमेंट केले त्याची माहिती रेकॉर्डवर असून ती जिल्हयांमध्ये असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्यांनी एफसीआयला जे पेमेंट केले आहे, त्याची माहिती द्यावी. एफसीआयकडे एवढ्या पावत्या नसतील तर ते क्लेमच करू शकणार नाहीत असे समितीने अवगत केले . तसेच What is the conclusion on this para अशी विचारणा प्रधान महालेखाकार यांनी केली. तसेच विभागाने संयुक्त बैठक नगरविकास विभाग-२ च्या प्रधान सचिवांसोबत घ्यावी तसेच महानगरपालिकेच्या संबंधित अधिका-यांनाही बैठकीमध्ये बोलाविण्यात यावे. बैठक घेऊन तुम्ही हे रेकॉर्डवर येऊ द्यावे असे समितीने विभागास सूचित केले.

१.४९ क्रमांक २.२.१५ गोदामे बांधण्यातील विलंब :

गोदामांचे बांधकाम करण्यासाठी नाबार्डकडून ४५९.९३ कोटी रुपये प्राप्त झाले असून शासनाने किती निधी उपलब्ध करून दिला होता याबाबत समितीने विचारणा केली असता, या वर्षापर्यंत ३५० कोटी रुपये निधी उपलब्ध झाला आहे. तरतूद २९२ कोटी रुपयांची झाली आहे आणि त्याचे वाटपही झाले असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

केंद्र सरकार व नाबार्ड यांच्याकडून किती निधी प्राप्त झाला आहे, ४५९.९३ कोटी रुपये आहेत त्यामध्ये ५०:५० टक्के असा रेश्यो आहे का अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी नाही, आपण नाबार्डकडून कर्ज स्वरुपात रक्कम घेतो. साधारणत: नॉमिनल ५ टक्के तर कधी ६ टक्के या व्याजदराने ते असते. या संदर्भातील एकूण निधी वित्त विभागाकडे जमा होतो. आपल्याकडे वित्त विभागाकडून तरतूद येते, त्यातून खर्च करतो, त्याचे क्लेम नंतर नाबार्डकडे जातात त्याचा पैसाही वित्त विभागाकडे जमा होतो अशी माहिती समितीस दिली.

मग त्याचा रेकॉर्ड मागण्यामध्ये उशीर का झाला आहे या समितीच्या प्रश्नाला आपल्याला आवश्यक तरतूद मिळत नाही, त्यामुळे कार्यक्रमाला उशीर होतो. आज अखेरची परिस्थिती अशी आहे की, आपण सुरूवातीला २३७ गोदामांची कामे हाती घेतली, १५३ गोदामांची कामे पूर्ण झाली आणि ४९ गोदामांची कामे प्रगतीपथावर आहेत, ३५ गोदामांची कामे आजही निविदा, तांत्रिक मान्यता या स्तरावर आहेत, १५ गोदामांची कामे रद्द झाली आहेत. ३५ गोदामांमध्ये १५ गोदामे अंतर्भूत आहेत. २० गोदामांच्या कामांच्या संदर्भात तांत्रिक मान्यता, जमीन निविदा ही कामे सुरू असल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

समितीची माहिती अशी आहे की, गोदामांसाठी ज्या रकमांच्या तरतुदी झाल्या होत्या, त्याही आपण वापरु शकलेला नाही अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी तसे नसून आपणास जितके वाटप झाले आहे, तितका खर्च झाला आहे फक्त एका वर्षात खर्च कमी केला आहे. सन २०१२-१३ मध्ये ६० कोटी रुपये मिळाले होते, त्यातील ४६ कोटी रुपये खर्च झाले होते. बाकी वर्षांमध्ये ३१ कोटी रुपये मिळाले, ३१ कोटी रुपये खर्च झाले आहेत, २४ कोटी रुपये मिळाले, २४ कोटी रुपये खर्च झाले आहेत, ५४ कोटी रुपये मिळाले, ५४ कोटी रुपये खर्च

झाले आहेत. मी या संदर्भातील तक्ता आपल्याकडे देतो. आम्हाला २० ते ३० कोटी रुपयांच्या वर तरतूद मिळत नाही यावेळी पहिल्यांदाच ८० कोटी रुपये मिळाले असल्याचे समितीस अवगत केले.

गोदाम बांधण्याचे उद्दिष्ट काय आहे अशी पृच्छा समितीने केली असता आपल्याला २३७ गोदामेच पुरत आहेत. २३७ गोदामांपैकी १५ गोदामे कमी झाली आहेत आपल्याला २२२ गोदामेच पूर्ण करावयाची आहेत. ४९ गोदामांची मान्यता वगैरे घेण्याचे कामे सुरू आहे. यावर्षी ती ४९ गोदामे पूर्ण होतील बाकी गोदामांची कामे सुरू आहेत, ती कामे पुढच्या वर्षी पूर्ण होतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच ही कामे वखार महामंडळाच्या माध्यमातून होत नसून सार्वजनिक बांधकाम विभागाच्या माध्यमातून डायरेक्टली होत असल्याचे विदित केले. आणि ही गोदामे तहसिलदार, जिल्हाधिकारी यांच्या ताब्यात राहणार आहेत. आधीच्या ५८४ गोदामांऐवजी २२२ गोदामे घेतली आहेत, कारण आपण गोदामांचा आकार वाढविला आहे आणि कमी गोदामे घेतली आहेत असेही समितीस अवगत केले.

गोदामांचे इन्फ्रास्ट्रक्चर कोण तयार करते, गोदामे कंपाऊंडेड असतात का, गोदामांना सुरक्षेची काय व्यवस्था असते, आपल्याला किती साठवणूक क्षमता गरजेची आहे अशी विचारणा समितीने केली असता, गोदामांच्या संदर्भातील सर्व कामे सार्वजनिक बांधकाम विभागाकडे आहेत ती कामे कमाल गोदामे असलेल्या ठिकाणीच ते घेतात. गोदामे कंपाऊंडेड असून सुरक्षा व्यवस्थाही असते असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले. तसेच आपल्याकडे ४.८३ लाख टन ॲलॉकेशन आहे. त्याच्या तिप्पट ३ महिन्यांचे स्टोअर आपल्याकडे असले पाहिजे. आजच्या परिस्थितीत आपण ही सर्व गोदामे पूर्ण केली तर २ महिन्यांचा साठा आपल्याकडे होईल. आपल्याला आताही १ महिन्याचा साठा करावा लागेल. पण आता थेट वाहतूक झाल्यामुळे गोदामे १ पट करण्याची गरज राहिलेली नाही. शहरी भागात कमाल सरळ थेट वाहतूक एफसीआय ते दुकानदार अशी सुरू केली आहे फक्त मध्ये एका ठिकाणी मोठ्या गाडीतून लहान गाडीमध्ये ट्रान्सफर करण्यात येते असेही समितीस अवगत केले.

आपला पूर्वीचा आकडा ५८४ गोदामे असा आहे ती आपल्याला नको आहेत का अशी विचारणा समितीने केली असता आता नको आहेत आता आपण त्याचा आकार वाढविला आहे आणि गोदामे कमी केली आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

आपली साठवण क्षमता फक्त ३ महिन्यांपुरती ठेवतो का? या समितीच्या प्रश्नाला तसाच नॉर्म्स आहे ३ महिन्यांचीच साठवणूक क्षमता असते. साधारणतः महिन्याला रोल ओव्हर करतो पण सेफ्टीसाठी ३ महिने ठरविले आहेत असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाला आता फंडचा कमतरता आहे का अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी केली असता आतापर्यंत इतका निधी नव्हता. पण यावर्षी पहिल्यांदा ८० कोटी रुपये मिळाले आहेत चौपट निधी मिळाला आहे, नाही तर आपल्याला २०-२२-२५ कोटी रुपये याच्यावर कधीही निधी मिळत नव्हता. एकाच वर्षी जास्त निधी मिळाला होता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

आपण ५८४ गोदामे बांधणे अपेक्षित आहे, हे उत्तर कधी दिले आहे अशी समितीने विचारणा केली असता, सन २०१४ मध्ये त्यांचे तसे नियोजन होते असा खुलासा प्रधान महालेखाकार यांनी केला. समितीने पुनः अशी विचारणा केली की, हे उत्तर आता दिले आहे नाबार्डच्या मंजुरी पत्रानुसार ५ लाख ९५ हजार लाख मेट्रिक टन असे दिले आहे. यावर विभागीय सचिवांनी ते बरोबर असून ते नियोजित होते व सन २०१५-१६ च्या अगोदरचे असल्याचे सांगितले.

विभागाने उत्तरात सुधारणा का केली नाही ? कारण उत्तरात अगोदर ५८४ चा उल्लेख येतो. ५ लाख ९५ हजार लाख मेट्रिक टनसाठी ५८४ गोदामे बांधणे अपेक्षित आहे, हे तुमचे रेकॉर्डवरील उत्तर आहे. आता आपण २३७ सांगत आहात याबाबत समितीने विचारणा केली असता, ३ लाख ३३ हजार टन आणि त्यासाठी २३७ गोदामे अशी स्थिती असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

विभागाने नव्याने सबमिशन केले पाहिजे होते असे समितीने सूचित केले असता, सुधारीत उत्तर देण्यात येणार होते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या विषयाच्या संदर्भात वित्त विभागाला देखील विचारले पाहिजे की, या योजनेंतर्गत नाबार्डने ९१.९८ कोटी रुपये दिले, मग त्यांनी यांना टप्प्याटप्प्याने पैसे का दिले नाहीत ? ते पैसे कन्सॉलिडेटेड फंडमध्ये आले अशी विचारणा प्रधान महालेखाकार यांनी केली असता योजना अशी होती की, नाबार्ड फायनान्स करते, मात्र पहिल्यांदा आपण हा खर्च करायचा आहे आणि नंतर ते रिईम्बर्स करणार आहेत. ते डायरेक्टली पैसे देत नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

What our information is that, 91.98 cr was released as mobilisation advance to the consolidated fund of the State. They were to release it to you depending on your progress of expenditure. आपण म्हणत आहात की, आपल्याला काही गोदामे फंड क्रंचमध्ये करता आली नाहीत असे प्रधान महालेखाकार यांनी विचारले असता विभागीय सचिवांनी असे काही म्हटले नसल्याचे समितीस अवगत केले.

इतके दिवस का लागले, या प्रश्नाला उत्तर असे आहे की, निधी मिळाल्याप्रमाणे गोदामे पूर्ण झाली असे समितीने विभागाच्या निदर्शनास आणले. आपण या प्रश्नाचे सुधारीत उत्तर दिले पाहिजे होते. आता आपण ३ लाख ३३ हजार मेट्रिक टन हे रेकॉर्डवर सांगत आहात उत्तरामध्ये तसे काहीही नसल्याचे समितीने विभागास अवगत केले.

Are you saying that funds was not an issue अशी विचारणा प्रधान महालेखाकार यांनी केली असता No.I didn't say that असे विभागीय सचिवांनी सांगितले.

या परिच्छेदाच्या अनुषंगाने वेटींगच्या वेळी महालेखाकार यांना दिलेल्या उत्तरामध्ये असे नमूद केले आहे की, "शासनाने गोदामाच्या बांधकामाची प्रगती असमाधानकारक असल्याचे मान्य करताना असे नमूद केले आहे की, नोव्हेंबर, २०१३ ची ३ लाख २४ हजार मेट्रीक टन क्षमतेची २३४ गोदामे बांधण्यासाठी प्रशासकीय मान्यता देण्यात आली होती." परंतु विभागाने दिलेले उत्तर मात्र सुधारित केलेले नाही. ही बाब रेकॉर्डवर राहिली तर हा विषय मिटणार नाही. विभागाने हे उत्तर सुधारित करून पाठवावे असे समितीने विभागास सूचित केले. तसेच Also send reply on this funds issue. असे प्रधान महालेखाकार यांनी विभागास सूचित केले असता विभागीय सचिवांनी होय असे उत्तर समितीस दिले.

१.५० परिच्छेद क्र.२.२.१५.१ गोदामामध्ये साठविलेल्या अन्नधान्याचा विमा न उतरविणे :

उपरोक्त परिच्छेदाच्या बाबतीत विभागाचे काय म्हणणे आहे अशी विचारणा समितीने केली असता, आता सर्व गोदामातील अन्नधान्याचा विमा उतरविलेला असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले. यावर समितीने त्या कालावधीत अन्नधान्याचा विमा उतरविलेला नव्हता असे विभागास अवगत केले.

As you said that you had no funds problem for that 237. आपण नमूद केले की, आम्ही ज्या ज्यावेळी निधीची मागणी केली त्या त्यावेळी वित्त विभागाने निधीचा पुरवठा केला अशी विचारणा प्रधान महालेखाकारांनी विभागास केली असता, तसे झाले नसल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

This is what I am trying to tell you that Rs. ९१.९८ cr. was received by the State Government from NABARD under this scheme specifically असे प्रधान महालेखाकारांनी विचारले असता, They have released Rs. 349 Cr.असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

We want to know about Rs. 91.98 Cr असे प्रधान महालेखाकारांनी अवगत केले असता, हा वित्त विभागाशी संबंधित विषय असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

त्या कालावधीत विमा उतरविण्याची तरतूद नव्हती या मागील कारण काय आहेत अशी विचारणा समितीने केली असता, त्यावेळी काही रिन्यूअल्स नव्हते आणि काही लोकांनी प्रस्ताव दिले नव्हते. परंतु आता १०० टक्के गोदामातील अन्नधान्याचा विमा उतरविलेला असल्याचे तसेचच त्या कालावधीत विमा उतरविण्याची पद्धत अस्तित्वात होती असे विभागीय सचिवांनी विदित केले.

विमा उतरविण्याची पद्धत अस्तित्वात होती तर आपण त्या कालावधीत गोदामातील अन्नधान्याचा विमा का उतरविला नाही या समितीच्या प्रश्नाला या बाबतीत कारणे दाखवा नोटीस जारी करून या संदर्भातील माहिती घ्यावी लागेल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

१९९ गोदामात साठविलेल्या अन्नधान्याचा विभागाने विमा उतरविलेला नव्हता विमा न उतरविल्यामुळे विभागाला काय नुकसान झाले आहे याबाबत समितीने विचारणा केली असता, कोणत्याही गोदामात अनुचित घटना न घडल्यामुळे विभागाला नुकसान झाले नाही. परंतु आता १०० टक्के सर्व गोदामातील अन्नधान्याचा विमा उतरविलेला आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने दिलेल्या ज्ञापनात सर्वात शेवटी नमूद केले आहे की, सद्य:स्थितीत सर्व ५ जिल्ह्यांनी अन्नधान्याचा विमा उतरविलेला नाही याबाबत समितीने विचारणा केली असता, हा तपशील त्या काळातील आहे विभागाने आता केवळ पाचच नव्हे तर सर्व जिल्ह्यातील गोदामांचा आढावा घेतला आहे. त्यानुसार सर्व जिल्ह्यांमध्ये ५५ लाख रुपये प्रिमियम भरून गोदामांतील अन्नधान्याचा विमा शासकीय कंपनीकडून उतरविलेला आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

विभागाकडून मोठ्या प्रमाणावर हप्त्यापोटी विमा रक्कम भरण्यात येते विभाग शासनाची कन्सोलेटेड इन्शुरन्स कंपनी का स्थापन करीत नाही या समितीच्या प्रश्नाला शासनाच्या विम्याची रक्कम राज्याच्या विमा संचालनालय (Directorate of Insurance) यांच्याकडे भरण्यात येते. त्यांच्याकडे प्रस्ताव सादर केला जातो आणि त्यानंतर ते मान्यता देतात त्यांचा प्रिमियम सुद्धा नॉमिनल असतो अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

अमरावती जिल्ह्यात काय कारवाई झाली, या बाबतचे उत्तर सादर करण्यात आलेले नाही. अमरावती, ठाणे, जळगांव या जिल्हयांत गोदामामध्ये ठेवलेल्या अन्नधान्याचा विमा उतरविलेला नव्हता. परंतु आता विभागाचे म्हणणे आहे की, सर्व जिल्ह्यातील गोदामातील अन्नधान्याचा विमा उतरविण्यात आलेला आहे अशी पृच्छा समितीने केली असता होय, आता सर्व जिल्ह्यातील गोदामातील अन्नधान्याचा विमा उतरविलेला आहे. विभागाने गोदामातील अन्नधान्याचा विमा उतरविण्यावर भर दिला. परंतु त्या कालावधीत विमा का उतरविण्यात आला नाही याबाबत संबंधितांना कारणे दाखवा नोटीस जारी करून त्यांच्याकडून खुलासा मागविण्यात येईल असे विभागीय सचिवांनी समितीस आश्वासित केले.

१.५१ परिच्छेद क्र.२.२.१६ संनियंत्रण :

परिच्छेद क्र. २.२.१६.१ : ''गोदामांची तपासणी निर्धारित संस्थेत न होणे'' :—

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, गोदाम तपासणीकरीता इष्टांक पूर्ण करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षित अधिकारी/कर्मचारी उपलब्धतेसाठी विभागाकडून कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, आता टीमची संख्या वाढवून दिलेली आहे पूर्वी ५ व्यक्तींची एक टीम होती. परंतु आता २ व्यक्तींची टीम करण्यात आलेली आहे. तसेच लोकांना आवश्यक ते प्रशिक्षण सुद्धा दिलेले आहे. पूर्वी केवळ १० लोक प्रशिक्षित होते आता २५ लोकांना प्रशिक्षित केले असून ५ लोकांऐवजी २ लोकांची टीम केल्यामुळे तसेच २५ लोकांना प्रशिक्षित केल्यामुळे स्क्वॉडची संख्या सुद्धा वाढलेली आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला तसेच पूर्वी केवळ २ स्क्वॉड होते आणि सध्या ५ स्क्वॉड आहेत. २०१५-१६ आणि २०१६-१७ मध्ये पूर्ण उद्दिष्ट साध्य केले आहे असेही अवगत केले.

पूर्वीच्या स्क्वॉड संख्येच्या तुलनेत विभागाने आता स्क्वॉडची संख्या अडीच पट केली. या स्क्वॉडने २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षातील तपासणीचे उद्दिष्ट साध्य केले असे विभागाचे म्हणणे आहे. स्क्वॉडला कोणत्या जिल्ह्यांत किती उद्दिष्ट दिले होते? याबाबत समितीने विचारणा केली असता, विभागाकडे या संदर्भातील आकडेवारी तयार आहे, परंतु सध्या उपलब्ध नसल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले.

तसेच स्क्वॉडला तपासणीमध्ये जे आढळून येते त्या अहवालावर ॲक्शन टेकन रिपोर्ट सादर केला जातो काय किंवा त्यांचे जे निदेश असतात त्या अनुषंगाने काय कार्यवाही केली जाते अशी विचारणा समितीने केली असता, त्या प्रकरणांच्या अनुषंगाने नियमानुसार पुढील कार्यवाही सुरू असते असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

अन्न व नागरी पुरवठा विभागाची स्वतंत्र कॉम्प्युटराईज्ड साईट निर्माण करण्यात आलेली आहे या साईटचा अंतर्भाव एमआयएस मध्ये करावा. जेणेकरून या बाबत लोकांना सुद्धा समजेल. विभागाकडून फार मोठी यंत्रणा चालविली जात असल्यामुळे समितीचे मत आहे की, विभागाने स्वत:चे स्वतंत्र ॲप तयार करावे असे समितीने सूचित केले असता आता विभाग कॉम्प्युटराईज्ड सप्लाय चेन मॅनेजमेंट राबवित आहे. या अंतर्गत सुरूवातीला जालना, वाशिम, सोलापूर, नागपूर हे जिल्हे थेट दुकानापर्यंत लिंक करीत आहोत. यामुळे एफसीआय ते दुकानापर्यंतचा लिंक लाईव्ह उपलब्ध होईल. या माध्यमातून कोणत्या ठिकाणी किती साठा आहे आणि त्यांची वाहतूक होऊन तो कसा वापरात आला या बाबतची मिळेल. ही पद्धत कालांतराने सर्व जिल्ह्यांमध्ये अवलंबणार आहोत. एपीडी एक-दोन महिन्यात सर्व ठिकाणी करून ते लाईव्ह सिस्टीमशी कनेक्ट करणार आहोत. त्यावेळी लाईव्ह आणि फिजिकल माहिती तपासली तर कोणताही इश्यू येण्याची शक्यता नाही. समितीने सुचविल्यानुसार यामध्ये एमआयएस समाविष्ट करण्याबाबत विचार करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

तपासणी करण्यासाठी पूर्वी ५ सदस्य संख्येचे स्क्वॉड आता २ सदस्य संख्येचे करण्यात आल्यामुळे स्क्वॉडची संख्या वाढली आहे. स्क्वॉडची सदस्य संख्या कमी केल्यामुळे भ्रष्टाचाराची प्रकरणे वाढली असतील असे आपल्याला वाटते काय? पूर्वी स्क्वॉडची सदस्य संख्या जास्त का ठेवली जात होती आणि आता सदस्य संख्या कमी ठेवण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा समितीने केली असता, विभागीय सचिवांनी भ्रष्टाचाराची प्रकरणे वाढली नसल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले. तसेच विभागाकडे पुरसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे स्क्वॉडची सदस्य संख्या कमी केली आहे. फिल्डवरील मंजूर पदे ४० असून सद्य:स्थितीत केवळ ११ पदेच कार्यरत आहेत. तसेच या स्क्वॉडच्या माध्यमातून रॅण्डमली चेकींग केली जाते असल्याचेही विभागीय सचिवांनी सांगितले.

तालुका ते जिल्हा स्तरावर फुड सप्लाय इन्स्पेक्टर, तहसीलदार, एसडीओ, जिल्हाधिकारी यांनी किती शिधावाटप दुकानांची तपासणी केली पाहिजे, या बाबतीत शासन निर्णय अस्तित्वात आहे काय अशी समितीने विचारणा केली असता, या संदर्भातील शासन निर्णय अस्तित्वात असून त्यांनी प्रत्येक दुकान वर्षातून दोन वेळा तरी तपासावयास पाहिजे तसेच गोदामाचे रोस्टर त्यांच्याकडे उपलब्ध असते असे विभागीय सचिवांनी समितीस अवगत केले.

परंतु अशा प्रकारची तपासणी होत नाही तीन तालुके मिळून एक आयओ असतो परंतु त्यांच्याकडून नियमित तपासण्या होत नाहीत. वर्षातून दोन वेळा तपासणी व्हावयास पाहिजे. परंतु वस्तुस्थिती या उलट आहे वर्षातून एकही तपासणी होत नाही. तसेच या संदर्भात समिती सुचवित आहे की, विभागाने स्वतंत्र ॲप तयार करावयास पाहिजे. तसेच या ॲपची मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी करावी जेणेकरून शिधापत्रिका धारकांचे जे म्हणणे आहे ते या ॲपद्वारे मांडता येईल असे समितीने अवगत केले असता, यासाठी कॉलसेंटर क्रमांक आणि ई-मेल प्रत्येक दुकानामध्ये नमूद केलेला

आहे कॉल सेंटरवर तक्रार आल्यानंतर त्या बाबतची दखल घेण्यात येते. राज्यात महिन्याला साधारणतः २०० कॉल आल्यानंतर त्यातील १९० कॉल्सना विभागाकडून प्रतिसाद देण्यात येतो असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

ही संख्या अतिशय अपुरी असल्याचे तसेच हा सर्व फार्स असल्याचे समितीस वाटत आहे असे समितीने विदित केले असता, आमचे कॉल सेंटर असून मुंबईसाठी वेगळा आणि राज्यासाठी वेगळा क्रमांक आहे. प्रत्येक पोस्टर आणि बॅनरवर कॉल सेंटरचा क्रमांक नमूद केलेला आहे. तसेच सर्व कार्यालयामध्ये सुद्धा हा क्रमांक आहे. तसेच प्रत्येक दुकानांमध्ये कॉल सेंटरचा क्रमांक असलेले पोस्टर लावलेले असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

आपण शिधापत्रिकाधारकांवर दया करीत आहोत असे त्यांना वागवित आहात. सबसिडीचा विचार सोडला तर शिधापत्रिकाधारक ग्राहक आहेत. एखाद्या कॉर्पोरेट कंपनीस इतक्या मोठ्या प्रमाणात ग्राहक मिळाल्यास ते त्यांना चांगल्याप्रकारे ट्रीट करतात. आपणास हे सर्व चांगल्याप्रकारे चालवावयाचे असेल तर पुढील काळात अधिका-यांच्या ऐवजी एमबीए झालेले लोक आणावे लागतील असे समितीने विदित केले असता, या महिन्यात १ कोटी २५ लाख लोकांनी मशीनद्वारा धान्य घेतलेले आहे. जवळपास ७० टक्के धान्यवाटप मशीनद्वारे झालेले आहे. मागे प्रेझेन्टेशन केले त्यावेळी हे प्रमाण ६२-६३ टक्के होते. म्हणजे टक्केवारी वाढत असून आता आपण आधारकार्डशिवाय देत नसल्याचे विभागीय सचिवांनी अवगत केले.

फक्त नागपूर जिल्हयात सर्व शिधापत्रिका लिंक झाल्या आहेत काय अशी विचारणा समितीने केली असता, सर्व ठिकाणी लिंक झाल्या असून नवीन सॉफ्टवेअर इंट्रोड्युस करताना ते टप्प्या टप्प्याने घेतो. सर्व ठिकाणी मशीनद्वारा धान्याचे वाटप होत आहे. ईएपीडीएस ही नवीन सिस्टीम युआयडी सर्व्हरशी लाईव्ह असते ती लाईव्ह सिस्टीम चार ठिकाणी सुरू आहे. मार्च महिन्यात जवळपास ५० टक्के महाराष्ट्र कव्हर होईल आणि एप्रिल महिन्यात सर्व ठिकाणी कार्यान्वीत होईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या दोन सिस्टीममध्ये फरक काय आहे या समितीच्या प्रश्नाला विभागीय सचिवांनी असे विदित केले की, आपल्या डाटाबेसमध्ये जी माहिती दिलेली आहे त्यास तो ऑथेन्टीकेट करत होता. ती स्टोअर ॲण्ड फॉरवर्ड सिस्टीम होती यामुळे सर्व्हरवर येणारा लोड कमी होतो. आता लाईव्ह मशीन युआयडी सर्व्हरशी लिंक आहे आणि युआयडी सर्व्हरमधून डायरेक्ट ऑथेन्टीकेशन येते असा फरक आहे. जुन्या सिस्टीमध्ये सर्व्हरवर लोड कमी येतो आणि नवीन सिस्टीममध्ये सर्व्हरवर लोड जास्त येतो. नवीन सिस्टीममध्ये सर्व्हरची संख्या वाढवावी लागेल. कारण एकाचवेळी जास्त व्यवहार (ट्रॅन्झॅक्शन) होऊ लागले तर सर्व्हरवर लोड येईल. एका महिन्यात सव्वा कोटी व्यवहार होतात एकाच दिवशी ३०-४० हजार व्यवहार होतात. एकाचवेळी इतके व्यवहार झाले तर सर्व्हर ओव्हरलोडेड होईल म्हणून आपण टप्प्याटप्प्याने सर्व्हर वाढवित आहोत. ऑथेन्टीकेशनची टक्केवारी चांगली पाहिजे डाटा चांगला पाहिजे. ज्याचे आधारकार्ड फेल होत आहे त्याला दुस-या पद्धतीने धान्य द्यावे लागते.तसेच जर थम्ब इप्रेशन ऑथेंटीक होत नसेल तर त्यांना पावती देण्यात येते. ३० टक्के लोकांचे थम्ब इम्प्रेशन होत नाही म्हणून त्यांना पावतीद्वारा धान्य देण्यात येते असेही विभागीय सचिवांनी विदित केले.

थम्ब इम्प्रेशन ऑथेन्टीक होत नाही आणि ती व्यक्ती जे सांगत आहे ते खरोखर आहे किंवा कसे हे तपासण्यासाठी कोणती व्यवस्था आहे अशी विचारणा समितीने केली असता, त्या व्यक्तीचा थम्ब केवायसी झालेला आहे इएपीडीएस जेथे आहे तेथे केवायसी आहे जो आधार नंबर दिलेला आहे त्याची माहिती लगेच डाटाबेसमध्ये समजते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

ज्येष्ठ नागरिक आणि कामगार वर्गाचे काम करून हात रफ झालेले असतात. त्यांच्या बाबतीत हा जास्त प्रश्न उपस्थित होतो त्यांच्याकडून या तक्रारी येत असतात असे समितीने निदर्शनास आणले असता, आपण या गोष्टींचा विचार केलेला असून मागील तीन-चार महिन्यांमध्ये ऑथेन्टीकेशनची टक्केवारी ५० टक्क्यांवर आली आहे. थम्ब इम्प्रेशनसाठी डाव्या हाताचा वापर करावा, हात स्वच्छ ठेवावा अशाप्रकारच्या सूचना दिलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी सांगितले.

थम्ब इम्प्रेशन ऑथेन्टीक होत नाही अशावेळी पावती देऊन धान्य देण्याची व्यवस्था केलेली आहे ही सिस्टीम कशाप्रकारे राबविण्यात येते अशी विचारणा समितीने केली असता, संबंधितांचे आधार कार्ड आणि डिटेल्स बरोबर आहेत किंवा कसे पाहिले जाते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

थम्ब इम्प्रेशन ऑथेन्टीक होत नाही असे दुकानदास समजल्यानंतर दुकानदार पावती देऊन धान्य देण्याची व्यवस्था करतो एवढ्यापुरती ही सिस्टीम मर्यादित आहे, परंतु त्याचे रिपोर्टींग करावे लागते काय अशी विचारणा समितीने केली असता, किती लोकांचे आधार कशामुळे फेल झाले, टाईम आऊट, कनेक्टीव्हीटी फेल, चुकीचा आधार नंबर किंवा दुस-या व्यक्तीने ऑपरेटट केले याचे सर्व विश्लेषण अहवालात येत असल्याची माहिती विभागीय सचिवांनी दिली.

शिधापत्रिकेमध्ये एक किंवा दोन ज्येष्ठ नागरिकांची नावे असतील तर प्रश्न वेगळा आहे. शिधापत्रिकेमध्ये चार-पाच जणांची नावे असतील तर त्या सर्वांचे थम्ब इम्प्रेशन घ्यावे आणि त्यापैकी कोणाचेही थम्ब इम्प्रेशन घेऊन धान्य देऊ शकता असे समितीने सूचित केले असता युआयडीने ही सर्व काळजी घेतलेली आहे लेफ्ट हॅण्ड इन्डेक्स फिंगर हाफ सक्सीड होतो हे देखील मशीन सांगते सिस्टीम बेस्ट फिंगर सांगते. दोन-तीन फिंगर्सची सिस्टीम आलेली आहे त्याला बीएफडी म्हणजे बेस्ट फिंगर डिटेक्शन म्हणतात अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

पॉस मशीन किती ठिकाणी बसविण्यात आली आहे? त्याचे रिपोर्टस् काय आहेत याबाबत विचारणा समितीने केली असता, पॉस मशिन्स सर्व ठिकाणी बसविण्यात आली आहे. यामध्ये टप्प्याटप्प्याने वाढ होईल असे प्रझेन्टेशनच्यावेळी सांगितले होते. दोन महिन्यापूर्वी १ कोटी व्यवहार झाले होते या महिन्यात १ कोटी २५ लाख व्यवहार झाले आहेत. ७० टक्के धान्याचे वाटप मशीनद्वारे होत आहे. कुटुंबामधील कोणतीही एक व्यक्ती आल्यास त्याला पूर्ण धान्य देण्यात येत असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

गोदामामध्ये किती टक्के धान्य वाया जाते ? गोदाम तपासणी पथकाने केलेल्या तपासणीमध्ये धान्य वाया जात असल्याचे आढळून आले आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता, एक टक्क्यापर्यंत धान्य वाया जाणे अलाऊड आहे, परंतु त्यापेक्षा जास्त झाल्यास आपण वसुली करतो. तसेच गोदाम तपासणीमध्ये किती धान्य वाया जात आहे याबाबत माहिती घ्यावी लागेल, परंतु एक टक्क्यापर्यंत अलाऊड आहे त्यापेक्षा जास्त झाल्यास वसूल करण्यात येते तीन टक्क्यांच्यावर धान्य वाया गेले असेल तर वसुली करण्यात येते. नाशिक व परभरणी येथील घोटाळा पथकाने उघडकीस आणला असल्याचे विभागीय सचिवांनी विदित केले तसेच जर तक्रार आली तर सर्व गोदामांची तपासणी करण्यात येते असेही समितीस अवगत केले.

उंदिर व घूस धान्यांची नासाडी करतात त्याबाबत आपण काय उपाययोजना करता तसेच पावसाळ्यातील वातावरणामुळे धान्य कुजून खराब होते, लोडींग आणि अनलोडींग करताना गोणी फाटतात त्यामुळे धान्य वाया जाते अशाप्रकारे वाया गेलेले धान्य कशाप्रकारे कॅल्युलेट करता अशी पृच्छा समितीने केली असता, एक टक्क्यापर्यंत अलाऊड असून त्यापेक्षा जास्त वाया गेल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चितत केली जाते असे विभागीय सचिवांनी विदित केले. या अनुषंगाने समितीने अशी विचारणा केली की, आपण अशी जबाबदारी निश्चित केलेली आहे काय यावर उत्तर देताना विभागीय सचिवांनी जबाबदारी निश्चित करून वसुली करतो. तसेच भांडारपाल, गोदामपालक यांच्याकडून वसुली करण्यात येत असल्याचे समितीस अवगत केले.

सचिव किंवा उप सचिव दर्जाच्या अधिका-यांनी गोदामास शेवटची भेट केव्हा दिली होती अशी विचारणा समितीने केली असता, नागपूर अधिवेशनामध्ये माहे डिसेंबर महिन्यात भेट दिली होती. तसेच दर दोन-तीन महिन्यांनी डिव्हीजनचे दौरे केलेले असल्याचे समितीस अवगत केले.

१.५२ परिच्छेद क्रमांक- २.२.१६.२ स्वस्त धान्य दुकाने व शिधापत्रिकांची अपर्याप्त/सदोष तपासणी :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात समितीने अशी विचारणा केली की, शासनाने असे प्रतिपादीत केले आहे की, (नोव्हेंबर २०१३) की विहित संख्येत FPS ची तपासणी करण्यात ज्या अधिका-यांना अपयश आले होते त्यांच्याविरूद्ध विरूद्ध शिस्तभंगाची कारवाई सुरू करण्याविषयी जिल्हाधिकारी यांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या असल्याचे विभागाने नमूद केले आहे तेव्हा या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे ? यासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, १३० अधिकारी/कर्मचारी यांना नोटीसा दिलेल्या आहेत जसजसा खुलासा येत आहे तस तशी कारवाई करण्यात येत आहे.

विभागाने १३० अधिकारी/कर्मचा-यांना नोटीसा काढल्या आहेत. यापूर्वी अशा प्रकारच्या नोटीसा या अधिका-यांविरोधात काढण्यात आल्या होत्या काय ? त्याची नोंद सेवा पुस्तिकेमध्ये आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, याबाबत तपासून घ्यावे लागेल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

विभागाने ही कारवाई रँडमली सुरूच ठेवावी विभागाने महालेखाकार यांच्या रिमार्कसाठी थांबू नये ही प्रथा कायमची पाडूनच द्यावी समितीने सूचित केले असता, याबाबत वर्षाच्या अखेरीस आढावा घेण्यात येईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

१.५३ परि. क्रमांक : २.२.१६.३ दक्षता समित्यांचे कमी संख्येत गठण करणे :

दक्षता समित्यांचे कमी संख्येत गठन करणे या परिच्छेदासंदर्भात विभागाचे काय म्हणणे आहे अशी विचारणा समितीने केली असता, दक्षता समितीचे सदस्य हे शासकीय असतात. परंतु, अशासकीय सदस्यांची नावे वेळेवर येत नाहीत समिती तशी घटित असते त्यांच्या बैठका होत असतात. परंतु, अशासकीय सदस्यांची नावे पालकमंत्री महोदयांकडून येत नाहीत त्यामुळे विलंब होतो असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

अमरावती जिल्हा येथे शासन मान्य दक्षता समिती आली. अडीच महिने झाले तरी आपल्या अधिका-यांनी नावे पाठविलेली नाहीत. विभागाकडून कोण कोण सदस्य आहेत याची नावे गेलेली आहेत. असे असताना अधिका-यांना आता कसली अडचण आहे अशी विचारणा समितीने केली असता यासंबंधातील माहिती घेऊन समितीस कळविण्यात येईल असे विभागीय सचिवांनी विदित केले.

यास विलंब का लागला याची देखील कारणे शोधावित असे समितीने विदित केले असता संबंधितांवर कारणे दाखवा नोटीस बजाविण्यात येईल असे सचिवांनी अवगत केले.

काही काही ठिकाणी समिती सदस्यांची नावे बदलण्याचे प्रकार देखील होत असतात. यादी अंतिम केल्यानंतर देखील परत एक नाव समाविष्ट करावे,यांच्या ऐवजी या नावाचा समावेश करावा अशा आशयाचे पत्र जाते असे समितीने निदर्शनास आणले असता, आता आपण नवीन शासनामध्ये असा निर्णय घेतला आहे की, जर माननीय पालकमंत्र्यांनी मुदतीमध्ये नावे दिली नाहीत तर ते अधिकार माननीय मंत्री महोदयांकडे जातील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

अमरावती जिल्ह्यात माननीय मंत्री महोदयांनी स्वत:च्या स्तरावर निर्णय घेऊन नावे अंतिम करून विभागामार्फत जिल्हा स्तरावर पाठविण्यात आली असे असताना आता त्यास जिल्हा स्तरावर विलंब करण्यात येत असल्याचे समितीने विदित केले असता, यासंबंधातील माहिती समितीस कळविण्यात येईल. सर्वच ठिकाणी असे होत असेल तर तेथे विलंब होणार नाही याची विभागामार्फत काळजी घेऊ, ही नवीन स्टेप आहे त्यामुळे यात विलंब पूर्णपणे टळणार आहे. कारण माननीय पालकमंत्र्यांनी विलंब केला तर तो अधिकार माननीय मंत्री महोदयांकडे जाणार आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

या समितीमध्ये आपण प्रतिनिधी म्हणून लोकप्रतिनिधींना घेतो. एन.जी.ओ., कार्यकर्ते यांना घेतो. दक्षता समित्यांच्या बैठकीसंबंधात विभागाने खालच्या स्तरावर परिपत्रक पाठवून द्यावे. यात कस्टमर कॉफरन्स घ्यावी असे अधीक्षकांना कळवावे विभागाने शिधापत्रिकाधारकांची परिषद घ्यावी असे समितीने विभागास सूचित केले असता, प्रत्येक दुकानदाराच्या क्षेत्रात एका आठवड्याचा अन्न सप्ताह आणि अन्न दिवस ठेवलेला आहे हा रिपोर्ट केंद्र शासनाला द्यावा लागतो यास सोशल ऑडिट म्हणतात. यासंबंधातील शासन निर्णय माहे नोव्हेंबर २०१६ मध्ये निर्गमित करण्यात आलेला असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले.

शासन निर्णय केव्हा निर्गमित केला आहे, अमरावती जिल्ह्यामध्ये नावे कधी पोहोचली, यासंबंधातील सगळी माहिती समितीस दिनांक निहाय द्यावी असे समितीने सांगितले असता, विभागीय सचिवांनी याबाबत होकार दर्शविला.

जिल्हा, तालुका पातळीवर, महानगरपालिका स्तरावर प्रत्यक्षात गठित झालेल्या समित्या किती आहेत, तसेच बैठकांची जी तुटीची टक्केवारी होती ती भरण्यात आली आहे काय या समितीच्या प्रश्नाला बैठकांची टक्केवारी भरून काढण्यात आलेली नाही या वर्षी गाव पातळीवर ३० हजार दक्षता समित्या स्थापन झालेल्या असून त्यांच्या १ लाखांपेक्षा जास्त बैठका झालेल्या आहेत. त्यानंतर तालुका स्तरावर २८८ बैठका झालेल्या आहेत अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

हे विभागाने रेकॉर्डवर दिलेलेच आहे त्याच्या अगोदर तालुका पातळीवर ३५१ समित्या घटित करावयाच्या होत्या. त्यापैकी ३२५ समित्या घटित झाल्या आहेत २५ समित्या कमी घटित झाल्या आहेत. महानगरपालिका स्तरावर ७७ समित्या घटित करावयाच्या होत्या त्यापैकी ७४ समित्या घटित झालेल्या आहेत. नगर परिषदेमध्ये २२१ समित्या घटित करावयाच्या होत्या त्यापैकी १८६ समित्या घटित झालेल्या असल्याचे समितीने अवगत केले असता ही जी आकडेवारी आहे ती समित्यांच्या बैठकांची आहे दर महिन्याला बैठका होणे अपेक्षित आहे. पण साधारणत: दर तीन-चार महिन्यातून एकदा बैठक होत असल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

सगळीकडे समित्या घटित करण्यात आल्या आहेत काय? सर्वात जास्ती शॉर्टफॉल हा गाव पातळीवर आणि नगरपरिषद स्तरावर असल्याचे प्रधान महालेखाकारांनी विदित केले असता एकूण किती समित्या असावयास पाहिजे यासंबंधातील माहिती, यात नाही असे विभागीय सचिवांनी अवगत केले असता ती माहिती आहे विभागानेच ही माहिती दिलेली असल्याचे प्रधान महालेखाकार यांनी निदर्शनास आणले असता ती जुनी माहिती होती आपणास नवीन माहिती कळविण्यात येईल असे विभागीय सचिवांनी अवगत केले.

जुन्या माहितीमध्ये ७७ समित्या घटित करण्यात येतील असे नमूद असून आता नवीन माहिती मध्ये महानगरपालिका क्षेत्रात फक्त २५ समित्या दाखवत आहोत असे समितीने विदित केले असता, महानगरपालिका २५ असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. यावर विभागाने महानगरपालिकेच्या क्षेत्रात ७७ समित्या दर्शविलेल्या असल्याचे समितीने नमूद केले व ही माहिती विभागानेच दिली असून Even there is one corporation there can be more than one Committee. असे विभागास अवगत केले असता काही समित्या ह्या वॉर्ड निहाय असतात असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

२२१ म्युनिसिपल कौन्सिलमध्ये शॉर्टफॉल होता तसेच समिती घटित करण्यासाठी आज काय स्थिती आहे अशी विचारणा समितीने केली असता, किती समित्या घटित व्हावयास पाहिजे यासंबंधातील माहिती आता उपलब्ध नाही यासंबंधातील माहिती घ्यावी लागेल असे विभागीय सचिवांनी नमूद केले असता यासंबंधातील तपशीलवार माहिती समितीला येत्या १५ दिवसांमध्ये सादर करावी. असे समितीने विभागास सूचित केले असता विभागीय सचिवांनी माहिती सादर करण्याबाबत होकार दर्शविला. तसेच सन २०१६-२०१७ मध्ये सुधार असून महिन्यातून नाही तर किमान

तीन-चार महिन्यातून एकदा बैठक होत आहे. जिल्हा स्तरावर ३१ समित्या असून आता पर्यंत ९८ बैठका झालेल्या असल्याचेही समितीस अवगत केले.

विभागाने जे सादरीकरण केले आहे त्याची हार्ड कॉपी समितीच्या सर्व सदस्यांना उपलब्ध करून देण्यात यावी असे निदेश समितीने दिले.

१.५४ परि. क्रमांक : २.२.१६.५ ''उपयोगिता प्रमाणपत्रे आणि नियतकालिक अहवाल सादर न करणे'' :

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, माहे डिसेंबर पर्यंत जेवढे उपयोगिता प्रमाणपत्रे सादर व्हावयाची होती तेवढी सगळी सादर झालेली आहेत.

शिधापत्रिकांचे संगणकीकरण करण्यात येईल अशी मध्यंतरी घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार १०० टक्के डिजिटलाईज रेशनकार्ड देण्याचे काम झाले आहे काय अशी विचारणा समितीने केली असता, यास थोडा वेळ लागेल १०० टक्के केवायसी झाल्यानंतर हे काम होईल. केवायसीचे काम चार जिल्ह्यांमध्ये झालेले असून माहे मार्च पर्यंत अर्धे राज्य कव्हर करणार असून पुढच्या माहे एप्रिल पर्यंत १०० टक्के राज्य कव्हर करणार असल्याचे विभागीय सचिवांनी नमूद केले.

म्हणजे दिनांक ३१ एप्रिल २०१८ पर्यंत ५ कोटी जनता कव्हर करणार आहोत अशी विचारणा समितीने केली असता, होय, आधार कार्ड फेल झाले तर मग धान्य मिळत नाही त्यामुळे काळजी घ्यावी लागते. आधार कार्ड का संलग्न होत नाही हे पहावे लागते त्यामुळे डबल काम होते. आधार नंबर चुकला आहे की, नाव चुकले आहे हे सर्व पहावे लागते असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

अभिप्राय व शिफारशी :

२.१. परिच्छेद क्र. २.२.८.१ ''लाभार्थ्यांचे अयोग्य परिक्षण''

अभिप्राय :

सार्वजनिक अन्नधान्य वितरण व्यवस्थेतील लाभार्थ्यांची यादी अंतिम करताना लाभार्थ्यांचे अयोग्य निर्धारण केल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत.

सार्वजनिक वितरण प्रणाली (नियंत्रण) आदेश, २००१ नुसार विभागाने दारिद्र्य रेषेखालील आणि अंत्योदय कुटुंबांच्या यादीचे दरवर्षी अपात्र कुटुंबे वगळण्यासाठी आणि पात्र कुटुंबांना संम्मिलीत करण्यासाठी पुनर्विलोकन करायला हवे होते. वर्ष २००९ आणि २०११ या दोन वर्षांमधील ज्या विशेष मोहिमांद्वारे १.५० लक्ष आणि १.२५ लक्ष दारिद्र्य रेषेखालील (BPL) शिधापत्रिका रदद केल्या गेल्या, त्या मोहिमांचा अपवाद वगळता वर्ष २००८-१३ या कालावधीत विभागाने कोणत्याही वर्षात दारिद्र्य रेषेखालील आणि अंत्योदय कुटुंबांच्या यादीचे पुनर्विलोकन केले नव्हते.

तसेच ग्रामविकास विभागाकडून वर्ष २००२ मध्ये लाभार्थींचे सर्वेक्षण करण्यात आले होते आणि नोव्हेंबर २००६ मध्ये BPL कुटुंबांची एक सुधारित यादी प्रसिद्ध करण्यात आली होती. सुधारित यादीप्रमाणे, ग्रामीण क्षेत्रात BPL कुटुंबांची संख्या ४५.०२ लक्ष होती. विभागाने जानेवारी २०१० मध्ये ग्रामीण विभागातील BPL लाभार्थ्यांच्या केलेल्या तुलनेत असे आढळून आले की, वर्ष २००६ मध्ये केलेल्या सर्वेक्षणानुसार २६.६९ लक्ष नवीन कुटुंबे BPL साठी पात्र ठरली होती, तर याआधी १९९७ मध्ये केलेल्या सर्वेक्षणात संम्मिलित केलेली २६.८४ लक्ष कुटुंबे आता अपात्र असल्याचे आढळून आले होते. तथापि, यादीचे पुनर्विलोकन आणि सुधार न केल्यामुळे रुपये २१०२.७१ कोटी किंमतीच्या ४२.२३ लक्ष मे.टन अन्नधान्याचे अपात्र लाभार्थ्यांना वर्ष २००८-१३ दरम्यान वाटप झाले होते तर २६.६९ लक्ष BPL कुटुंबे सवलतीच्या दराने अन्नधान्य मिळण्याच्या लाभापासून वंचित राहिली होती.

ग्रामविकास आणि नगरविकास विभागाकडून राज्यात मागील सर्वेक्षणात निश्चित केलेल्या BPL कुटुंबांची संख्या ५९.६७ लक्ष होती. मात्र मे २०१३ पर्यंत केंद्र शासनाच्या निर्धारीत सार्वजनिक वितरण प्रणाली (TPDS) अंतर्गत BPL शिधापत्रिकाधारकांची संख्या ६७.८२ लक्ष होती. अशाप्रकारे विभागाने ग्रामविकास आणि नगरविकास विभागाच्या सर्वेक्षणावर आधारित BPL शिधापत्रिकांचे पुनर्विलोकन न केल्यामुळे राज्यात ८.१५ लक्ष जास्तीचे BPL शिधापत्रिकाधारक होते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे आक्षेपात नोंदविलेले आहेत.

राष्ट्रीय अन्नसुरक्षा अधिनियम, २०१३ दिनांक ५ जुलै, २०१३ पासून राज्यात लागू करण्यात आला. सदर योजनेत ७५% ग्रामीण तर ५०% शहरी लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण योजनेचा लाभ घेत असलेल्या लाभार्थ्यांना ३५ किलो/माह धान्य मिळेल, तर उर्वरित लाभार्थ्यांना ५ किलो/माह धान्य मिळेल अशी या अधिनियमात तरतूद आहे.

पूर्वी लक्ष्य निर्धारित सार्वजनिक वितरण योजनेत ८.७७ दशलक्ष लाभार्थी होते. तर आता राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेंतर्गत दिनांक १ फेब्रुवारी, २०१४ रोजी ७ दशलक्ष लाभार्थ्यांचा समावेश करण्यात आलेला आहे. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांच्या यादीचे अद्ययावतीकरण ही निरंतर प्रक्रीया असल्याने, सदर यादीचे वेळोवेळी अद्ययावतीकरण करणे, अपात्र व्यक्तींची नावे यादीतून वगळणे इ. कार्यवाही करण्याबाबत शासन निर्णय दिनांक २२.०२.२०१०, दिनांक २५.०३.२०१० दिनांक २७.०८.२०१० अन्वये आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत धान्य वितरणाचा लाभ देण्यासाठी सर्व अंत्योदय लाभार्थ्यांना पात्र लाभार्थी म्हणून गणण्यात आले आहे. अन्नसुरक्षा-२०१३ अंतर्गत सर्व BPL लाभार्थ्यांना प्राथम्य कुटुंबगटात समाविष्ट करण्यात येऊन त्यांना लाभ देण्यात आला तर उर्वरीत लाभार्थी हे अंत्योदय गटातून निवडण्यात आले असे विभागाने त्यांचे लेखी उत्तरात नमूद केले आहे.

यावर विभागाकडून रेशनकार्डची तपासणी करण्यासाठी वेळोवेळी मोहीम राबविण्यात येत असून सन २००८ मध्ये २९ लाख, सन २००९-१० मध्ये १२ लाख आणि सन २०१०-११ मध्ये ११.८६ लाख सन २०१२ मध्ये १० लाख तर २०१६-१७ मध्ये १ लाख रेशनकार्ड रद्द करण्यात आल्याचे विभागीय सचिवांनी समितीला सांगितले.

मुंबईमध्ये एसआरए किंवा झोपडटपट्टीमध्ये राहणारी व्यक्ती काही कारणाने स्थलांतरीत झालेली असते. अशावेळी तपासणीसाठी शिधावाटप निरीक्षक जातात. त्यावेळी तेथे कोणतीही व्यक्ती आढळून येत नाही . त्यामुळे शिधावाटप निरिक्षक त्यांची रेशनकार्ड रद्द करतात असे समितीने निदर्शनास आणले असता टीपीडीसनुसार या योजनेस पात्र असलेल्या व्यक्ती आता कोणत्याही रेशन दुकानातून धान्य खरेदी करु शकतो. या पद्धतीनेच नागपूर शहरामध्ये धान्य वाटप केले जात असल्याचे समितीला अवगत केले.

शिफारशी :

२.२ (१) महाराष्ट्र शासनाने निश्चित केलेल्या निकषांनुसार (नोव्हेंबर १९९९/ऑगस्ट २००१), रुपये १५,०००/- पेक्षा कमी वार्षिक उत्पन्न असलेल्या ज्या कुटुंबांना १९९७-९८ BPL कुटुंबांविषयीच्या एकात्मिक ग्रामविकास योजनेच्या (IRDP) यादीत समाविष्ट केले होते, ती कुटुंबे TPDS अंतर्गत ग्रामीण क्षेत्रात दारिद्र्य रेषेखालील शिधापत्रिका मिळण्यास पात्र होती, परंतु त्याकरिता त्यांच्याकडे दुचाकी किंवा चार चाकी वाहनाची मालकी नसणे, गॅस जोडणी प्राप्त नसणे इत्यादी इतर अटींची पूर्तता होणे गरजेचे होते. शहरी क्षेत्रात, ज्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रुपये १५,०००/- पेक्षा कमी होते आणि ज्यांचे स्वतःचे दुचाकी किंवा चार चाकी वाहन आणि गॅस जोडणी नव्हती ती कुटुंबे BPL शिधापत्रिका मिळण्यास पात्र होती. मे २००५ मध्ये स्वतःच्या मालकीची दुचाकी आणि गॅस जोडणी नसणे हा निकष विभागाकडून काढून टाकण्यात आला होता, असे असतानाही लाभार्थ्यांचे अयोग्य निर्धारण झाल्याचे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. परिणामी यादीमध्ये पात्र कुटुंबांना संम्मिलीत करण्याची व अपात्र कुटुंबे वगळण्यासाठीची प्रक्रिया ही सदोष राहिली व वेळेत यात सुधारणा न झाल्यामुळे अपात्र लाभार्थ्यांना अन्नधान्याचे वाटप होणे कायम राहिले व पात्र कुटुंबे सवलतीच्या दराने अन्नधान्य मिळविण्याच्या लाभापासून वंचित राहिली. वास्तविकतः या योजनांसाठी पात्र ठरण्यासाठीचे निकष हे अत्यंत स्पष्ट आहेत. परंतु त्याची अंमलबजावणी करताना या योजनांचा लाभ देण्यासाठी लाभार्थ्यांची निश्चितती व पात्रता अचुकरित्या करणे व केवळ योग्य व पात्र लाभार्थ्यांना या योजनांचा लाभ देणे या बाबी अंमलबजावणीच्या स्तरावर वाटतात तितक्या सोप्या नाहीत हे समितीला मान्य आहे. सर्वच कुटुंबांना या योजनांतर्गत सवलती पाहिजे असतात. त्यामुळे पात्र ठरण्यासाठी कित्येक प्रकरणी वैध व अवैध असे दोन्ही मार्गांचा अवलंब होतो. तसेच यात गैरव्यवहारदेखील केला जातो. ही वस्तुस्थिती आहे. तरीही या सर्व अडचणींमधून योग्य तो मार्ग काढून या योजनांचा लाभ केवळ पात्र लाभार्थ्यांना मिळणेसाठी विभागाने योग्य ते नियोजन करावे व त्याची अंमलबजावणी करावी व विभागाने सार्वजनिक वितरण प्रणाली (नियंत्रण) आदेश २००१ ची काटेकोर अंमलबजावणी करावी आणि दारिद्र्य रेषेखालील कुटुंबे व अंत्योदय कुटुंबाच्या यादीचे दरवर्षी पुनर्विलोकन करुन अपात्र कुटूंबे वगळावीत व पात्र कुटूबांचा यादीत समावेश करावा. यासाठी कालबद्ध कार्यक्रम राबविण्यात यावा. तसेच ग्रामविकास विभाग आणि नगरविकास विभाग यांचेकडून BPL व अंत्योदय लाभार्थ्यांचे वेळोवेळी सर्वेक्षण करण्यात आल्यास त्याचा आधार घेऊन विभागाने लाभार्थ्यांच्या याद्यांचे पुनर्विलोकन करावे व कोणत्याही प्रकारे अपात्र लाभार्थ्यांना लाभ होणार नाही याची दक्षता घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

(२) शहरी भागात पुनर्वसन वा अन्य कारणास्तव लाभार्थी तात्पुरत्या स्वरुपात अन्यत्र स्थलांतरीत झाल्यास त्याचा ठावठिकाणा न सापडल्यास हे रेशनकार्ड रद्द करण्यात येते. परिणामी पात्र असतानाही लाथार्थी या योजनांतर्गत सवलतीपासून वंचित राहतात. अतः अशी रेशनकार्डे पुर्ण चौकशी केल्यानंतरच रद्द करण्याचा निर्णय विभागाने घ्यावा. कोणत्याही परिस्थितीत पात्र कुटुंबे अन्नधान्याच्या लाभापासून वंचित राहणार नाहीत याची विभागाने योग्य दखल घेऊन उपाययोजना करावी. तसेच दारिद्र्य रेषेखालील कुटुंबामध्ये नैसर्गिक वाढीमुळे एका कुटुंबाची दोन कुटुंबे झाली तर त्या वाढीव कुटुंबांना देखील इष्टांक वाढवून देऊन त्यांना नियतन देण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.३ परिच्छेद क्र. २.२.८.२ "शिधापत्रिकांचे पुनर्विलोकन"

अभिप्राय :

सार्वजनिक वितरण प्रणाली (नियंत्रण) आदेश २००१ नुसार शिधापत्रिका पूर्वी निलंबित अथवा रद्द केली नसेल तर ती जारी केलेल्या तारखेपासून पाच वर्षांपर्यंत वैध असते. तसेच आधीच्या माहितीची नव्याने पडताळणी करुन आणि महाराष्ट्र शासनाने विहित केलेल्या इतर चाचण्या पूर्ण करुन नवीन शिधापत्रिका जारी करता येते किंवा तिचे नुतनीकरण करता येते. परंतु बीड, नंदुरबार, जळगाव आणि ठाणे शिधावाटप क्षेत्रामध्ये स्वघोषणापत्र आणि प्रतिज्ञापत्राच्या आधारावर आवेदकांना शिधापत्रके जारी करण्यात आली होती. विभागाने आवेदनपत्रात दिलेल्या चारचाकी वाहने, जमिनीच्या मालकीचा तपशील इत्यादीची खात्री करुन अपात्र शिधापत्रके रद्द करण्यासाठी इतर शासकीय विभागांबरोबर समन्वय साधला नव्हता. तसेच आवेदनाच्या प्रपत्रांमध्ये सादर केलेल्या अपूर्ण माहितीच्या आधारावर शिधापत्रिका देण्यात आल्या होत्या, उत्पन्न घोषित करण्यात आले नव्हते आणि जिल्हा शिधावाटप क्षेत्रांच्या शिधावाटप प्राधिका-यांकडून अधिप्रमाणन करण्यात आले नव्हते. तसेच अमरावती, बीड, जळगाव आणि नंदूरबार येथे को-या शिधापत्रिकांचा लेखा ठेवण्यात आला नव्हता आणि वर्ष २००८-१३ दरम्यान शिधापत्रिकांच्या साठयाची प्रत्यक्ष पडताळणी केली नव्हती. शिधापत्रिका अयोग्य पद्धतीने ठेवल्यामुळे शिधापत्रिकांचा अवैध वापर होण्याची शक्यता नाकारता येत नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

राज्यात सर्वच जिल्ह्यांना व कुटुंबांना सारखेच धान्य वाटप करण्यात येते. याअगोदर धान्य वितरण व्यवस्थेमध्ये अपहार व गैरव्यवहार होत असल्याचे निदर्शनास आल्यामुळे बायोमॅट्रीक पद्धतीचा अवलंब विभागाने केला. त्यामुळे यात बरीच सुधारणा झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले असता बायोमॅट्रीक पद्धतीमध्ये देखील धान्याचा काळा बाजार होत आहे. त्यामुळे याचेशी आधार कार्ड लिंक करण्याचा देखील निर्णय शासनाने घेतलेला असून यासाठी आधारभूत सार्वजनिक वितण व्यवस्था (Aadhar enabled public Distribution system) ही नवीन यंत्रणा प्रायोगिक तत्वावर ४ जिल्ह्यांमध्ये सुरु करण्यात आली असून ती राज्यात सर्वच जिल्ह्यांमध्ये नजिकच्या काळात अवलंबिण्यात येईल असे समितीस सांगण्यात आले.

शिफारस :

२.४ शिधापत्रिकांचे नियमित पुनर्विलोकन करणे बंधनकारक असताना ते न झाल्यामुळे अथवा सदोषरित्या झाल्यामुळे अपात्र कुटुंबियांना देखील या योजनांचा लाभ मिळाला. या योजनांतर्गत पात्र ठरविण्यासाठी निश्चित केलेल्या निकषांतर्गत सादर माहितीची योग्य छाननी, शहानिशा व खात्री करुनच शिधापत्रिकांची पात्रता व अपात्रता अंतिम करण्यात यावी व त्यासाठी दुचाकी /चारचाकी वाहने, जमीनिची मालकी इत्यादीबाबत प्रादेशिक परिवहन विभाग, महसूल विभाग या विभागांशी योग्य तो समन्वय ठेवून शिधापत्रिका धारकांच्या कागदपत्रांची छाननी व तपासणी करावी व त्यानंतरच शिधापत्रिका जारी करावी. तसेच या शिधापत्रिकांचे नियमित पुनर्विलोकन करुन शिधापत्रिका जारी अथवा रद्द करणेबाबतची कार्यवाही करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.५ कोणतीही शिधापत्रिका जारी करताना अर्जदाराकडून पुर्ण माहिती तथा कागदपत्रे घेण्यात यावीत व को-या शिधापत्रिकांचा लेखा योग्य प्रकारे ठेवून दरमहा शिधापत्रिकांच्या शिल्लक साठ्याची पडताळणी करण्याबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात याव्यात अशी समितीची शिफारस आहे.

२.६ विभागाने आता धान्य वितरणासाठी बायोमॅट्रीक यंत्रणा सुरु केली असून त्याचेशी आधार कार्डदेखील लिंक केलेले आहे. शासनाने सुरु केलेल्या या नवीन पद्धतीमुळे गैरव्यवहार थांबविण्यास काही प्रमाणात निश्चितच मदत होणार असून ज्या रेशन दुकानांमध्ये नवीन पद्धतीच्या अगोदर व नंतर धान्य उचल व ग्राहक संख्येत मोठ्या प्रमाणात तफावत आढळल्यास तसेच ज्याठिकाणी लोकसंख्या व रेशन कार्डाच्या प्रमाणात तफावत आढळल्यास त्या सर्व प्रकरणांची शासनाने चौकशी करावी व यात गैरव्यवहार वा अनियमितता आढळल्यास रेशन कार्ड रद्द करावे व संबंधित अधिकारी/कर्मचा-यांवर कडक कारवाई करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.७ परिच्छेद क्र. २.२.९.१ "सबसिडीचे अनियमित आहरण"

अभिप्राय :

अन्नधान्य, पामतेल व इतर वस्तूंच्या सबसिडीबाबत अनियमित आहरण झाल्याचे आक्षेप महालेखापालांनी नोंदविले आहेत. त्यात विशेषत: अंत्योदय योजनेअंतर्गत तांदूळ आणि गव्हाच्या वितरण, हाताळणी आणि प्रशासनिक खर्चाची टक्केवारी महाराष्ट्र शासनाने १९९२ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केल्याप्रमाणे १२% ऐवजी २०% हिशेबात धरण्यात आली, परिणामत: रुपये ४१.२५ कोटीची जास्तीची सबसिडी देण्यात आली. तसेच विभागाने मागील वर्षीच्या अन्नधान्याची उचल विचारात न घेता, शिधापत्रिकांच्या संख्येवर आणि प्रति पत्रिका अनुज्ञेय असणा-या धान्याच्या आधारावर सबसिडी अंदाजित केली होती. आणि रुपये १२८४.४२ कोटी सबसीडी प्राप्त केली होती. विभागाने या कालावधीसाठी गणना केलेली प्रत्यक्ष सबसिडी रुपये ५९१.९२ कोटी इतकी होती. परिणामत: रुपये ६९२.५० कोटीच्या सबसिडीचे अनियमित आहरण झाले होते जी एकस्वीय प्रपंजी लेखा (PLA) मध्ये पडून होती. तसेच विभागाने सबसिडीपोटी रुपये ६१९.८९ कोटी प्राप्त केले होते, तथापि जिल्हयांकडून मागणी प्रतिक्षित असल्यामुळे विभागाने सबसिडीचे गणन केले नव्हते.

महालेखापालांचे उपरोक्त आक्षेपांबाबत विभागाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये खुलासा केला की, लाभार्थ्यांना धान्य प्रत्यक्ष उपलब्ध करुन देण्यासाठी FCI कडून खरेदी झाल्यानंतर त्याची शासकीय गोदामापर्यंत वाहतूक करण्यासाठी, साठवणूक, सुरक्षा, हमाली तसेच दुकानदारांचे मार्जिन इत्यादीसाठी जो अनुषंगिक खर्च येतो त्याचे दर शासन निर्णय नोव्हेंबर,१९९२ नुसार निश्चित केले आहेत. तथापि सद्य:स्थितीत धान्य खरेदीचे व विक्रीचे दर, वाहतुकीचे दर, गोदाम भाडे, हमाली इत्यादीमध्ये मोठया प्रमाणात वाढ झाली असून उपरोक्त शासन निर्णयातील अनुषंगिक खर्चाचे १२% दर व सध्या प्रत्यक्षात येणारा अनुषंगिक खर्च यामध्ये फरक असल्याने प्रत्यक्ष अनुषंगिक खर्च भागविण्यासाठी किमान २०% दराने अनुषंगिक खर्चाची गणना अर्थसंकल्पिय अंदाजपत्रकात केली आहे. तसेच सदर १२% अनुषंगिक खर्चामध्ये वाढ करुन मिळण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर केला असून तो प्रलंबित आहे, प्रत्यक्ष खर्च शासन निर्णयाच्या अधिन राहून करण्यात येत आहे.

तसेच सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे मासिक नियतने शिधापत्रिकाधारकांच्या संख्येवर आधारीत असते. या वितरण व्यवस्थेच्या लाभापासून कोणीही लाभार्थी वंचित राहणार नाही, याची दक्षता अंदाजपत्रक तयार करताना घ्यावी लागते. त्यामुळे मागील वर्षाच्या प्रत्यक्ष उचलीवर आधारीत अंदाजपत्रक तयार केल्यास अन्नधान्य खरेदी कमी होवून काही लाभार्थी वगळले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे नियतनावर आधारित अंदाजपत्रकात सबसिडीची मागणी करण्यात येते.

तसेच जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती स्थिर ठेवण्यासाठी BPL/APL/AAY तूरडाळ, पामतेल, साखर, गहू, तांदूळ या पाच वस्तूंची खरेदी सार्वजनिक वितरण व्यवस्थेच्या सबसिडीतून करण्यात आली. त्याचा भार स्वीय प्रपंजी लेख्यात (PLA) जमा झालेल्या सबसिडीवर पडला. तसेच आधारभूत किंमत योजनेअंतर्गत भरड धान्य खरेदी करिता प्रतीपूर्तीच्या अधिन राहून स्वीय प्रपंजी लेख्यातून सबसिडीचे वाटप करण्यात आले आहे. वरील सर्व व्यवहारांच्या येणे देणे रकमांचा ताळमेळ घेवून त्याची प्रतिपूर्ती स्वीय प्रपंजी लेख्यात करण्यात आली आहे. प्रतिपूर्तीद्वारे प्राप्त झालेल्या रकमांचा आढावा घेवून शासनास परत करावयाच्या रकमेबाबतची कार्यवाही करण्यात येत आहे. प्राप्त सबसिडीचा वापर हा राज्याची सार्वजनिक वितरण व्यवस्था सुरळीत चालावी व गरजू जनतेला स्वस्त दरात जीवनावश्यक वस्तू प्राप्त व्हाव्यात याकरिता स्वतंत्र तरतूद उपलब्ध न झाल्यामुळे शासन निर्णयाचे अधिन राहून सबसिडीतील रकमांचा वापर राज्यातील जनतेसाठी केला आहे, त्यामुळे ही अनियमितता नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

सन २००८-०९ ते २०१२-१३ या वर्षात अर्थसहाय्याची एकूण रुपये १९०४.३१७२ कोटीपैकी अन्नधान्य व्यवहारातील रक्कम रुपये ९४९.१४९७ कोटी व पामतेल, साखर व तुरडाळ या योजनेकरिता एकूण रक्कम रुपये ६१९.५२५३ कोटी खर्ची पडली आहे. अशी आहरीत एकूण तुट रकमेपैकी रुपये १५६८.६७५० कोटी खर्ची पडली असून अखर्चित रक्कम रुपये ३३५.६४२२ कोटी ही आधारभूत किंमत योजनेसाठी धान व भरडधान्य खरेदीकरीता वापरण्यात आलेली आहे. आधारभूत योजनेच्या प्रलंबित रकमा भारतीय अन्न महामंडळाकडून प्राप्त होईल, त्याप्रमाणे अखर्चित रक्कम शासन लेख्यात भरणा करण्याची कार्यवाही सुरु आहे व सन २०१५-१६ या वर्षात रक्कम रुपये २०० कोटी शासन विभागास भरणा करण्यात आली आहे.

शासन निर्णय दिनांक २४.११.१९९२ नुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत अन्नधान्य हाताळणूक व वाहतूकीवरील खर्च हा अन्नधान्याच्या खरेदी दराच्या १२ टक्क्यांनुसार देय होणा-या रकमेप्रमाणे खर्च नियतनानुसार व आवश्यक बाबींवर करण्यात आला आहे. राज्यात राष्ट्रीय अन्न सुरक्षा योजना माहे फेब्रुवारी २०१४ पासून कार्यान्वित असून केंद्र शासन अधिसुचना दिनांक १५.८.२०१५ नुसार अन्नधान्य हाताळणुक व वाहतुकीकरीता प्रत्येकी रुपये ६५/- दर निश्चित करण्यात आला आहे. तथापि सदर खर्चाची रक्कम सुद्धा कमी पडत असून त्यामध्ये वाढ करण्याबाबत, शासन स्तरावर कार्यवाही प्रस्तावित आहे.

यामध्ये जर १२ टक्केप्रमाणे अनुषंगिक खर्च आहे तर शासन २० टक्क्यांची मागणी का करते ? अशी विचारणा समितीने केली असता बदलणा-या योजना व किंमतीतील बदल यामुळे ही २० टक्के मागणी केल्याचे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले. मग विभाग सन १९९२ चा शासन निर्णय मागे घेणार आहे काय ? अशी विचारणा महालेखाकारांनी केली असता ज्यात १२ टक्क्यांचा दर निश्चित केला होता तो २० टक्के करण्यासाठी शासन निर्णय जारी केला होता. त्यामुळे सन १९९२ चा शासन निर्णयाचा आता काहीच उपयोग नसल्याचे व त्याअनुषंगाने शासन निर्णयात सुधारणा करण्याचे मान्यही केले. तसेच विभागाने ज्या ५ वस्तुंची खरेदी केली, त्याकरिता वेगळे नियोजन का केले नाही याबाबत समितीने विचारले असता ती योजना नॉनप्लान मधूनच राबविली गेली. प्लॅनसाठी वेगळे पैसे मिळाले नाहीत, त्यामुळे नॉनप्लॅन मधूनच याच पी.एल.ए. मधून त्याचा खर्च जात होता त्याकरिता वेगळा निधी प्राप्त नसल्याचा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच त्यांनी ती प्लान योजना म्हणून जाहीर केली होती परंतु, विभागाला नॉनप्लॅन मधूनच पैसे मिळाले असल्याचे समितीस अवगत केले. तसेच मागील वर्षीच्या धान्याची उचल विचारात न घेता ज्याआधारे सबसीडी अंदाजित केली त्याच्या खर्चाचा ताळमेळ करण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच किती तूट अनुज्ञेय आहे अशी पृच्छा समितीने केली असता टक्केवारीवर तूट अनुज्ञेय नसून वास्तविक आधारावर आहे व अनुषंगिक खर्चाच्या बाबी सतत बदलत राहतात. त्यामुळे वास्तविक आधारावर जी तूट येते तेवढी तूट अलाऊ होते त्याचा ॲव्हरेज २० टक्क्यांच्यावर गेला आहे. क्विंटलच्या मानकाप्रमाणे पाहिले तर पर क्विंटल २८३ रुपयांची तूट येत आहे तसेच गोदामामध्ये जी तूट आहे त्याबाबत समितीने विचारणा केली असता ती वेगळी असून ती आपण दिडपटीने वसूल करतो व १ टक्क्यांच्या वर गेल्यास दिडपट वसूल करण्यात येते असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

शिफारस :

२.८ केंद्राची निर्धारीत किंमत (Central Issue Price) अधिक हाताळणी आणि प्रशासनिक खर्च आणि गोदामातून माल निर्गमित करतानाची त्याची किंमत यातील तफावतीची रक्कम ही महाराष्ट्र शासनाकडून सबसीडी म्हणून देण्यात येते. परंतु या सबसीडीचे अनियमित आहरण झाल्याबाबतचे तसेच अधिकची सबसीडी दिल्याबाबतचे तसेच प्रत्यक्ष

सबसीडीचे गणन केले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. त्याचप्रमाणे अर्थसंकल्पीय अंदाजापेक्षा भांडवली खर्चावर झालेला अधिक खर्च हा PLA निधीतून करण्यात आला होता. हा वाढीव खर्च पामतेल, तांदुळ आणि गहू यांच्या वाढीव किंमतीला प्रतिबंध करण्यासाठी, त्याची खरेदी आणि वितरण करण्यासाठी झाला होता. विभागाने पुढे असेही नमूद केले की, २००९-१३ दरम्यान झालेली बचत ही अर्थसंकल्पीय वितरण प्रणालीतील तांत्रिक अडचणीमुळे (२००९-१०), निधी उशिराने प्राप्त झाल्यामुळे (२०१०-११), विभागाने शिधापत्रक पुनर्विलोकनाची मोहीम राबविल्यामुळे लाभार्थ्यांच्या संख्येत झालेली घट (२००९ आणि २०११) आणि एप्रिल,२०१३ साठी महाराष्ट्र शासनाने जिल्हानिहाय अन्नधान्याच्या वाटपाचे आदेश उशीराने जारी केल्यामुळे झाली होती असेही समितीच्या निदर्शनास आले. अतः अन्नधान्यावरील सबसीडीचे अंदाजपत्रक वास्तववादी असावे तसेच अधिकचा खर्च PLA खात्यातून न करता त्यासाठी स्वतंत्र लेखा उपशिर्ष तयार करुन त्याअंतर्गत निधीची तरतूद करुन हा खर्च भागविण्यात यावा. वित्तीय लेखे संगणकीय आज्ञावलीच्या माध्यमातून हाताळण्यात यावे व विभागाने खर्चाचा ताळमेळ (Reconciliation) नियमितरित्या करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.९ परिच्छेद क्र. २.२.९.२ "रिकाम्या पोत्यांची विल्हेवाट न लावणे"

अभिप्राय :

महाराष्ट्र शासनाने जारी केलेल्या निर्देशानुसार धान्य वाहून नेण्यासाठी उपयोगात आणलेल्या पोत्यांची दरवर्षी निविदा/लिलावाद्वारे विल्हेवाट लावणे आवश्यक होते. परंतु २५.५६ लक्ष रिकामी पोती एक वर्षापेक्षा जास्त काळापासून पडून होती. तसेच रिकाम्या पोत्यांची विल्हेवाट न लावल्यामुळे केवळ शासनाचा रुपये १.५९ कोटीचा (अंतिम निविदेतील दरावर आधारित) महसूल अडकून पडला होता असे नाही तर ती पोती खराबही होत होती असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविले आहेत.

यावर विभागाने दिनांक १२ नोव्हेंबर, २०११ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासनाने राज्यातील शासकीय गोदामातील शिल्लक बारदान्याची विल्हेवाट लावण्यासंदर्भात सविस्तर सूचना दिलेल्या आहेत. राज्यातील जिल्ह्यांमध्ये शिल्लक असलेल्या उपयोगी/निरुपयोगी/तुकडा बारदान्याची संख्या जुलै, २०१३ मध्ये ४२.४५ लक्ष इतकी होती.

राज्यातील सर्व संबंधित जिल्हाधिकारी कार्यालयाकडून शिल्लक बारदान्याची विल्हेवाट लावण्यासाठी सातत्याने प्रयत्न करण्यात येत आहेत. मात्र निविदांना प्रतिसाद न मिळाल्याने, अपेक्षित किंमतीपेक्षा खुपच कमी दर आल्याने वारंवार निविदा प्रक्रिया राबवावी लागलेली आहे. त्यामुळे शिल्लक बारदान्याची विल्हेवाट लावण्यास विलंब होत असल्याचे समितीस सांगण्यात आले.

तसेच पी.डी.एस. साठीची बारदाने काही ठिकाणी बारदाने खराब होतात किंवा काही वेळेस वाटप करताना ते छोट्या बारदानांमध्ये केल्यामुळे अशी बारदाने शिल्लक राहतात किंवा जुनी बारदाने शिल्लक आहेत, असा तो हिशोब असून ४२ लाखावरुन ती संख्या १७ लाखांवर आली असून आता एकुण १४ लाख बारदाने शिल्लक असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

विभागाकडून खराब बारदाने विकण्यासाठी जी निविदा काढण्यात येते त्यामध्ये एक मोठी साखळी करुन ५-६ रुपयांचे बारदान २-३ रुपयांमध्ये विकले जाते याला कुठे तरी चाप बसला पाहिजे यावर कुठे तरी नियंत्रण आले पाहिजे असे समितीने अवगत केले असता विभागीय सचिव यांनी यास सहमती दर्शविली.

शिफारस :

२.१० उपयोगात आणलेल्या रिकाम्या बारदानांची दरवर्षी निविदा किंवा लिलावाद्वारे विल्हेवाट लावणे आवश्यक असताना ही विल्हेवाट न लावल्यामुळे विभागाचा मोठ्या प्रमाणात महसूल अडकून पडला. अतः शासनाने सर्व जिल्हाधिका-यांना धान्याच्या रिकाम्या पोत्यांच्या साठ्याचा आढावा घेण्याचे आणि त्यांची विल्हेवाट लावण्यासाठी योग्य ती कारवाई करण्याचे निर्देश द्यावे व त्यासाठी आवश्यक ती यंत्रणा उभी करावी व विभागाकडून बारदाने विक्रीची जी निविदा काढली जाते त्यामध्ये साखळी पद्धत होऊ नये यासाठी ई-निविदा पद्धतीचा अवलंब करावा व भविष्यात या आक्षेपांची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता विभागाने घ्यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.११ परिच्छेद क्र. २.२.९.३ "भारतीय अन्न महामंडळाकडे प्रलंबित असलेली अग्रीमे"

अभिप्राय :

TPDS अंतर्गत केंद्र शासनाकडून होत असलेल्या अन्नधान्याच्या मासिक वाटपाच्या आधारावर DSOs/FDOs यांनी अन्नधान्याच्या किंमतीपोटी संपुर्ण रक्कम आगावू भरून FCI गोदामातुन अन्नधान्याची उचल करायची असते. जर DSOs/FDOs नी धान्य संपूर्णपणे उचलले नाही तर उचल न केलेल्या अन्नधान्याची किंमत FCI कडून परत घ्यायची होती. परंतु रुपये ७७.९६ कोटी रक्कमेचे F.C.I कडून समायोजन/वसूली प्रलंबित होती ज्यापैकी रुपये ११.४४ कोटीची समायोजन / वसूली तीन वर्षापेक्षा अधिक काळापासून प्रलंबित होती, असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे.

भारतीय खाद्य निगम महामंडळाकडे अन्नधान्य उचलीसाठी ४० दिवस अगोदर अगावू जमा रक्कमा महामंडळाकडे जमा होतात. जमा रक्कमेतुन पुढील नियतनाचे समायोजन करुन व्यवहार केले जातात व यातील शिल्लक जमा रक्कमा वसुल करणेबाबत पाठपुरावा केला जातो. यासाठी भारतीय खाद्य निगम महामंडळाकडे कमीत कमी आगाऊ रक्कमा रहाव्यात यासाठी अपेक्षित प्रयत्न सुरु असून सद्यःस्थितीत परिच्छेदात नमूद रुपये १३.१० कोटी पैकी मुंबई व ठाणे जिल्ह्यातील शिधावाटप क्षेत्राची जुनी रुपये १.५९ कोटी एवढीच वसुली शिल्लक असून उर्वरीत सर्व वसुली झाल्याचे व या थकीत वसूलीचे प्रयत्न चालू आहेत असे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

२.१२ विभागाने केवळ परिच्छेदात नमूद केलेल्या जिल्ह्यातील नव्हे तर राज्यातील सर्वच जिल्ह्यांतील अग्रीमाची वसूली/ समायोजन रकमेचा आढावा घ्यावा. त्यातील वसुलपात्र रक्कम तात्काळ वसुल करावी अथवा त्याचे समायोजन करण्यात यावे व भविष्यात यासाठी अस्तित्वात असलेल्या नियमांचा अवलंब करुन असे आक्षेप टाळण्यात यावेत व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.१३ परिच्छेद क्र. २.२.१०.१ "अन्नधान्य वाटप आणि उचल यामधील फरक/विसंगती"

अभिप्राय :

सन २००८-१३ या कालावधीत अन्नधान्याचे वाटप आणि उचल याविषयी FCI व विभागाने सादर केलेल्या आकडेवारीची तुलना केली असता त्यामध्ये तफावत आढळून आली असा महालेखापालांचा आक्षेप आहे.

नियतन व उचल यातील फरक मुख्यत्वे कामगार विषयक समस्या, FCI गोदामांच्या फळ्या रिकाम्या नसणे, सुट्टयांच्या दरम्यान उचल न होणे, FCI गोदामांमध्ये धान्य उपलब्ध नसणे, APL मध्ये उचल कमी होत होती कारण त्यासाठी रकमेचे प्रदान करावे लागत होते आणि FCI कर्मचा-यांचा असहकार या कारणांमुळे आहे. अन्नधान्याचे नियतन व वाटप यामध्ये फरक पडू नये यासाठी जिल्हा यंत्रणांना वेळोवेळी सूचना देण्यात आल्या असून यासंदर्भात APL शी चर्चा करुन अन्नधान्याची जास्तीत जास्त उचल होण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असल्याचे विभागाने समितीस सांगितले. तसेच सन २०१४ पुर्वी यात तफावत होती परंतु सन २०१४ नंतर यात सुधारणा झाली.

शिफारशी :

२.१४ अन्नधान्य वाटप आणि उचल यामधील फरक वा विसंगती असणे हे विभागांतर्गत नियंत्रणाचा अभाव असल्याचे द्योतक आहे. तसेच यात गैरव्यवहार वा अवैध विक्रीदेखील असण्याची शक्यता नाकारता येत नाही. अतः अन्नधान्य अवैधरितीने दुसरीकडे वळविण्यात येत नाही याची खात्री करण्यासाठी अन्नधान्याचे वाटप आणि उचल यातील तफावतीचा ताळमेळ घालणे व त्याचा तपास करणे आवश्यक असल्यामुळे यासाठी आवश्यक ती यंत्रणा वा उपाययोजना निर्माण करण्यात यावी व वाटप व उचल यात तफावत राहू नये यासाठी विभागाने FCI सोबत समन्वय साधून व प्रसंगी बैठका घेऊन यासंदर्भात येणा-या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत तसेच क्षेत्रीय कार्यालयांनी विशेष मोहिम घेऊन वाटप आदेश लवकर निर्गमीत करणे, पहिल्या किंवा दुस-या आठवड्यापर्यंतच जास्तीत जास्त उचल करणे, प्रत्येक जिल्ह्यासाठी स्वतंत्र वाहतूकदार निश्चित करणेबाबत उपाययोजना करण्यात याव्यात. मालाची उचलच केली नाही तर तो दुसरीकडे वळविण्याचा धोका संभवितो. FCI कडून घेतलेला माल दुकानदारांना देण्यात येतो व दुकानदारांनी किती माल जनतेला पुरविला याबाबत खातरजमा करण्याची कार्यपद्धती विभागाने विकसित करावी व केलेल्या उपाययोजनांची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.१५ सध्या प्रत्येक वाटपाचा स्वतंत्र परतावा घ्यावा लागतो त्याऐवजी दरवर्षी अथवा तिमाही पद्धतीने दिलेल्या अग्रिमाचे समायोजन करण्याची पद्धत स्विकारण्याबाबतच्या पर्यायांची छाननी करुन त्याचा अवलंब करण्यात यावा. सध्या FCI कडे असलेल्या अग्रीमाचे लवकरात लवकर समायोजन करुन घ्यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.१६ परिच्छेद क्र. २.२.१०.२ "वाटप केलेल्या अन्नधान्याची FCI गोदामातून उचल न करणे"

अभिप्राय :

केंद्र शासनाकडून वाटप आदेश प्राप्त झाल्यापासून १० दिवसाच्या आत FCI गोदामातून अन्नधान्य उचलणे गरजेचे असते. विहित कालावधीत DSOs ने जर FCI गोदामातून वाटप केलेल्या अन्नधान्याची उचल केली नाही तर, उचल न केलेले अन्नधान्य रद्दबादल होते. या पार्श्वभूमीवर वर्ष २००८-१३ दरम्यान त्याआधारे BPL अंतर्गत १६.०९ लक्ष मे. टन तांदुळ आणि गहू आणि अंत्योदय अंतर्गत ५.०१ लक्ष मे. टन तांदुळ आणि गहू याचे वाटप घेऊनही उचल न केल्यामुळे रद्दबादल झाले होते. ११ चाचणी तपासणी केलेल्या घटकांमध्ये, BPL अंतर्गत ९.२४ लक्ष मे. टन तांदुळ आणि गहू यांचे वाटप घेऊनही उचल न केल्यामुळे रद्दबादल झाले होते. परिणामतः अन्नधान्याच्या लाभापासून लाभार्थी त्या प्रमाणात वंचित राहिले, असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे.

शासनाने अन्नधान्य न उचलणे अथवा कमी उचलणे यासाठी कामगार विषयक समस्या, FCI गोदामांच्या फळ्या रिकाम्या नसणे, सुट्यांच्या दरम्यान उचल न होणे, FCI गोदामांमध्ये धान्य उपलब्ध नसणे आणि FCI कर्मचा-यांचा असहकार इत्यादी कारणांमुळे या कालावधीत धान्याची पूर्ण उचल होऊ शकली नाही असे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

२.१७ वाटप केलेल्या अन्नधान्याची FCI गोदामातून उचल न करणे याबाबत सदरहु आक्षेप नोंदविण्यात आलेले असून विभागाने धान्य वितरण व्यवस्थेचे सक्षमीकरण करण्यासाठी वाटप व उचल याची तफावत होऊ नये यासाठी विशेष मोहिम राबविण्यात यावी. भारतीय अन्न महामंडळाबरोबर सल्लामसलत करुन या समस्येचे निराकरण करण्याचे प्रयत्न करण्यात यावेत. तसेच, अन्नधान्य उचलीचे प्रमाण वाढविण्यासाठी प्रयत्न करण्यात यावेत. तसेच ही उचल न झाल्यामुळे याबाबतचा कोट्यावधीचा निधी FCI कडे प्रलंबित आहे. याचादेखील विभागाने आढावा घ्यावा व जुन्या प्रलंबित रकमांचा परतावा घेणेसाठी अथवा समायोजन करण्यासाठी प्रयत्न करण्यात यावे. समायोजन होऊ शकत नसल्यास तात्काळ परतावा घेण्यात यावा. निश्चितच यासाठी यंत्रणा कमी पडत आहे ही वस्तुस्थिती आहे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात सादर करण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.१८ परिच्छेद क्र. २.२.१०.३ "खुल्या बाजारातून तांदुळ खरेदीवर झालेला टाळतायेण्याजोगा जास्तीचा खर्च"

अभिप्राय :

जीवनावश्यक वस्तूंच्या झालेल्या भाववाढीपासून थोडा दिलासा मिळावा यासाठी महाराष्ट्र शासनाने प्रत्येक APL लाभार्थ्याला (केशरी शिधापत्रिका धारक) दरमहा पाच किलो तांदुळ तीन महिन्यासाठी स्वस्त दराने देण्याचे ठरविले. या निर्णयानुसार, हया योजनेची सुरुवात जुलै २००८ पासून व्हायला हवी होती आणि तिची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य सहकार पणन महासंघ मर्यादीत (पणन महासंघ) व्दारे करायची होती. पणन महासंघाकडून १६,८१६ प्रति मे. टन या दराने तांदुळाचे प्रापण करायचे होते. ज्यांनी शासकीय गोदामात ते धान्य पाहोचवणे अपेक्षित होते. जिल्हयांच्या मागण्या विचारात घेऊन पणन महासंघाकडे ७०,००० मे. टनाचा पुरवठा आदेश दिला गेला होता त्यानंतर ४३,१०३ मे. टन (ऑगस्ट २००८) आणि ५,५६८ मे. टन (सप्टेंबर २००८) यासाठी आदेश दिले गेले. मागणी केलेल्या एकूण १.१९ लक्ष मे. टन धान्यापैकी पणन महासंघाने डिसेंबर २००८ पर्यंत फक्त ६६,९९४ मे. टन धान्याचा पुरवठा केला होता. परंतु केंद्र शासनाने वाटप केलेल्या ५१,२८७ मे. टन तांदळापैकी फक्त ३६,७८५ मे. टन तांदुळाची उचल केली होती. केंद्र शासनाने वाटप केलेल्या तांदुळाची पूर्ण उचल न करता पणन महासंघाकडून तांदूळ वाढीव किंमतीस खरेदी करण्यात आला ज्यामुळे १०.९१ कोटीचा टाळता येण्याजोगा जास्तीचा खर्च झाला. तसेच पणन महामंडळाकडे केलेल्या १.१९ लक्ष मे. टन अन्नधान्याच्या मागणीपैकी पणन महामंडळाने फक्त ०.९६ लक्ष मे. टन अन्नधान्याचा पुरवठा केला होता ज्यामुळे महागाईपासून APL शिधापत्रिकाधारकांना दिलासा देण्याचा उद्देश पुर्ण होऊ शकला नाही असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांच्या परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

केंद्र शासनाने तांदुळाचे अत्यल्प वाटप केल्यामुळे केंद्र शासनाला जास्त तांदुळ पुरविण्याची विनंती केली होती, जी पूर्ण करण्यात आली नव्हती. तसेच, महागाई नियंत्रणात ठेवण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने APL शिधापत्रिकाधारकांसाठी पणन महासंघाकडून जास्तीचे तांदूळ घेण्याचे ठरविले. तसेच कामगार विषयक समस्या, FCI गोदामांच्या फळ्या रिकाम्या नसणे, सुट्टयांच्या दरम्यान उचल न होणे, FCI गोदामांमध्ये धान्य उपलब्ध नसणे आणि FCI कर्मचा-यांचा असहकार इ. कारणांमुळे FCI कडून १००% उचल होऊ शकली नाही. त्यामुळे महाराष्ट्र राज्य सहकार पणन महासंघ मर्यादीत (पणन महासंघ) व्दारे तांदूळ खरेदी करणे भाग पडले. सुरुवातीच्या १.१९ लक्ष मे.टन अन्नधान्याच्या मागणी पैकी प्रत्यक्ष नियतनाच्या वेळी उपलब्ध मागणी नुसार ०.९६ लक्ष मे.टन म्हणजेच ८०% धान्याचा पुरवठा महामंडळाकडून करण्यात आला. त्यामुळे प्रत्यक्ष मागणी पेक्षा अधिक तांदळाची खरेदी टाळण्यात आली असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

यावर समितीने आक्षेप नोंदवित एका बाजूला विभागाकडे मालाची उचल करण्यासाठी यंत्रणा नाही दुस-या बाजूला आपण खुल्या बाजारातून धान्य खरेदी केले होते. तसेच रुपये ७ ते ७.५ प्रतिकिलो या दराने केंद्र शासनाकडून धान्य मिळू शकत होते तरी देखील ते खरेदी न करता बाजारातून रुपये १६ प्रति किलो या भावाने धान्य विकत घेतले. वाटप केलेला माल उचलला असता व उर्वरित आवश्यक माल पणन महामंडळाकडून वाढीव दराने घेतला असता तर काही अडचण नव्हती. एवढेच नव्हेतर प्रति किलो १६ रुपयांनी मात्र खरेदी केला व प्रति किलो १२ रुपयांनी विकला हा तर अत्यंत गंभीर व आक्षेपार्ह निर्णय असून असे करण्याची कारणे काय ? अशी विचारणा समितीने केली असता कॅबिनेट सब कमिटीने धान्य खरेदी करण्याचा निर्णय घेतला होता तसेच मार्केटींग फेडरेशनने निविदा काढून तांदूळ खरेदी केले होते व खरेदी करण्याचा निर्णय शासनाचा होता असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

शिफारस

२.१९ एकीकडे बीपीएल, अंत्योदय व एपीएल करिता वाटप केलेल्या मालाची उचल न केल्याबाबतचे गंभीर आक्षेप याअगोदरच्या परिच्छेदात महालेखाकारांनी नोंदविलेले असताना दुसरीकडे विभाग खुल्या बाजारातून धान्य खरेदी करते. परिणामी टाळता येण्याजोगा जास्तीचा खर्च झाल्याचे गंभीर आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत व यासाठी विभागाने दिलेले उत्तर समर्थनीय नाही. विभागाने धान्याचे वाटप, त्याची उचल, त्याचे वितरण याचे यथायोग्य नियोजन करुन त्याउपरही अतिरिक्त धान्याची गरज पडल्यास तो खुल्या बाजारातून आवश्यकतेनुसार खरेदी करणे आवश्यक असताना विभाग एकीकडे धान्याची उचल करीत नाही व दुसरीकडे पणन महासंघाकडून ज्यादा दराने धान्य खरेदी करते याबाबत समिती तीव्र नाराजी व नापसंती व्यक्त करीत आहे. FCI च्या अडचणी व्यतिरिक्त माल न उचलण्याकरिता जे जबाबदार असतील त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करावी. अधिका-यांच्या चुकीमुळे वाटप व उचल यात तफावत निर्माण झाली असल्यास त्यांच्यावर देखील कारवाई करण्यात यावी. तसेच वाटप केल्याप्रमाणे मालाची उचल होईल व शक्यतो खुल्या बाजारातून धान्य खरेदी करावे लागणार नाही याबाबतची दक्षता घेऊन योग्य ते नियोजन विभागाने करावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२० परिच्छेद क्र. २.२.१०.४ "अन्नधान्याच्या गुणवत्तेची तपासणी न करणे"

अभिप्राय :

अन्नधान्याच्या विहित गुणवत्तेच्या सुनिश्चिततेसाठी, PDS (नियंत्रण) आदेश, २००१ मधील अटींनुसार FCI ला अन्नधान्याच्या किंमतीचे प्रदान करण्याआधी राज्य शासनाचा प्रतिनिधी किंवा त्यांनी नामनिर्देशित केलेली व्यक्ति आणि FCI यांनी संयुक्तरित्या अन्नधान्याच्या साठयाची तपासणी करावी. PDS (नियंत्रण) आदेश, २००१ मध्ये पुढे अशीही तरतुद आहे की, FCI ने साठयानुसार अन्नधान्याचे बंद नमूने राज्य शासनास पाठवावे. परंतु शिधा नियंत्रक, मुंबई व्यतिरिक्त कुठल्याही कार्यालयाची संयुक्त तपासणी केली नव्हती. तसेच, चाचणी तपासणी केलेल्या एकाही कार्यालयांत विभागाला अन्नधान्याच्या साठ्याचे रकाना-निहाय बंद नमुने देखील प्राप्त झाले नव्हते असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे.

विभागाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाद्वारे खुलासा केला की, सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत (नियंत्रण) आदेश २००१ मधील अटींनुसार FCI कडून योजनानिहाय धान्याचे वितरण आदेश (Distrubution Order) घेण्यासाठी रक्कम जमा करण्यात येते व धान्याची उचल FCI च्या गोदामातून उचल करण्याअगोदर संयुक्त तपासणी करण्यात येते.

FCI ही केंद्र शासनाची संस्था असल्याने, अन्नधान्याची उचल करण्याअगोदर दोन्ही कार्यालयांच्या प्रतिनिधींकडून संयुक्त तपासणी करण्यात येते. तथापि, या संदर्भात लेखी नोंद ठेवण्यात येऊन, त्या लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याच्या सूचना पुन्हा एकदा देण्यात आल्या आहेत.

याबाबत समितीने विभागीय सचिवांची साक्ष घेतली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, उचल करतेवेळी मालाच्या गुणवत्तेची तपासणी करण्यात येते, त्याचे रेकॉर्ड विभागाकडे आहेत, एक महिनाभर नमुने ठेवले जातात, तक्रार आली तर दोन महिन्यासाठी नुमने ठेवले जातात. त्यानंतर ते ठेवण्यात येत नसल्यामुळे ते तपासणीसाठी उपलब्ध झाले नाही. परंतु तपासणी करुनच उचल घेतली जाते असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

शिफारस :

२.२१ अन्नधान्याच्या विहित गुणवत्तेच्या सुनिश्चिततेसाठी सार्वजनिक वितरण प्रणाली आदेश सन २००१ मधील अटीनुसार अन्नधान्याच्या साठ्याची संयुक्त तपासणी करुन त्याची गुणवत्ता निश्चित करणे बंधनकारक असतानाही संयुक्त तपासणी न केल्यामुळे TPDS अंतर्गत निर्धारित गुणवत्तेचे धान्य वितरीत केले जात होते याची काहीही खात्री देता येत नाही. अतः केंद्र शासनाने वाटप केलेल्या अन्नधान्यांची संपुर्णपणे उचल होण्याची खात्री करण्यासाठी आणि FCI कडून अन्नधान्याची उचल करण्याआधी धान्याच्या गुणवत्तेची खात्री करण्यासाठी संयुक्त तपासण्या केल्या जातील यासाठी प्रयत्न करुन योग्य ती उपाययोजना करण्यात यावी. तसेच FCI व नागरी पुरवठा विभागाचे अधिकारी संयुक्त तपासणी करताना सध्या अस्तित्वात असलेल्या पद्धतीनुसार धान्याचे नमुने गोळा करतात, सील करतात व सही करतात. या पद्धतीत विभागाने अधिक सुधारणा करुन यापुढे नमुना गोळा करतेवेळी व्हिडीओ शुटींग देखील करावे व ते एखाद्या सीडी किंवा पेनड्राईव्हमध्ये रेकॉर्ड करावे. स्टॉकनिहाय/दिनांकनिहाय रेकॉर्ड तयार ठेवावे व घेतलेले नमुने व येणारा माल यामध्ये तफावत वा विसंगती राहणार नाही यासाठी आवश्यक ती उपाययोजना करावी व केलेल्या उपाययोजनांची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२२ परिच्छेद क्र. २.२.११ ''साखरेचे वाटप आणि वितरण''

अभिप्राय :

केंद्र शासन महाराष्ट्र शासनाला TPDS अंतर्गत वितरणासाठी साखरेचे वाटप करते. जिल्हाधिका-यांनी नियुक्त केलेले साखर नामनिर्देशित सदस्य केंद्र शासनाने निर्देशित केलेल्या साखर कारखान्यातून केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या किंमतीत लेव्ही साखरेची उचल करतात आणि FPS द्वारे दारिद्र्य रेषेखालील आणि अंत्योदय शिधापत्रिकाधारकास वाटप करतात. त्याअनुषंगाने साखरेच्या वाटप आणि वितरणासंबंधीच्या दस्तऐवजांच्या तपासणीअंती वाटप करण्यात आलेल्या १२.९८ लक्ष मे.टन साखरेऐवजी फक्त ८.७५ लक्ष मे.टन साखरेची उचल झाली होती. ४.२३ लक्ष मे.टन साखरेची कमी उचल झाली होती. विभागीय अधिका-यांबरोबर लेखापरीक्षेने केलेल्या लाभार्थ्यांच्या संयुक्त सर्वेक्षणात १० टक्के BPL लाभार्थ्यांनी साखरेचा कमी पुरवठा/पुरवठा होत नसल्याची तक्रार केली होती. तसेच BPL साखरेच्या आणि APL साखरेच्या वाटप आणि उचल यात तफावती आढळून आल्या असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत. अतः वाटप आणि उचल यातील तफावती ह्या योग्य संनियंत्रणाचा अभाव दर्शविते आणि साखरेला योग्य ठिकाणी वळविण्यात आल्याची शक्यता नाकारता येत नाही.

स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाद्वारे विभागाने खुलासा केला की, केंद्र शासन, राज्य शासनास लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत बीपीएल (BPL) आणि अंत्योदय (AAY) शिधापत्रिकाधारकांना नियंत्रित साखरेचे महिनानिहाय नियतन उपलब्ध करुन देते. साखर कारखान्याच्या एकूण उत्पादनापैकी १० टक्के साखर केंद्र शासनास नियंत्रित साखर म्हणून लक्ष्यनिर्धारित सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत वाटपासाठी प्राप्त होत होती. परंतु सन २००८ ते २०१३ ह्या कालावधीत नियंत्रित साखरेची कमी उचल करण्यात आली. साखर कारखान्याकडे नियंत्रित साखर उपलब्ध नसल्याने, नियंत्रित साखर पुरविण्यास साखर कारखान्यांनी नकार दिल्यामुळे, साखर नामनिर्देशकांनी साखरेची उचल केली नसल्याने, साखर ओली, खराब किंवा चांगल्या दर्जाची नसल्याने, सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत मंजूर साखरेचे दर खुल्या बाजारातील दरांपेक्षा जास्त किंवा दरांइतके असल्याने साखर नामनिर्देशकाने उचल न केल्याने, साखर कारखाना बंद असल्याने, साखर वाहतूक कंत्राट निश्चित नसल्यामुळे साखर नामनिर्देशकाने उशिरा आरटीजीएस भरणा करणे इत्यादी अनेक कारणे या कमी उचलीमागे होती.

केंद्र शासनाने साखर कारखान्यांना त्यांच्याकडील नियंत्रित साखरेची राज्यांमार्फत उचल करण्यासंदर्भात आदेश निर्गमित केले होते. तथापि, काही नामित साखर कारखान्यांनी केंद्रांच्या आदेशानुसार साखर पुरवठा केला नाही, त्यामुळे ज्या कारखान्यांनी नियंत्रित साखर उपलब्ध करुन दिली नाही ते कारखाने बदलून देण्याबाबत केंद्र शासनास वेळोवेळी विनंती करण्यात आली. संबंधित जिल्हाधिका-यांना दोषी असलेल्या साखर कारखान्यांविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियम, १९५५ अंतर्गत गुन्हा दाखल करुन साखर साठा कायदेशीररित्या ताब्यात घेण्याबाबत निदेश देण्यात आले. तसेच दोषी साखर नामनिर्देशकांचे अनुज्ञाप्ती प्रमाणपत्र रद्द करण्याबाबत व ठेवी जप्त करण्याबाबत निदेश देण्यात आले होते. अशाप्रकारे राज्य शासनाने साखरेची उचल व वाटपाबाबत सातत्याने संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा केला असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

परंतु कारखान्यांविरुद्ध गुन्हे दाखल केल्यामुळे संबंधित कारखान्यांनी उच्च न्यायालयामध्ये केंद्र शासनाविरुद्ध याचिका दाखल केल्या आणि मुंबई उच्च न्यायालयाच्या निदेशानुसार केंद्र शासनाने साखर कारखान्यांशी त्यांच्या हंगाम सन २०११-१२ मधील नियतित केलेल्या प्रलंबित नियंत्रित साखरेबाबत चर्चा केली. त्यानुसार ज्या साखर कारखान्यांनी त्यांच्या हंगाम सन २०११-१२ मधील नियतित केलेली प्रलंबित नियंत्रित साखर देण्याची तयारी दर्शविली त्या साखर कारखान्यांना उचल करण्यासाठी केंद्र शासनाकडून मुदतवाढ देण्यात आली व राज्य शासनास संबंधित साखर उचल करण्याबाबत केंद्र शासनाकडून विविध आदेशाद्वारे सूचना देण्यात आल्या. साखर उद्योगावरील नियंत्रण केंद्र शासनाने हटविल्याने एप्रिल २०१३ पासून राज्यात खुल्या बाजारातून साखर खरेदी करुन वाटप केली जाते. म्हणून या विभागातून सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत करावयाची साखर खुल्या बाजारातून

ई-लिलावाद्वारे जुलै २०१४ पासून आजतागायत खरेदी केली जाते असे समितीस सांगण्यात आले. त्याआधारे १२५ साखर कारखान्यांपैकी ३० कारखान्यांवर कारवाई करण्याचा प्रस्ताव असून त्यापैकी ६ कारखान्यांना केंद्रशासनाकडून स्थगिती मिळाली आहे. तर एका साखर कारखान्यावर गुन्हा दाखल झाला आहे. उर्वरित ११८ कारखान्याच्या बाबतीत काय परिस्थिती आहे याबाबत समितीने विचारणा केली असता लेव्ही न दिलेले ३० कारखाने असल्याचे विभागीय सचिवांनी सांगितले. यावर ३० पैकी फक्त ६ कारखान्यांना केंद्रशासनाकडून स्थगिती आहे तर एका कारखान्यावर गुन्हा दाखल आहे. बाकी २३ कारखान्यांच्या बाबतीत सहा-सहा वर्षे कारवाई नाही अशी विचारणा समितीने केली असता त्यातील काही कारखाने बंद आहेत तर काही ठिकाणी साखर नामनिर्देशक नाही तरीही जिल्हाधिका-यांना वेळोवेळी सूचना दिलेल्या असून जिल्हाधिकारी हे सक्षम असल्याचे व त्यांचेमार्फत कारवाई सुरु असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच आता सन २०१३ पासून मार्केट खुले झाले असल्यामुळे साखर वितरणाची जबाबदारी आता विभागाची राहिली नाही. तरीही केंद्र शासनाच्या सुचनेनुसार व मान्यतेने विभाग कार्यवाही करीत असल्याचे समितीस सांगण्यात आले.

शिफारस :

२.२३ केंद्र शासन महाराष्ट्र शासनाला TPDS अंतर्गत वितरणासाठी साखरेचे वाटप करते. जिल्हाधिका-यांनी नियुक्त केलेले साखर नामनिर्देशित सदस्य केंद्र शासनाने नामित केलेल्या साखर कारखान्यातून केंद्र शासनाने ठरवून दिलेल्या किंमतीत लेव्ही साखरेची उचल करतात आणि FPS द्वारे BPL आणि AAY शिधापत्रिका धारकास वाटप करतात असे असतानाही साखरेची उचल, वाटप व वितरण कमी करण्यात आले. राज्यातील एकुण १२५ साखर कारखान्यांपैकी लेव्हीची साखर न दिलेले एकुण ३० कारखाने असून त्यातील ६ कारखान्यांना केंद्र शासनाकडून स्थगिती मिळालेली असून एका कारखान्यावर गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. परंतु उर्वरीत कारखान्यांवर कारवाई करणे अभिप्रेत असताना इतकी वर्षे त्यांचेवर कोणतीही ठोस कारवाई विभागाकडून करण्यात आली नाही. त्यांचेकडून लेव्ही साखर वसुलही केली नाही, गुन्हा देखील दाखल करण्यात आला नाही. इतका गंभीर विषय असताना समितीची साक्ष लागेपर्यंत या प्रकरणी कोणतीही ठोस कारवाई विभागाकडून केल्याचे समितीला दिसून आले नाही. आता मार्केट खुले करण्यात आलेले असल्यामुळे प्रश्न उद्‌भवणार नाही. परंतु या सर्व प्रकरणांचा विभागाने आढावा घ्यावा. कारखान्यांकडून वसुली करावी व यामध्ये जबाबदार अधिका-यांवर जबाबदारी निश्चित करुन कारवाई करण्यात यावी तसेच वसुली प्रलंबित असलेल्या कारखान्यांवर कारवाई करण्याच्या सूचना जिल्हाधिका-यांना देण्यात आल्याचे समितीसमोर सांगण्यात आले व जे अधिकारी कारवाई करण्यास टाळाटाळ करीत असतील त्या अधिका-यांवर देखील कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२४ परिच्छेद क्र. २.२.११.१ "साखर सबसिडीच्या विलंबित प्रतिपूर्तीमुळे निधीची झालेली अडवणूक"

अभिप्राय :

साखर नामनिर्देशक ज्या किंमतीला FPS ला साखर विकतात ती किंमत आणि FPS ज्या किंमतीला साख्र शिधापत्रिकाधारकांना वाटप करतात ती किंमत केंद्र शासनाकडून ठरविली जाते. साखरेचा हाताळणी व वाहतूकीचा खर्च व नफा यांचा समावेश करुन गणन केलेल्या साखर नामनिर्देशकांच्या साखरेच्या खरेदी किंमतीमधून FPS कडून केलेल्या विक्रीची किंमत वजा केल्यावर येणारी रक्कम सबसिडी म्हणून साखर नामनिर्देशकांना प्रदान केलेल्या रकमेची प्रतिपूर्ती मिळण्यासाठी विभाग केंद्र शासनाकडे (FCI) मागणी करतो. साखर सबसिडीसंबंधीची दस्तऐवजांची तपासणी केली असता सन १९७९-८० ते २०११-१२ या कालावधीत विभागाने केंद्रशासनाकडे केलेली रुपये ७३.६८ कोटींची मागणी नोव्हेंबर २०१३ पर्यंत प्रलंबित होती. तसेच वर्ष २००८-०९ ते २०११-१२ पर्यंतच्या कालावधीची मागणी विभागाने केंद्र शासनाकडे संबंधित वित्तीय वर्ष संपल्यानंतर सहा महिने ते १ वर्षाच्या कालावधीनंतर केली होती तर वर्ष २०१२-१३ ची मागणी नोव्हेंबर, २०१३ पर्यंत सादर केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी नोंदविलेले आहेत.

साखर सबसिडीच्या प्रतिपूर्तीची प्रलंबित असलेली रक्कम रुपये ७३.६८ कोटीपैकी प्राप्त व समायोजित रकमेचा तपशील पाहता त्यातील जकात व विम्याची रक्कम रुपये ३९,६८,९९,८५०/- केंद्र सरकारने नाकारलेली आहे. संकीर्ण (मार्जिन फरक, भाव फरक व वाहतूक इ.) रक्कम रुपये ४,६०,१३,२३६/- समायोजित केलेली आहे. त्यामुळे सदर रकमा केंद्र शासनाकडे प्रलंबित नाही. सन २०००-०१ ते २०१०-११ या कालावधीतील साखर मूल्य समानीकरण निधी लेखे सुधारित करुन फरकाची रक्कम रुपये २४,८८,१९,५०५/- भारतीय अन्न महामंडळ यांच्या कडून दिनांक १४.०९.२०१५ रोजी या कार्यालयास प्राप्त झालेली आहे. सन २०११-१२ या कालवधीतील मार्जिन व वाहतूक दर सुधारित करण्यात आलेला आहेत. त्यानुसार दिनांक १०.०७.२०१५ रोजीच्या पत्रान्वये तफावतीची रक्कम रुपये १०,०६,५३,९१८/- ची मागणी भारतीय अन्न महामंडळ यांचेकडे करण्यात आलेली आहे. सदर रक्कम प्राप्त झालेली नसून याबाबत पाठपुरावा सुरु असल्याचे समितीस सांगण्यात आले.

तसेच शासनाने पुढे असे नमूद केले की (नोव्हेंबर,२०१३) सर्व जिल्हयांचे मासिक लेखे प्राप्त झाल्यानंतर लेव्ही साखरेवरील प्रतिपूर्तीचे दावे सादर करावे आणि दाव्यांचे सादरीकरण लवकरात लवकर होण्यासाठी पाउले उचलली जातील. सन २०१२-१३ या कालवधीतील मार्जिन व वाहतूक दर सुधारित करण्यात आलेला आहेत त्यानुसार दिनांक २१.०६.२०१६ च्या पत्रान्वये तफावतीची रक्कम रुपये ७,४२,६५,४२९/- ची मागणी भारतीय अन्न महामंडळ यांचेकडे करण्यात आलेली आहे. सदर रक्कम प्राप्त झालेली नसून याबाबत पाठपुरावा सुरु असल्याचे समितीस सांगण्यात आले.

शिफारस :

२.२५ साखर सबसिडीच्या विलंबित प्रतिपूर्तीमुळे निधीच्या झालेल्या अडवणूकीबाबत महालेखाकारांनी गंभीर आक्षेप नोंदविलेले असून याअंतर्गत कोट्यावधी रुपयांची वसुली प्रलंबित असल्याचे समितीच्या निदर्शनास आले. सदरहु परिच्छेदांन्वये प्रलंबित रक्कमेबाबत विभागाने FCI सोबत एकत्रित बैठक घेऊन वसुलपात्र निधीचे कालबद्धरित्या रिकन्सीलिएशन करुन अंतिम वसुलपात्र रकमेची निश्चिती करावी व तात्काळ वसुली करावी. तसेच आता आधुनिक तंत्रज्ञानाचे युग असल्याने सदर रिकन्सीलिएशन नवीन व अद्ययावत पद्धतीने म्हणजे online पद्धतीने करावे. सन १९७९ पासून रक्कम प्रलंबित आहे तेव्हा याच कामासाठी एका अधिका-याची नियुक्ती करुन या कामाचा पाठपुरावा कालबद्धरित्या करावा. तसेच केंद्र व राज्य सरकारचे जे परस्पर देणे घेणे असते यासंदर्भात विभागाने अद्ययावत संगणकीय आज्ञावली तयार करावी. जेणेकरुन याबाबतचा परतावा/प्रतिपुर्ती इ. सर्व गोष्टी एका क्लीकवर अचूकरित्या समोर येतील. यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात कळवावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२६ परिच्छेद क्र. २.२.१२ "रॉकेल तेलाचे वाटप"

अभिप्राय :

केंद्र शासनाचे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालय प्रत्येक राज्याला त्यांच्या मागणीच्या आधारावर अनुदानीत दराने रॉकेल वाटप करते. जिल्ह्यांच्या मागणीच्या आधारावर जिल्ह्यांना राज्य रॉकेलचे वाटप करते. वाटपाच्या आधारावर केंद्र शासनाकडून नियुक्त केलेले रॉकेलचे विक्रेते केंद्र शासनाच्या तेल कंपन्यांच्या तेल डेपोमधून रॉकेलची उचल करतात आणि FPS ना वितरित करतात. रॉकेलची त्या डेपोमधील किंमत आणि इतर प्रासंगिक खर्च जसे विक्रेत्याची / FPS ची दलाली, तापमान फरकामुळे रॉकेल कमी होणे आणि हाताळणी, वाहतूक खर्च, टोल कर व जकात इत्यादी विविध कारणे लक्षात घेऊन प्रत्येक जिल्हा, शिधापत्रिका धारकासाठी विक्रीची किंमत निश्चित करतो.

केंद्र शासनाकडून रॉकेलचे कमी वाटप आणि रॉकेलच्या मात्रेचे वितरण हे प्रत्येक शिधावाटप पत्रिकेत किती व्यक्ति आहेत आणि त्यांच्याकडे किती गॅस सिलेंडर आहेत हे विचारात घेऊन केले जाते म्हणून शिधावाटप पत्रिकेचे वेळोवेळी पुनर्विलोकन करणे गरजेचे आहे जेणेकरुन अपात्र लाभार्थ्यांना वगळता येईल, ज्यामुळे रॉकेलच्या योग्य वितरणाची सुनिश्चिती होईल. परंतु, असे पुनर्विलोकन झाले नव्हते कारण रॉकेलसाठी पहिल्या तीन वर्षात (२००८-०९ ते २०१०-११) मागणी २३.०६ लक्ष (KL) इतकी स्थिर होती आणि २०११-१२ मध्ये २२.७६ लक्ष (KL) तर २०१२-१३ मध्ये २१.७२ लक्ष (KL) इतकी कमी झाली होती.

विभागाने निर्धारित केलेल्या माहितीनुसार राज्यात ४२.७९ लक्ष कुटुंबांकडे दोन गॅस सिलेंडर्स होती तर तेल कंपन्यांच्या माहितीनुसार राज्यात ६२.२३ लक्ष कुटुंबांकडे दोन गॅस सिलेंडर्स होती. तसेच राज्यात ५.८३ लक्ष घरांना पाईप गॅसची जोडणी दिलेली होती जी विभागाने पात्र लाभार्थ्यांची ओळख पटवितांना विचारात घेतली नव्हती. अशारीतीने, रॉकेलचा पुरवठा करतांना पात्र लाभार्थ्यांची योग्य निर्धारणा केली नव्हती असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले आहेत.

राज्यात शिधापत्रिकांची संख्या, शिधापत्रिकेवरील व्यक्तींची संख्या व गॅसधारकांची संख्या वेळोवेळी बदलत असते. त्यानुसार राज्यात शिधापत्रिकांवर गॅस स्टँपिंग करण्याची कार्यवाही क्षेत्रिय कार्यालयांकडून करण्यात येते. तसेच केरोसिनचे वाटप केरोसिन मिळण्यास पात्र असलेल्या शिधापत्रिकाधारकांनाच करण्यात येईल, याबाबत दक्षता घेण्यात येते. शिधापत्रिकेवरील गॅस असल्याची नोंद विचारात घेऊन केरोसिनचे वाटप शिधापत्रिकाधारकास करण्यात येते. तथापि राज्यात शिधापत्रिकाधारकांची मोठ्या प्रमाणात असलेली संख्या व त्यामानाने पुरवठा विभागात असलेला अपुरा कर्मचारी वर्ग, यामुळे राज्यात गॅसस्टँपिंग मोहिम यशस्वीपणे राबविणे शक्य झालेले नाही. तसेच, तेल कंपनीकडून गॅस कनेक्शनचे वितरण करताना शिधापत्रिका विचारात घेतली जात नाही. यास्तव गॅसधारकांची विभागाची माहिती व तेल कंपन्यांची माहिती यात तफावत आढळून येते व प्रत्येक जिल्ह्याची केरोसिनची अचूक मागणी शासनास प्राप्त झालेली नसल्यामुळे केरोसिनचे वाटप मागणीशी सुसंगत नसल्याचे दिसून येते.

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात पात्र लाभार्थ्यांची संख्या निश्चिती करण्यासाठी ज्या व्यक्तींकडे गॅसची जोडणी आहे त्यांच्या शिधापत्रिकेवर गॅस कनेक्शनचा शिक्का मारुन रॉकेलच्या लाभार्थ्यांच्या यादीतून त्यांचे नाव वगळणे आवश्यक असताना हे स्टँम्पींगचे कामच पुर्ण झालेले नसून विभागाचे लाभार्थी व तेल कंपन्यांकडे असलेल्या गॅस होल्डरची संख्या यात तफावत दिसून येते. शिधापत्रिकेवर गॅस होल्डर स्टॅम्पींगचे काम हे सन २०१३ पर्यंत पूर्ण करण्यात आले नव्हते. आता विभागाने १ कोटी ६७ लाख लोकांच्या गॅस होल्डर स्टॅम्पींगचे काम पूर्ण केलेले असून यासोबत त्यांचे आधारकार्ड देखील घेतले जात आहे. यासंदर्भात माननीय उच्च न्यायालयात जनहित याचिका देखील सुरु असून न्यायालयासमोर याची माहिती वेळोवेळी दिली जात आहे.

प्रत्येक लाभार्थ्यांना किती रॉकेलचा पुरवठा करावयाचा याबाबतचे प्रमाण अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून निश्चित केले जाते व एका व्यक्तीला २ लिटर, दोन व्यक्तींना ३ लिटर व ३ व्यक्तींना ४ लिटर असे वाटप करण्यात येते.

राज्यात उज्वला योजनेअंतर्गत गॅस जोडण्यांचे मोफत वाटप करण्यात येते. तसेच जंगलामधून वृक्षतोड होऊ नये म्हणून या सर्व लोकांना रॉकेट वाटपातून वगळण्याची आवश्यकता असताना केवळ या सर्व गॅस कनेक्शनची नोंद शिधापत्रिकेवर नसल्यामुळे या लोकांना देखील रॉकेलचे वाटप सुरु आहे. त्यामुळे विभागाने हे गॅस कनेक्शन असलेल्या लोकांची निश्चिती व त्याचे शिधापत्रिकेवर स्टॅम्पींग तातडीने करणे आवश्यक आहे असे समितीचे स्पष्ट मत आहे.

शिफारशी :

२.२७ केंद्र शासनाकडून रॉकेलचे वाटप व लाभार्थ्यांना रॉकेलच्या मात्रेचे वितरण हे प्रत्येक शिधावाटप पत्रिकेत किती व्यक्ती आहेत व त्यांच्याकडे किती गॅस सिलेंडर आहेत हे विचारात घेऊन केले जाते. त्यासाठी गॅस जोडण्या असणा-यांच्या शिधापत्रिकेवर तसा शिक्का मारणे आवश्यक असून त्या शिधापत्रिकेचे वेळोवेळी पुनर्विलोकन करुन पात्र लाभार्थ्यांची निश्चिती व अपात्र लाभार्थ्यांची नावे वगळणेबाबतची कार्यवाही विभागाने करणे आवश्यक आहे. परंतु असे पुनर्विलोकन वेळोवेळी न केल्यामुळे नवीन पात्र लाभार्थ्यांची नावे समाविष्ट न केल्यामुळे ते या सवलती पासून वंचित राहिले व अपात्र लाभार्थ्यांना या सवलतीचा फायदा मिळणे कायम राहिले. तसेच गॅस कनेक्शन देताना शिधापत्रिका ग्राह्य धरली नाही व त्यावर स्टॅम्पींग करणेची कार्यवाही या गॅस कंपन्यांकडून करण्यात येत नसल्यामुळे विभागाकडे रॉकेलच्या लाभार्थ्यांची संख्या व गॅस कंपन्यांकडे असणा-या जोडणीधारकाची संख्या यात मोठ्या प्रमाणात तफावत आढळून येते. त्यामुळे रॉकेलच्या योग्य वितरणाची सुनिश्चिती विभागाला करता येणे शक्य झाले नाही. तसेच उज्वला योजनेंतर्गत मोफत गॅस जोडणी देण्यात येते. तसेच काही ठिकाणी जंगलातील वृक्षतोड टाळण्यासाठी आजुबाजूच्या परिसरातील लोकांना गॅस जोडणी देण्यात येते. या सर्व जोडण्यांसंदर्भातील स्टॅम्पींग शिधापत्रिकेवर न करण्यात आल्यामुळे हे लाभार्थी गॅस जोडणी व रॉकेल अशा दोन्ही सवलतींचा दुहेरी लाभ घेत असून अशा लाभार्थ्यांची विभागाला अद्याप निश्चिती करता आली नाही. राज्य शासनाच्या स्तरावर अस्तित्वात असलेल्या वेगवेगळ्या योजनांतर्गत समन्वयाचा व ताळमेळाचा अभाव तसेच गॅस कंपन्यांकडून गॅस जोडणीधारकांची निश्चिती करताना शिधापत्रिकेवर त्याची योग्यप्रकारे नोंद न झाल्यामुळे या सर्व आकडेवारींमध्ये मोठ्या प्रमाणात विसंगती व तफावत दिसून येते. हे सर्व नियोजन व समन्वय त्या-त्यावेळी केले असते तर ही अडचण इतक्या अमर्याद कालावधीकरीता प्रलंबित राहिली नसती ही देखील वस्तुस्थिती आहे. त्यामुळेच महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहु आक्षेप हे अत्यंत गंभीर आहेत. अतः विभागाने आता यासाठी धडक कृति कार्यक्रम आखून कालबद्ध मोहिमेअंतर्गत सर्व गॅस वा तेल कंपन्या तसेच अन्य योजनांशी संबंधित विभागासोबत एकत्रित बैठक घेऊन शिधापत्रिकेत गॅस जोडणीधारकांची नोंद घेण्याचे काम तात्काळ पुर्ण करण्यात यावे व त्याअनुषंगाने त्यांना रॉकेल वितरणातील लाभार्थ्यांच्या यादीमधून वगळण्यात यावे. रॉकेलच्या योग्य वितरणाची सुनिश्चिती करण्यात यावी व रॉकेल वितरणासाठी योग्य लाभार्थ्यांची निश्चिती करुन रॉकेलचे वितरण करावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात समितीला द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२८ रॉकेलचा पुरवठा करताना पात्र लाभार्थ्यांनाच तो व्हावा यासाठी अपात्र लाभार्थ्यांची नावे यादीतून काढून टाकण्यासाठी प्रत्येक वर्षी TPDS अंतर्गत BPL लाभार्थ्यांच्या यादीचे पुनर्विलोकन कार्यक्रम विभागाने राबवावा. तसेच पात्र लाभार्थ्यांना प्रती व्यक्ती २ लिटर रॉकेलचा पुरवठा हा अत्यंत अल्प असून तो वाढविण्याची आवश्यकता आहे. त्याअनुषंगाने उपाययोजना करण्यात यावी व हा लाभ केवळ पात्र लाभार्थ्यांना देण्यात यावा व रॉकेलचा काळाबाजार रोखण्यात यावा. तसेच देशात काही राज्ये ही केरोसीनमुक्त झालेली आहेत. महाराष्ट्राने देखील त्याअनुषंगाने प्रयत्न करावे व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात समितीला द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.२९ परिच्छेद क्र. २.२.१२.१ "तेल कंपन्यांचे राज्य पातळीवरील समन्वयक आणि विभाग यांच्याकडील रॉकेलच्या वाटप व वितरणाच्या माहितीमधील तफावत"

अभिप्राय

तेल कंपन्यांच्या राज्यस्तरीय समन्वयकांकडील आणि विभागाकडील रॉकेलचा वाटप व वितरणाच्या तपशिलाचे अवलोकन केले असता २००८-११ मध्ये रॉकेल वितरणाची विभागाकडील आकडेवारी ही तेल कंपन्यांकडील आकडेवारीपेक्षा ७६७८ कि.ली.ने कमी होती. त्याचवेळी २०११-१२ आणि २०१२-१३ दरम्यान विभागाकडील रॉकेल वितरणाची आकडेवारी तेल कंपन्यांच्या आकडेवारीपेक्षा १०३३१ कि.ली.ने जास्त होती. तसेच रॉकेलच्या २००८-१० मधील वाटपाची विभागाची आकडेवारी तेल कंपन्यांच्या आकडेवारीपेक्षा ४७४ कि.ली.ने कमी होती व २०११-१२ मध्ये ती ६० कि.ली.ने जास्त होती असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत केरोसीनचे नियतन राज्यास केंद्र शासनाकडून प्राप्त होते. सदर केरोसीन नियतन हे त्रैमासिक (Qurterly) अथवा मासिक (Monthly) स्वरूपात प्राप्त होते. केंद्र शासनाकडून केरोसीनचे नियतन राज्याच्या मागणीच्या ज्या प्रमाणात (टक्केवारी) प्राप्त होते त्याच प्रमाणात ते सर्व जिल्हयांना वितरित केले जाते. सन २००८ ते २०१३ या कालावधीकरीता केंद्र शासनाकडून प्राप्त झालेले केरोसीन पूर्णतः राज्यातील सर्व जिल्हयांना वाटप करण्यात आले असे विभागाकडून सांगण्यात आले.

शिफारस :

२.३० केंद्र शासनाचे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालय प्रत्येक राज्याला त्यांच्या मागणीच्या आधारावर अनुदानित दराने रॉकेल वाटप करते. जिल्ह्यांच्या मागणीच्या आधारावर जिल्ह्यांना राज्य शासन रॉकेलचे वाटप करते. वाटपाच्या आधारावर केंद्र शासनाकडून नियुक्त केलेले रॉकेलचे विक्रेते केंद्र शासनाच्या तेल कंपन्यांच्या तेल डेपोमधून रॉकेलची उचल करतात आणि FPS ना वितरित करतात. रॉकेलची त्या डेपोमधील किंमत आणि इतर प्रासंगिक खर्च जसे विक्रेत्याची / FPS ची दलाली, तापमान फरकामुळे रॉकेल कमी होणे आणि हाताळणी, वाहतूक खर्च, टोल कर व जकात इत्यादी विविध कारणे लक्षात घेऊन प्रत्येक जिल्हा, शिधापत्रिका धारकासाठी विक्रिची किंमत निश्चित करतो. विभागाच्या माहितीमध्ये व तेल कंपन्यांच्या रॉकेलच्या वाटप व वितरणाच्या माहितीमध्ये तफावत दिसून येणे याचाच अर्थ या तफावतीच्या संख्येचे लाभार्थी हे गॅस व रॉकेल या दोन्ही सवलतींचा लाभ घेतात हे स्पष्टपणे दिसून येते. ही तफावत तात्काळ शोधून काढून योग्य लाभार्थ्यांची निश्चिती करुन रॉकेलचे वितरण केवळ पात्र लाभार्थ्यांना होण्याच्यादृष्टीने विभागाने उपाययोजना करण्याची आवश्यकता आहे. अतः विभागाने रॉकेलच्या वाटप व वितरणाच्या आकडेवारीतील तफावतीचा तेल कंपन्यांच्या माहितीबरोबर ताळमेळ घालावा, जेणेकरुन रॉकेलचे अनधिकृत हस्तांतरण होणार नाही याची खात्री करावी. रॉकेलचे नियतन वाटप व वितरण यामध्ये तफावत राहू नये यासाठी यासंदर्भात येणा-या अडचणी सोडविण्याच्या दृष्टीने विभागाने नियोजन करावे. यासाठी अद्ययावत संगणकीय आज्ञावली तयार करुन हा ताळमेळ थेट व ऑनलाईन करणेबाबतच्या पर्यायांचा देखील अवलंब करण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या नियोजनाची व कार्यवाहीची माहिती ३ महिन्यात समितीला द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.३१ परिच्छेद क्र. २.२.१२.२ "रॉकेलवरील रोख सबसिडीचे परस्पर हस्तांतरण करण्यास सुरुवात न करणे"

अभिप्राय :

रॉकेलचे अवैध हस्तांतरण कमी करण्यासाठी आणि त्याचवेळी लाभार्थ्यांना PDS रॉकेलवरील सबसिडीचा लाभ थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये प्राप्त होईल याची खात्री करण्यासाठी केंद्रीय वैशिष्ट्यपुर्ण ओळख प्राधिकरण यांच्या अध्यक्षतेखाली गठीत केलेल्या कृती गटाच्या शिफारशींच्या आधारावर केंद्र शासनाच्या पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायु मंत्रालयाने राज्यामध्ये रॉकेलवरील रोख सबसिडीचे थेट हस्तांतरण (DTCK) करण्याची योजना राबविण्याचे निश्चित केले. राज्यांनी शिधापत्रिका धारकांच्या बँक खात्यात रॉकेलवरील सबसिडीचे रोख हस्तांतरण

करण्यासाठी संस्थात्मक कार्यतंत्र स्थापित करायचे होते. केंद्र शासनाच्या वित्त मंत्रालयाने , ३१ मार्च, २०१२ पूर्वी ज्या राज्यांनी DTCK योजना अवलंबिली त्यांना रुपये १०० कोटीचे एकरकमी अनुदान देण्याचे निश्चित केले. मार्च २०१३ मध्ये केंद्र शासनाने रुपये १० कोटीचे अनुदान मुक्त केले आणि संपूर्ण राज्यात पूर्ण किरकोळ विक्री किंमतीस रॉकेलची विक्री पूर्ण होऊन एक महिना पूर्ण झाल्याविषयीचे वैयक्तिक प्रमाणपत्र दिल्यानंतर रुपये ५० कोटीचा पुढचा हप्ता मुक्त करायचा होता. विभागाने ऑगस्ट २०१२ ला योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी सुरुवात केली. तथापि, मार्च, २०१३ पर्यंत अमरावती (५१ टक्के), नंदुरबार (६६ टक्के) आणि वर्धा (७१ टक्के) या ३ जिल्ह्यांमध्ये लाभार्थ्यांची बँकेत खाती उघडण्याचे काम अंशतः पूर्ण झाले होते.

परिणामी रॉकेलचे अवैध हस्तांतरण रोखण्याचे आणि लाभार्थ्यांच्या बँकखात्यात रोख सबसिडी परस्पर हस्तांतरित करण्याचा उद्देश साध्य झाला नव्हता असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे.

केंद्र शासनाने दिनांक ९ जुलै, २०१२ च्या पत्रान्वये दिलेल्या निदेशानुसार केरोसिनवरील अनुदान लाभार्थ्यांच्या बँकखात्यात जमा करण्याच्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी वर्धा, मुंबई व मुंबई उपनगर, अमरावती, पुणे व नंदुरबार या ६ जिल्ह्यांतील शिधापत्रिकांची बँकखाती सुरु करण्याच्या सूचना शासनाच्या दिनांक ९ ऑगस्ट, २०१२ च्या पत्रान्वये संबंधित जिल्हाधिकारी व नियंत्रक शिधावाटप व संचालक, मुंबई यांना देण्यात आल्या. तथापि उपरोक्त ६ जिल्ह्यांपैकी नंदुरबार, वर्धा व अमरावती या ३ जिल्ह्यांतील बँक खाती सुरु केल्याची टक्केवारी तुलनात्मकदृष्ट्या जास्त असल्याने सदर योजना प्रथम या ३ जिल्ह्यांत राबविण्याबाबत केंद्र शासनास शासनाच्या दिनांक २१ मार्च,२०१३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. तसेच सदर योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शन करण्याबाबत केंद्र शासनास दिनांक १० एप्रिल, २०१३ च्या पत्रान्वये कळविण्यात आले. तथापि केंद्र शासनाने शासनास अद्याप काहीही कळविलेले नाही.

केरोसिनवरील अनुदान शिधापत्रिकाधारकांच्या बँक खात्यात थेट जमा करण्याच्या योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी राज्यास सन २०१२-१३ मध्ये प्राप्त झालेली रुपये १० कोटी इतकी रक्कम सन २०१३-१४, सन २०१४-१५ व सन २०१५-१६ मध्ये वापरण्यात आली नाही. सन २०१६-१७ मध्ये क्ष्क्ष्ख् योजनेसाठी सदर रक्कम वळती करण्याबाबतची विनंती केंद्र शासनास शासनाच्या दिनांक १ मार्च, २०१६ च्या पत्रान्वये करण्यात आली आहे. तथापि केंद्र शासनाकडून राज्यास याबाबत काहीही कळविण्यात आलेले नाही असा खुलासा विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात केला.

समितीने याबाबतची माहिती साक्षीदरम्यान घेतली असता रॉकेलवरील रोख सबसिडीचे परस्पर लाभार्थ्यांच्या खात्यात हस्तांतरण करण्यासंबंधीचा निर्णय २०११-१२ मध्ये घेतला होता. परंतु हे हस्तांतरण मशिनशिवाय केल्यास सर्वांनाच सबसीडी द्यावी लागेल व एखाद्याने त्या महिन्यात रॉकेल घेतले नाही तरी त्याच्या खात्यात पैसे जमा होतील. केरोसीनचे राज्यात किरकोळ व घाऊक विक्रेते हे वेगवेगळे आहेत. तसेच उपलब्ध निधीमध्ये या मशिनची ई-पॉस राज्यभरासाठी खरेदी होऊ शकणार नसल्यामुळे संपूर्ण राज्यात ई-पॉस मशिनवर हे काम एकाचवेळी होऊ शकणार नाही. फक्त मुंबई व ठाणे येथे हे विक्रेते सारखेच आहे. त्यामुळे मुंबईपुरते हे ई-पॉस मशीन कामाला येईल कारण लाभार्थ्याला बोलावून त्यांची बायोमॅट्रीक नोंद घेऊन त्यांच्या खात्यामध्ये रक्कम हस्तांतरण करावी लागेल. आधार व बँक खाते लिंक करुन सरसकट रक्कम हस्तांतरण करता येणार नाही. जो लाभार्थी रॉकेल घेण्यास येईल केवळ त्यालाच सबसिडी देता येईल व यासाठी मशिन खरेदीसाठी लागणारा निधी वाढवून मिळण्याची आवश्यकता आहे असेही विभागीय सचिवांनी स्पष्ट केले.

केरोसीन सबसिडी डायरेक्ट बँक खात्यामध्ये जमा होणार असून आधार कार्ड लिंक करणे या सर्व योजना संदर्भातील काम मुंबईपुरते सहा महिन्यात पूर्ण करण्यात येईल. त्यासोबतच गॅस सिलेंडर स्टॅम्पींगनंतर यात ब-याचअंशी सुसुत्रता येणार आहे असा खुलासा विभागीय सचिवांनी केला असता ही पद्धत राज्यभर तातडीने लागू करण्याची आवश्यकता असल्याचे समितीने मत नोंदविले.

शिफारस :

२.३२ रॉकेलचे अवैध हस्तांतरण कमी करण्यासाठी आणि त्याचवेळी लाभार्थ्यांना PDS रॉकेलवरील सबसीडीचा लाभ थेट त्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यासाठी संस्थात्मक कार्यतंत्र स्थापित करणे आवश्यक होते. यासाठी राज्यात केरोसीन DBT योजना सुरु केली. राज्यात सर्वत्र ही योजना एकाचवेळी सुरु करणे निधीअभावी अडचणीचे ठरल्यामुळे राज्यात प्रायोगिक तत्वावर काही जिल्ह्यांमध्ये ती राबविण्याचा निर्णय घेण्यात आला. ही सबसीडी थेट बँक खात्यात सर्वच लाभार्थ्यांना सरसकट न देता जे पात्र लाभार्थी हे केरोसीन घ्यायला रेशन दुकानात येणार त्यांनाच हा लाभ मिळावा यासाठी ई-पॉस मशिनची आवश्यकता असून प्रथम याची अंमलबजावणी ही मुंबईमध्ये सुरु करण्यासाठी प्रयत्न करण्यात येत असून एका ई-पॉस मशिनची किंमत रुपये १५०००/- असून मुंबईत जवळजवळ ५८००० किरकोळ विक्रेते आहेत. या सर्वांसाठी ही मशिन खरेदी करण्याइतपत निधी उपलब्ध नसून हा निधी वाढवून देणेबाबत तशी मागणी केंद्राकडे करण्यात आलेली

असून अद्यापही केंद्राकडून उत्तर अप्राप्त आहे. रेशन कार्डवर स्टॅम्पींग झाल्यानंतर यात ब-यापैकी सुसुत्रता येणार आहे. परंतु तरीही रॉकेलचे अवैध हस्तांतरण रोखण्याचे आणि लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रोख सबसीडी परस्पर हस्तांतरीत करण्याचा उद्देश अमर्याद कालावधीकरिता साध्य होऊ शकला नाही ही वस्तुस्थिती आहे. अतः पात्र व योग्य लाभार्थ्यांना ही सबसीडी थेट बँक खात्यात जमा करणेकरिता संस्थात्मक कार्यतंत्र स्थापित करण्यात यावे व याची प्रभावी अंमलबजावणी करणेकरिता योग्य ते नियोजन करण्यात यावे. तसेच प्रायोगिक तत्वावर काही जिल्ह्यांपुरती याची अंमलबजावणी मर्यादित न ठेवता राज्यात सर्वत्र तातडीने करण्यात यावी. ई-पॉस मशिनच्या माध्यमातून ही प्रक्रिया राज्यभर राबविणे आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरत असल्यास त्यासाठी तातडीने निधी मिळणेबाबत प्रयत्न करण्यात यावे. परंतु रॉकेलच्या सबसीडीच्या रकमेपेक्षा जास्त जर या मशिनची किंमत होत असेल तर ही बाब विभागासाठी निश्चितच आर्थिकदृष्ट्या व्यवहार्य ठरणार नाही. अशा परिस्थितीत ई-पॉस मशिनऐवजी लाभार्थी व शासनास सोईची ठरेल अशी पर्यायी व्यवस्था शोधून त्याचा अवलंब विभागाने करुन रॉकेल सबसिडीचे लाभार्थ्यांचे खात्यात थेट हस्तांतरण करण्याच्या कार्यपद्धतीची अंमलबजावणी करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.३३ परिच्छेद क्र.२.२.१२.३ "वाहन मागोवा प्रणालीच्या अंमलबजावणीत विलंब"

अभिप्राय :

केंद्र शासनाने महाराष्ट्र शासनास PDS रॉकेलची वाहतूक करणा-या वाहन / टँकर्सच्या हालचालींचा मागोवा घेण्यासाठी ग्लोबल पोझीशनींग सिस्टीम आधारित वाहन मागोवा प्रणाली (VTS) बसविण्याची विनंती (फेब्रुवारी २०११) केली होती. प्रणालीला PDS रॉकेलची वाहतूक करणा-या वाहन मार्गाचे आणि वेळेचे उल्लंघन केल्यास सतर्कतेचा इशारा द्यायचा होता आणि अशा रितीने वाहतूक वाटेवरील भुरट्या चो-या आणि अवैध हस्तांतरणावर नजर ठेवण्याचे एक परिणामकारक साधन म्हणून काम करणे अपेक्षित होते. अशाप्रकारे प्रत्येक वाहनावर PDS बसविण्याची अंदाजित किंमत रुपये १३,०००/- राहिल जो खर्च महाराष्ट्र शासन व तेल कंपन्यांना करायचा होता. परंतु नोव्हेंबर २०१३ पर्यंत एकूण रुपये १.३९ कोटी खर्च करुन संपूर्ण राज्यात ११०७ वाहनांपैकी जरी १०६८ वाहनांवर PDS बसविण्यात आले होते तरीही कोल्हापूर जिल्ह्यातील PDS बसविलेली फक्त ३४ वाहने प्रत्यक्षात वापरली जात होती. PDS बसविलेल्या वाहन /टँकर्सपैकी ९७ टक्के अकार्यरत असल्यामुळे PDS रॉकेलच्या गळतीवर बंधन घालण्याचे / अवैध हस्तांतरण रोखण्याचे उद्दीष्ट सफल झाले नव्हते असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे.

सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत शिधापत्रिकाधारकांना वितरित करण्यात येणा-या केरोसिनची वाहतूक करणा-या टँकर्सवर जी.पी.एस.यंत्रणा बसविण्याच्या दिलेल्या सूचनांच्या अनुषंगाने सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांच्यामार्फत स्वखर्चाने सदर यंत्रणा बसविण्यात आली होती.

तथापि, सदर यंत्रणा पुढे सुरळीत सुरु राहण्याबाबत सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांनी खबरदारी न घेतल्यामुळे, तसेच प्रस्तुत यंत्रणा राबविण्याकरिता घाऊक केरोसिन परवानाधारकांनी आवश्यक ती रक्कम सायन्स ॲण्ड टेक्नॉलॉजी पार्क, पुणे यांना अदा न केल्यामुळे राज्यातील सर्व जिल्ह्यातील केरोसिन टँकर्सवरील जी.पी.एस.यंत्रणा सद्यःस्थितीत कार्यान्वित नाही. केरोसिनची वाहतूक करणा-या टँकर्सवर जी.पी.एस.यंत्रणा बसविण्यासाठी येणा-या खर्चाच्या विभागणीबाबत केंद्र शासनाकडून दिनांक १६ जुलै, २०११ च्या पत्रान्वये मार्गदर्शन मागविण्यात आले आहे. तथापि, अद्यापपर्यंत केंद्र शासनाकडून कोणतेही अभिप्राय प्राप्त झालेले नाहीत.

तथापि तुर्त केरोसिनच्या वितरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी तसेच केरोसिनची अवैध विक्री रोखण्यासाठी सद्यःस्थितीत वेळोवेळी दुकानांच्या तपासण्या केल्या जातात, विविध स्तरावर दक्षता समित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत, परवानाधारकांविरुद्ध तक्रारी प्राप्त झाल्यास दक्षता पथकांमार्फत धाडी टाकण्यात येतात, ग्राहकांना तक्रार करता यावी याकरिता हेल्पलाईन (१८००-२२-४९५०) सुरु करण्यात आली आहे, रॉकेलचा टँकर डेपोमधून निघाल्यानंतर त्या भागातील नागरिकांना एसएमएसद्वारे कळविले जाते अशा उपाययोजना करण्यात येतात.

साक्षीवेळी उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी विदीत केले की, सध्या कोणत्याही ठिकाणी जीपीएस यंत्रणा लावलेली नाही. ती यंत्रणा तेल कंपन्यांनी लावली पाहिजे अशी विभागाची भूमिका आहे. धान्याच्या संदर्भात जीपीएस सिस्टिम सुरु करण्यात आली असून ती जबाबदारी कंत्राटदारावर टाकण्यात आली आहे व त्यामुळे केरोसीनबाबत देखील हा खर्च संबंधित कंपनीनेच करावा असा निर्णय झालेला आहे. राज्य सरकार केरोसीनवर कोणताही खर्च देत नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीसमोर सांगितले.

केरोसीनची डिझेलमध्ये भेसळ होण्याची शक्यता जास्त आहे. यात राज्यभर मोठा काळाबाजार होत असताना व माफीया यामध्ये सक्रिय आहेत. मग विभाग या संदर्भातील जीपीएस सिस्टीम सुरु करण्यासाठी केंद्र शासनावर का अवलंबून राहिले ? विभाग संबंधित कंपन्यांबरोबर करार करुन आणि त्यांच्या किंमतीमध्ये समाविष्ट करुन घ्यावे असे मत समितीने व्यक्त केले असता वाहतूक कंत्राट देतांना त्यात जीपीएस

यंत्रणा बसविण्याच्या खर्चाचा समावेश करुनच निविदा मागविल्यास तो खर्च त्या वाहतूक खर्चात समाविष्ट होईल असा खुलासा विभागीय सचिवांनी केला. तसेच हे तीन महिन्यांत कंपनीकडून करुन घेण्याचा प्रयत्न करण्यात येईल असेही अवगत केले.

शिफारस :

२.३४ रॉकेलच्या गळतीवर बंधन घालण्याचे/अवैध हस्तांतरण रोखण्यासाठी रॉकेलची वाहतूक करणा-या वाहन/टँकर्सवर GPS वर आधारीत वाहन मागोवा प्रणाली (VTS) बसविण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु त्याची प्रभावी अंमलबजावणी राज्यात न झाल्यामुळे व अन्य अनेक कारणांमुळे सर्व जिल्ह्यातील केरोसीन टॅकर्सवर ही यंत्रणा कार्यान्वित नव्हती. यामध्ये मोठ्या प्रमाणात माफीया सक्रिय आहेत. आपण या संदर्भातील सिस्टिम सुरु करण्यासाठी केंद्र सरकारवर अवलंबून न राहता संबंधित तेल कंपन्यांबरोबर करार करताना त्यांचे वाहतूक खर्चाचे करारामध्ये जीपीएस सिस्टिमचा खर्च त्याची देखभाल व दुरुस्तीची जबाबदारी व त्याचे योग्य ते नियंत्रण तेल कंपन्यांनी करणेबाबतची अट करारात समाविष्ट करुन घ्यावी व रॉकेलच्या गळतीवर बंधन घालण्याचे/अवैध हस्तांतरण रोखण्याचे उद्दीष्ट १०० टक्के सफल करण्यात यावे व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.३५ परिच्छेद क्र. २.२.१४ "एफपीएस आणि शिधापत्रिका धारकांना अन्नधान्य वितरण करण्याच्या प्रणालीत सुधारणा करण्यासाठीच्या योजनेच्या अंमलबजावणीत झालेला विलंब."

अभिप्राय :

TPDS अंतर्गत अन्नधान्याच्या वितरण यंत्रणेत सुधार आणण्यासाठी शासकीय गोदामातून शासनाच्या स्वत:च्या किंवा आदिवासी विकास महामंडळाकडून चालविलेल्या भाड्याच्या वाहनांतून आणि पणन महासंघाच्या कंत्राटी वाहनांतून अन्नधान्याची वाहतूक FPS पर्यंत करण्याची योजना महाराष्ट्र शासनाने आदिवासी आणि दुष्काळप्रवण क्षेत्रात अनुक्रमे मार्च, १९९३ आणि मार्च १९९८ पासून अंमलात आणली होती.

परंतु ही योजना ऑक्टोबर, २००५ पासून बंद करण्यात आली जे केंद्र शासनाच्या एप्रिल, २००५ च्या अन्नधान्य दारी पोहचविण्यासाठी कार्यक्षम आणि प्रभावी वितरण यंत्रणा प्रस्थापित करण्याच्या शिफारशीच्याविरुद्ध होती. यासाठी शासनाने उशिराने गठीत केलेल्या समितीने (जुलै, २००९) केलेल्या शिफारशींच्या आधारावर फेब्रुवारी,२०१२ मध्ये धान्य हमी योजना नावाची एक नविन योजना आखली. ज्याद्वारे शासकीय गोदामांतील धान्य दारिद्र्य रेषेखाली व अंत्योदक शिधापत्रिकाधारकांना थेट वितरण व्हावे यासाठी एका ठराविक दिवशी एका ठिकाणी पोहचविणे तसेच त्या वाहनांवर GPS यंत्रणा बसविणे हे उद्दिष्ट साध्य करायचे होते. परंतु FPS आणि शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्याचे वितरण करण्याच्या प्रणालीच्या सुधारणेत सहा वर्षांपेक्षा अधिक विलंब झाला होता असा आक्षेप महालेखापालांनी घेतला आहे.

केंद्र शासनाच्या अर्थसहाय्यातून खरेदी केलेल्या वाहनांद्वारे राज्यात सुरु केलेली दुबार वितरण योजना ही आदिवासी व अवर्षणप्रवण क्षेत्रातील १० जिल्ह्यांमध्ये कार्यान्वित करण्यात आली होती. ही योजना टप्प्याटप्प्याने राज्यातील २३ जिल्ह्यांमध्ये कार्यान्वित करण्याच्या सूचना देखील देण्यात आल्या होत्या. परंतु द्वार पोच योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येत असलेल्या विविध अडचणी विचारात घेऊन शासनाने सदर योजना दिनांक ३१ मे, २००६ पासून बंद करण्याचा निर्णय घेतला.

सुधाकर जोशी समितीने अहवालाच्या अनुषंगाने धान्य हमी योजना अंमलात आणण्यासाठी मंत्री मंडळ प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया विभागाने एप्रिल, २०१० मध्ये सुरु केली होती. या प्रस्तावावर वित्त विभागाने ५ वेळा उपस्थित केलेल्या त्रुटी, त्या अनुषंगाने मागवावयाची/ संकलित करावयाची माहिती यामुळे कालापव्यय होऊन शेवटी मंत्रीमंडळाच्या मान्यतेनंतर दिनांक २ फेब्रुवारी, २०१२ रोजी धान्य हमी योजनेचा शासन निर्णय निर्गमित करण्यात आला. आता विभागाने एप्रिल, २०१७ मध्ये सुधारीत शासन निर्णय निर्गमित केलेला आहे व आता सर्व जिल्ह्यांमध्ये द्वार पोच योजनेची अंमलबजावणी झालेली असल्याचे समितीस सांगण्यात आले. तरीही सदर प्रकरणी झालेला विलंब हा केवळ प्रशासकीय अडचणींमुळे झालेला आहे.

साक्षीवेळी उपरोक्त परिच्छेदासंदर्भात विभागीय सचिवांनी योजनेच्या अंमलबजावणीत झालेला विलंब मान्य केला. धोरणात्मक निर्णय घेण्यास वेळ लागलेला आहे. तसेच नवीन योजनांच्या अंमलबजावणीवर ब-याच संख्येत न्यायालयीन दावे दाखल केल्यामुळे देखील हा विलंब झाल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

२.३६ FCI आणि शिधापत्रिकाधारकांना अन्नधान्य वितरण करण्याच्या प्रणालीत सुधारणा करण्यासाठीच्या योजनेच्या अंमलबजावणीत झालेला विलंब याबाबत महालेखाकारांनी गंभीर आक्षेप नोंदविलेले असून याची अंमलबजावणी करण्यास प्रशासकीय व न्यायालयीन कारणास्तव विलंब झाल्याचे विभागीय प्रतिनिधींनी मान्यही केले. योजनेच्या अंमलबजावणीत नियोजनाचा अभाव व निर्णयात व शासनाच्या भूमिकेत वेळोवेळी होणारा बदल परिणामी हा अमर्याद विलंब झाल्याचे समितीचे स्पष्ट मत आहे. शासनस्तरावर सुरु करण्यात आलेल्या कल्याणकारी योजनांची निश्चिती व त्याची अंमलबजावणी करण्याची उपरोक्त कार्यपद्धती निश्चितच समर्थनीय नाही व समिती याबाबत तीव्र नापसंती व्यक्त करीत आहे. विभागाने याची दखल घेवून भविष्यात अशा बाबींची पुनरावृत्ती टाळावी व संपूर्ण राज्यात धान्य हमी योजना लागू करावी व याबाबत विभागाने केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.३७ परिच्छेद क्र. २.२.१४.१ "FCI ला चुकीने प्रदान केलेल्या जकातीचा परताव्यासाठी दावा न करणे"

अभिप्राय :

मुंबई महापालिका अधिनियम, १८८८ च्या कलम १९४ (१) सह मुंबई प्रांतिय महापालिका (BPMC) अधिनियम, १९४९ च्या कलम १४६ (१) मधील तरतूदीनुसार, एखादी वस्तू आयात करताना, या बाबतीत संबंधित शासनाने प्राधिकृत केलेल्या अधिका-याने, ती शासनाच्या मालकीची असून तिचा वापर केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठी होणार असल्याचे किंवा तसा वापर करण्याचा उद्देश असल्याचे,तसेच नफा मिळविण्यासाठी तिचा वापर होणार नसल्याचे किंवा तसा वापर करण्याचा उद्देश नसल्याचे प्रमाणित केल्यास अशा वस्तूवर जकात आकारणीय नसावी. तसेच दोन्ही अधिनियमांच्या उप-कलम (२) मध्ये अशी तरतूद करण्यात आली आहे की, ज्या वस्तूवर जकात भरण्यात आली आहे, ती वस्तू आयात करताना आयातदाराने सदर वस्तू शासनाबरोबर केलेल्या विशिष्ट कराराची पूर्तता करण्यासाठी किंवा शासनाच्या वापरासाठी किंवा केवळ सार्वजनिक प्रयोजनासाठी आयात केल्या विषयीचे स्वाक्षांकीत लेखी घोषणा पत्र सादर केल्यास त्यावर भरलेल्या संपूर्ण शुल्काचा परतावा देण्यात यावा. परंतु १३ जिल्हयांमध्ये विभागाने FCI ला अन्नधान्याच्या किंमतीबरोबरच रुपये ६.५५ कोटी एवढी जकात रक्कम प्रदान केली होती. परंतु वरील अधिनियमांच्या उप-कलम (२) मधील तरतूदींच्या अंतर्गत विहीत केले असूनही विभागाने FCI कडून कुठलाही परताव्याचा दावा केला नव्हता.

आक्षेपात नमूद कालावधीत सोबतच्या विवरणपत्रात दर्शविलेल्या एकुण ३३ जिल्हा पुरवठा कार्यालयापैकी फक्त १० जिल्हा पुरवठा कार्यालयांनी जकात कर भरल्याचे स्पष्ट होते. त्यासंदर्भात संबंधीत १० जिल्हा पुरवठा कार्यालयाशी संपर्क साधला असता, महानगरपालिका क्षेत्रातील भारतीय खाद्य निगम मंडळाच्या FCI डेपोमधून धान्याची उचल करण्याकरीता महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १२७ (२) (अ) १४९ (१) अन्वये जकात कर आकारणी करण्यात येत असल्याबाबत व भारतीय खाद्य निगम मंडळास अन्नधान्याच्या रक्कमे बरोबर जकात कराचा भरणा न केल्यास धान्याचे वितरण आदेश भारतीय खाद्य निगम मंडळाकडून दिले जात नसल्याबाबत निवेदन सादर केले आहे. त्यावरुन सदर जिल्हा कार्यालयाकडुन महानगरपालिका क्षेत्रातील भारतीय खाद्य निगम मंडळास जकात कराची भरणा करण्यात येते.

महालेखाकारांच्या आक्षेपाच्या परिच्छेदांच्या अनुषंगाने भारतीय खाद्य निगम मंडळाकडून पावती (Cash Memo) प्राप्त करुन यापुर्वी जकात करापोटी भारतीय खाद्य निगम मंडळास प्रदान करण्यात आलेल्या रक्कमेची वसुली करण्याबाबत कळविले असल्याचे समितीस सांगण्यात आले.

उपरोक्त परिच्छेदासंदर्भात माहिती देताना विभागीय सचिवांनी असे विदित केले की, यामध्ये जवळपास रुपये ६ कोटीची रक्कम आहे. हे अतिशय किचकट काम असून या कामाबाबत शासनाकडून पाठपुरावा सुरु आहे. १० जिल्ह्यातील महानगरपालिकांकडून रेकॉर्ड घेऊन एफसीआयकडून परतावा घ्यावा लागेल. त्यासंदर्भातील कार्यवाही सुरु आहे. काही ठिकाणी कंत्राट देऊन जकात वसूल केली जात होती. वास्तविकतः हे प्रदान करण्याची आवश्यकता नव्हती तरीही काही ठराविक महानगरपालिकांमध्येच या बाबी कशा काय घडलेल्या आहेत. कारण सन २००८ अगोदर हे जकातीचे प्रदान कधीच करण्यात आले नव्हते. त्यामुळे याची चौकशी करण्याची आवश्यकता असल्याचे समितीने विदित केले. ही सर्व माहिती आता महानगरपालिकेकडून गोळा करुन पावत्यांसह परतावा सादर करावा लागेल. सदर परतावा एफसीआयकडून महानगरपालिकेमार्फत विभागाला घ्यावा लागेल. जे जकातीचे प्रदान केले त्याची पावती एफसीआयने विभागाला नक्कीच दिली असेल. त्यांनी जकात भरलेली आहे म्हणून रुपये ६ कोटीचे रेकॉर्ड महालेखाकारांना प्राप्त झाले. त्यांनी महानगरपालिकेला पैसे भरले आहेत. विभागाने एफसीआयला त्यापोटी रुपये ६ कोटी दिले आहेत. १० शहरातील महानगरपालिकेच्या पावत्या गोळा करुन एफसीआयकडून नावाने परतवा घ्यावा लागेल असा खुलासा विभागीय सचिवांनी समितीसमोर केला.

शिफारस :

२.३८ सन २००८ ते २०१२ पर्यंतच्या कालावधीत जकातीचे अशाप्रकारचे प्रदान झाले असून त्या अगोदर तसे प्रदान कधीही करण्यात आलेले नाही. अशाप्रकारे नियमांचे उल्लंघन करुन प्रदानाची काही विशिष्ट महानगरपालिकांमध्ये सुरुवात कोणत्या अधिका-यांनी कशाच्या आधारे केली याची चौकशी करुन दोषी अधिका-यांवर कडक कारवाई करण्यात यावी. तसेच या सर्व जकातीच्या प्रदान व परताव्यासंदर्भात सर्व पावत्या व अन्य कागदपत्रे विभागाने प्राप्त करुन घेऊन FCI कडे यासंदर्भात योग्य तो पाठपुरावा करण्यात यावा यासाठी जिल्हाधिकारी, महापालिका व FCI चे प्रतिनिधी तसेच नगरविकास विभागाचे अधिकारी यांची एकत्रित बैठक आयोजित करुन शासनाला परतावा मिळविण्यासाठी विभागाने आवश्यक कार्यवाही करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.३९ परिच्छेद क्र. २.२.१५ "गोदामे बांधण्यातील विलंब"

अभिप्राय :

FCI डेपोमधून प्राप्त झालेल्या धान्याचे FPS द्वारे शिधापत्रिकाधारकांना वितरण करण्याकरीता ते शासकीय गोदामांमध्ये साठविले जाते. अन्नधान्य अधिक कालावधीकरिता साठविण्यासाठी तसेच भविष्यातील अन्नधान्याची वाढीव प्राप्ती विचारात घेता गोदामांची साठवण क्षमता ५.९५ लक्ष मे.टनने वाढविण्यासाठी, महाराष्ट्र शासनाने ३४ जिल्ह्यांमध्ये ५८४ अतिरिक्त गोदामांचे बांधकाम करण्याविषयीचा एकूण रुपये ४८४.१३ कोटी खर्चाचा कृती आराखडा तयार केला. त्यासाठी नाबार्डकडून रुपये ४५९.९३ कोटी कर्जरुपात प्राप्त व्हावयाचे होते व उर्वरित रुपये २४.२० कोटी निधी महाराष्ट्र शासनाने उपलब्ध करुन द्यावयाचा होता व सर्व ५८४ गोदामांचे बांधकाम मार्च, २०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले होते.

मार्च, २०१२ मध्ये नाबार्डने रुपये ९१.५८ कोटी (२० टक्के) सुसज्जता अग्रीम मुक्त केला आणि प्रकल्पावर प्रत्यक्ष झालेल्या खर्चाच्या आधारावर/प्रमाणात उर्वरित रक्कमेची प्रतिपूर्ती करावयाची होती. ज्या १२८ गोदामांसाठी वित्त विभागाने निधी वितरीत केला होता, त्यापैकी फक्त ३१ गोदामांचे बांधकाम नोव्हेंबर, २०१३ पर्यंत पूर्ण झाले होते. जमिनीच्या अनुपलब्धतेमुळे आठ गोदामांचे काम सुरु होऊ शकले नव्हते. ६६ गोदामांचे काम प्रगतीपथावर होते. एका गोदामाच्या खर्चाचे अंदाजपत्रक तयार करण्याची प्रक्रिया सुरु होती. २२ गोदामांच्या बाबतीत निविदेची प्रक्रिया सुरु होती. ज्या गतीने गोदामांचे बांधकाम पूर्ण होत होते. ते विचारात घेता, सर्व ५८४ गोदामांचे बांधकाम मार्च, २०१४ पर्यंत पूर्ण करण्याचे उद्दीष्ट साध्य होणे अशक्य होते असा आक्षेप महालेखापालांनी घेतला आहे.

नाबार्डच्या मंजूरी पत्रानुसार ५.९५ लक्ष मे .टन क्षमतेची ५८४ गोदामे बांधणे अपेक्षित आहे. माहे ऑगस्ट, २०१७ पर्यंत ३.३३ लक्ष मे.टन क्षमतेच्या २३७ गोदाम बांधकामांना प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. वित्त विभागाकडून उपलब्ध होणा-या निधीचा विचार करुन गोदाम बाधकामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आल्या आहेत/येत आहेत. दरसूचीमध्ये होणा-या वाढीमुळे व भाववाढीमुळे बांधकाम खर्चातील होणा-या वाढीचा विचार करता निधीच्या उपलब्धतेनुसार प्रशासकीय मान्यता देणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे विभागाकडून कार्यवाही करण्यात येत आहे.

सन २०१०-११ ते २०१७-१८ या कालावधीत २१४ गोदाम बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागास रुपये २७५.९५ कोटी निधी उपलब्ध करुन दिला असून प्रस्तुत गोदाम बांधकामाच्या पुर्णत्वासाठी वेळोवेळी आढावा घेऊन समस्यांचे निराकरण करुन गोदाम बांधकामे तातडीने करण्यास विभाग प्रयत्नशील आहे असे विभागाने त्यांच्या लेखी उत्तरात नमूद केले आहे.

समितीस यासंदर्भात साक्षीदरम्यान सांगण्यात आले की, नाबार्ड विभागाला कर्जस्वरुपात निधी देते. परंतु हा निधी प्रथम शासनाला खर्च करावा लागतो व त्याची प्रतिपुर्ती नंतर नाबार्डकडून होते. त्यावेळी ५८४ गोदामांचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले होते. परंतु विभागाने निधीच्या उपलब्धतेनुसार २३७ गोदामांना प्रशासकीय मान्यता दिली असून त्यातील १५३ गोदामांची कामे पुर्ण झालीअसून ४९ गोदामांची कामे प्रगतीपथावर आहेत. २० गोदामांची कामे तांत्रिक मान्यता व निविदास्तरावर आहेत. १५ गोदामांची कामे रद्द झाली तसेच या बांधण्यात येणा-या गोदामांचा आकार व क्षमता वाढविण्यात आली असल्यामुळे आता ५८४ गोदामांची आवश्यकता राहिली नसून विभागाला ही २३७ गोदामे पुरेशी असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले. तसेच अपूर्ण व बाकी गोदामांची कामे सुरु असून पुढच्या वर्षी पूर्ण होतील असा खुलासा विभागीय सचिवांनी केला.

शिफारस :

२.४० अन्नधान्याचा जवळजवळ ३ महिन्यांचा साठा करुन ठेवणेकरिता गोदामांची संख्या अपुरी असल्यामुळे त्यात वाढ करण्यासाठी ५८४ गोदामे नव्याने बांधण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले व त्याअनुषंगाने विभागाकडून कार्यवाही सुरु

झाली. परंतु हे उद्दिष्ट विहित कालावधीत पुर्ण होऊ न शकल्यामुळे गोदामे बांधण्यास विलंब झाला. परिणामी अन्नधान्याच्या साठवणीसाठी अतिरिक्त साठवण क्षमता निर्माण करण्याच्या उद्दिष्टाला बाधा निर्माण झाली असा आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केला. अन्नधान्याची साठवणूक क्षमता वाढविणे व भविष्यातील वाढीव प्राप्ती विचारात घेता अन्नधान्याचा शाश्वत व समाधानकारक साठा ठेवण्याच्या दृष्टीने विभागाने हा निर्णय घेतला. परंतु गोदामे बांधकामाची प्रगती मात्र निश्चितच समाधानकारक नसून यास अमर्याद विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे. केवळ विभागास प्राप्त निधी सार्वजनिक बांधकाम विभागास देऊन विभाग आपली जबाबदारी टाळू शकत नाही. सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करुन दिलेल्या निधीप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून कामाची देखरेख, संनियंत्रण व प्रगती पाहण्याची जबाबदारी प्रशासकीय मान्यता देणारा विभाग या नात्याने अन्न व नागरी पुरवठा विभागाची आहे. विभागाने गोदामांची साठवणूक क्षमता व त्याचा आकार आता वाढविलेला असल्यामुळे ५८४ ऐवजी २३७ गोदामे आता पुरेशी असल्याचे विभागाचे म्हणणे असेल तर त्याअनुषंगाने विभागाने आवश्यक ती प्रशासकीय पुर्तता करुन घेऊन यास मान्यता घ्यावी व प्राप्त निधीचे योग्यरित्या नियोजन करुन व त्याप्रमाणे आढावा घेऊन गोदामांचे बांधकाम विहीत वेळेत करुन त्यांचा वापर पुर्ण क्षमतेने करावा. तसेच या गोदामांमध्ये धान्य सुरक्षित राहण्याच्या दृष्टीने आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.४१ परिच्छेद क्र. २.२.१५.१ "गोदामांमध्ये साठविलेल्या अन्नधान्याचा विमा न उतरविणे"

अभिप्राय :

वित्त विभागाने फेब्रुवारी, १९६६ मध्ये दिलेल्या आदेशांनुसार शासकीय गोदामांमध्ये साठविल्या जाणा-या अन्नधान्याचा विमा उतरविणे आवश्यक आहे. त्याआधारे शासकीय गोदामांमध्ये तपासणी केली असता एकंदर १.०५ लक्ष मेट्रीक टन साठवण क्षमता असलेल्या १९९ गोदामात साठवलेल्या अन्नधान्याचा विभागाने विमा उतरविला नव्हता असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नोंदविलेले आहेत.

महालेखापाल, मुंबई यांच्या अहवालातील आक्षेपानुसार पुरवठा कार्यालयास अन्नधान्याच्या साठवणूक विम्याबाबत विचारणा केली असता सन २००८-१२ च्या प्रपत्रलेखा पडताळणीमध्ये बहुतांश जिल्हा पुरवठा कार्यालयाकडून अन्नधान्याचा साठयाचा विमा उतरविण्यात आला असून, प्रपत्रलेख्यात सदर रकमेची नोंद Insurance on Storage या लेख्यात दर्शविण्यात आला असून विम्याचे हप्ते स्विय प्रपंजी लेख्यातून (PLA) वार्षिक भरण्यात येत असल्याचे दिसून येते. तरीही काही जिल्हा कार्यालयाने शासकिय गोदामात साठवणूक करण्यात आलेल्या अन्नधान्याच्या विम्याची रक्कम न भरण्यात येत असल्याबाबत कळविले आहे. तसेच ज्या जिल्हा पुरवठा कार्यालयाने अद्यापपर्यंत अन्नधान्याच्या साठवणूक विम्याबाबत कार्यवाही केली नाही अशा कार्यालयांना अन्नधान्य साठयाचा विमा उतरविण्याची कार्यवाही करण्याबाबत समितीसमोर सांगण्यात आले. तथापि, सद्यःस्थितीत ५ जिल्हयांनी अन्नधान्याचा विमा उतरविलेला नव्हता. परंतु समितीच्या साक्षीदरम्यान सर्व गोदामांमधील अन्नधान्याचा आता विमा उतरविलेला असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

२.४२ शासनाच्या आदेशानुसार शासकीय गोदामांमध्ये साठविल्या जाणा-या अन्नधान्याचा विमा उतरविणे आवश्यक असताना राज्यात काही जिल्ह्यामध्ये असा विमा उतरविलेला नसल्याचे आक्षेप नोंदविण्यात आलेले आहेत. ही बाब गंभीर असून त्यावेळी या धान्याच्या साठ्यासोबत काही अनुचित प्रकार घडला किंवा कसे याबाबतची देखील छाननी करण्याची आवश्यकता आहे. महालेखाकारांच्या आक्षेपानंतर विभागाने याचा आढावा घेऊन सर्व गोदामातील अन्नधान्याचा विमा आता उतरविलेला आहे. परंतु आक्षेपाधीन कालावधीत हा विमा न उतरविणा-या अधिका-यांवर विभागाने कोणतीही कारवाई केली नाही. अतः अशा बेजबाबदार व निष्काळजीपणाच्या कृतीसाठी जबाबदार असणा-या संबंधित अधिका-यांवर कारवाई करण्यात यावी व भविष्यात अशा आक्षेपांची पुनरावृत्ती टाळावी. तसेच केवळ लेखापरिक्षण केलेल्या वर्षातीलच नाहीतर आजतागायत व यापुढे प्रत्येक आर्थिक वर्षात सर्व गोदामांमध्ये साठविलेल्या अन्नधान्याचा विमा सर्व जिल्हा कार्यालयांकडून वेळीच उतरविला जाईल याची खबरदारी व दक्षता विभागाने घ्यावी व त्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना करुन केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात द्यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.४३ परिच्छेद क्र. २.२.१६.१ "गोदामांची तपासणी निर्धारीत संख्येत होणे"

अभिप्राय :

महाराष्ट्र शासनाने मे २००६ च्या परिपत्रकामध्ये जिल्हयातील वेगवेगळया तपासणी प्राधिका-यांनी तसेच पुरवठा आयुक्त, मुंबई यांच्या दोन गोदाम तपासणी पथकांनी (GIS) गोदामांच्या लेख्यांची तसेच गोदामात साठविलेल्या अन्नधान्यांची कसून तपासणी करण्याची गरज असल्याचा पुनरूच्चार केला. अशा तपासणीच्या वेळी या पथकांनी प्रत्यक्ष साठे, पोत्यांची शास्त्रोक्त मांडणी, धूरी देण्याची पद्धत तपासणे अपेक्षित होते. दरवर्षी प्रत्येक पथकाने २०० गोदामांना भेट देऊन पुरवठा आयुक्तांच्या कार्यालयाने वार्षिक तपासण्यांचा एक एकत्रित अहवाल महाराष्ट्र शासनाला सादर करणे आवश्यक होते. अशाप्रकारे तपासणी करणे अपेक्षित असलेल्या २००० गोदामांपैकी फक्त ७३९ गोदामांची तपासणी या पैकी दोन पथकांनी केली होती. अशाप्रकारे पथकांनी एकूण गोदामांपैकी ६३ टक्के कमी गोदामांची तपासणी केली होती. तसेच तपासणी विषयीचे एकत्रित वार्षिक अहवालही सादर करण्यात आले नव्हते.

दिनांक २४ एप्रिल, १९८४ रोजीच्या परिपत्रकान्वये जिल्हा स्तरावर गोदाम तपासणीसाठी तीन स्तरीय पद्धत चालू केली असून तपासणी अधिका-यांसाठी मार्गदर्शक सूचना व जबाबदा-या तसेच गठीत करावयाच्या तपासणी पथकांबाबत परिपत्रके निर्गमित करण्यात आलेली आहेत. त्यानुसार पुरवठा आयुक्त कार्यालयाकडून नियतकालिक गोदाम तपासण्यासाठी विस्तृत आराखडा तयार केला जातो.

परंतु शासन परिपत्रकान्वये विहीत तपासण्या करण्यासाठी आवश्यक तांत्रिक प्रशिक्षित अधिकारी /कर्मचारी नसल्याने गोदाम तपासणीचा इष्टांक पूर्ण करता आला नाही. यापुढे गोदाम तपासणीचा इष्टांक पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येत असल्याचे विभागाने त्यांचे लेखी उत्तरात नमूद केले आहे.

यासंदर्भात समितीने विभागीय सचिवांची विस्तृत साक्ष घेतली व गोदाम तपासणीकरिता इष्टांक पूर्ण करण्यासाठी आवश्यक प्रशिक्षित अधिकारी/कर्मचारी उपलब्धतेसाठी विभागाकडून कोणते प्रयत्न करण्यात येत आहेत अशी समितीने विचारणा केली असता आता ही संख्या वाढवून दिलेली असून त्यांना आवश्यक ते प्रशिक्षण सुद्धा दिलेले आहे व सन २०१५-१६ आणि २०१६-१७ मध्ये पूर्ण उद्दिष्ट साध्य केले आहे असेही विभागीय सचिवांनी समितीसमोर सांगितले.

पूर्वी तपासणी पथकाची सदस्य संख्या जास्त ठेवली जात होती आणि आता सदस्य संख्या कमी ठेवल्यामुळे भ्रष्टाचाराची प्रकरणे देखील वाढण्याची पुर्ण शक्यता आहे. विभागाकडे पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे तपासणी पथकाची सदस्य संख्या कमी केली स्थानिक पातळीवरील मंजूर पदे ४० असून सद्यःस्थितीत केवळ ११ पदेच कार्यरत आहेत. तसेच या तपासणी पथकाच्या माध्यमातून रॅण्डमली तपासणी केली जाते असेही विभागीय सचिवांनी सांगितले.

तालुका ते जिल्हा स्तरावर शिधावाटप निरिक्षक, तहसीलदार, शिधा वितरण अधिकारी (FDO), जिल्हाधिकारी यांनी किती शिधावाटप दुकानांची तपासणी केली पाहिजे, या संदर्भातील शासन निर्णय अस्तित्वात असून त्यांनी प्रत्येक दुकान वर्षातून दोन वेळा तरी तपासावयास पाहिजे तसेच गोदामाचे रजिस्टर त्यांच्याकडे उपलब्ध असते. परंतु अशाप्रकारे गोदामांची नियमीत तपासणी होत नाही ही वस्तुस्थिती आहे. वर्षातून दोन वेळा तपासणी होणे अपेक्षित असताना एकदाही अशी तपासणी न होणे ही बाब गंभीर असून निश्चितच भ्रष्टाचारास वाव व चालना देणारी आहे. गोदाम तपासणी पथकाने केलेल्या तपासणीमध्ये तसेच उंदीर, घुस यांचेमुळे धान्याची नासाडी तसेच पावसाळ्यातील वातावरणामुळे धान्य कुजून खराब होणे तसेच धान्याची चढउतार व वाहतूक यामुळे एक टक्क्यापर्यंत धान्य वाया जाणे अनुज्ञेय आहे. परंतु त्यापेक्षा जास्त धान्य वाया गेल्यास संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात येते व त्याची वसुली करण्यात येते. तसेच जर तक्रार आली तर सर्व गोदामांची तपासणी करण्यात येते असेही विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

शिफारशी :

२.४४ गोदामातील अन्नधान्याची व लेख्यांची तपासणी करण्यासाठी गोदाम तपासणी पथकांची नियुक्ती करुन त्यांनी प्रत्यक्ष तपासणीसाठी जाणे, पोत्यांची शास्त्रोक्त मांडणी, धुरी देण्याची पद्धत तपासणे अभिप्रेत असून या पथकांनी वर्षातून दोनदा गोदामांना भेट देऊन या वार्षिक तपासण्यांचा एकत्रित अहवाल शासनाला सादर करणे आवश्यक होते. परंतु यासाठी अपुरी यंत्रणा, कर्मचा-यांची कमतरता व पुरेशा देखरेख व नियंत्रणाच्या अभावामुळे या गोदामांची तपासणी निर्धारित संख्येने न झाल्यामुळे महालेखापालांनी हे आक्षेप नोंदविलेले आहे. या गोदामांची विहीत कालमर्यादेत तपासणी न झाल्यामुळे संनियंत्रणाची यंत्रणा कमकुवत होण्याची व गैरव्यवहारास वाव व चालना मिळण्याची पुर्ण शक्यता होती. तसेच ज्या पथकांनी तपासणी केली त्यांचा अहवाल, त्यातील निष्कर्ष तसेच त्यात काही अनियमितता आढळल्यास त्यावर विभागाने केलेली कारवाई व भविष्यात त्याअनुषंगाने करावयाची उपाययोजना या सर्वच बाबींची सखोल तपासणी करण्याची आवश्यकता आहे. अतः

या सर्व बाबींची सखोल तपासणी करण्यात यावी तसेच ज्या गोदामांची तपासणी करण्यात आली नाही त्याठिकाणी काही अनुचित प्रकार वा अनियमितता झाली किंवा कसे याची तपासणी करुन आवश्यक ती पुढील कारवाई करण्यात यावी तसेच त्यावेळी अस्तित्वात असलेल्या पथकांची संख्या व त्यांनी केलेली तपासणी याचीदेखील छाननी करण्यात यावी तसेच केलेल्या तपासणी व्यतिरिक्त जास्त गोदामांची तपासणी करणे त्या पथकांना शक्य होते काय ? याचीदेखील तपासणी करावी व भविष्यात गोदामांची तपासणी योग्यरित्या होणेकरिता आवश्यक ती पुरेशी यंत्रणा निर्माण करावी. तसेच गोदाम तपासणीमध्ये काही अनुचित प्रकार वा अनियमितता आढळल्यास त्याची गंभीर दखल विभागाने घेऊन आवश्यक ती कारवाई करावी व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.४५ सद्यःस्थितीत अन्न व नागरी पुरवठा विभागाचे स्वतंत्र संगणकीय संकेतस्थळ निर्माण करण्यात आलेले आहे. त्यात FCI पासून थेट दुकानांपर्यंत सर्व लींक थेट जोडण्यात आली असून या माध्यमातून साठा, पुरवठा, उचल व धान्याचे वितरण तसेच धान्याची वाहतूक या सर्व बाबींची माहिती थेट ऑनलाईन उपलब्ध होऊ शकतात. त्यामुळे याची प्रभावी अंमलबजावणी केल्यास यात अनियमितता घडण्याची शक्यता भविष्यात कमी राहील. तसेच शक्य असल्यास व अधिक नियंत्रणासाठी यामध्ये एमआयएस यंत्रणेचा देखील समावेश करण्यात यावा. अन्न व नागरी पुरवठा विभागाकडून मोठ्या प्रमाणात अन्नधान्याचे वितरण गरीब व गरजू लोकांना होत असते व यासाठी अगदी शेवटच्या थरापर्यंत शासकीय यंत्रणा कार्यरत असते. तसेच यामध्ये मोठया प्रमाणात भ्रष्टाचार देखील होतो. या सर्व बाबी टाळण्यासाठी व अधिक पारदर्शकपणे, गुणवत्तापुर्ण व थेट गरजूंपर्यंत याचा लाभ पोहोचविण्यासाठी अन्नधान्यासंबंधी FCI, गोदामे, अन्नसाठा, वाहतूक वितरण तसेच लाभार्थी ही सर्व माहिती जनतेसाठी खुली करावी, जेणेकरुन त्यावर काही आक्षेप अथवा त्यामध्ये काही गैरव्यवहार वा अनियमितता असल्यास ते विभागापर्यंत पोहोचू शकतात. यासाठी आवश्यक ते ॲप तयार करण्यात यावे तसेच कॉलसेंटर वा ई-मेलच्या माध्यमातूनही या तक्रारी स्वीकारुन त्याची योग्य ती दखल घेण्यात यावी व ही व्यवस्था अधिक पारदर्शक करण्यात यावी व यासाठी अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर करण्यात यावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.४६ परिच्छेद क्र. २.२.१६.२ "स्वस्त धान्य दुकाने व शिधापत्रिकांची अपर्याप्त/सदोष तपासणी"

अभिप्राय :

PDS (नियंत्रण) आदेश, २००१ च्या परिशिष्टाच्या परिरिच्छेद ६ सह उपवाक्य ८ नुसार राज्य शासनाने रास्त भाव दुकानाच्या पदाधिका-यांद्वारे नियमितपणे तपासणी होत असल्याची, म्हणजेच, प्रत्येक सहा महिन्यांच्या कालावधीत कमीत कमी एक वेळा खात्री करावयाची होती. राज्य शासनाने तपासणीचे वेळापत्रक, तपासणी करावयाच्या दुकानांची यादी विनिर्दिष्ट करणारे आदेशही जारी करावयाचे होते आणि त्यामध्ये या आदेशांचे अनुपालन करण्यास जबाबदार असणारे अधिकारी नमूद करावयाचे होते. तसेच, रास्त भाव दुकानांची (FPS) ची तपासणी अधिक प्रभावीपणे होण्यासाठी महाराष्ट्र शासनाने असेही निर्देश दिले (एप्रिल २००५) की, FPS च्या तपासणी दरम्यान पुरवठा निरीक्षकांनी लाभार्थ्यांना बोलावून अथवा त्यांच्या निवासस्थानांना भेट देऊन कमीत कमी ५० शिधापत्रिकांची पडताळणी करावी. तरीही FPS ची सातत्याने कमी प्रमाणात तपासणी होत होती.

FPS च्या निर्धारित ५.१० लक्ष तपासण्यांपैकी फक्त ३.११ लक्ष तपासण्या विभागाकडून करण्यात आल्या होत्या. विभागाने FPS च्या तपासण्यांच्या माध्यमातून FPS च्या मालकांकडून वेगवेगळया त्रुर्टींप्रित्यर्थ रुपये ५.३७ कोटी एवढी रक्कम दंडाच्या रुपात जमा केली होती. एकूण FPS पैकी अनुक्रमे परभणी येथील ९१ टक्के, औरंगाबाद येथील ५५.१७ टक्के आणि सोलापूर जिल्ह्यातील ५३.७३ टक्के FPS मध्ये त्रुटी निदर्शनास आल्या होत्या. यावरुन हे सिद्ध होते की, निर्धारित संख्येत तपासण्या होण्याची खात्री करणे विभागासाठी अत्यावश्यक होते. एकाही कार्यालयात ५० शीधापत्रिकांची पडताळणी करण्याचे निर्धारित लक्ष्य असूनही ती केली गेली नव्हती. तीन कार्यालयांनी ४९ शिधापत्रिकांची पडताळणी केली असल्याचा दावा केला, परंतु त्याच्या पुष्ठ्यर्थ ते एकही दस्तऐवज लेखापरीक्षकांना सादर करु शकले नाहीत.

रास्तभाव दुकानांच्या नियमित तपासण्या करण्याबाबत क्षेत्रिय अधिका-यांना शासन स्तरावरुन वेळोवेळी सूचना देण्यात येतात. शासन परिपत्रक दिनांक १२ जानेवारी २०१२ अन्वये विहीत मानकांप्रमाणे तपासणी न करणा-या अधिकारी व कर्मचा-यांवर उप आयुक्त (पुरवठा) व जिल्हाधिकारी, यांनी महाराष्ट्र नागरी सेवा नियमानुसार शिस्तभंगाची कार्यवाही करावी अशा सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. राज्यातील ज्या रास्तभाव दुकानांच्या तपासण्या इष्टांकाप्रमाणे झालेल्या नाहीत त्यास कारणीभूत असणा-या अधिकारी/ कर्मचारी यांच्या विरुद्ध कारवाई करण्याबाबत तत्कालिन प्रधान सचिव स्तरावरुन संबंधित जिल्हयाच्या जिल्हाधिका-यांना वेळोवेळी सूचना देण्यात आलेल्या असून

त्याअनुषंगाने १३० अधिकारी / कर्मचारी यांना नोटीसा देण्यात आलेल्या असून जसजसा खुलासा येत आहे तसतशी कारवाई करण्यात येत असल्याचे समितीस सांगण्यात आले.

शासन परिपत्रक दिनांक १९ एप्रिल, २००५ अन्वये रास्तभाव दुकानांची तपासणी करताना प्रत्येक वेळी रास्तभाव दुकानास जोडण्यात आलेल्या एकूण शिधापत्रिकांपैकी किमान ५० शिधापत्रिकांची तपासणी करण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

शिफारस :

२.४७ PDS (नियंत्रण) आदेश २००१ मध्ये नमूद तरतुदीनुसार राज्य शासनाने FPS च्या पदाधिका-यांद्वारे नियमितपणे तपासणी होत असल्याची सहा महिन्याच्या कालावधीत कमीत कमी एक वेळ खात्री करुन घेणे आवश्यक होते. तसेच तपासणी दरम्यान कमीत कमी ५० शिधापत्रिकांची व लाभार्थ्यांची तपासणी करणे आवश्यक असताना या तपासण्या करण्यात मोठ्या प्रमाणात शासनस्तरावर तूट आढळून आली. ज्या ठिकाणी या तपासण्या झाल्या होत्या त्या प्रकरणी त्रुटीप्रित्यर्थ कोट्यावधीची रक्कम दंडाच्या रुपात जमा झाली होती. यावरुनच हे सिद्ध होते की, निर्धारीत संख्येत तपासण्या होण्याची खात्री करणे विभागासाठी संनियंत्रण व महसूल वाढीसाठी आवश्यक होते. अतः या सर्व प्रकरणाची चौकशी करुन तात्काळ दोषीवर कारवाई करण्यात यावी तसेच योजनेवर प्रभावीपणे संनियंत्रण ठेवण्यासाठी गोदामे, स्वस्त धान्य दुकाने आणि शिधापत्रिका यांच्या विहित संख्येत तपासण्या करण्यात याव्या. तसेच नियमानुसार प्रत्येक सहामाही कालावधीत प्रत्येक रास्तभाव व केरोसीन दुकानाची किमान एक वेळा तपासण्या होतील, अशाप्रकारे नियोजन करुन परिणामकारक तपासण्या करण्याची दक्षता विभागाने घ्यावी व यापुढे मुदतीत तपासणी अहवाल सादर न करण्या-या अधिका-यांविरुद्ध कारवाई करण्यात यावी व भविष्यात असे आक्षेप टाळावे व यासंदर्भात केलेल्या कारवाईची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२,४८ परिच्छेद क्र. २.२.१६.३ "दक्षता समित्यांचे कमी संख्येत गठन करणे"

अभिप्राय :

PDS (नियंत्रण) आदेश, २००१ आणि जानेवारी, २००८ च्या शासन निर्णयानुसार PDS अंतर्गत वस्तूंच्या वितरणावर संनियंत्रण ठेवण्यासाठी गाव/FPS, तालुका, जिल्हा, नगरपरिषद, महापालिका आणि राज्य पातळीवर दक्षता समित्या (VC) गठित करायच्या होत्या. अन्नधान्याचे वाटप, उचल आणि वितरण यावर संनियंत्रण ठेवणे, अन्नधान्याची गुणवत्ता तपासणे, PDS च्या अभिलेख्यांची तपासणी आणि शिधापत्रिकाधारकांनी केलेल्या तक्रारीविषयीचा अहवाल सादर करणे यांचा समावेश VCs च्या कार्यात होतो. राज्य पातळी वगळता इतर सर्व पातळयांवर VCs ची प्रत्येक महिन्यात किमान एकदा व राज्य पातळीवर प्रत्येक दोन महिन्यांच्या कालावधीत बैठक होणे आवश्यक होते.

गठीत करावयाच्या समित्या व प्रत्यक्ष गठीत केलेल्या समित्यांची संख्या पाहता ज्क चे गठन करण्यात राज्यात गाव पातळीवर १२,२७४, तालुका पातळीवर २५ आणि महापालिका व नगरपरिषद पातळीवर ३८ इतकी तूट होती. तसेच VCs नी नियमितपणे मासिक बैठकाही घेतल्या नव्हत्या. वेगवेगळ्या पातळ्यांवर VCs चे गठन न करणे, नियतकालीक बैठका न घेणे आणि VCs विषयी लाभार्थी अनभिज्ञ असणे यावरुन योजनेचे सदोष संनियंत्रण दर्शविले गेले असा आक्षेप महालेखापालांनी नोंदविला आहे.

शासनाकडून दक्षता समित्यांच्या बैठकांबाबत घेण्यात आलेल्या विभागवार आढाव्यामध्ये दक्षता समित्यांच्या बैठका नियमितपणे घेतल्या जात नसल्याचे आणि अशा बैठका न घेणा-या संबंधित सदस्य सचिवांविरुद्ध यथोचित शिस्तभंगाची कारवाई केली जात नसल्याच्या पार्श्वभूमीवर, शासन निर्णय दिनांक ८.१.२०१५ अन्वये योग्य त्या मार्गदशक सूचना पुन्हा निर्गमित करण्यात आलेल्या आहेत असे विभागाने त्यांचे लेखी उत्तरात नमूद केले आहे.

दक्षता समितीचे सदस्य हे शासकीय व अशासकीय असतात. परंतु अशासकीय सदस्यांची नावे पालकमंत्री महोदयांकडून वेळेवर येत नाहीत. काही ठिकाणी यादी अंतिम केल्यानंतर देखील समिती सदस्यांची नावे बदलण्याचे प्रकार देखील होत असतात. त्यामुळे विलंब होतो असा खुलासा विभागीय सचिवांनी साक्षीदरम्यान समितीसमोर केला. तसेच आता असा निर्णय घेतला आहे की, जर माननीय पालकमंत्र्यांनी मुदतीमध्ये नावे दिली नाहीत तर ते अधिकार माननीय मंत्री महोदयांकडे जातील.

शिफारस :

२.४९ सार्वजनिक वितरण व्यवस्थेवरील देखरेखीत जनतेचा सहभाग राहण्याच्या दृष्टीने सार्वजनिक वितरण व्यवस्थेमार्फत वितरीत करण्यात येणा-या जिवनावश्यक वस्तूंच्या वितरणावर देखरेख ठेवण्यासाठी शासन निर्णय दिनांक २३/१/२००८ अन्वये राज्यात विविध स्तरावर समित्या गठीत करण्यात आल्या असून, या विविध स्तरावरील दक्षता समित्यांच्या बैठका दरमहा नियमितपणे घेण्याची तरतूद करण्यात आली आहे. अन्नधान्याचे वाटप, उचल, वितरण यावर संनियंत्रण ठेवणे, अन्नधान्याची गुणवत्ता तपासणे, अभिलेख्यांची तपासणी आणि शिधापत्रिकाधारकांनी केलेल्या तक्रारी विषयीचा अहवाल सादर करणे हे या दक्षता समित्यांचे प्रमुख कार्य असून या दक्षता समित्या गठीत न होणे अथवा कमी संख्येत गठीत होणे अथवा समित्यांच्या बैठका नियमित न होणे यामुळे योजनेच्या अंमलबजावणीवर योग्य संनियंत्रण राहीले नाही. या समित्यांची सर्वात जास्त तूट ही गाव पातळीवर व नगरपरिषदस्तरावर होती. या समित्यांमध्ये महालेखाकारांनी नमूद केलेली तूट, विभागाने नमूद केलेली तूट व समितीसमोर साक्षीदरम्यान आलेली माहिती यामध्ये देखील समित्यांच्या संख्येमध्ये तफावत होती. यासंदर्भात चौकशी करुन अद्ययावत माहिती समितीस १५ दिवसांत सादर करणेबाबत समितीने निर्देश दिले असता अद्यापही ही माहिती समितीस अप्राप्त आहे. अतः उपरोक्त प्रकरणाची व समित्या गठीत करण्यास विलंब का झाला याची तपासणी करण्यात यावी तसेच काही ठिकाणी अशासकीय सदस्यांची नावे प्राप्त असताना शासकीय सदस्यांची नावे अधिका-यांनी न दिल्यामुळे या समित्या गठीत करण्यास विलंब झाला याची देखील चौकशी करण्यात येऊन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यात यावी. तसेच विविध स्तरावरील दक्षता समित्या विहीत केल्याप्रमाणे गठीत करुन त्याचा आढावा घेऊन सदर समित्यांच्या बैठका दरमहा नियमितपणे होण्यासाठी त्याबाबतचा मासिक अहवाल घेण्याची पद्धत विभागाने सुरु करावी तसेच दक्षता समित्यांच्या बैठकांसंबंधी विभागाने अगदी शेवटच्या स्तरापर्यंत परिपत्रक निर्गमित करुन यास जाहीर प्रसिद्धी द्यावी, तसेच शिधापत्रिकाधारकांची परिषद घ्यावी. आता प्रत्येक दुकानदाराच्या क्षेत्रात एका आठवड्याचा अन्न सप्ताह आणि अन्न दिवस आयोजित करुन केंद्र शासनास त्याचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे. अशाप्रकारे या सोशल ऑडीट ठेवण्याच्या कामावर शासनाने योग्य संनियंत्रण ठेवून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी व वेगवेगळ्या पातळ्यांवर निर्धारित संख्येत दक्षता समित्यांचे गठन करण्यातील तूट कमी करावी व केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

२.५० परिच्छेद क्र. २.२.१६.४ TPDS चे संगणकीकरण

अभिप्राय :

लक्ष्य निर्धारीत सार्वजनिक वितरण व्यवस्था (Tangeted Public Distribution System) संगणकीकरणासाठी विभागाने मेसर्स ३i इन्फोटेक लिमिटेड यांची सल्लागार म्हणून नियुक्ती केली (मार्च, २००६) रुपये २४.२६ लक्ष मोबदल्यास हे काम दिले गेले आणि या कामामध्ये अभ्यास व आवश्यक माहिती हस्तगत करणे, निविदा प्रक्रियेचे व्यवस्थापन, समन्वय, अंमलबजावणीवरील संनियंत्रण तसेच प्रशिक्षण याचा समावेश होता. कामाच्या पूर्णत्वाच्या टप्प्यानुसार सल्लागाराला रक्कम प्रदान करायची होती. सल्लागाराने मागणी केलेल्या रुपये १०.९२ लक्ष रक्कमेपैकी विभागाने रुपये सात लक्षचे प्रदान केले (ऑक्टोबर,२००८)

पायाभूत सुविधा प्रस्थापित करण्यासाठी कुटुंब प्रमुखाचे छायाचित्र तसेच वैयक्तिक ओळखीसाठी बारकोड आणि होलाग्राम, कुटुंबातील सर्व सदस्यांचे हाताचे ठसे यांची संगणकीकृत माहितीची नोंद घेता येईल. संगणक सॉफ्टवेअर विकसित करण्यासाठी सर्व FPS ना हस्तचलित यंत्राचा पुरवठा करणे, लेखांकनासाठी तालुका व गोदामाच्या ठिकाणी संगणकांची व्यवस्था करणे इत्यादीसाठी निविदा मागविण्यात आल्या (जून,२००७). शिधापत्रिका जारी करताना/पुन्हा जारी करतांना तसेच इतर सेवांकरीता शिधापत्रिका धारकांकडून शुल्क वसूल करुन त्याद्वारे हा खर्च वसूल करायचा होता.

बांधा, वापरा, मालकी प्राप्त करा व हस्तांतरीत करा (BOOT) या तत्वावर सर्वसमावेशक सेवा पुरवठादार म्हणून रुपये १२४.९८ कोटीची बोली सादर केलेल्या मे.स्पॅन्को टेलिसिस्टिम सोल्युशन लिमिटेड (STSL) यांचा प्रस्ताव न्यूनतम असल्याचे आढळले. कंत्राट देण्याविषयीचा प्रस्ताव प्रधान सचिवांकडे (वित्तीय सुधारणा) मंजुरीसाठी पाठवण्यात आला त्यांनी निविदेत तरतूद केलेल्या बारकोड पद्धतीऐवजी स्मार्टकार्ड तंत्राचा वापर करण्याविषयी शिफारस केली. स्मार्टकार्ड तंत्राचा समावेश असलेली योजना कार्यान्वित करणे खर्चिक असल्याने प्रधान सचिव (वित्तीय सुधारणा) यांची शिफारस उच्चाधिकार समितीने मान्य केली नाही (फेब्रुवारी, २००८). कालांतराने STSL बरोबर रुपये १२४.९८ कोटीचा सप्टेंबर २०११ पर्यंतच्या कालावधीसाठी तीन वर्षाचा करार करण्यात आला (सप्टेंबर,२००८) जो संपल्यावर मत्ता विभागाकडे हस्तांतरीत करायची होती.

परंतु नंतर बायोमेट्रिक पद्धत खर्चिक असूनही जास्त परिणामकारक असल्याचे निदर्शनास आल्याने फेब्रुवारी २००९ मध्ये विभागाने कामाच्या व्याप्तीचे पुनर्विलोकन केल्याचे लेखापरिक्षणांत आढळून आले आणि अशाप्रकारे करार केल्यावर चार महिन्यांच्या आत विभागाने बारकोड पद्धतीऐवजी बायोमेट्रिक तंत्राचा अवलंब करण्यासाठी कामाच्या व्याप्तीत बदल करण्यासाठी STSL ला विनंती केली. STSL ने कामाच्या व्याप्तीत बदल करण्यास नकार दिल्यावर (ऑगस्ट २००९) कंपनीला करार समाप्तीची नोटीस अखेर जारी केली (डिसेंबर,२०११). विभागाच्या या निदर्शनास STSL ने विरोध दर्शविला (ऑक्टोबर २०११) आणि सदर प्रकरण दोन वर्षापेक्षा जास्त काळ लवादाकडे (प्रधान सचिव, अन्न, नागरी पुरवठा आणि ग्राहक संरक्षण विभाग) प्रलंबित आहे (जानेवारी, २०१४)

अशाप्रकारे प्रारंभी वित्त विभागाच्या यावरील मतास जरी सहमती दर्शविण्यात आली नव्हती तरी शेवटी त्यास मान्यता देण्यात आली. प्रधान सचिवांनी (वित्तीय सुधारणा) प्रथम बायोमेट्रीक शिधापत्रिकांसाठी केलेली शिफारस फेब्रुवारी २००८ मध्ये मान्य न करणे आणि त्यांनतर तीच शिफारस फेब्रुवारी २००९ मध्ये म्हणजेच करार केल्यानंतर चार महिन्यांनी मान्य करणे यामुळे फक्त करार रद्द करावा लागला असा नाही तर प्रकरण लवादाकडे गेले जे दोन वर्षापासून प्रलंबित आहे. TPDS चे संगणकीकरण जे सप्टेंबर २०११ पर्यंत पूर्ण होणे अपेक्षित होते ते अजूनही साध्य झालेले नाही (जानेवारी, २०१४)

परंतु महाराष्ट्र शासनाने TPDS चे संपूर्ण संगणकीकरण या योजनांतर्गत योजनेखाली रुपये १०२.७७ कोटी खर्चाचा एक प्रस्ताव केंद्र शासनाला सादर केला होता जो खर्च राज्य शासन आणि केंद्र शासनाने सारख्या प्रमाणात विभागून करायचा होता. महाराष्ट्र शासनाने प्रकल्पावरील खर्च सुधारुन तो रुपये ७४.८८ कोटी निर्धारित केला (जून, २०१३). कामाच्या व्याप्तीमध्ये सॉफ्टवेअर तयार करणे, माहिती केंद्राची निर्मिती, माहिती आकडेवारीच्या स्वरुपात मांडणे इत्यादीचा समावेश होता. महाराष्ट्र शासन व केंद्र शासनामधील सामंजस्य करारानुसार लाभार्थ्यांची व इतर माहितीची आकडेवारी तयार करण्याचे आणि पुरवठा साखळीचे संगणकीकरण करण्याचे काम अनुक्रमे मार्च २०१३ व ऑक्टोबर २०१३ पर्यंत पूर्ण करायचे होते. केंद्र शासनाने रुपये ६९.७२ कोटी इतक्या प्रस्ताव खर्चास मंजुरी दिली (जून २०१३) आणि रुपये २०.९१ कोटी रक्कम मुक्त केली (जुलै, २०१३). मे. २०१३ पर्यत या योजनेवर रुपये ६.२८ कोटीचा खर्च करण्यात आला.

महालेखाकारांनी नोंदविलेले सदरहु आक्षेप हे अतिशय गंभीर स्वरुपाचे असून संपुर्ण सार्वजनिक वितरण व्यवस्थेवर अंतिमतः परिणाम करणारे आहेत. सदरहु आक्षेपांवर विभागाने दिलेल्या लेखी उत्तराचे अवलोकन केले असता असे नमूद करण्यात आले आहे की, मे. ३i इन्फोटेक लिमिटेड या सल्लागार कंपनीच्या मदतीने प्रकल्पासाठी आवश्यक तांत्रिक बाबींची पुर्तता करण्यासाठी विहित पद्धतीने निविदेद्वारे मे.स्पॅन्को या कंपनीची प्रकल्प अंमलबजावणीसाठी शासनाने निवड करुन करार केला. या करारातील अटी व शर्तीनुसार २ वर्ष कालावधी उलटल्यानंतरही काम सुरु न केल्याने मे.स्पॅन्को लि. यांच्याबरोबर झालेला करार का रद्द करण्यात येवू नये अशी नोटीस बजावण्यात आली असता त्याविरुद्ध मे.स्पॅन्को कंपनीने उच्च न्यायालयात अर्ज सादर केला. मा.उच्च न्यायालयाच्या निर्णयाच्या अनुषंगाने कंपनीच्या विनंतीवर विभागाने घेतलेल्या सुनावणीदरम्यान परफार्मन्स बँक गॅरेंटीची वैधता समाप्त होत असल्याचे निदर्शनास येता लवादाने हा अवधी वाढविण्यासंदर्भात आदेश दिले. परंतु मे.स्पॅन्को लि. यास असमर्थ ठरल्याने शासनाने त्यांची रुपये १७.१९ कोटीची बँक गॅरेंटी जमा केली. Sole Arbitrator यांनी अंतिम निर्णय घेतला नाही म्हणून मे.स्पॅन्को कंपनीने Arbitrator बदलण्याबाबत उच्च न्यायालयात याचिका दाखल केली व त्याच्या निर्णयानुसार सेवानिवृत्त न्यायाधीशाची Sole Arbitrator म्हणून नियुक्ती करण्यात आली. परंतु सद्यःस्थितीत उच्च न्यायालयाने मे.स्पॅन्को यांच्याविरुद्ध दिवाळखोरीचे काढलेल्या आदेशान्वये मा.उच्च न्यायालय यापुढे लिक्वीडेटर म्हणून काम पाहत आहेत असल्याचे विभागाच्या लेखी उत्तरात नमूद आहे.

शिफारस :

२.५१ महालेखाकारांनी नोंदविलेले उपरोक्त आक्षेप व त्यास विभागाने दिलेले लेखी उत्तराचे अवलोकन करता या बाबी अतिशय गंभीर असून संपुर्ण वितरण व्यवस्थेवर विपरीत परिणाम करणा-या आहेत. सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपुर्ण संगणकीकरण करुन अन्नधान्य वितरणाच्या संपुर्ण प्रक्रियेत पारदर्शकता आणण्यासाठी व गैरव्यवहार टाळण्यासाठी तसेच या योजनेचा लाभ राज्यातील अत्यंत दुर्लक्षित, गरीब व गरजू कुटुंबांना मोफत वा सवलतीच्या दराने अन्नधान्याचे वितरण शाश्वतरितीने होण्यासाठी कोट्यावधी रुपयांचा निधी खर्च करुन या TPDS चे संगणकीकरण करण्याचा निर्णय घेण्यात आला. परंतु याची अंमलबजावणी विहित कालावधीत झालेली नसून या संपुर्ण प्रक्रियेमध्ये प्रशासकीय व न्यायालयीन कारणास्तव हे संपुर्ण प्रकरण अडकून पडलेले आहे. तसेच अगोदर वित्त विभागाने बारकोड पद्धतीऐवजी स्मार्टकार्ड तंत्राचा वापर करण्यासंदर्भात केलेली शिफारस खर्चिक असण्याच्या कारणास्तव नाकारण्यात येणे, परंतु कालांतराने मान्य झालेल्या कामाच्या व्याप्तीत बदल करुन बारकोड पद्धतीऐवजी बायोमेट्रीक तंत्राचा अवलंब करण्याचा निर्णय घेण्यात येणे. या सर्व बाबी प्रशासकीय गोंधळ दर्शविणा-या आहेत. विहित वेळेत योग्य ते निर्णय न घेतल्यामुळे तसेच घेतलेल्या निर्णयांवर कायम

वा ठाम न राहिल्यामुळे या अनेक अडचणी उद्‌भवलेल्या असून विभागाला या बाबी निश्चितच टाळता आल्या असत्या. अतः या संपुर्ण कार्यपद्धतीबाबत समिती तीव्र नापसंती व्यक्त करीत असून विभागाने याची दखल घ्यावी अशी समितीची शिफारस आहे. उपरोक्त सर्व अडचणींमुळे या संपुर्ण प्रक्रियेत सार्वजनिक वितरण प्रणालीचे संगणकीकरणाचे काम हे समांतररित्या अन्य मार्गाद्वारे करुन घेणे आवश्यक ठरले व त्यास अमर्याद विलंब तर झालाच परंतु अतिरिक्त निधीदेखील खर्च झाला. सार्वजनिक वितरण व्यवस्थेमध्ये शिधावस्तुंचे वाटप आधार कार्डाच्या आधारावर बायोमेट्रीक पद्धतीने ओळख पटवून करण्यास तसेच रास्तभाव दुकानांचे ऑटोमेशन करण्यास व यासाठी मोबाईल टर्मिनल टेक्नॉलॉजीचा वापर करण्यासाठी स्वतंत्र निविदा प्रक्रिया राबविण्याची कार्यवाही आता विभागस्तरावरुन सुरु आहे. तसेच शिधापत्रिकांचे डिजीटायझेशन तसेच लाभार्थ्यांचा तपशिल पीडीएस डेटाबेसमध्ये समाविष्ट करण्याची कार्यवाही विभागस्तरावरुन प्रगतीपथावर आहे. तसेच सद्यःस्थितीत संपुर्ण राज्यात E-PDS प्रणालीच्या माध्यमातून सार्वजनिक वितरण व्यवस्था राबविण्यात विभागाला यश आले आहे. परंतु अत्यंत दुर्गम व नक्षलग्रस्त अशा गोंदिया व गडचिरोली जिल्ह्यात जिथे ब्रॉड-बँडच्या नेटवर्कची अडचण आहे तिथे आधार कार्ड आधारीत APDS प्रणाली राबविण्याबाबत विचार व्हावा. या सर्व प्रक्रियेची अंमलबजावणी तातडीने करण्यात यावी व संपुर्ण सार्वजनिक वितरण व्यवस्था अद्ययावत संगणकीय आज्ञावलीच्या माध्यमातून जोडण्यात यावी व यांसदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी अशी समितीची शिफारस आहे.

२.५२ परिच्छेद क्र. २.२.१६.५ "उपयोगिता प्रमाणपत्रे आणि नियतकालिक अहवाल सादर न करणे"

अभिप्राय :

PDS (नियंत्रण) आदेश २००१ च्या परिशिष्ट क्ष सह उपवाक्य ८ मधील तरतुदीनुसार संबंधित राज्यांकडून प्राप्त होणारे सर्वसाधारण अहवाल आणि ज्या महिन्यात अन्नधान्याचे वाटप करण्यात आलेले आहे त्या महिन्यापासून दोन महिन्यांच्या आत उपयोगिता प्रमाणपत्रे (UCs) सादर होणे या दोन बाबींच्या आधारावर राज्याला नंतरच्या कालावधीत अन्नधान्यांचे वाटप करावयास हवे.

परंतु विभागाने केंद्र शासनाला UCs तसेच PDS (नियंत्रण) आदेश २००१ अंतर्गत सादर करावयाचे मासिक अहवाल सादर केले नव्हते असे आक्षेप महालेखाकारांनी त्यांचे परिच्छेदात नमूद केले होते.

सार्वजनिक वितरण व्यवस्था (नियंत्रण), २००१ च्या आदेशानुसार सार्वजनिक वितरण व्यवस्थेंतर्गत मासिक धान्य उचल व वितरण यांचा अहवाल विहित नमुन्यात राज्य शासनाने केंद्र शासनास सादर करणे आवश्यक आहे. त्याअनुसार आता केंद्र शासनास मासिक धान्य उचल व वितरण यांचा अहवाल पाठविण्यात आला असल्याचे समितीसमोर सांगण्यात आले.

शिफारस :

२.५३ सहाय्यक अनुदान देयकांद्वारे कोषागारातून आहरित केलेल्या सर्व रकमांची उपयोगिता प्रमाणपत्रे विहीत वेळेत महालेखापालांना व केंद्र शासनास सादर करण्याची दक्षता विभागाने घ्यावी जेणेकरुन सदर रकमेच्या गैरव्यवहार / अफरातफरीस वाव राहणार नाही व उपयोगिता प्रमाणपत्र न दिल्यामुळे पुढील निधीचे वितरण थांबणार नाही अशी समितीची शिफारस आहे.

सर्वसाधारण शिफारस :

२.५४ सार्वजनिक वितरण प्रणाली (PDS) ही केंद्र शासन पुरस्कृत योजना असून त्याच्या अंमलबजावणीची जबाबदारी ही राज्य शासनाची असते. PDS मध्ये अन्नधान्याचे प्रापण, साठवण आणि शिधापत्रिका धारकांना स्वस्त धान्य दुकानांमार्फत शिधा वाटप होते आणि PDS (नियंत्रण) आदेश, २००१ च्या तरतूदींतर्गत याचे नियमन होते. PDS हे सर्वसामान्य जनतेला योग्यवेळी वाजवी दरात अन्नधान्य उपलब्ध करुन देण्याचे तसेच गरीबांना अन्न सुरक्षा देण्याचे एक प्रमुख साधन आहे. केंद्र शासनाच्या अधिसूचनेनुसार PDS अंतर्गत तांदूळ, गहू, साखर, खाद्य तेल, तूरडाळ आणि रॉकेल याचे वाटप होते. PDS च्या बळकटीकरणासाठी केंद्र शासनाने जून, १९९७ मध्ये दारिद्र्य रेषेखालील कुटुंबियांना अनुदानित दराने अन्नधान्याचे वाटप करण्यासाठी निर्धारीत सार्वजनिक वितरण प्रणालीची सुरुवात केली. या सार्वजनिक वितरण प्रणालीमध्ये लाभार्थ्यांचा शोध आणि शिधापत्रिकांचे वाटप योग्यप्रकारे आणि प्रभावीपणे करण्यात आले होते किंवा कसे, वित्तीय व्यवस्थापन सक्षम होते किंवा कसे, अन्नधान्य वाटप करण्याची, उचल करण्याची, वाहतूक, साठवण आणि वितरण करण्यासाठी प्रणाली पर्याप्त आणि परिणामकारक होती किंवा कसे, पर्याप्त आणि परिणामकारक संनियंत्रण कार्यतंत्र कार्यरत होते किंवा कसे या बाबींची खात्री करुन घेणेसाठी कार्यसिद्धी लेखापरिक्षण करणेबाबत लेखापरिक्षेची उद्दिष्टे ठरविण्यात आली होती.

राज्यात निर्धारित सार्वजनिक वितरण प्रणालीच्या कामकाजात अनेक त्रुटी समितीस दिसून आल्या. दारिद्र्यरेषेखालील कुटुंबांची निवड अयोग्यप्रकारे केल्यामुळे मोठ्या संख्येत अपात्र कुटुंबांचा समावेश होऊन कित्येक लाभपात्र कुटुंबांना मात्र योजनेच्या लाभापासून वंचित रहावे लागले. संबंधित विभागाकडून माहितीची प्रती पडताळणी न करता स्वतः सादर केलेल्या उत्पन्नाच्या दाखल्याच्या आणि प्रतिज्ञापत्राच्या आधारावर शिधापत्रिका देण्यात आल्या. सबसिडीचे नियमबाह्यपणे आहरण केल्याचे आणि FCI कडे मोठ्या प्रमाणात अग्रीमांचे समायोजन प्रलंबित असल्याचेही काही प्रकरणांत दिसून आले होते. FCI कडून अन्नधान्याची उचल न केल्यामुळे दारिद्र्य रेषेखालील लाभार्थी योजनेचा लाभ मिळविण्यापासून वंचित राहिले होते. त्याचवेळी खुल्या बाजारातून तांदूळ खरेदी करण्यावर राज्य शासनाद्वारे खर्च करण्यात आला होता, जो टाळता आला असता. FCI कडून उचल करण्यात आलेल्या अन्नधान्याची गुणवत्ता तपासण्यात आली नव्हती. ग्राहकांकडे असलेली गॅस सिलेंडर्स किंवा गॅसच्या पाईप जोडण्या असलेले ग्राहक यांच्या माहितीशी सार्वजनिक वितरण प्रणालीद्वारे रॉकेलचे वितरण करण्यासाठी निर्धारित करण्यात आलेल्या लाभार्थ्यांची माहिती प्रभावीपणे न जोडल्यामुळे हे निर्धारण पर्याप्त प्रमाणात झाले नव्हते. रॉकेल वरील रोख सबसिडीचे थेट हस्तांतरण करण्याची योजना मागे पडली होती तसेच वाहनांचा माग घेण्याच्या प्रणालीची अंमलबजावणीही प्रभावीपणे करण्यात आलेली नव्हती. वेगवेगळ्या पातळयांवर निर्धारित संख्येमध्ये दक्षता समित्यांचे गठन करण्यात न आल्यामुळे योजनेवरील संनियंत्रण कमकुवत होते. पदाधिका-यांकडून गोदामांची, स्वस्त धान्य दुकानांची आणि शिधापत्रिकांची तपासणी कमी संख्येत केली जात होती. अशा अनेक त्रुटी व उणिवा या सर्व परिच्छेदांच्या माध्यमातून समितीच्या निदर्शनास आल्या. अन्न नागरी पुरवठा विभागाच्या माध्यमातून राज्यातील गरीब व गरजु कुटुंबांना अन्नाची मुलभूत गरज भागविण्याचे महत्वपुर्ण कार्य होत असते. यासाठी शासनस्तरावरून व केंद्र शासनाकडून मोठ्या प्रमाणात सवलतही देण्यात येते. या महत्वपुर्ण कार्यासाठी शासनस्तरावर मोठी उद्दिष्टे देखील निश्चित करण्यात आलेली असून राज्यभरात यासाठी मोठी शासकीय यंत्रणा अगदी शेवटच्या थरापर्यंत कार्यरत आहे. या सर्व प्रस्थापित यंत्रणेच्या माध्यमातून वास्तविकरित्या समाजातील गरजुंपर्यंत याचा किती लाभ पोहोचला, केंद्र पुरस्कृत सार्वजनिक वितरण प्रणाली या योजनेची अंमलबजावणी किती प्रमाणात यशस्वी झाली, तसेच जनतेला वाजवी दरात अन्नधान्य वेळेवर उपलब्ध करुन देण्याचे व गरिबांना व गरजूंना अन्न सुरक्षा पुरविणे या सर्व कामांच्या यशस्वीतेचा आढावा घेण्यासाठी महालेखाकारांनी या विभागाचे लेखापरिक्षण केले असता उपरोक्त गंभीर त्रृटी निदर्शनास आल्या असून यासंदर्भात अस्तित्वात असलेल्या संपुर्ण यंत्रणेबाबत आक्षेप नोंदविण्यात आले आहे. यावरुनच या योजनेची अंमलबजावणी किती सदोषरित्या झाली हे स्पष्ट होते. या सर्व प्रक्रियेत मोठ्या प्रमाणात अनियमितता व गैरव्यवहार देखील झालेला आहे. परिणामी ही संपुर्ण यंत्रणा व कार्यपद्धतीबाबत आक्षेप नोंदविण्यात आले व योजनेवरील संनियंत्रण अतिशय कमकुवत होते हे सिद्ध झाले. समिती या संपुर्ण कार्यपद्धतीबाबत तीव्र नापसंती व नाराजी व्यक्ती करीत आहे. शासनाने या सर्व आक्षेपांची गंभीर दखल घ्यावी व विभागाने याची भविष्यात पुनरावृत्ती टाळावी व या साठा, वितरण विभागांतर्गत अन्नधान्याची व लाभार्थ्यांची माहिती जनतेसाठी खुली करावी जेणेकरुन ही व्यवस्था अधिक पारदर्शकपणे कार्यरत राहील व काही आक्षेपार्ह बाबी झाल्यास यासंदर्भातील तक्रारीदेखील शासनाकडे प्राप्त होतील व यासाठी अद्ययावत संगणकीय कार्यप्रणालीचा वापर करावा व डीजीटल रेशनकार्ड देण्याच्या पर्यायांचा अवलंब करावा व यासंदर्भात केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीस ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.

कृषी व पदुम, दुग्धव्यवसाय (दुग्धव्यवसाय)

३.१ भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालातील परिच्छेद क्र. ३.१.५ "व्याजाची हानी" यासंदर्भात महालेखाकारांनी खालील अभिप्राय व्यक्त केले आहेत.

३.२ परिच्छेद क्रमांक ३.१.५ व्याजाची हानी

सहायक अनुदाने बचत खात्याऐवजी चालू खात्यात ठेवल्यामुळे रु.७४.२१ लक्ष रक्कमेच्या व्याजाची हानी झाली होती.

विदर्भ, मराठवाडा आणि कोकण विभागाच्या २३ जिल्ह्यांमध्ये वर्ष २००९-१० दरम्यान, केंद्र पुरस्कृत योजनेच्या राष्ट्रीय कृषि विकास योजनांतर्गत (RKVY) "एकात्मिक दुग्धव्यवसाय क्षेत्र योजना (योजना) राबविण्यासाठी महाराष्ट्र शासनाने रुपये २१.६० कोटी रकमेचे सहायक अनुदान (GIA) मुक्त करण्यासाठी प्रशासकीय मान्यता (ऑगस्ट, २००९) दिली होती. हे सहायक अनुदान महाराष्ट्र शासनाच्या नोव्हेंबर, २००९ च्या आदेशानुसार मुक्त केले गेले होते. (१७ डिसेंबर २००९) कृषी मंत्रालय (कृषि आणि सहकार विभाग) यांच्या निर्देशानुसार (ऑगस्ट, २००९) केंद्र शासन, राज्य शासन/अंमलबजावणी करणारी एजन्सी या जमा केलेल्या सहायक अनुदानावर बँक द्वारा व्याज मिळवू शकते. अशा प्रकारे मिळालेले व्याज आणि अखर्चित रक्कम या संबंधित निधीत जमा होतील आणि वर्षाच्या सुरूवातीला स्वयंचलित पुन:वैधतेद्वारे संबंधित कार्यक्रम विभागाकडून योजनेच्या मान्यताप्राप्त कामासाठी प्राधिकृत केल्या जातील.

आयुक्त, दुग्ध विकास, वरळी, मुंबई यांचेकडील दस्तऐवजाच्या तपासणी (जुलै, २०१०) दरम्यान असे आढळून आले की, जरी सहायक अनुदानाची रक्कम ही १७ डिसेंबर, २००९ रोजी जमा केली होती तरी ४६ दुग्ध सहकारी संस्थांना रुपये ४६.३८ लक्ष प्रत्येकी याप्रमाणे १४ जुलै, २०१० रोजी वितरीत करण्यात आली होती. तसेच कृषी, पशु संवर्धन, दुग्धविकास आणि मत्स्यव्यवसाय विभागाकडून (विभाग) मिळालेल्या माहितीवरून असे आढळून आले की, ३१ मार्च, २०१३ पर्यंत दुग्ध सहकारी संस्थांनी फक्त रुपये १७.७० कोटीचा उपयोग केला होता. सहाय्यक अनुदान २०९ दिवस चालू खात्यात (बचत खात्यात ठेवण्याऐवजी) ठेवल्यामुळे रुपये ७४.२१ लक्षची व्याजाची हानी झाली.

लेखा परिक्षणात हे लक्षात आणून दिल्यावर (जानेवारी, २०१२) शासनाने नमुद केले (मार्च, २०१२) की, सहायक अनुदानाचा उपयोग करण्याबाबतच्या तपशिलावर मार्गदर्शक सुचना फेब्रुवारी, २०१० मध्ये प्राप्त झाल्या आणि योजनेच्या अंमलबजावणीची अंतिम मान्यता जुलै, २०१० मध्ये प्राप्त झाली होती. पुढे असेही नमूद केले होते की, महाराष्ट्र शासनाच्या २९ ऑगस्ट २००५ च्या सुचनांनुसार चालू खाते उघडण्यात आले होते. शासनाने पुढे असेही नमूद केले की, सहायक अनुदानावर व्याज मिळविण्याचा राज्याचा कुठलाही उद्देश नव्हता तर त्याचा लवकरात लवकर उपयोग व्हावा हाच उद्देश होता.

हे उत्तर असंबद्ध आहे कारण, केंद्र शासनाच्या ऑगस्ट, २००९ च्या निर्देशानुसार, आयुक्त दुग्धव्यवसाय यांनी सहायक अनुदानाची रक्कम ही बचत खात्यात ठेवायला हवी होती. असे न केल्यामुळे विभागाला रुपये ७४.२१ लक्ष रकमेची व्याजापोटी हानी झाली. तसेच, जरी वर्ष २००९-१० मध्ये सहायक अनुदानाची पूर्ण रक्कम उपयोगात आणायची होती तरी सहाय्यक अनुदानाची रक्कम चालू खात्यात ठेऊनही रुपये २१.६० कोटीपैकी फक्त रुपये १७.७० कोटी (८२ टक्के) एवढीच रक्कम मार्च २०१३ पर्यंत सहकारी दुग्ध सोसायट्यांकडून उपयोगात आणली गेली होती.

ज्ञापन :

महालेखापरीक्षकांच्या उपरोक्त अभिप्राया संदर्भात कृषि व पदुम, दुग्धव्यवसाय (दुग्धव्यवसाय) विभागाकडून प्राप्त झालेल्या स्पष्टीकरणात्मक ज्ञापनात खालीलप्रमाणे नमूद केले आहे:—

भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्या सन २०१२-१३ या वर्षाच्या आर्थिक क्षेत्र अहवालात परिच्छेद क्रं.३.१.५ यात व्याजाच्या नुकसानीसंबंधात आक्षेप घेण्यात आलेला आहे. या अनुषंगाने पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात येत आहे.

रा.कृ.वि.यो.अंतर्गत रक्कम रुपये २१.६० कोटी निधी दिनांक १७ डिसेंबर २००९ रोजी आयुक्त (दुग्ध) या कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी यांच्या चालू खात्यात जमा करण्यात आला होता. रा.कृ.वि.यो.राबविण्यासंदर्भात केंद्र शासनाच्या मागदर्शक सूचना ऑगस्ट, २००७ ला देण्यात आल्या होत्या. तथापि यात उपलब्ध होणारा निधी बचत खात्यात अथवा चालू खात्यात ठेवण्याबाबत कोणतीही सूचना केलेली नव्हती. रा.कृ.वि.यो. प्रमाणे राज्याचा एकत्रित निधी आयुक्त (कृषी) यांच्यकडे प्राप्त होतो व तद्नंतर आयुक्त (दुग्ध) या कार्यालयास सदर निधी वितरीत केला जातो. सदर निधी ज्यावेळी आयुक्त (दुग्ध) कार्यालयास प्राप्त झाला त्यावेळी आयुक्त कार्यालयात वित्त विभाग, शासन निर्णय दिनांक २९ ऑगस्ट २००५ अन्वये एकच बँक खाते हे स्टेट बँक ऑफ इंडिया या राष्ट्रीयकृत बँकेत (चालु खाते) उघडलेले होते. त्यामुळे सदर निधी त्याच चालु खात्यात जमा करण्यात आला होता.

सदर निधी या कार्यालयाच्या आहरण व संवितरण अधिकारी चालू खाते क्र.३००२४७०१४९४ यात जमा करण्यात आला होता. चालू खात्यावर बँक व्याज देत नसल्याने सदर निधीवर व्याज मिळविण्यासाठी बचत खाते अथवा मुदत ठेव योजनेअंतर्गत हा निधी ठेवण्यासाठी शासनाकडून दिनांक १ जानेवारी २०१० रोजीच्या पत्रान्वये परवानगी मागितली होती. तथापि अखर्चित निधीवर व्याज मिळणे हा शासनाचा उद्देश नाही असे शासनाने दिनांक २५ जानेवारी २०११ च्या पत्रान्वये कळविले. म्हणून सदर निधी चालू खात्यातच ठेवण्यात आला.

तरी महालेखापाल कार्यालयाने आक्षेप घेतल्यामुळे या कार्यालयाने बचत खाते उघडण्यासाठी दिनांक ३० ऑगस्ट २०१३, दिनांक १० ऑक्टोबर २०१३ व दिनांक २८ ऑगस्ट २०१४ रोजी शासनाकडून परवानगी मागविण्यात आली. प्राप्त होणा-या निधीवर व्याज मिळविण्यासाठी सदर रकमा बचत खात्यात ठेवण्याकरीता सहा.आयुक्त (लेखा) यांचे नावे स्वतंत्र बचत खाते उघडण्यास परवानगी शासनाने दिनांक ४ ऑक्टोबर २०१४ च्या पत्रान्वये बचत खाते उघडण्यासाठी परवानगी दिली. तद्नंतर या कार्यालयाने दिनांक २६ जून २०१५ रोजी सहा.आयुक्त (लेखा) यांचे नावे स्वतंत्र बचत खाते उघडण्यात आले आहे.

सदर निधी बचत खात्यात ठेवण्यास दिलेल्या परवानगीनुसार राष्ट्रीयकृत बँकेत (Canara Bank) बचत खाते उघडले असून त्यात रा.कृ.वि.यो.तील शिल्लक निधी वर्ग करण्यात आला आहे. सदर निधीवर आजपावेतो रुपये ६६.४२ लाख रुपयांपेक्षा अधिक रकमेचे व्याज प्राप्त झाले आहे. सदर निधी चालू खात्यात ठेवण्यात कोणाचाही वैयक्तिक स्वार्थ वा हेतू नव्हता. तसेच शासन आदेशानंतर लगेचच बचत खात्यात सदर निधी वर्ग करण्यात आला होता.

रा.कृ.वि.यो.योजनेंतर्गत एकात्मिक दुग्धशाळा प्रक्षेत्र व उपवन (IDFP) या प्रकल्पाअंतर्गत विदर्भ, कोकण व मराठवाडा या क्षेत्रातील २३ जिल्ह्यांत ४६ प्राथमिक सहकारी दुग्ध संस्थांना नोव्हेंबर, २००९ मध्ये शासनाकडून रुपये २१.६० कोटी प्राप्त होते. सदर प्रत्येक संस्थेसाठी शासन मान्यतेनुसार रु.४६.३८ लक्ष इतका निधी जुलै २०१० मध्ये वितरित करण्यात आला. सदरचे निधी वितरण नोव्हेंबर, २०१० मध्ये पुर्ण झाले. सदरच्या निधीतून प्रशासकीय खर्च व संनियंत्रणासाठी रु.०.२६.५२ कोटी इतका निधी विभागीय कार्यालये व जिल्हास्तरीय कार्यालये यांना देण्यात आला. सदरच्या सर्व निधी नोव्हेंबर, २०१० पर्यंत संपूर्ण वितरित करण्यात येऊन खर्च झाला असून प्रकल्प पूर्ण झाला आहे. तरी उपरोक्त वस्तुस्थितीचा विचार करता सदर परिच्छेद वगळण्यात यावा ही विनंती.

३.३ परिच्छेद क्र.३.१.५. " व्याजाची हानी " :

साक्ष :

